महाराष्ट्र महिला.

पुस्तक १ लें—पूर्वार्ध.

[जान्युआरीपासून जूनपर्यंत.]

१९०१.

संपादिका—श्रीमती सौ. मनोरमाबाई मित्र.

प्रकाशक

मनोरंजक ग्रंथप्रसारक मंडळी.

निर्णयसागर छा० खा०] मुंबई. [किंमत ५-४-०.

विषयानुक्रम.

महाराष्ट्र महिला.

महिलेसंबंधीं दोन शब्द.

फार दिवसांचा हेतु सिद्धीस जाऊन ज्याच्या मंगल कृपाप्रसादानें महिलेला आपल्या भगिनींच्या भेटीचा आज हा सुयोग प्राप्त झाला आहे, त्या जगत्पालक प्रभूचे पदीं नम्र होऊन व त्याचप्रमाणें परमपूज्य अशा गुरुजनांपाशीं कृपापूर्ण आशीर्वादाची याचना करून मी हें महत्कार्य शिरावर घेण्याचें धाडस करित आहें. ज्या भाग्यशाली महाराणीच्या कृपाछत्राखालीं आह्मां स्त्रियांची थोडीबहुत उन्नति होऊन आह्मांला विद्या आणि ज्ञानसंपादनाचीं साधनें सुलभ झालीं आहेत, त्या आमच्या परम कृपाळु महाराणी साहेबांविषयीं महिलेनें कितीहि कृतज्ञबुद्धि दर्शविली तरी ती थोडीच होणार आहे.

आज आमचा समाज सर्वच बाबतींत पुरुषसमाजाच्या मागें पडला आहे. त्यांत शिक्षणासंबंधीं तर बोलावयासच नको! आपल्या लेखनचातुर्यानें सर्व समाजालाहि हलवून सोडणाऱ्या पाश्चिमात्य देशांतील स्त्रीलेख-कांची गोष्ट दूरच राहिली, परंतु ज्यांनां चार ओळी साधारणपणें शुद्ध लिहितां येतील, अशा स्त्रियाहि आज मितीस आह्मांमध्यें फारच थोड्या आहेत. तेव्हां अशा स्थितींत केवळ स्त्रियांनींच स्वतंत्रपणें असें एखादें मासिक पुस्तक चालविणें ह्मणजे खरोखरच धाडसाचें काम आहे. त्यांत माझें स्वताचें शिक्षणहि बेताचेंच झालेलें असल्यामुळें दुसऱ्या कोणाकडूनहि मदतीची अपेक्षा न करितां मी एकटीनेंच हें कार्य सुरळीतपणें चालवूं पहाणें ह्मणजे अगदींच अशक्य गोष्ट आहे.

परंतु या गोष्टीचा मी विचारच करित नाहीं; कारण या मोठ्या जबाबदारीच्या कामीं माझी सर्व भिस्त माझ्या उदार आणि विद्वान् बंधूंवर आणि त्याचप्रमाणें माझ्या सुशिक्षित आणि प्रेमळ भगिनींवर आहे. मीं माझ्या अल्पबुद्धीनें आरंभिलेल्या या महत्वाच्या कार्यांत मला सर्व प्रकारें साह्य आणि उत्तेजन देऊन माझ्या बंधुभगिनी महिलेवर सदोदित दयार्द्र दृष्टि ठेवितील, असा मला पूर्ण भरंवसा आहे.

आह्मी स्त्रिया सर्व बाबतींत खरोखरच अबला आहों. पुरुषांचें पाठबळ असल्याविना आमच्या हातून कोणतीहि महत्वाची गोष्ट नीटपणें तडीस जाणें शक्य नाहीं. अर्थात् महिलेलाहि माझ्या विद्वान् बंधूंचें भरपूर पाठबळ असल्याशिवाय चालावयाचें नाहीं. ही गोष्ट लक्ष्यांत आणूनच माझ्या बऱ्याच हितचिंतक बंधूंनीं साह्य करण्याविषयींचें मला पूर्ण आश्वासन देऊन विशेष आग्रह केल्यामुळेंच हें माझ्या शक्तीच्या पलीकडचेंहि काम करण्याला मी धजत आहें.

आतां कोणत्या विशिष्ट हेतूसाठीं महिलेनें जन्म घेतला आहे, हें महिलेनेंच क्रमाक्रमानें सांगितलेलें बरें. तथापि याठिकाणीं मी फक्त एवढेंच सांगतें कीं, वेदांनीं आणि शास्त्रांनीं स्त्री हें पुरुषाचें अर्धांग असें मानिलें आहे. स्त्री आणि पुरुष मिळून देहाचें पूर्णत्व मानिलें आहे. तेव्हां या स्त्रीरूपी अर्धांगाची शारीरिक, मानसिक व सर्व प्रकारें उन्नति व्हावी, हें अर्धांग दुसऱ्या अर्धांगाला पूर्णपणें शोभेल, कोणत्याहि प्रकारें विसंगत दिसणार नाहीं, असें करण्याचा पवित्र हेतु मनांत भरून तत्प्रीत्यर्थ यथाशक्ति प्रयत्न करण्यास महिला कायावाचामनें करून झटेल.

जग हें दिवसेंदिवस पुढें पुढें चाललें आहे. कालमानाप्रमाणें प्रत्येक गोष्टींत थोडीबहुत सुधारणा ही झालीच पाहिजे. या स्त्रीपुरुषरूपी देहाच्या अर्ध्याच अंगाची– अर्थात् फक्त पुरुषवर्गाची–योग्य जोपासना करून दुसऱ्या अर्ध्या अंगाची ह्मणजे स्त्रीवर्गाची अगदींच अनास्था करून चालावयाचें नाहीं.

असें करणें हें शास्त्रदृष्टयाहि घातक आहे. त्यामुळें जोपासना केलेल्या अर्ध्या भागाचीहि हानि होऊन शेवटीं एकंदर देहाचीहि खराबी झाल्याविना रहाणार नाहीं, आणि याचा थोडा बहुत अनुभवहि आपल्यास येत आहे. ही स्थिति सर्वथा अनिष्ट आहे हें हळू हळू प्रत्ययास येऊन ही सुधारण्याविषयीं थोडेबहुत प्रयत्नहि चालले आहेत व ही खरोखरच मोठ्या आनंदाची गोष्ट आहे. येथील 'आर्यमहिलासमाज' व 'लेडीजसोशलक्लब,' सोलापुर येथील 'सरस्वतीमंदिर,' उमरावती येथील 'वनितासमाज,' पुणें येथील 'ब्राह्मिकासमाज' इत्यादि संस्था ह्मणजे याच स्तुत्य प्रयत्नांचीं फळें आहेत. अशा प्रकारच्या संस्था निदान प्रत्येक मोठमोठ्या शहरीं तरी स्थापन व्हाव्या; त्यांचें एकमेकांशीं दळणवळण सुरू होऊन आमच्या एकंदर सुशिक्षित स्त्रीसमाजांत एकप्रकारची सहानुभूति उत्पन्न व्हावी; परस्परांस परस्परांनीं अंतःकरणपूर्वक साह्य करावें व याप्रमाणें कोणतेंहि कार्य जुटीनें करण्यास आह्मी समर्थ व्हावें, हा महिलेचाहि हेतु आहे. तेव्हां या आणि अशाच प्रकारच्या दुसऱ्याहि स्त्रीसमाजांकडून सर्व प्रकारें साह्य आणि प्रोत्साहन मिळण्याची महिलेनें आशा केल्यास ती विफल होणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

आह्मा स्त्रीवर्गाची उन्नति व्हावी, आमची वास्तविक योग्यता आह्मांस कळून पुरुषवर्गाला प्रत्येक कामीं आमच्याकडून खरें खरें साह्य व्हावें, यासाठीं बरेच प्रयत्न चालले आहेत. तेव्हां अशावेळीं आपणहि या कामाला यथाशक्ति हातभार लावावा, याच हेतूनें महिला आपल्या बंधुभगिनींकडे येत आहे. महिलेच्या वाचकभगिनी तर तिचें प्रेमानें आणि कौतुकानें प्रतिपालन करितीलच, परंतु माझ्या सर्व बधूनांहि माझी नम्र विनंति आहे कीं, त्यांनींहि महिलेकडे सदैव उदार आणि कृपापूर्ण दृष्टीनेंच पहावें.

सुशीला.

कांहीं वर्षांमागें एका शहरामध्यें विष्णुपंत या नांवाचे एक मध्यम स्थितींतील कुलीन गृहस्थ रहात असत. त्यांनां गांवांतीलच एका व्यापाऱ्याकडे कारकुनीची नोकरी असून दरमाहा पंधरा रुपये पगार होता. विष्णुपंतांनां दोन मुलगे व सुशीला नांवाची एक मुलगी. अशीं तीन मुलें होती. सुशीला रंगानें किंचित् काळीसांवळी होती खरी, परंतु तिच्या देहाची एकंदर रचना आणि सर्व अवयवांची नीटनेटकी ठेवण, हीं इतकीं कांहीं मोहक होतीं कीं, पहाणाराला एकसारखें तिच्याकडे पहातच रहावें, असें वाटे. रूपापेक्षांहि तिचे गुण तर अधिकच सुंदर होते. आईनें मोठ्या आवडीनें तिला दिलेल्या 'सु-शीला' या नांवाचें अगदीं लहानपणापासून तिनें खरोखरच सार्थक्य केलें होतें. सुशीला चार पांच वर्षांची होतांच तिनें आपल्या सुशील स्वभावानें आणि निर्मळ आचरणानें खुद्द आपल्या आईबापांचेंच केवळ नव्हे, तर शेजाऱ्यापाजाऱ्यांचेंहि प्रेम संपादिलें होतें.

सुशीला सहा वर्षांची होतांच ती म्युन्सिपालिटीच्या मुलींच्या शाळेंत जाऊं लागली. शाळेंतहि लवकरच तिनें आपलें नांव काढलें. थोडक्या दिवसांच्या आंतच सुशीला शाळेंतील सर्व शिक्षकिणींचें प्रेम संपादन करून मन लावून झटून अभ्यास करूं लागली. अगदीं अल्पावकाशामध्यें शाळेंत ती इतकें कांहीं शिकली कीं, इतर मुलींनां तेवढ्या वेळांत सुशीलेच्या शतांशाएवढेंहि ज्ञान झालें नसतें.

सुशीला दररोज मोठ्या पहांटेस उठून शाळेंतील अभ्यास करित असे. अभ्यास करण्यास किंवा असेंच दुसरें कसलेंहि काम करण्यास सर्व वेळांत पहांटेचा वेळ फारच उत्कृष्ट असतो, असें सुशीलेच्या आईनें तिला सांगितलें होतें. सुशीलाच एकटी दररोज पहांटेस उटत नव्हती, तर सुशीलेच्या घरची एकूनएक मंडळी उठून आपापल्या कामास लागत असे. दररोज नेमानें पहांटेस उठल्यानें शरीरांतील आळस नाहींसा होऊन मनास उत्साह

वाटतो, व कोणतेंहि काम चांगल्या प्रकारें होत असतें, याचा विष्णुपंतांच्या कुटुंबांतील सर्व मंडळीस चांगला अनुभव होता. विष्णुपंत मध्यम स्थितींतील गृहस्थ होते, हें वर सांगितलेंच आहे. अर्थात् त्यांचे घरीं गडी मोलकरणी इत्यादिकांचा त्रास मुळींच नव्हता, हें निराळें सांगावयास नकोच. घरांतील एकंदर काम लक्ष्मीबाई जातीनेंच करित असत. दररोज पहांटेस उठून प्रातर्विधि आटोपून त्या घराची झाडलोट व सडासारवण करीत, व बाहेर दिसतें न दिसतें तोंच आपलें स्नान उरकून सुशीलेला आंघोळ घालीत. प्रत्येक लहानमोठ्या गोष्टीमध्यें सुशीलेचें आपल्या आईला साह्य असे. शाळेंतील धडे पाठ केल्यावर ती आपल्या आईला मदत करण्यासाठीं तिच्याजवळ येई व तिच्या हाताखालीं प्रत्येक लहानसहान काम करी. सहा साडेसहांचे सुमारास घरांतील एकंदर भांडीं व आपलीं दोघींचीं धुणीं घेऊन सुशीला व तिची आई नदीवर जात. घरांतील एकंदर चीजवस्त सुशीलेची आई सकाळ संध्याकाळ घांसून पुसून लख्ख ठेवित असे. या कामांतहि सुशीलेचें तिला पूर्ण साह्य असे. सुशीलेची आई गृहकृत्यांत अगदीं दक्ष असे. घरांतील प्रत्येक काम वेळच्या वेळीं होण्याकडे आणि प्रत्येक वस्तु जागच्याजागीं ठेवण्याकडे ती आपलें इतकें कांहीं लक्ष्य पुरवी कीं, तिच्या या उत्तम वर्तनाचा इष्ट परिणाम तिच्या सद्गुणी मुलांवर फारच चांगल्या प्रकारें घडला होता. या बाबतींत तीं आईपेक्षांहि कांकणभर जास्त कसास उतरलीं होतीं, असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

सात साडेसातांच्या सुमारास वेणीफणी करून मुलांना आणि नवऱ्याला स्नानास पाणी काढून दिल्यावर सुशीलेची आई स्वयंपाक घरांत जात असे. स्वयंपाकासंबंधींचें किरकोळ काम सुशीलेची आई नेहमीं सुशीलेकडूनच करवून घेई व प्रत्येक गोष्ट तिला ममतेनें शिकवी. यामुळें सहासात वर्षांतच सुशीलेला स्वयंपाकाची साधारण बरीच माहिती झाली होती. आई विटाळशी झाल्यावेळीं प्रत्येक महिन्यास आईच्या देखरेखीखालीं सुशीलाच स्वयंपाक करित असे. स्वयंपाकाचेंच नव्हे, घरांतील बहुतेक काम अगदीं

अल्पवयांतच सुशीलेला चांगल्याप्रकारें करितां येऊं लागलें होतें. तिच्या आईनें लहानपणापासून तिला असेंच शिक्षण दिलें होतें. मुली शाळेंत जाऊं लागल्या ह्मणजे त्या शाळेंत जात आहेत तोंपर्यंत त्यांनां घरांतील कोणत्याच कामास लावावयाच्या नाहींत, असा जो कित्येक आईबापांचा वेडा समज असतो, तसा सुशीलेच्या आईचा मुळींच नव्हता. घरचें काम पहिल्यानें आणि मग इतर गोष्टी, असा तिचा समज असून तसें आचरणहि होतें. 'मुलगी मोठी पंडिता झाली, परंतु तिला घरचें कांहींच काम जर समजत नाहीं, तर तिचें तें पांडित्य काय जाळायचें आहे!' असें ती वारंवार ह्मणत असे. मुलींनां आईबापांनीं पंडिता करावयाच्या नसतात, त्यांनां सुगृहिणी बनवावयाच्या असतात. आतां सुगृहिणी व्हावयाला प्रत्येक मुलीला लिहितां वाचतां येणें आवश्यक आहे हें खरें, व प्रत्येक मातेनें आपल्या मुलीला लिहिणेंवाचणें शिकविलेंच पाहिजे; परंतु मुलींनां फक्त शाळेंत पाठवून त्यांच्याकडून एकसारखीं पुस्तकें घोंकून घेऊन घरांतील कामांकडे त्यांचें अगदींच दुर्लक्ष्य होऊं देणें, हें फार घातक आहे. मुलगी चांगली शिकलेली आहे, परंतु तिला घरांतलें कांहींएक कळत नाहीं, तर बिचाऱ्या गरीब नवऱ्याच्या घरीं तिचा काय उपयोग? श्रीमंतांची गोष्ट सोडून द्या. ते घरांतल्या कामास दुसरीं माणसें ठेवूं शकतील, परंतु आजकाल श्रीमंतांपेक्षां गरीबांचीच संख्या निदान आपल्या देशांततरी जास्त आहे. तेव्हां गरीब नवऱ्याच्या घरांतलें काम त्याच्या बायकोकडून जर होणार नाहीं, तर त्याची पुढें वाट काय? त्यानें घरांतल्या कामासाठीं आणखी दुसरी बायको करावयाची कीं काय? बायको जी करावयाची असते ती तिनें घर संभाळावें ह्मणून. परंतु, आजकाल आमच्या बहुतेक आईबापांचें इकडे दुर्लक्ष्य होऊन तीं आपल्या मुलींचा संसार बिघडवूं लागलीं आहेत. मुलींकडून सारा दिवस पुस्तकें घोकून घेऊन त्यांनां संसारांतील कामापासून अगदींच अलिप्त ठेवित आहेत व याचे वाईट परिणाम घरोघरीं जरी नसले तरी पुष्कळ ठिकाणीं दिसून येत आहेत. प्रत्येक आईबापांचें अवश्य कर्तव्य हें आहे कीं, त्यांनीं

मुलींनां शाळेंतील शिक्षण अवश्य द्यावेंच, परंतु त्यापेक्षांहि घरच्या शिक्षणाकडे जास्त लक्ष्य पुरविलें पाहिजे. अशा प्रकारचे सुशीलेच्या आईचे विचार असल्यामुळें, सुशीला घरांतील प्रत्येक गोष्टीमध्यें अल्प वेळांतच तरबेज झाली होती, यांत कांहीं नवल का होतें?

भोजन झाल्यावर दहा वाजतां सुशीला आपल्या भावांबरोबर शाळेंत जात असे. सुशीलेला तिच्या शाळेंत पोंचवून तिचे भाऊ नंतर आपल्या शाळेंत जात व संध्याकाळीं परत येतांना तिला बरोबर घेऊन येत. दररोज नियमित वेळीं शाळेंत जाऊन सुशीला आपल्या शिक्षकीणबाईस वंदन करी, व नंतर आपल्या अभ्यासास लागे. आदल्या दिवशीं समजावून दिलेले धडे सुशीला पहांटेस तोंडपाठ करून येत असल्यामुळें शिक्षकीणबाईनीं विचारतांच ते ती ह्मणून दाखवी; यामुळें शिक्षकीणबाई सुशीलेवर नेहमीं संतुष्ट असत व पुढचे धडे त्या सुशीलेला मोठ्या प्रेमानें समजावून देत. शिक्षकीणबाई समजावून सांगत असतांना कित्येक भिडस्त पण खुळ्या मुली, शिक्षकीणबाईनीं 'समजलें कीं नाहीं' ह्मणून विचारतांच शिक्षकीणबाईला व वर्गांतील इतर मुलींनां आपण मूर्ख आहों असें वाटू नये, ह्मणून आपल्याला बरोबर न समजलेला भागहि ज्याप्रमाणें समजल्याविषयींचें खोटेंच सांगतात, तसा वेडेपणा सुशीला कधींहि करित नसे. तिला न समजलेला भाग ती पुनः पुनः विचारी व आपली पक्की खात्री होईपर्यंत स्वस्थ ह्मणून बसत नसे. आणि सुशीलेच्या या प्रश्नांबद्दल शिक्षकीणबाईनां कधींहि वाईट वाटत नसे. उलट सुशीलेचा हा प्रशंसनीय ज्ञानाभिलाष पाहून त्या तिच्यावर फार लोभ करीत. सुशीलेचा अभ्यास तिच्या वर्गांतील एकंदर मुलींत सर्वांत उत्तम असून वर्गांत तिचा नेहमीं पहिला नंबर असे. सुशीला आपल्या वर्गांतील मुलींनां अडलेला भाग नेहमीं मनापासून समजावून देई व ज्या कित्येक खुळ्या मुली शिकण्याकडे दुर्लक्ष्य करीत, त्यांस मधुर भाषणानें सदुपदेश करून त्यांच्याकडून ती अभ्यास करवून घेई. यामुळें वर्गांतील सर्व मुलींनांहि ती फारच प्रिय झाली होती. सुशीला जसें सांगेल तसें करण्यास वर्गांतील सर्व मुली

नेहमीं तयार असत. सुशीलेच्या सांगण्याबाहेर त्या कधींहि जात नसत. फार काय सांगावें, कित्येक दुष्ट स्वभावाच्या मुली मनांतून सुशीलेचा जरी अत्यंत मत्सर करीत, तरीहि सुशीलेच्या सुशील स्वभावानें आणि त्यांच्याशीं ती ठेवित असलेल्या प्रेमळ आचरणानें त्या इतक्या कांहीं लज्जित होत कीं, एक दिवसहि सुशीलेला टाकून बोलण्याचें त्यांनां धैर्य होत नसे.

सुशीलेच्या शाळेंतील मुख्य शिक्षकीणबाई फारच सज्जन होत्या. शाळेंत शिकण्यासाठीं येणाऱ्या सर्व मुलींनां त्या आपल्या पोटच्या मुलींसारख्या वागवित असत व त्यांच्या कल्याणाविषयीं रात्रंदिवस काळजी वहात. इतर शाळांप्रमाणें नेमलेले विषयच शिकवून त्या स्वस्थ बसत नसत. वाचन, लेखन, गणित, इतिहासभूगोल, कविता, व्याकरण इत्यादि विषय त्या मुलींस शिकवीतच; परंतु यांशिवाय नीतिशास्त्र, धर्मशास्त्र, स्वयंपाक, कशिदा, शिवणकाम इत्यादि स्त्रियांस अत्यंत उपयुक्त असलेल्या विषयांकडे त्यांचा विशेष भर असे. शाळेंतील मुलींच्या कल्याणाकडे त्यांचें विशेष लक्ष्य पाहून त्यांच्याविषयीं त्यांच्या वरिष्ठांचा फारच चांगला ग्रह झाला होता; व त्याचप्रमाणें गांवांतील सर्व मंडळी त्यांनां फार पूज्य मानून हरएक गोष्टींत त्यांनां साह्य करी. त्यांनीं आपल्या शाळेंमध्यें अशी कांहीं उत्तम शिस्त लावून दिली होती कीं, मुलींनां शाळेंत पाठविणें हें पाप आहे, असें मानणाऱ्या कैक स्त्रियांनीं आपल्या मुली या शाळेंत पाठविल्या होत्या इतकेंच नव्हे, तर अशा शाळेंत मुलींनां न पाठविणें हेंच खरोखर पाप आहे, असें त्यांनां वाटूं लागलें होतें.

शाळेंतील नेहमींचे विषय झाल्यावर वर्गांतील सर्व मुलींनां कशिदा, शिवणकाम शिकविण्यांत येई. सर्व मुली कशिदा काढित बसत व शिक्षकीण-बाई किंवा सुशीला, स्त्रियांकरितां उपदेशपर असें एखादें पुस्तक घेऊन तें वाची व सर्व मुली कशिदा काढतां काढतां तें ऐकत. वाचलेला भाग बरोबर समजला आहे कीं नाहीं, हें पहाण्याकरितां मधून मधून शिक्षकीणबाई मुलींस प्रश्न विचारीत. याप्रमाणें हंसून खेळून कशिदा आणि नीति यांचें शिक्षण देण्यांत येई. नंतर मग सर्व मुली बाहेर झाळेच्या

सभोंवतीं असलेल्या बागेंत जात. शाळेच्या सभोंवार बरीच जागा होती. तींत वरिष्ठांच्या परवानगीनें आणि गांवांतील लोकांच्या साह्यानें शिक्षकीण बाईनीं एक सुंदर फुलबाग केली होती. या बागेंत, गुलाब, शेवंती, जाई, जुई, बटमोगरा, कुंदप्रभृति फुलझाडें; मुळे, शेपू, मेथी, चवळी इत्यादि पालेभाज्या व दुसरीं अशींच कित्येक शोभिवंत आणि संसारांत नेहमीं उपयोगीं पडणारीं फुलझाडें वगैरे लाविलीं असून दररोज त्या झाडांची जोपासना करण्यांत येत असे. जमीन खणण्याकरितां, गवत उपटण्याकरितां व त्याचप्रमाणें झाडांची खच्ची वगैरे करण्याकरितां गांवांतील सभ्यलोकांच्या साह्यानें शिक्षकीणबाईनीं बरींच हत्यारें जमविलीं होतीं. या बागेंत सर्व मुली जमल्यावर प्रत्येकीकडून आळीपाळीनें निरनिराळ्या झाडांची शुश्रूषा करवून घेण्यांत येई. स्वतः शिक्षकीणबाई या कामीं प्रत्येक मुलीस मदत करीत व सांगण्यासारखी माहिती सांगत असत. मुली बागेंत काम करित असतां महाभारत, रामायण यांसारख्या एखाद्या नीतिपर ग्रंथांतील मनोरंजक आणि बोधप्रद गोष्ट शिक्षकीणबाई मुलींनां सांगत असत. यायोगें मनास करमणूकच्या करमणूक होऊन शरीरास योग्य व्यायाम घडे व यामुळें सर्वांच्या प्रकृति नेहमीं सुरेख रहात. शिवाय कृषिकर्मविद्येचें फारच उपयुक्त ज्ञान अनायासें मुलींनां होत असे. जमिनीचा एक एक लहान तुकडा प्रत्येक मुलीच्या हवालीं करण्यांत आला होता. त्या तुकड्यांत प्रत्येकीनें निरनिराळीं फुलझाडें, भाज्या वगैरे लावून त्यांची व्यवस्था तिनेंच ठेवावयाची, असा क्रम असे. सर्व मुली ईर्षेनें आपापला तुकडा सर्वांत उत्तम करण्याविषयीं झटून मेहनत करीत. सुशीलेचा तुकडा सर्वांत जास्त सुरेख असून नेहमीं फुलांनीं शृंगारलेला असे. बागेची व्यवस्था पहाण्याकरितां एक माळी ठेविला होता. तो मुलींनां कृषिकर्मविद्येची बरीच माहिती समजावून देत असे.

शाळेंतून घरीं आल्यावर आईनें कांहीं खावयास दिल्यास तें खाऊन थोडा वेळ विसांवा घेऊन सुशीला वाडींतल्या मुलांमुलींबरोबर खेळा-

वयास जाई. ज्याच्या योगें शरीरास व्यायाम घडून मनास प्रसन्नता वाटेल, अशा प्रकारचे मुलींनां शोभण्यासारखे खेळ सुशीला खेळत असे. सुशीलेचा सर्वांत आवडीचा खेळ ह्मटला ह्मणजे भातकुलीचा. बहुतकरून प्रत्येक रविवारीं वाडींतील लहानमोठ्या सर्व मुलींनां गोळा करून सुशीला हा भातकुलीचा खेळ खेळत असे. सर्वांच्या लहान लहान बाहुल्या शृंगारावयाच्या, त्यांचीं लग्नें करावयाचीं, लग्नांतले थाटमाट, रुसणीं फुगणीं, हळदकुंकू, भोजनसमारंभ, वरात वगैरे वगैरे नानाप्रकारची मौज करावयाची. दरखेपेला नवीन नवीन सुधारणा करून सुशीला हा खेळ खेळत असे. या भातकुलीच्या खेळानें मुलींनां पुढील संसाराची बरीच ओळख होऊन पुष्कळशी अवश्य माहितीहि कळून येते, असें सुशीलेची आई एकवेळ ह्मणाली होती; तें सुशीलेनें धानांत ठेवून ती नेहमीं नेहमीं हा खेळ खेळे. कित्येक खुळ्या मुली या खेळांत जे कित्येक वेडेवेडे प्रकार करित असतात, ते सुशीला मुळींच करित नसे. एखादी मुलगी तसें करूं लागल्यास मधुर भाषणानें तिची समजूत करून त्या गोष्टीचा ती तिरस्कार करी. सुशीलेविषयीं सर्व मुलींच्या मनांत मोठा आदर असल्यामुळें सुशीलेनें नको ह्मटलेली गोष्ट करण्याविषयीं कोणींहि आग्रह धरित नसे. खेळतेवेळीं सुशीला कोणाबरोबर केव्हांहि भांडत नसे इतकेंच नाहीं, तर एखादी मुलगी वर्दळीस आल्यास तिच्या जवळ जाऊन तिच्या खांद्यावर हात टाकून प्रेमानें गोड भाषण करून ती तिची समजूत करी व सर्व आनंदानें खेळत. खेळामध्यें सुशीला असतांना कधीं एक्र दिवसहि जोराचें तंटाभांडण होत नसे. यामुळें सर्व मुलींचें सुशीलेवर फारच प्रेम जडलें होतें. सुशीला सांगेल त्याप्रमाणें सर्व मुली वागत असत. वाडींतील कोणी बाई अगर मूल आजारी असल्याचें कळतांच सुशीला खेळ तसाच सोडून देऊन त्या दुखणेकऱ्याच्या समाचारास जात असे व आपल्या हातून होण्याजोगी त्याची सेवाचाकरी मनोभावानें करित असे. सुशीलेची मधुर वाणी ऐकून आणि ती घेत असलेली कळकळ पाहून आजाऱ्याच्या

जीवास फार समाधान होई. वाडींतल्या कित्येक बायका घरचें काम-काज आटोपल्यावर उगीच भलत्यासलत्या चकाट्या पिटीत बसत; तें पाहून सुशीलेला फार वाईट वाटे. ह्मणून आपल्या शिक्षकीणबाईकडून स्त्रियांनां उपदेशपर असें एखादें मनोरंजक पुस्तक मागून घेऊन तें त्या बायांनां वाचून दाखवून सुशीला त्यांचें मनोरंजन करी. पुढें पुढें तर या बाय-कांस सुशीलेचें अगदीं वेडच लागून गेलें होतें. सुशीलेला सुटी मिळतांच वाडींतील लहानमोठ्या एकूनएक स्त्रिया एके ठिकाणीं जमून तिच्याकडून कांहींतरी वाचवून तें मोठ्या आदरानें ऐकत असत. सुशीलेच्या सुशील स्वभावामुळें वाडींतील सर्व स्त्रिया सुशीलेवर आपल्या पोटच्या लेंकराप्रमाणें प्रेम करीत.

सुशीलेचें गरीब दुबळ्या मुक्या प्राण्यांवरहि पराकाष्ठेचें प्रेम असे. आप-ल्याला जशी तहान भूक लागते तशीच त्यांनांहि लागते, आपल्याला जसें सुखदुःख होतें तसेंच त्यांनांहि होतें, हें सुशीलेला पूर्णपणें ठाऊक असल्या-मुळें ती मुक्या जनावरांची फारच काळजी घेई. कित्येक दुष्टस्वभावी मुलां-प्रमाणें या प्राण्यांनां यातना देण्यांत सुशीलेला मुळींच आनंद वाटत नसे. एखादा मुलगा या मुक्याजनावरांचा छळ करित असतां सुशीलेच्या दृष्टीस पडल्यास ती त्याचा निषेध करी व साधल्यास त्या बिचाऱ्या गरीब प्राण्याचें दुःख कमी करण्याचा प्रयत्न करी. एके दिवशीं सुशीला आपल्या भावांबरोबर शाळेंतून घरीं येत होती, तों वाटेंत कांहीं खोडकर मुलें एकत्र जमलीं आहेत व एका अगदीं मरणोन्मुख होऊन पडलेल्या मांजराच्या पोराला काठीनें टोंचित आहेत व त्याचा छळ करित आहेत, असें तिच्या दृष्टीस पडलें. मांजराच्या पोराचे ते हाल पाहून सुशीलेचें कोंवळें अंतःकरण कळवळलें. बिचारें तें मांजराचें दुर्दैवी पोर करुणाजनक मंदस्वरानें कण्हत होतें व भुकेनें आणि रोगानें त्याचा अगदीं अस्थिपंजर होऊन राहीला होता. त्याची ती स्थिति पाहतांच सुशीलेचे डोळे भरून आले. तिनें तेथें जमलेल्या मुलांच्या मनांत असा निष्ठुरपणा करणें हें मोठें पाप आहे, असें

बिंबविलें व त्यांची चूक त्यांनां समजावून दिली. इतकेंच करून ती थांबली नाहीं. त्या मांजराचे पोरास आपल्या घरीं नेण्याविषयीं सुशीलेनें आपल्या भावांस सांगितलें. सुशीलेची ही फाजील दया पाहतांच त्यांतील एक मुलगा ह्मणाला "सुशीले, हें पोर तर मला वाटतें आणखी एका तासाचे आंत मरून जाईल. कावळ्यांनीं बोंचून बोंचून याला अर्धमेलें केलें आहे. याला घरीं नेऊन काय उपयोग! त्या दिवशीं परसांत सांपडलेलें पोपटाचें पिल्लूं तूं असेंच नेलें होतेंस. त्याची खूब काळजी घेऊन त्याला खाऊंपिऊं घातलेंस, त्याची खूब बरदास्त ठेविलीस, परंतु पुढें काय! त्याच्या अंगांत साधारण शक्ति येऊन तें आतां कुठें बोलूं लागणार, तोंच त्याला आकाशांत सोडून दिलेंस. अशी निरर्थक मेहनत करण्यांत मला तरी कांहीं अर्थ दिसत नाहीं. कोणीं फुलपांखरूं धरलें कीं 'अरे त्याला सोड सोड, त्या बापड्याचे हाल केल्यास देवाला राग येईल. असा निष्ठुरपणा करणें चांगलें नव्हे.' असा तूं एकसारखा आकांत करतेस व पांखराला सोडल्याविना तुझ्या जिवाला चैन ह्मणून पडत नाहीं. मी त्या दिवशीं आमच्या शेजारच्या विनूला मैनेचें एक पोर धरून दिलें होतें; थोडेंसें मोठें झाल्यावर कसें सुरेख गाऊं लागलें असतें ह्मणून सांगूं! पण तूं केवढी शहाणी! तूं आपली विनूला कांहींतरी समजावून त्याला सोडून देवविलेंस! आतां हें मांजराचें पोर घरीं नेऊन तूरी काय करणार? असेंच याला खाऊंपिऊं घालून हें चांगलें गुटगुटीत झालें ह्मणजे कोणाला तरी देऊन टाकणार, असेंच कीं नाहीं! असल्या नसल्या उठाठेवी तुला सांगितल्या आहेत तरी कोणीं? मरेना कां हें येथच्या येथेंच!"

आपल्या सोबत्याचे हे निष्ठुर उद्गार ऐकून सुशीलेनें त्याचा धिक्कार न करितां गोड भाषणानें त्याचें मन वळविलें आणि सर्वांनीं मिळून तें पोर घरीं नेलें. घरीं जातांच त्या पोराची सगळी हकीकत सुशीलेनें आपल्या आईस सांगितली. ती ऐकून आईच्या अंतःकरणासहि कळवळा येऊन ती सुशीलेला मोठ्या प्रेमानें ह्मणाली "तूं याला जशी घेऊन आली आहेस, तशी याची काळजी घे, ह्मणजे झालें."

आईच्या आज्ञेप्रमाणें सुशीला त्या पोराची फारच काळजी घेऊं लागली. ती दररोज गरम पाण्यानें त्याचें अंग धुई, चमच्यानें त्याला दूध पाजी, इतकेंच नव्हे तर त्याच्यासाठीं मुद्दाम एका सुरक्षित जागीं एक लहानसा बिछाना करून त्याच्या अंगाभोंवतीं गरम कपडे गुंडाळून त्याला निजवित असे. सुशीलेच्या या कळकळीच्या शुश्रूषेनें तें मांजरूं लवकरच रोगमुक्त झालें इतकेंच नाहीं, तर असें कांहीं गोजिरवाणें दिसूं लागलें कीं, प्रत्येकजण त्याला उचलून घेऊं लागलें. तें पाहून सुशीलेला फारच समाधान होई. जात्या क्रूर स्वभाव असतांहि सुशीलेच्या मातृवत् स्नेहानें तें मांजरूं पुढें इतकें कांहीं सालस आणि आज्ञाधारक होऊन गेलें कीं, सुशीलेच्या इच्छेप्रमाणें तें वागत असे. असो.

बाहेरून खेळून आल्यावर सुशीला व तिचे भाऊ शाळेंत नेमून दिलेला अभ्यास करावयास बसत. सुशीला कठीण धड्यांचा अर्थ भावांकडून समजून घेऊन आपले सर्व धडे झटपट आटोपून टाकी व नंतर स्वयंपाकघरांत आईस मदत करण्यास जात असे. इतक्यांत बाहेरून विष्णुपंतांची येण्याची वेळ होई. ते घरीं येतांच एकंदर मुलें व लक्ष्मीबाई हास्यमुखानें त्यांनां दाराशीं सामोरीं येत. थकूनभागून घरीं आलेल्या विष्णुपंतांनां आपल्या साध्वी भार्येचें आणि सद्गुणी मुलांचीं प्रफुल्ल मुखें पाहून व त्याचप्रमाणें घरांत जिकडे-तिकडे अगदीं स्वच्छ व नीटनेटकेपणा पाहून जो कांहीं आनंद होई, तो वर्णन करून सांगतां येणार नाहीं. त्यांची जरी फार गरिबीची स्थिति होती तरी ईश्वरानें आपल्यास अशा या सुखदायक गरिबींतच सदैव ठेवावें, आपल्याला ती दुःखदायक श्रीमंती नको, असें ते वारंवार मनांत म्हणत असत. असो. नंतर लवकरच सातसाडे सातांचे सुमारास सर्व मंडळी जेवावयास बसे. जेवण उरकल्यावर या सर्व मंडळीच्या माजघरांत एकत्र बसून कांहीं वेळ गोष्टी चालत असत व नंतर सुशीला किंवा तिचा कोणी तरी भाऊ, रामविजय, हरिविजय किंवा असेंच एखादें नीतिपर पुस्तक वाची. कठीण भागाचा अर्थ विष्णुपंत सर्वांस समजावून देत. पुस्तक वाचून झाल्यावर सर्वजणें ईश्वराला वंदन करून निजावयास जात.

मुलीची पाठवणी.

[मुलगी सासरीं जाण्यास निघाली असतांना, तिला तिच्या जनकानें केलेला कळकळीचा सदुपदेश पुढील आर्यांत ग्रथित केला आहे.]

जन्मापासुनि तुजला प्राणासम समजलों, न गे! ऊन,
तुजसह सुखनिधि अजि परि अन्यकरीं अर्पितोंचि नेऊन. १
जे परकी, ते झाले बाले! तव आजपासुनी आप्त,
पैर[1], कीं परकीयत्वचि आम्हांला आज जाहलें प्राप्त! २
होतों सुखांत बाळे! सुखांत पाहोनि सर्वकाळ जिला
अशि नांदशील ती तूं पतिगृहिं, अशि वाहुं सर्व काळजिला. ३
होइल उदास सारें, आम्हां भासेल शून्य हें सदन,
कोमेल हृत्कुमुद मम होवोनि तुझें अदृश्य शशि-वदन. ४
ये कंठ भरोनि, फुटे शब्द न, नयनांत लोटतें वारी,
मत्तुल्य स्थिति तवही होय, परी दुःखलोट ते वारीं. ५
जाई बाळे! डोळे पूस, मना आवरीं, नकोचि रडों,
आम्हां वृद्धांचीं गे! दुःखें हृदयें बये! नको चिरडों. ६
जी जी विवाहिता स्त्री तिस पतिसदनीं अवश्य गे! जाणें,
सोडीं मोहा, जोडीं निश्चय, जनरीति ही असे, जाणें. ७
जें गृहशिक्षण आम्हीं दिधलें त्याची बरी करीं चीज,
कर्तव्यीं, सत्कर्मीं, परोपकारीं बये! सदा झीज. ८
सन्मार्गें चालावें, दिशा धरीं नित्य साधु-रीतीची,
सेवावें तिस जों जों, तों तों वाढे सुमाधुरी तीची. ९
पतिसेवा आद्य स्त्री-कर्तव्य स्मर असें मनामाजी,
संतुष्ट ठेवुनी त्या होइं सुखी, हीच कामना माझी. १०

---

१ परंतु.

पति दैवत आद्य असे, तोचि असे स्त्रीस आत्म-जन्म-हित,
तव चित्तचकोर तया चंद्राला भजुनि होउं सन्महित. ११
क्रोध सदा आवर तूं, मग तव गातील लोक गुणगीतें,
कलहास कोप चेतवि, वायु जसा क्षिप्र अल्प फुणगीतें. १२
पति कोपती तरी तूं त्यजीं न विनया, न शांतिला ढळवीं,
होतांच शांत तन्मन, सस्मितमधुरोदितें[1] तया वळवीं. १३
सुविनीत, सुशीलवती, सुखमूर्ति अशा सतीस पति वर्णी
स्वपतिकृतस्तुति सुख दे तीस सुधा-वृष्टिसी सदा कर्णी. १४
वाचीं पतिव्रतांचीं पुण्यचरित्रें बये! मनोभावें,
तत्कृति-गुण-कीर्तीतें चित्त तुझें सर्वदैव लोभावें. १५
ऐकें मुली कुलीने! वर्णी स्वसतीस धन्य तो धर्म,
धन्य द्रुपद-सुता ती, यत्कृति सकलांस देतसे शर्म. १६
*"धर्म ह्मणे शकुने! जी रूपें श्रीला, क्षमागुणें महिला[2]
साजे, सखी अखिन्ना कृत्यभरें सुमति आमुची महिला. १७
शरदुत्पलपत्राक्षी[3] शरदुत्पलपुण्यगंध समगंधा
अस्खलित चालवी गृहधर्मीं मज यष्टि[4] पथिं जशी अंधा. १८
आधीं जिणें उठावें, पाहुनि निजलों असें मग निजावें,
रागेजणें सुदुर्मिळ तेंहि जिचें ज्वाळसें गगनिं जावें. १९
धौम्यापासुनिं गोपापर्यंत जिणें स्वयें समाचार
घ्यावा, श्रिततापहर[5] श्रीगंगेचा तिचा समाचार[6]." २०

---

१ हास्ययुक्त गोड भाषणानें. २ पृथ्वीला. ३ शरदृतूंतील कमल पत्राप्रमाणें आहेत डोळे जिचे अशी. ४ काठी. ५ आश्रितांचा ताप हरण करणारीं. ६ सारखा आचार. * ह्या अवतरणांतील आर्या मोरोपंतकृत आहेत. ह्यांत धर्मानें द्रौपदीच्या गुणांचें थोडक्यांत चटकदार वर्णन केलें आहे.

हे शब्द-मणी वागविं हृदयीं प्रेमें, तसे न रत्न-मणी,
गुणगण चिंतामणिसम व्हावें, त्याचें बये! सदैव धणी. २१
प्रातःकाळीं उठुनी शुचि व्हावें, शांत चित्त ठेवावें,
भावें कर जोडावे, ईशातें भक्तिपूर्व सेवावें. २२
स्मरुनी ईश मनीं— जो थोर जगद्धार नित्य सांवरतो,
लागावें मुदित मनें करण्याला गे! घरांत वावर तो. २३
संतृप्त मुदित चित्तें गृहकर्मी जे विशंक राबेल
ते स्त्री सकलां होई मान्य, प्रिय जेंवि शंकरा बेल. २४
करुनि सडासंमार्जन जपुनी घालीं सुरेख रांगोळी,
निर्मळ गृह बघुनि मुखीं घालूं जन कौतुकेंचि आंगोळी! २५
वेणीफणी करावी नीट, नसावें चटोरपण तींत,
सहज सुरूपीं तुळितां कृत्रिमता शून्य होय गणतींत. २६
कृत्रिम पुष्पें दिसती सुंदर, परि देति काय परिमळ तीं ?
अंतर्गुण तो नसतां, बाळे गे! रम्य काय परि मळती. २७
परकी न त्यांस मानीं, असती जे स्वजन दीर, जावा, गे!
मत्सर करीं न, न विटो त्यांनां मन, तव न धीर जावा गे! २८
कोणास न निंदावें, कोणाचें शत्रु कधिं न वा होणें,
सुद्धें परकीयांच्या कळागती लावणें न गे! कोणें. २९

---

१ देह.

सद्वर्तनास ठेवीं, होउं नको तूं प्रवृत्त वादास,
विनयेंच मान मिळतो, गोडेंपण देइ साधु-वादास. ३०
कुजनासहि सज्जन तव सच्छील करील जाण हें सोनें,
परिसाशीं झगडे जें आयस[1] होतें स्वयेंचि तें सोनें ! ३१
कंटक पदांत शिरला जोरानें काढिल्यास कळ लागे,
जरि शमविशील सुवचें दुष्ट, तरी मदुपदेश कळला गे! ३२
शांति क्षांति प्रकटीं, त्याच सुवृत्तींत मोहनी जादू,
विषतरु वितरु कडु फळ, अमृततरु परी फळे फळें स्वादू. ३३
तरवार वार न करी, हृदयांत जसें करील कटुक[2] वच,
वचक तुझा राहिल गे! वरिशील मनीं जरी क्षमा-कवच. ३४
गोसावी संन्यासी भोंदू येती स्त्रियांस ठकवाया,
तद्बहिरंगा भुलुनी भ्रमूं श्रमूं तूं नको कधीं वाया. ३५
विश्वास दाखवोनी फसविति भोळ्यांस पिहितमुख[3] खळगे
तैसें स्त्रियांस, वरुनी करुनी अति दंभ अमृतमुख-खळ[4] गे ! ३६
'परम शिव जींत नांदे', जी दुःखें सर्व आठरा खणती,
तुज मंगल जनकांशी[5] काशीसम होय पाठराखण ती. ३७
जा बाळे! पतिसदनीं, देतों तुज सर्व—मंगलाशीला[6],
जाई सन्मार्गानें, मलिन करूं नको स्व मंगला शीला. ३८

---

१ लोखंड. २ मर्मभेदक. ३ ज्यांचीं तोंडें झांकलीं आहेत असे खळगे.
४ गोडबोले, दुष्ट. ५ वडिलांचा आशीर्वाद. ६ मंगलमय आशीर्वाद.

श्रीमती कॅथेराईन ग्लॅडस्टन.



गेल्या जून महिन्याच्या १४ व्या तारखेस श्रीमती कॅथेराईन ग्लॅडस्टन, या थोर बाई परलोकवासी झाल्याचें वृत्त सर्वांनां माहित असेलच.

अंतकाळ अगदीं समीप येऊन या महान् पतिव्रताबाईला भ्रम झाला व त्या भ्रमांत आपल्या पतीसाठीं गाडी जोडून आणण्यास सांगितली होती ती अद्यापिहि आली नाहीं, असा भास होऊन आपल्या पतीची झालेली ही गैरसोय त्या तशा अवस्थेंतदेखिल या साध्वीला खपली नाहीं. आपली शुश्रूषा करण्यासाठीं जवळ उभ्या असलेल्या बाईवर या खूप रागावल्या आणि अगदीं तावडतोब गाडी आणून दरवाजाशीं उभी करण्याचा रागाचा निरोप यांनीं पाठविला. नंतर, गाडी आणण्याच्या कामीं हयगय अगर उशीर झाला हें समजून आपल्या पतीच्या मनास त्रास होऊं नये, म्हणून आपला क्रुद्ध स्वर तात्काळ बदलून आपले पति तेथेंच उभे आहेत अशा कल्पनेनें त्यांच्याकडे वळून या मोठ्या प्रेमानें म्हणाल्या "फारसा अवकाश नाहींना लागायचा आतां बाहेर निघायला?"

भगिनींनो! या लहानशा गोष्टीवरून आपल्याला काय बरें दिसून येतें? 'ध्यानीं वसे तें स्वप्नीं दिसे,' म्हणून प्रचारांत एक म्हण आहे; पण महानिद्रेच्या पूर्वीं होणाऱ्या भ्रमांतदेखिल जी गोष्ट आठवते, ती त्या मनुष्याच्या ध्यानींचशी काय, परंतु ध्यानींमनींस्वप्नींदेखिल अगदीं पूर्णपणें बिंबून राहिली असली पाहिजे, हें उघड आहे. किंबहुना त्या गोष्टीशीं त्या मनुष्याच्या अंतःकरणाचें अगदीं तादात्म्यच झालें असलें पाहिजे; त्या गोष्टीविना आपल्यास कर्तव्य अशी या जगांत दुसरी महत्वाची गोष्टच नाहीं, असा अंतःकरणाचा पूर्ण ग्रह होऊन गेला असला पाहिजे. मिसेस ग्लॅडस्टन यांची गोष्ट अशीच होती. पतिव्रताधर्म त्यांच्या आंगीं अगदीं पूर्णपणें बाणला होता. पतीची सेवाशुश्रूषा नीटपणें करण्यांत, पतीला यत्किंचितहि निरर्थक श्रम पडणार नाहींत अशी पूर्ण खबरदारी घेण्यांत, त्या नेहमीं दक्ष असत. सारांश, आपल्या पतीच्या शारीरिक आणि मानसिक शक्तीचा व्यय मोठ्या काटकसरीनें होऊं देण्याकडे त्यांचें संपूर्ण लक्ष्य गुंतलेलें असे. याव्यतिरिक्त आयुष्यांत आपलें दुसरें प्रधान कर्तव्यच नाहीं, असा त्यांचा पूर्ण समज होऊन राहिला होता. आणि त्यांच्या एकंदर वर्तनाची गुरुकिल्ली

हीच होती. अशा या महान् पतिव्रतेच्या चरित्रांतील कित्येक महत्वाच्या गोष्टींचें दिग्दर्शन करण्याचा आज मानस आहे.

मिसेस ग्लॅडस्टन यांच्या वडिलांचें नांव सर स्टीफन ग्लीन असें होतें. यांचें घराणें फार उंच दर्जाचें होतें. मिसेस ग्लॅडस्टन यांची आजी लेडी बेब्रुक, ही मि. ग्रेनव्हिल यांची मुलगी, लॉर्ड ग्रेनव्हिल यांची बहीण आणि मि. पिट यांची मावसबहीण होती. या तिघांहि गृहस्थांनीं इंग्लंडच्या मुख्य प्रधानकीच्या जागेचा अति श्रेष्ठ मान मिळविला होता. आणि शेवटचे गृहस्थ मि. पिट यांनीं तर त्या देशाच्या इतिहासांत आपलें नांव अजरामर करून ठेविलें आहे. अगदीं बाल्यावस्थेंतच मिसेस ग्लॅडस्टन यांनां पितृवियोग झाला व त्यांची जोपासना करण्याचा सर्व भार त्यांच्या आईवर पडला. पुढें सन १८३९ त ग्लॅडस्टन साहेबांशीं यांचा विवाह झाला. या संबंधानें विशेष लक्ष्यांत ठेवण्याजोगी गोष्ट म्हटली म्हणजे यांच्या धाकट्या बहिणीचाहि लॉर्ड लिटलटन यांच्याशीं त्याच दिवशीं विवाह झाला, ही होय.

लग्नापूर्वींच सात वर्षें ग्लॅडस्टन साहेब हे 'पार्लमेंट' सभेचे सभासद असून 'अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट' या हुद्यावर होते. विवाहविधि आटोपतांच मिसेस ग्लॅडस्टन यांच्या पतिसेवापरायणतेला प्रारंभ झाला. यांनीं घेतलेल्या पराकाष्ठेच्या काळजीनें आणि स्वतः ग्लॅडस्टन साहेबांच्या अत्यंत पवित्र आणि नियमितपणाच्या आचरणामुळेंच ग्लॅडस्टन साहेबांची प्रकृति अगदीं उतारवयांतदेखिल जरी निकोप राहिली होती, तरीहि त्या वेळीं, म्हणजे यांच्या लग्नाच्या वेळीं तिजबद्दल विशेष काळजी आणि खबरदारी घेतल्यावांचून चालण्याजोगें खास नव्हतें. आणि ग्लॅडस्टन साहेबांनां इतकीं महत्वाचीं कामें सुरळितपणें करण्याला जो अवसर सांपडला, जी मोकळीक मिळाली, जी शांतता लाभली, इतकेंच नव्हे, तर हीं एकंदर कामें करण्यास ते जे शक्तिमान् झाले, त्याचें सर्वच जरी नाहीं तरी पुष्कळच श्रेय त्यांच्या या पतिव्रता पत्नीलाच दिलें पाहिजे.

ग्लॅडस्टनबाईचा सगळा वर्तनक्रम फक्त एका धोरणावर चालत असे; आणि तें धोरण ह्मणजे आपल्या पतीला विश्रांति मिळून त्यांची प्रकृति चांगली कशी राहील, त्यांचें चित्त नेहमीं सुप्रसन्न राहून इष्ट हेतु तडीस नेण्याला, त्याचप्रमाणें हातीं घेतलेला कार्यभार चांगल्या रीतीनें शेवटास नेण्याला त्यांनां नेहमीं उत्साह कसा राहील, या गोष्टींकडे संपूर्ण लक्ष्य ठेवून वागणें हेंच होय. संसारांत त्यांनां मोठी काळजी ह्मणजे काय ती हीच होती. आणि त्यांचे सर्व प्रयत्न नेहमीं याच धोरणावर चालत असत. ग्लॅडस्टन साहेबांनां अन्न चांगलें शिजविलेलें लागत असून तें अगदीं सावकाशीनें चावून चावून खाणें त्यांनां आवडत असे. त्यामुळें मिसेस ग्लॅडस्टन या त्यांच्या स्वयंपाकावर स्वतः देखरेख ठेवीत; इतकेंच नव्हे, तर जेवणाच्या वेळीं कोणत्याहि कारणानें, कधींहि त्यांनां घाई होणार नाहीं, स्वस्थपणें आणि सावकाश जेवावयास मिळेल, अशाविषयीं त्या पूर्ण खबरदारी घेत. पुढें कित्येक वर्षांनीं ग्लॅडस्टन साहेबांवर जेव्हां वार्धक्यानें अंमल बसविला, त्या वेळीं कोणकोणते पदार्थ त्यांच्या प्रकृतीला हितकारक होतील, कशा प्रकारचें जेवण त्यांनां मानवेल याचें एक टिपण त्यांच्या डॉक्टरांनीं करून मिसेस ग्लॅडस्टन यांच्या पाशीं दिलें होतें; आणि आपल्या पतीच्या खाण्यापिण्याची व्यवस्था अगदीं त्या टिपणाबरहुकूम राखण्यास कधीं एक दिवसदेखिल त्या चुकल्या नाहींत. ही घरची गोष्ट झाली; परंतु बाहेर त्या दोघांनांहि कोठें भोजनास जाण्याचा प्रसंग आला, आणि तेथें ग्लॅडस्टन साहेबांच्या प्रकृतीस मानवणार नाहीं असें कांहीं पक्वान्न त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें, कीं, तात्काळ आपल्या नोकराला पाठवून 'हें अमुक अमुक पक्वान्न खातां कामा नये,' अशा अर्थाची सूचना आपल्या पतीला देण्यास त्या चुकत नसत.

ग्लॅडस्टन साहेबांची मित्रमंडळी, किंवा राजदरबारांत काम करणारी दुसरी मोठमोठी हुद्देदार मंडळी, त्यांच्या घरीं आली असतां त्यांचा यथायोग्य आदरसत्कार करण्याचें कामदेखिल मिसेस ग्लॅडस्टन याच स्वतः करीत. त्याचप्रमाणें अनेक कारणांमुळें, ज्यांनां भेटणें ग्लॅडस्टन.

साहेबांनां इष्ट नसेल असेहि कोणी गृहस्थ जरी घरीं आले तरी त्यांची बाहेरच्या बाहेर संभावना करून बोळवणी करण्याची जबाबदारीहि त्या आपल्या स्वतःच्याच शिरावर घेत असत. पतीच्या स्वास्थ्यासंबंधीं त्या जी ही बेसुमार काळजी वहात, त्याबद्दल कित्येक त्यांची फार प्रशंसा करीत आणि कित्येक कुचेष्टाहि करण्यास चुकत नसत. परंतु मिसेस ग्लॅडस्टन या दोहोंचीहि पर्वा करित नसत. आपल्या पतीची प्रकृति चांगली राहील अशी नुस्ती व्यवस्था करूनच केवळ त्या स्वस्थ रहात नसत तर कसाहि प्रसंग असला तरी ती व्यवस्था अमलांत आणण्यास त्या मुळींच डगमगत नसत. या संबंधानें पुढील गोष्ट लक्ष्यांत ठेवण्यासारखी आहे.

एके दिवशीं कांहीं महत्वाच्या कामाकरितां एक सभा भरावयाची होती; या सभेंत भाषण करण्याचें ग्लॅडस्टन साहेबांनीं कबूल केलें होतें. ही सभा आटोपल्यावर त्याच दिवशीं त्याहिपेक्षां कांहीं अधिक महत्वाच्या कामाकरितां लागलीच दुसरी एक मोठी सभा भरावयाची होती; आणि याहि सभेंत भाषण करण्याचें त्यांनीं कबूल केलें होतें. हें भाषण आटोपतांच, त्या वेळच्या राज्यकारभार चालविणाऱ्या मंत्रिमंडळावर पूर्ण विश्वास आहे, अशा अर्थाचा एक ठराव 'पार्लमेंट' सभेपुढें यावयाचा होता, त्यावर उत्तरादाखल भाषणहि त्यांनांच करावयाचें होतें. एकाच दिवशीं हीं एकामागून एक अशीं तीन मोठीं भाषणें करण्याचें काम त्यांनां फार अवजड होईल, ह्मणून पहिलें भाषण संपून दुसरें सुरू होण्याच्या पूर्वी त्यांनां थोडीशी विश्रांति मिळावी या हेतूनें, तेथेंच एका स्वतंत्र खोलींत मुद्दाम त्यांच्यासाठींच अल्पाहाराची व्यवस्था करण्यांत आली होती. तेथील स्थानिक 'लिबरल असोसिएशन'च्या अध्यक्षाची पत्नी, सर्व सिद्धता करून ठेवून ग्लॅडस्टन साहेबांनां स्वतः आपल्या हातानें चहा करून द्यावयाचा अशा हेतूनें त्यांची मार्गप्रतीक्षा करित उभी राहिली होती. इतक्यात आपल्या पत्नीबरोबर एकटे ग्लॅडस्टन साहेबच तेथें आले. आपल्या बरोबर दुसऱ्या कोणालाहि न आणण्यांत त्यांचा हेतु इतकाच होता कीं, या खोलींत क्षणभर अगदीं निवांत पडून विश्रांति घ्यावी. त्या चहा करून

देणाऱ्या बाईच्या हें तात्काळ ध्यानांत आलें; आणि त्याप्रमाणें ती आपण होऊनच खोलीबाहेर जाऊं लागली. परंतु ही गोष्ट योग्य झाली नसती, म्हणून मिसेस ग्लॅडस्टन यांनीं तिला जाऊं दिलें नाहीं. मोठ्या आग्रहानें त्यांनीं तिला थांबविली, आणि आपण व आपले पति अशा दोघांच्या मध्यें तिला सन्मानपूर्वक बसवून घेतली. परंतु या बाईबरोबर बोलावयास लागून ग्लॅडस्टन साहेबांनां निष्कारण तसदी पडूं नये म्हणून ती खालीं बसतांच मिसेस ग्लॅडस्टन यांनीं स्वतः तिच्या जवळ बोलण्याचा असा कांहीं धडाका लाविला कीं, ग्लॅडस्टन साहेबांनां मध्यें एक शब्दहि उच्चारण्यास संधी मिळाली नाहीं! अर्थात् त्या थोड्या वेळांत त्यांनां पूर्ण स्वस्थता मिळून विश्रांतिहि मिळाली.

कोणी कशाहि गहन विषयावर भाषण करो, तें अगदीं एकाग्रतेनें ऐकून घेण्याचा बहुमोल गुण मिसेस ग्लॅडस्टन यांच्या आंगीं होता. कोणाचेंहि भाषण त्या ऐकत बसल्या म्हणजे बोलणाराच्या तोंडाकडे त्या सारखी दृष्टी लावून बसत, आणि त्या भाषणाचें मर्म नीटपणें समजून घेतल्याविना रहात नसत. राजकीय विषयांसंबंधीं होणारीं भाषणेंहि ऐकण्याचा त्यांनां फार नाद असे. 'पार्लमेंट' सभेंत 'व्हिजिटर' या नात्यानें जाऊन तेथें चालणारे लांबच लांब वादविवाददेखिल त्या अगदीं लक्ष्यपूर्वक ऐकत बसत. स्वतः ग्लॅडस्टन साहेबांचें भाषण व्हावयाचें असलें म्हणजे तर या बहुतकरून त्यांच्या बरोबर जावयाच्याच. भाषण करितांना 'शेरी' नामक मद्यार्काबरोबर अंडें मिश्र करून तें घेण्याचा ग्लॅडस्टन साहेबांचा नेहमींचा परिपाठ असे; आणि हें मिश्रण मिसेस ग्लॅडस्टन स्वतः आपल्याच हातानें तयार करून देत असत. अगदीं शेवटपर्यंत हें काम त्यांनीं कधींहि कोणावरहि सोंपविलें नाहीं.

या वर दिलेल्या गोष्टींवरून मिसेस ग्लॅडस्टन या किती पतिसेवापरायण होत्या, हें सहज दिसून येणार आहे. पतीच्या सुखापुढें त्या आपलें प्रत्यक्ष अस्तित्वहि विसरून जात असत. पातिव्रत्य म्हणजे काय हें त्यांनीं आपल्या प्रत्यक्ष आचरणानें दाखवून दिलें आहे; आणि म्हणूनच त्यांचें

पवित्र चरित्र एकंदर स्त्रीवर्गाला अत्यंत अनुकरणीय होऊन राहिलें आहे. आम्हां भारतवासीयांच्या पुराणादि ग्रंथांत द्रौपदी, सीता, सावित्री आदिकरून महान् महान् साध्वींचीं मनोरम आणि उपदेशपर चरित्रें उपलब्ध आहेत.

'पति दैवत आद्य असे, तोचि असे स्त्रीस आत्मजन्म हित ।'

या किंवा याच अर्थाच्या दुसऱ्या परम उदात्त उपदेशानें आमच्या प्राचीन व अर्वाचीन कवींच्या काव्यकृति परिपूर्ण भरल्या आहेत; आमच्या मुलींनां तर हें बहुतकरून बाळकडूच मिळत असतें असें ह्मटलें तरीदेखिल चालण्यासारखें आहे. परंतु पाश्चिमात्यांची गोष्ट केवळ अशी नाहीं. तेथें पतिपत्नींचा संबंध म्हणजे किंचित् निराळ्या तऱ्हेचा आहे. आह्मी कोणत्याहि गोष्टीचा विचार पारमार्थिक दृष्टीनें करित असतों; परंतु ते लोक बहुधा तो ऐहिक दृष्टीनेंच करित असतात. तेव्हां अशा स्थितींत मिसेस ग्लॅडस्टनसारख्या अति श्रेष्ठ कुलांतील एका बाईनीं आम्हा आर्यांनां परम पूज्य होऊन राहिलेल्या एखाद्या महान् साध्वीप्रमाणें आचरण करावें; आपलें जीवनसर्वस्व केवळ आपल्या पतीकरितां आहे; आपलें खरें सुख काय तें आपल्या पतीला सुखी ठेवण्यांत आहे; इतकेंच नव्हे तर या लोकीं पति हेंच काय तें आपलें खरें दैवत आहे; पतिसेवा हाच काय तो आपला खरा धर्म आहे, असें मानून तदनुरूप आपलें वर्तन ठेवावें; ध्यानींमनीं-स्वप्नीं सदासर्वदा पतीचेंच चिंतन करित रहावें, यापेक्षां अधिक धन्यतेची गोष्ट ती कोणती! आणि याच कारणासाठीं मिसेस ग्लॅडस्टन यांची योग्यता फारच मोठी आहे. अशा साध्वीचा उदात्त चरित्रक्रम—मग ती कोठेंहि, कोणत्याहि देशांत जन्मास येवो—अत्यंत उपदेशपर आणि अनुकरणीय झाल्याविना रहणार नाहीं. अशी महान् पतिव्रता स्त्री एकंदर स्त्रीवर्गाला भूषणभूतच समजली पाहिजे.

मिसेस ग्लॅडस्टन यांचें अंतःकरण केवळ पतिमय कसें बनून गेलें होतें ह्याचें एक उत्कृष्ट उदाहरण वाचनांत आलें आहे. एकदां एक बिशप (धर्माधिकारी) ग्लॅडस्टन साहेबांनां भेटावयास आले होते; परंतु

ग्लॅडस्टन साहेब वर कांहीं कामांत गुंतले असल्यामुळें बिशपसाहेबांनां खालींच वाट पहात बसावें लागलें. वाट पहात बसण्याचा त्यांनां कंटाळा येऊं नये ह्मणून मिसेस ग्लॅडस्टन या त्यांच्या जवळ येऊन बसल्या आणि इकडच्या तिकडच्या गोष्टी सांगूं लागल्या. त्या वेळीं घरें, देवळें वगैरे 'डिनॅमाइट'नें उडवून देण्याचा धडाका चालला होता; अर्थात् बोलतां बोलतां साहजिक तो विषयहि निघाला. तेव्हां बिशपसाहेब गंभीर मुद्रेनें ह्मणाले "या भयंकर प्रसंगीं समाधान मानण्याला एकच जागा आहे कीं, ज्याला आपणां सर्वांची काळजी आहे असा एकजण वर बसला आहे."

बिशप साहेबांचे हें बोलणें अर्थातच ईश्वराला उद्देशून होतें; परंतु मिसेस ग्लॅडस्टन यांनां आपल्या पतीपरतें दुसरें दैवतच नव्हतें! सदासर्वदा त्यांची वृत्ति पतीच्या ठिकाणीं तल्लीन झालेली; अंतःकरण पतिमय होऊन राहिलेलें; त्यांत दुसरा तिसरा ह्मणून विचार नाहीं. त्या तात्काळ मोठ्या उत्साहानें ह्मणाल्या "अगदीं बरोबर बोललां, बिशप साहेब! ते खरोखर वरतीच बसले आहेत; आणि आतां इतक्यांत हात धुऊन खालीं येतील."

भगिनींनों! पतिसेवापरायणतेचें, पतिव्रतेच्या श्रेष्ठतर व्रताचें यापेक्षां उत्तम उदाहरण तें कोणतें? आणि ह्मणूनच मिसेस ग्लॅडस्टन यांचा 'महान् पतिव्रता' या श्रेष्ठ संज्ञेनें वर उल्लेख केला आहे. कोठेंहि त्या गेल्या तरी त्यांच्या पहिल्या गोष्टी ह्मणजे आपल्या पतीसंबंधींच्याच असावयाच्या. कोणताहि विषय कां निघेना, पतीचे जे विचार तेच यांचेहि विचार असावयाचे; आणि तेच विचार मोठ्या अभिमानानें या नेहमीं पुढें ठेवीत. लोक याबद्दल त्यांची खूप थट्टा करीत, पण यांनीं ह्मणून त्या थट्टेला कधींच जुमानिलें नाहीं.

इंग्लंडासारख्या धनधान्यसंपन्न, बलाढ्य राष्ट्राच्या मुख्य प्रधानकीचीं वस्त्रें परिधान करण्याचा अति श्रेष्ठ मान ग्लॅडस्टन साहेबांनीं चार वेळां

मिळविला. एकट्या इंग्लंडास किंवा केवळ यूरोपखंडासच नव्हे, तर पृथ्वीवरील एकंदर राष्ट्रांस ते आपल्या सदाचरणानें, आपल्या नीतिमत्तेनें परम वंद्य होऊन राहिले. सर्वतोमुखीं त्यांची धन्यता झाली. या गोष्टीचा मिसेस ग्लॅडस्टन यांना फार अभिमान वाटे. आपल्या पतीचा त्यांनां नेहमींच अभिमान वाटे. परंतु हा अभिमान ह्मणजे आमच्या इकडील कित्येक स्त्रियांत जो एकप्रकारचा अभिमान दृष्टोत्पत्तीस येतो, तशा प्रकारचा नव्हता. आमच्या इकडील स्त्रियांनांदेखिल आपल्या पतीचा अभिमान वाटत असतो. परंतु पतीबद्दलचा तो अभिमान नसून त्याच्या मोठेपणाबद्दलचा तो दुरभिमान असतो. पतिराजांनां जरा कोठें पांच दहा रुपये पगार वाढला, किंवा सरकारानें खूष होऊन जरा कोठें एखादा लहानसहान किताब पतिराजांच्या नांवाला जोडला, ह्मणजे पत्नीला अस्मानदेखिल ठेंगणें होऊन जातें. बाईसाहेबांच्या पोकळ डौलाला मग सीमाच रहात नाहीं! बाकीची मंडळी त्यांनां तृणवत् वाटूं लागते! परंतु या पोकळ डौलाचें किंवा अभिमानाचें पर्यवसान बहुधा नेहमीं एकाच गोष्टींत होत असतें, आणि ती गोष्ट ह्मणजे उंची उंची कपडे वापरण्याची हांव! आपल्या ओळखीच्या इतर स्त्रियांपेक्षां एखाददुसरा अधिक डागिना आंगावर घालून त्याचें प्रदर्शन करण्याची हांव! मग तो डागिना पोकळ किंवा वेळेस मुलामा दिलेला असला तरीदेखिल चालेल! आपल्या शेजारपाजारच्या इतर बायकांनीं आपल्या थोरपणाचे गोडवे गावे; 'बाईसाहेब! बाईसाहेब!' ह्मणून आपला बडिजाव करावा, ही हांव! यापलीकडे कांहींएक नाहीं. त्या बिचाऱ्या पतीचा या अशा प्रकारच्या अभिमानापासून लेशमात्र फायदा होत नसून झाल्यास थोडेंबहुत नुकसान मात्र होत असतें. कारण रावसाहेबांचा पाट एक ठिकाणीं तर बाईसाहेबांचा पाट मग सात ठिकाणीं नाचूं लागतो. अशा मूर्ख, पोकळ डौल मिरविणाऱ्या पत्नीपासून पतीला कोणत्या प्रकारचें सहाय्य किंवा कसलें सुख मिळणें शक्य आहे!

भगिनींनों! मिसेस ग्लॅडस्टन यांचा अभिमान अशा प्रकारचा नव्हता. पतीविषयीं जसजसा त्यांचा अभिमान वाढत होता, तसतशी पतीला नेहमीं सुखशांतिलाभ कसा होईल; त्यांनां कोणत्याहि प्रकारचा उपसर्ग पोहोंचणार नाहीं असें करण्याला कायकाय केलें पाहिजे; त्यांचें मन सदोदित सुप्रसन्न राहून आपला उद्योगक्रम अव्याहतपणें चालविण्यास त्यांनां नेहमीं उमेद कशी येत जाईल; त्यांची शरीरप्रकृति नेहमीं चांगली कशी राहील इत्यादि गोष्टींबद्दल त्यांची चिंता उत्तरोत्तर अधिकाधिक वाढत होती. आपल्या स्वतःसंबंधीं कोणत्याहि गोष्टीची त्यांनां पर्वाच नसे. त्यांचें आयुष्य ह्मणजे स्वार्थत्यागाचें एक अलौकिक उदाहरणच होतें. आणि या निस्सीम पातिव्रत्याचें फळ त्यांनां ऐहिक दृष्टीनें तरी पूर्णपणें मिळालें होतें. ग्लॅडस्टन साहेबांचें त्यांच्यावर पराकाष्ठेचें प्रेम असून परिपूर्ण विश्वास असे. कोणतीहि गुप्त गोष्ट एकमेकांपासून एकमेक कधींहि लपवून ठेवित नसत. 'बायकांच्या तोंडीं कधींहि गुप्त गोष्ट रहाणें शक्य नाहीं.' ह्मणून, अशी गोष्ट प्रत्यक्ष आपल्या पत्नीलादेखिल सांगूं नये, अशा अर्थाचीं कितीतरीं वृद्धवचनें आमच्याकडे आहेत. परंतु वृद्ध ग्लॅडस्टन साहेबांचा अनुभव याच्या अगदींच उलट असे. मोठमोठीं महत्वाचीं गूढ राज्यरहस्यें, जीं ते दुसऱ्या कोणाजवळहि सांगण्यास धजत नसत, तीं देखिल ते आपल्या पत्नीला सांगत असत. ते वारंवार मोठ्या अभिमानानें ह्मणत असत कीं "प्रत्येक गुप्त गोष्ट तिला माहित आहे, परंतु त्यांतली एकदेखिल तिनें कधीं बाहेर जाऊं दिली नाहीं." आपल्या पत्नीला सोडून कधीं एकटेंच दूर जाण्याचा प्रसंग आला तर पतीपत्नींचा दररोज पत्रव्यवहार चालावयाचा. त्या पत्रांत आपले सर्व विचार व आपले सर्व हेतु ग्लॅडस्टन साहेब अगदीं स्पष्टपणें आपल्या पत्नीला कळवित असत. पतिसुखाविषयीं ही गोष्ट झाली. इतर बाबतींतहि त्या तशाच सुखी होत्या. सद्गुणी संतती, विपूल संपत्ति इत्यादि ऐहिक सर्व सुखें त्यांनां पूर्णपणें अनुकूल होतीं. तरीहि त्यांचा स्वभाव पराकाष्ठेचा सरळ आणि साधा असे. गर्व कसा तो त्यांनां मुळींच माहित नव्हता.

येथवर मिसेस ग्लॅडस्टन यांच्या चरित्रक्रमाच्या फक्त एकाच बाजूचा विचार झाला. परंतु त्यांच्या संबंधींची दुसरीहि एक गोष्ट सांगितल्याविना या साध्वीची श्रेष्ठ योग्यता पूर्णपणें समजून येणार नाहीं. परंतु आतांपर्यंतचा भाग बराच लांबल्यामुळें ही गोष्ट संक्षेपानें सांगितली पाहिजे. ही गोष्ट ह्मणजे त्यांचें औदार्य आणि परोपकारबुद्धि होय. कोठेंहि, केव्हांहि, गरीब दुबळा, दुःखानें गांजलेला, निराश्रित प्राणी दृष्टीस पडला ह्मणजे यांचें कोंवळें हृदय तात्काळ कळवळत असे. आपल्या शेजारींपाजारीं रहाणाऱ्या गरीब, निराश्रित कुटुंबांवर कांहीं दुःखप्रसंग आल्याचें समजलें पुरे, कीं या दयाळु बाई त्या कुटुंबांच्या मदतीला स्वतः धांवल्याच. मग आपल्याला यापासून होणाऱ्या त्रासाकडे किंवा दगदगीकडे त्या मुळींच लक्ष्य देत नसत. कितीतरी निराश्रित कुटुंबांला त्यांच्याकडून नित्य नियमानें मदत होत असे. कितीतरी दुःखी कुटुंबांत त्या स्वतः जाऊन त्यांचा समाचार घेत असत. प्रत्यक्ष आपले पति—ग्लॅडस्टन साहेब—मृत होऊन कांहीं वेळ जातो न जातो तोंच आपलें दुःख विसरून, कोळशाच्या खाणींत काम करणारा एक मजूर कांहीं अपघातानें त्याच दिवशीं मरण पावल्याचें त्यांनां समजलें होतें, त्याच्या निराश्रित बायकोच्या समाचाराला त्या गेल्या आणि तिला धीर देऊन त्यांनीं तिचें समाधान केलें.

भगिनींनों ! केवढा हा दीन दुबळ्यांविषयीं कनवाळूपणा ! केवढी ही परोपकारबुद्धि !

'जे का रंजले गांजले, त्यांसी ह्मणे जो आपुले;
तोची साधु ओळखावा, देव तेथेंची जाणावा !'

ह्मणून जें साधुश्रेष्ठ तुकारामांनीं ह्मटलें आहे, त्याचें यापेक्षां उत्तम उदाहरण सांपडेल काय ?

एके दिवशीं मिसेस ग्लॅडस्टन या कांहीं कामासाठीं वुडफर्ड नामक गांवीं आगगाडींतून चालल्या होत्या. नोकरानें तिकिट काढून त्यांच्या हातीं दिलें, व त्यांनां गाडींत बसवून तो परत गेला. गाडी चालू लागली.

थोडक्याच वेळांत मिसेस ग्लॅडस्टन यांची दृष्टी त्याच डब्याच्या एका कोंपऱ्यांत अगदीं दुःखी मुद्रेनें स्तब्ध बसलेल्या एका तरुण स्त्रीकडे गेली. त्याबरोबर त्यांचें अंतःकरण कळवळलें. त्या बाईजवळून त्यांनीं तिच्या दुःखाचें कारण समजाऊन घेतलें. तिचा नवरा बराच आजारी होता. हवा बदलण्यासाठीं तो आस्ट्रेलियांत तावडतोब जाईल, तरच तो कदाचित् वांचण्याचा संभव आहे, असें डॉक्टरनें सांगितल्यावरून ती त्याला एक दोन दिवसांत तिकडे पाठवित होती. परंतु गरिबीमुळें तिला स्वतः कांहीं आपल्या नवऱ्याबरोबर जातां येत नव्हतें; आणि हेंच त्या तरुण स्त्रीच्या दुःखाचें कारण होतें. तिनें सरळपणानें सांगितलेली ती हकीकत ऐकण्यांत मिसेस ग्लॅडस्टन या इतक्या तल्लीन होऊन गेल्या कीं, वुडफर्ड स्टेशन केव्हां निघून गेलें, हेंदेखिल त्यांनां समजलें नाहीं. या वेळीं त्यांचे जवळ पैसे नव्हते. येतां येतां नेहमीं प्रमाणें गरीबदुबळ्यांनां धर्म करण्यांत जवळचे सर्व पैसे संपून गेले होते. शेवटीं गाडीच्या तिकिटासाठीं त्या तरुण स्त्रीजवळूनच त्यांनीं एक शिलिंग उसना घेतला आणि आपलें नांव व पत्ता तिला देऊन सांगितलें कीं "उद्यां तूं मला येऊन भेट ह्मणजे मी लावीन तुझी कांही तरी सोय."

त्याच दिवशीं संध्याकाळीं घरीं परत आल्यावर जेवतांना त्यांनीं त्या तरुण स्त्रीची हकीकत अशा कांहीं रीतीनें सगळ्यांनां सांगितली कीं, आस्ट्रेलियाच्या उतारापुरती रक्कम त्या मंडळीनें आपापसांत तात्काळ उभी केली. त्यांत मिसेस ग्लॅडस्टन यांचा स्वतःचाच बराचसा भाग होता, हें सांगावयास नकोच.

इकडे त्या तरुण स्त्रीनें ही हकीकत आपल्या नवऱ्याला सांगितली; परंतु त्याला वाटलें कीं, आपल्या बायकोला कोणीं तरी खास फसविली. ह्मणून दुसरे दिवशीं सकाळीं तो स्वतः तसाच हळु हळू तिच्या बरोबर ग्लॅडस्टन साहेबांच्या घरीं आला. परंतु त्या दोघांचेंहि तेथें चांगलें

आदरातिथ्य झालें आणि त्या तरुण स्त्रीच्या उताराला लागणारे पैसे मिसेस ग्लॅडस्टन यांनीं तिच्या हातीं दिले. आपल्याला आपल्या नवऱ्याची शुश्रूषा करण्यासाठीं त्याच्या बरोबर जावयास मिळणार या विचारानें त्या तरुण स्त्रीला किती आनंद झाला आणि त्या नवराबायकोंनीं मिसेस ग्लॅडस्टन यांचे किती आभार मानले, हें सांगण्याची आवश्यकताच नाहीं!

आपल्या पतीची हरएक प्रकारची तरतूद लावून बाकीचा सर्व वेळ परोपकाराचीं कृत्यें करण्यांत त्या खर्च करीत. लंडन येथें त्या असल्या म्हणजे लंडन हॉस्पिटलमध्यें वारंवार जाऊन तेथील एकंदर व्यवस्था—विशेषतः अगदीं गरीबगुरिबांची व्यवस्था—नीट रीतीनें राहील अशा-विषयीं त्या फार दक्ष असत. स. १८६६ त लंडन येथें कॉलऱ्यानें भयंकर प्रळय मांडला होता; परंतु त्या प्रसंगींदेखिल त्या स्वतः हॉस्पिटल-मध्यें दररोज जाऊन कॉलऱ्यानें लागलेल्या रोग्यांची हालहवाल पहात असत व त्यांनां मदत करित असत. इतकेंच नव्हे, तर तेथें ठेविलेल्या दायांनांदेखिल रोग्यांची शुश्रूषा ठेवण्याच्या कामीं त्या स्वतः मदत करीत. येथेंच त्यांचा आणि सर, अँड्रु क्लार्क या नामांकित डाक्टरांचा परिचय झाला. या डाक्टरांचा त्यांनां पुढें फारच उपयोग झाला, हें सर्वांनां माहितच आहे. सर अँड्रु क्लार्क हे इतके प्रसिद्धीस येण्यालादेखिल हाच परिचय कारणीभूत झाला.

या कॉलऱ्याच्या सांथीला बळी पडलेल्या शेंकडो गरीब लोकांचीं मुलें अनाथ निराधार होऊन रस्तोरस्तीं फिरूं लागलीं. त्यांची ती दुर्दशा पाहून मिसेस ग्लॅडस्टन यांचें हृदय फारच कळवळलें. त्यांनीं त्यांची कांहींतरी व्यवस्था लावावी म्हणून पैशासाठीं आपल्या ओळखीच्या मोठमोठ्या श्रीमंत गृहस्थांनां विनंति केली. सभांवर सभा भरविल्या. या सभांतून ग्लॅडस्टन साहेबदेखिल भाषणें करित असत. टाईम्स पत्रांत मदतीसाठीं कितीतरी विनंतिपत्रें त्यांनीं प्रसिद्ध केलीं; आणि याप्रमाणें अविश्रांत श्रम करून शेवटीं 'न्यू मार्केट रेफ्यूज' नांवाची अनाथ निराश्रित मुलांचें

संरक्षण करण्यासाठीं एक संस्था स्थापन केली. त्याचप्रमाणें दुखण्यां-तून उठलेल्या गरीबगुरीब लोकांसांठीं 'फ्री कॉन्व्हॅलसंट होम' म्हणून एक विश्रांतिगृहहि स्थापन केलें. 'न्यू मार्केटरेफ्यूज' या अनाथ बालका-श्रमाला एक उद्योगशाळाहि जोडली होती. शिवाय खुद्द हावर्डन येथें त्यांचें स्वतःचें अनाथबालकाश्रम होतेंच. या संस्था म्हणजे त्यांच्या परोपकारबुद्धीचीं स्मारकेंच आहेत. याशिवाय त्यांनीं केलेलीं आणखी कितीतरी परोपकाराचीं कृत्यें दाखवितां येतील.

आपल्या गरीबगुरीब नातलगांनां शक्य तेवढी मदत करण्यास त्या कधींच विसरत नसत. आपलें दुःख कोणीहि त्यांच्यापुढें मांडो, त्याला विन्मुख म्हणून त्यांनीं कधीं जाऊंच दिलें नाहीं. दुःख, विपत्ति कोठेंहि दृष्टीस पडली, म्हणजे त्यांचें कोमल हृदय तात्काळ तळमळूं लागे.

मिसेस ग्लॅडस्टन यांची बुद्धि फार तीक्ष्ण असून स्मरणशक्ति तर अगदींच तीव्र असे. एकवार पाहिलेल्या मनुष्याला त्या कधींहि विसरत नसत. ग्लॅडस्टन साहेबांनां एकवार पाहिलेला मनुष्य पुनः ओळखण्याची मोठी पंचाईत पडे; आणि यामुळें एखाद्याला विनाकारण राग येण्याला कारण होई. परंतु मिसेस ग्लॅडस्टन यांचा अशा प्रसंगीं त्यांनां फार उपयोग होई. त्या नेहमीं, राजकारणासाठीं भरलेल्या सभेंतदेखिल, त्यांच्या बरोबर असत. हावर्डन येथील ग्लॅडस्टन साहेबांच्या 'शांतिमंदिरांत'च काय परंतु 'डाउनिंग स्ट्रीट'मधील त्यांच्या कचेरीच्या जागींदेखिल मिसेस ग्लॅडस्टन यांच्यासाठीं एक खुर्चीटेबल ठेवलेलें असावयाचें. हरएक कामीं त्यांची आपल्या पतीला मदत ही व्हावयाचीच. घरींबाहेर, हाच क्रम सदोदित चालावयाचा. घरांतील मुलांबाळांसंबधानें, चाकरांनोकरांसंबंधीं, घरीं कोणी पाहुणे वगैरे आले तर त्यांच्या संबंधानें, एकंदर सर्व व्यवस्था त्या स्वतः पहात. ग्लॅडस्टन साहेबांनां म्हणून कोणत्याहि गोष्टींत एवढीदेखिल दगदग त्या पडूं देत नसत. घरांतील कोणत्याहि प्रकारची तक्रार म्हणून त्यांच्या कानीं यावयाची

नाहीं. पत्नी ह्मणजे ग्लॅडस्टन साहेबांचा मोठा आधार. पत्नीशिवाय कोणतीहि गोष्ट त्यांच्या हातून होत नसे. सर्व कामांत पत्नीची सल्लामसलत त्यांनां लागत असे. मिसेस ग्लॅडस्टन यांचें तर सगळें जीवित्व केवळ पतीसाठींच होतें. पति हेंच त्यांचें आराध्य दैवत. त्यांची सगळी शक्ति, सगळा उत्साह काय तो पतीसाठींच होता. याचा प्रत्यक्ष दाखला ह्मणजे सरासरी सहा वर्षांपूर्वी जेव्हां ग्लॅडस्टन साहेबांनीं सार्वजनिक कामांतून आपलें आंग काढून घेतलें, दगदगीचे सर्व व्यवहार बंद करून आपला बहुतेक काळ ते विश्रांति घेण्यांत घालवूं लागले, त्याबरोबर मिसेस ग्लॅडस्टन यांची सर्व शक्ति, आणि सर्व उत्साह हीं क्षीण झालीं, ही गोष्ट होय. पुढें ग्लॅडस्टन साहेब आजारी पडले त्याबरोबर यांनां पुनः बरीच हुशारी येऊन या त्यांची सेवाशुश्रूषा करूं लागल्या; परंतु ता. २८ मे १८९८ या दिवसापासून ह्मणजे ग्लॅडस्टन साहेबांच्या अंःतकाळापासून थोड्याच दिवसांनीं पुढें कधींहि त्या पूर्वस्थितीवर आल्या नाहींत. त्या दिवसापासूनच वास्तविक त्यांचा आयुष्यक्रम पूर्ण झाला.

मिसेस ग्लॅडस्टन यांचा अंत झाल्याची बातमी समजतांच आपल्या परम दयाळु महाराणी साहेब यांनीं "त्या मजवर नेहमीं ममता करीत." एवढाच अगदीं कळवळ्याचा निरोप तारेंतून पाठविला. भगिनींनों, महाराणी साहेबांचा हा निरोप जितका साधा तितकाच तो प्रेमळ आणि हृदयद्रावक आहे. महाराणी साहेबांचा साधा सरळ स्वभाव तर त्यांत दिसून येतोच येतो; परंतु मिसेस ग्लॅडस्टन यांच्या संबंधानेंहि त्यांत त्यांचा विलक्षण प्रेमभाव दिसून येतो. ग्लॅडस्टन साहेबांप्रमाणें त्यांच्या पत्नीच्या अंतःकरणांतहि महाराणी साहेबांसंबंधीं फारच पूज्यबुद्धि वसत असे. महाराणी साहेबांवर त्यांची पराकाष्ठेची भक्ति असे. परंतु महाराणी साहेबांच्या दृष्टीसमोर या वेळीं जी गोष्ट आली ती मिसेस ग्लॅडस्टन यांची सदयता,—दुःख, मग तें कोठेंहि असो—तें पाहून कळवळणारें त्यांचें दयार्द्र अंतःकरण, हीच होय.

मिसेस ग्लॅडस्टन यांच्या उदात्त आणि पवित्र चरित्रक्रमांतील कित्येक गोष्टींचें हें अल्प दिग्दर्शन पुरें करितांना थोडक्यांत असें ह्मणायाला मुळींच हरकत नाहीं कीं, धर्मराजानें

"शरदुत्पलपत्राक्षी, शरदुत्पलपुण्यगंधसमगंधा,
अस्खलित चालवी गृह धर्मी मज यष्टि पथिं जशी अंधा.
आधीं जिणें उठावें, पाहुनि निजलों असें, मग निजावें,
रागेजणें सुदुर्मिळ तेंहि जिचें ज्वाळसें गगनिं जावें.
धौम्यापासुनि गोपापर्यंत जिणें स्वयें समाचार,
घ्यावा श्रितत्तापहर, श्रीगंगेचा तिचा समाचार"

अशी द्रौपदीची जी महती गाइली आहे, ती ग्लॅडस्टन साहेबांनांहि आपल्या पत्नीला अक्षरशः लावितां येण्याजोगी आहे.

स्त्रीशिक्षणाविषयीं एका राजपत्नीचे उद्गार.

गेल्या आक्टोबर महिन्याच्या २ ऱ्या तारखेस काठेवाडांतील लिंबडी राजनगरीमध्यें संस्थानाधिपतींच्या सहधर्मिणी श्रीमंत सौ. राजबा राणीसाहेब यांच्या हस्तें तेथील मुलींच्या शाळेचा बक्षिससमारंभ झाला. त्या प्रसंगीं मुलींनां उद्देशून राणीसाहेबांनीं एक अगदीं लहानसेंच पण सुंदर भाषण केलें. राणीसाहेब विनयपूर्वक ह्मणाल्या—

"शुभोपमा योग्य शिक्षक मैत्रिणींनों, भगिनींनों, आणि प्रिय मुलींनों! आजच्या या आनंदाच्या प्रसंगीं आपणां सर्वांची भेट झाली आहे, याबद्दल आमच्याप्रमाणेंच आपणां सर्वांसहि मोठा आनंद झाला असेलच. देशाला ऊर्जितावस्था येण्याचा सर्वस्वी आधार मुलींनां मिळणाऱ्या सुशिक्षणावरच आहे. कारण या मुलीच पुढें मातृपदास पोंचणाऱ्या असून त्यांनां मिळालेल्या सुशिक्षणाचा फायदा त्या आपल्या संततीला करून देऊन त्यांच्या करवीं मोठमोठीं कृत्यें करविणार आहेत. यास्तव स्त्रियांचा समाज सुधारण्यासाठीं सांप्रत शाळांमधून शिकत असलेल्या मुलींनां योग्य उत्तेजन देणें, हें, प्रत्येक सुज्ञ स्त्रीपुरुषाचें कर्तव्य आहे. ज्यांनीं सुशिक्षणाच्या मधुर फलांचा आस्वाद घेतला आहे अशा आमच्या सारख्या राजमहिषींनीं मुलींच्या शिक्षणाविषयीं विशेष आस्था बाळगिल्यास त्यांत नवल वाटण्याजोगें कांहीं नाहीं; परंतु प्रत्येक लहानमोठ्या स्त्रीनें या बाबतींत लक्ष्य पुरवून आपल्या मुलींस व त्याचप्रमाणें आपल्या शेजार पाजारच्या मुलींसहि उत्तेजन दिलें पाहिजे. केवळ लिहितांवाचतां येणें किंवा थोडासा हिशेबठिशेब समजणें याचें नांव विद्या, असें कोणी समजत असेल तर तें चुकीचें आहे. स्त्रीशिक्षणामध्यें मुख्यत्वेंकरून पातिव्रत्य, संतोष, दया, क्षमा, विवेक, संबंधीजनांविषयीं प्रेम, आणि कोमलता हे गुणहि असले पाहिजेत. त्याचप्रमाणें संसार काटकसरीनें करतां येणें, घरखटल्याच्या सर्व कामांची माहिती असणें, मुलांची जोपासना करतां येणें, वडिलांची सेवा, इत्यादि कामें स्त्रियांनां उत्तम प्रकारें करतां आलीं पाहिजेत.

उत्तम वस्त्रालंकारांनीं शरीराची शोभा वाढविण्यापेक्षां उत्तम गुणांनीं देहकांति वाढविणें अधिक श्रेयस्कर आहे, हें, प्रत्येक स्त्रीनें लक्ष्यांत वागविलें पाहिजे. आपल्या प्राचीन पूज्य स्त्रिया गार्गी, सीता, द्रौपदी, मंदोदरी, इत्यादि गुणवती स्त्रियांचा कित्ता नेहमीं आपल्या पुढें ठेवून आपणहि त्यांच्याप्रमाणेंच कीर्तिमान् होण्याचा प्रयत्न केला पाहिजे, एवढेंच केवळ नव्हे, तर इतर स्त्रियांनां आपण आदर्शरूप भासलें पाहिजे. म्हणजेच आपलें इहपरलोकीं हित होऊन ईश्वरानें दिलेल्या या श्रेष्ठ मानवजन्माचें सार्थक्य होईल."

लिंबडी संस्थानच्या राणीसाहेबांची आपल्या राज्यांतील मुलींच्या शिक्षणाविषयींची ही आस्था प्रशंसनीय आहे. श्रीमंत सौ० राजबा राणीसाहेबांचें या बाबतींत स्तुत्य अनुकरण आमच्या इतर संस्थानिकांच्या पत्नी करून आपापल्या संस्थानांत स्त्रीशिक्षणाला उत्तेजन देण्याचें मनावर घेतील तर प्रजेवर त्यांचे फार उपकार होतील. परंतु दुर्दैवानें आमच्या राजपत्नींमध्यें लिंबडीच्या राणीसाहेबांसारख्या विद्येचें महत्व जाणणाऱ्या भाग्यवान् स्त्रिया फारच विरळा. परमेश्वर श्रीमंत सौ. राजबा राणीसाहेबांस दीर्घायु करून स्त्रियांच्या उन्नतिविषयींची त्यांच्या अंतःकरणांतील सदीच्छा फलद्रूप करो व त्याचें स्तुत्य अनुकरण करण्याची वासना आमच्या इतर राजपत्नींनां देवो, हेंच त्याजपाशीं मागणें आहे.

स्त्रियांची प्रसूति व तत्संबंधीं उपचार.

[१]

प्रसूतीचे नियम जगांतील सर्व विवाहित स्त्रियांस लागू आहेत, हें सांगणें नको; आणि हे नियम इतके साधारण आहेत कीं, जगांतील एकूनएक विवाहित स्त्रियांस बहुधा एकपासून वीस वेळांपर्यंत प्रसूतीचा प्रसंग येतो. या प्रसूतीचे क्रियेमध्यें कित्येक वेळीं स्त्रियांच्या व सुईणींच्या अज्ञानामुळें स्त्रियांवर व मुलांवर संकटें येऊन तीं प्राणासहि मुकतात. शास्त्रदृष्ट्या पाहून त्याप्रमाणें आचरण केल्यास यांतील बहुतेक संकटें व त्यांपासून होणारे अपघात व मृत्यु टाळतां येतील, हें, प्रसूतीचें शास्त्र समजून घेतल्यानें सहज लक्ष्यांत येईल, अशी माझी खात्री आहे. ह्याकरितां बायकांस प्रसूतीच्या संबंधानें शारीरशास्त्र जेवढें जरूर आहे तेवढें व साधारण मला जेवढी माहिती आहे तेवढी मी सांगतें.

स्त्रियांच्या ओटीमध्यें गर्भाशय ह्मणून साधारण पेरूच्या आकारासारखा एक अवयव असतो. या अवयवाचें तोंड स्त्री उभी राहिली ह्मणजे जमिनीकडे असतें. गर्भाशय नेहमीं अशा स्थितींत राहण्याकरितां तंबूच्या दोऱ्यानें जसा तंबू ताणून उभा केला जातो, त्याप्रमाणें हाहि सतत उभा राहण्याकरितां बंधनानें बांधलेला असतो. याचा आकार पेरूच्या आकारासारखा गोल असतो, असें सांगितलें आहे, पण तो अगदीं गोलाकार नाहीं. मागें व पुढें साधारण चापट असतो. याच्या पुढें मूत्राशयाची—ह्मणजे शरीरामध्यें मूत्र तयार होऊन आपल्या इच्छेनें तें बाहेर पडण्याच्या अवधीपर्यंत ज्या पिशवीमध्यें सांठवून राहतें ती—पिशवी असते व त्याला लागून मागें शेवटच्या आंतड्याचा भाग असतो व गर्भाशयाचे माथ्यावर आंतडीं पडलेलीं असतात. त्याचे खालीं स्त्रियांचें प्रसूतिद्वार असतें व त्याला लागून बारीक मूत्रद्वार व मागें गुदद्वार असतें.

मूत्र हें प्रसूतिद्वारापासूनच निघतें, अशी कित्येक स्त्रियांची समजूत आहे; परंतु प्रसूतिद्वार व मूत्रद्वार हीं निरनिराळीं आहेत, हें लक्ष्यांत ठेवावें. गर्भाशय आंतून पोकळ असतो व ती पोकळी साधारण त्रिकोणाकृति असते व त्याचें तोंड खालीं असून तें जननेंद्रियाशीं मिळालें असतें. या पोकळीच्या दुसरीं जीं दोन टोकें असतात तीं 'फ्यालोपियन' नामक नळ्यांमधून संगम पावून कोठ्याशीं मिळालीं असतात व स्त्रिया विटाळशा होऊन अंडाशया-मध्यें स्त्रियांचीं जीं अंडीं उत्पन्न होतात तीं शोषून आणण्याच्या कामीं या नळ्यांचीं शेवटें उपयोगीं पडतात आणि स्त्रियांच्या अंड्यांचा पुरुषांच्या वीर्याशीं जेव्हां संबंध होतो, तेव्हां गर्भोत्पत्ति होते. हीं अंडीं ज्या पिंडांत उत्पन्न होतात त्यास अंडाशय किंवा इंग्रजींत 'ओव्हरीज' असें ह्मणतात.

स्त्रीचीं अंडीं पुरुषाच्या वीर्याशीं मिळाल्याशिवाय गर्भोत्पत्ति होत नाहीं, असें वर सांगितलेंच आहे. गर्भाशयाचे बाजूस 'ओव्हरीज' ह्मणून ज्या गांठी असतात त्या गांठींमध्यें स्त्री विटाळशी होण्याचे अगोदर आठ दिव-सांपासून तों विटाळशी झाल्यानंतर पंधरा दिवसपर्यंत हीं अंडीं उत्पन्न होत असतात व या काळामध्यें पुरुषाच्या वीर्याचा संगम झाल्यास गर्भोत्पत्ति होते. 'ओव्हरीज'मध्यें प्रथम एक प्रकारचे फोड उत्पन्न होतात व ते वाढत जाऊन फुटतात व त्यामध्यें जीं अंडीं असतात त्यांनां 'फ्यालो-पियन' नळीचीं बारीक बोटासारखीं टोंकें गर्भाशयांत शोषून आणितात व तेथें पुरुषाच्या वीर्याचा संगम झाला ह्मणजे गर्भोत्पत्ति होते.

गर्भ पुढें वाढत जातो; त्यामध्यें निरनिराळे अवयव उत्पन्न होतात; गर्भासभोंवतीं एक पिशवी तयार होऊन ती चिकट पाण्यानें भरत जाते; तें पाणी उत्पन्न झाल्याकारणानें गर्भाच्या हालचालींत कांहीं बाध येत नाहीं; इत्यादि शास्त्रीय गोष्टी कशा उत्पन्न होतात व कशा वाढत जातात याविषयीं बारीक माहिती समजावून घेण्याची विशेषशी आवश्यकता नाहीं. गर्भ उत्पन्न होतो व त्यामध्यें वरील सर्व क्रिया सुरू होऊन वाढत जातात व गर्भोत्पत्तीपासून ९ महिने १० दिवस, किंवा २८० दिवस ही क्रिया सुरू राहून गर्भ जन्मास येतो, येवढें लक्ष्यांत ठेविलें ह्मणजे पुरे आहे.

हा गर्भ जसजसा वाढत जातो तसतशा गर्भाशयाच्या बाजू किंवा भिंती ताणल्या जाऊन वाढतहि जातात व गर्भाच्या वाढीच्या प्रमाणानें त्या पातळ होतात. ही गर्भाची वाढ बहुतकरून २८० दिवसपर्यंत सुरू असते व नंतर तो जन्मास येतो. या गर्भाच्या जन्मास येण्याच्या काळासच व्यवहारामध्यें बाळंतपण असें ह्मणतात. या बाळंतपणाचे वेळीं काय व्यवस्था ठेवावी व काय उपचार करावे याविषयीं मी माझे अनुभवावरून थोडी उपयुक्त माहिती सांगतें.

घरांतील पुरुषांच्या व बायकांच्या आणि मदतीस ह्मणून बोलावलेल्या सुइणींच्या वगैरे अज्ञानामुळें हिंदुस्थानामध्यें हिंदु, मुसलमान, पारशी व खालच्या प्रतीचे ख्रिश्चन, या सर्वांमध्यें जन्मणाऱ्या मुलांनां व त्यांच्या आयांनां कायमची दुखापत होऊन व्यंगें होतात येवढेंच नव्हे, तर हजारों प्राणी प्रतिवर्षी प्राणासहि मुकतात, असें सर्वत्र अनुभवास आलें आहे. बोलावून आणलेल्या अडाणी सुइणी, घरांतील माणसें व शेजारपाजारच्या अनुभवशीर ज्ञात्या बायका, यावेळीं कित्येक गोष्टी अशा रीतीनें करावयास लावितात कीं, ज्यांचा खरोखरी कांहींएक उपयोग न होतां त्या जन्मलेल्या मुलाच्या व त्याच्या आईच्या प्रकृति खराब करण्याच्या कामीं कारणीभूत होतात.

स्त्री बाळंतीण होण्याचे अगोदर मूल जें गर्भाशयांत वर असतें तें ओटीमध्यें येऊं लागतें ह्मणून गरोदर राहिल्या दिवसापासून जें तिला अवघडल्यासारखें वाटत असतें, तें निघून जाऊन आतां तिला बरें वाटूं लागतें. तिचा श्वासोच्छ्वास साहजिक होतो असें तिला भासतें, व हिंडण्याफिरण्यासहि तिला बरें वाटतें. तिचा गर्भाशय जो अगदीं छातीपर्यंत गेला असतो, तोहि बऱ्याच अंशीं खालीं येतो. गर्भाशयाचा मूत्राशयाच्या तोंडावर दाब असल्याकारणानें लघ्वीस वारंवार जावेंसें वाटतें व लघ्वीहि साफ होत नाहीं, व त्याचप्रमाणें गर्भाशयाचा भाग आंतड्याच्या शेवटचे भागावर असल्यानें शौचास वारंवार जावेंसें वाटतें. याकरितां स्त्री बाळं-

तीण होण्याचे सुमारास तिला एरंडेल तेलाचा जुलाब द्यावा. सुमारें दोन मोठे चमचे सुंठीचे काढ्यांतून तेवढेंच एरंडेल द्यावें. पोटांत मळाच्या गांठी झाल्या कारणानें तिला व्यथा होऊन बाळंतीण होण्यास उशीर लागतो. याजकरितां ही गोष्ट लक्ष्यांत ठेवून त्याप्रमाणें आचरण केल्यास बाळंतिणीस हितावह होणार आहे. एरंडेल घेववत नसल्यास 'म्यागनेशिया साल्ट' किंवा 'बरल्ट म्यागनेशिया' म्हणून दवाखान्यांत औषध मिळतें, तें अर्धा तोळा थोड्याशा सोनामुखीच्या काढ्यांतून द्यावें. सर्वांत उत्तम मार्ग म्हटला म्हणजे साबूच्या पाण्याचा बस्ति द्यावा. पाणी कोमट असावें.

स्त्री बाळंतीण होण्याचे सुमारास थोडेंसें रक्तमिश्रित चिकट पांढरें पाणी दोन तीन दिवस अगोदर निघूं लागलें म्हणजे बाळंतीण होण्याची वेळ नजीक आली, असें समजावें. अशा वेळीं तिचे मनास सर्वत्र शांतता राहील व उल्हास आणि आनंद होईल, अशी व्यवस्था ठेवावी. तिचे मनास धक्का लागेल अशा बाबी टाळाव्या. किळस येणारे व घाणेरडे पदार्थ तिचे नजरेस पडूं देऊं नयेत, व सर्व तऱ्हेनें उल्हास होईल अशी तिची मनोवृत्ति राखावी. सासऱ्याहून बाळंत होण्याकरितां माहेरीं नेतात, याचें तरी कारण हेंच. बाळंत होण्याकरितां घरांतील एखादी प्रशस्त खोली तयार करावी. त्या खोलींतील सर्व जमिनी सारवून भिंतींनां चुना लावावा. खोलींतील सर्व सामान काढून टाकावें. फक्त बाळंतिणीकरितां ज्या वस्तु लागतील तेवढ्या मात्र त्यांत राहूं द्याव्या व बाळंतिणीकरितां खोलींत नवी विणलेली बाज, अगर ज्यांची ऐपत असेल त्यांनीं पलंग ठेवावा. खोलीच्या आसपासचे दुर्गंधी येणारे पदार्थ वगैरे काढून टाकवावे. या खोलीमध्यें हवा स्वच्छ राखण्याकरितां पुष्कळ लोकांचा प्रवेश होऊं देऊं नये, व खोलींत उजेड राहण्याकरितां जितके कमी ठेववतील तितके दिवे कमी ठेवावे. त्या दिव्यांचें तेल तिळांचें किंवा एरंडाचें नसावें. दिव्याकरितां खोबरेल तेलाचा किंवा तुपाचा उपयोग करावा. सर्वांत चांगला दिवा मेणबत्तीचा. ऐपतवाल्यांनीं या दिव्याचा उपयोग अवश्य करावा.

हिंदु लोकांमध्यें बाळंतिणीचे १० दिवस अशौच बाळगतात. या अशौचानें बाळंतिणीस व तिचे मुलास तकलीफ होऊन केव्हां केव्हां अनर्थहि होतात असें जरी बारंवार त्यांचे नजरेस येतें, तरीदेखिल ते आपलें अज्ञान सोडित नाहींत. या अशौचाच्या कारणामुळें बाळंतिणीकरितां घरांतील एखादी अगदीं लहान अप्रशस्त घाणेरडी व सर्व तऱ्हेनें अहितकारी अशी खोली हुडकून काढतात; परंतु अशानें बाळंतिणीचें फार नुकसान होतें, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. अशाच खोलींत बाळंतिणीला न्हावूं घालण्याकरितां व तिच्या मलमूत्रविधीकरितां एक किंवा अधिक खड्डे खोदतात व केव्हां केव्हां बाळंतिणीची वार इत्यादिक पदार्थहि खोलींतच पुरून टाकितात! बाळंतिणीच्या अशौचाचा प्रकार कित्येक प्रांतीं तर इतका माजला आहे कीं, बाळंतिणीची किंवा मुलाची प्राणहानीची वेळ आली तरीदेखिल तिचे आप्तसोयरेदेखिल तिला शिवत नाहींत. कदाचित् शिवलेच तर शिवणारीण बायको हातांतील बांगड्या वाढवून पुनः भरते व गळ्यांतील मंगळसूत्र पुनः ओवून घालते !

बाळंतीण होतांना प्रथम पोटांत दुखूं लागतें व नंतर वेणा येऊं लागतात. हें पोटांत दुखणें व वेणा अगदीं भिन्न आहेत, हें लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. बाळंतीण होण्याचे वेळीं गर्भाशयाचे हालचालीमुळें त्याच्या जवळील अवयवांची अव्यवस्था होऊन ते ताणले, चुरडले आणि चेंगरले जातात व याजमुळें पोटांत दुखूं लागतें. या दुखण्याची अवधि अगदीं कमी असते व तें लगेच थांबतें व लगेच सुरूहि होतें. असें होतांहोतां वेणा सुरू होतात व वेणांमुळें जें पोटांत दुखतें तें जास्त अवधीचें असून पोटांत आंव झाली असतां शौचाच्या वेळीं जसें कुंथावें लागतें, तसें बाळंत होणाऱ्या बायकोस या वेणांचे वेळीं कुंथावें लागतें. याचें कारण असें आहे कीं, वृद्धि पावलेला गर्भाशय मुलावर ताणून आकुंचित होऊं लागतो व आंतील मुलास बाहेर काढून देण्याच्या प्रयत्नास लागतो. गर्भाशयाचे इंद्रियामध्यें वरील कारणामुळें जें दुःख व वेदना होतात त्याला

वेणा ह्मणतात. या वेणा प्रथम थोड्या अवधीच्या असतात व जसजसें मूल बाहेर येऊं लागतें तसतशा त्या जास्त अवधीच्या होतात व त्यांतील दुःखहि वाढतें. बाळंतीण होणारी बायको बाजेस किंवा जवळ असणाऱ्या सुइणीस घट्ट धरून सतत जोरानें कुंथूं लागते. याप्रमाणें त्या वेणा पुढें लवकर लवकर येऊं लागतात. त्यांची अवधि व दुःख हीं वाढत जातात व बायको जास्त जोरानें कुंथूं लागते व शेवटीं एकदाचें मूल बाहेर निघून जन्मास येतें.

साध्या बाळंतपणामध्यें मूल बहुतकरून डोक्यानें जन्मतें. पोटांत वेणा सुरू झाल्यापासून बहुशा १२ तासांचे आंत मूल जन्मतें. पहिलटकरणीला अमळ जास्त वेळ लागतो. तरी २४ तासांचे वर वेळ लागल्यास बाळंतपणामध्यें कांहींतरी अडथळा आहे असें समजून बाळंतिणीची सुटका करण्याचे प्रयत्नास लागावें.

साध्या बाळंतपणास फारशी पंचाईत नसते. सुईणी बाळंतिणीचें पोट मागून पुढून सर्व बाजूंनीं चोळतात हें अगदीं इष्ट नाहीं. त्याचे योगानें मुलाला गर्भाशयांतून बाहेर निघण्यास अडथळा होतो. शरीर, गर्भाशय व बाकीचे अवयव मुलास बाहेर आणण्याचें काम आपण होऊनच सुरळीत करित असतात; त्याला चोळाचोळीची अगर रगडारगडीची कांहींएक गरज नाहीं. फक्त वेणा येते समयीं गर्भाशयाला वरून खालीं दाबावा लागतो व जें डोकें खालीं येत असतें तें लवकर खालीं येण्याकरितां एरंडेल तेल किंवा दुसरे कांहीं बुळबुळीत पदार्थ त्या भागांस लावावे लागतात.

पोटांत दुखूं लागल्यापासून स्त्री बाळंत होई तोंपर्यंत तिला उपाशीं ठेवूं नये. बाळंत होण्याची क्रिया दुःखदायक असून शक्तिहारक आहे व बाळंतीण होण्यास शक्तीचें मुख्य पाठबळ पाहिजे. ती शक्ति राखण्याकरितां बाळंतिणीला वारंवार खावूं घालावें व मधून मधून ऊन काफी तिला प्यावयास द्यावी. काफीच्या योगानें बाळंतिणीचे शरिरांतील शक्तीस उत्तेजन येतें. केव्हां केव्हां बाळंतीण होण्यास उशीर लागतो

व ही गोष्ट पहिलटकरणीस जास्त लागू असते. केव्हां केव्हां बाळंतीण होण्यास स्त्रिया नडतात यालाच व्यवहारामध्यें 'आडवें आलें' असें ह्मणतात.

वर सांगितलेंच आहे कीं, मुलें बहुतकरून डोक्याचे बाजूनें जन्मतात व सर्व गोष्टी अनुकूल असल्या ह्मणजे बाळंतीण होण्यास अडचण पडत नाहीं; परंतु जेव्हां बाळंत होण्यास उशीर लागतो तेव्हां खालीं सांगिलेल्या तीन गोष्टींपैकीं एकीमध्यें कोठें तरी व्यंग आहे असें समजावें.

पहिली गोष्ट गर्भाशयाचें तोंड मुलाचे डोक्यावर ताणत जाऊन आंत जी पाणमोटली असते तिचा गर्भाशयाच्या तोंडावर सर्वत्र सारखा दाब बसल्यानें तें तोंड मोठें होऊं लागतें; शेवटीं, प्रथम जें तोंड गुंजेएवढें लहान असतें, तें पाणमोटलीच्या दाबानें रुपयाएवढें मोठें होतें, व पुढें दाब तसाच चालला ह्मणजे ती पिशवी फुटते; यास पिशवी फुटली, अगर उतरंडी फुटली असें ह्मणतात. नंतर दोन तीन वेणा येऊन मूल त्या गर्भाशयांतून जननेंद्रियाच्या वाटे बाहेर येऊन जन्मास येतें. कोणत्याहि कारणानें असो, जेव्हां या क्रियेस व्यत्यय होतो तेव्हां बाळंतीण होण्यास उशीर लागतो. एखादी स्त्री अशक्त असल्यामुळें, किंवा सशक्त असूनदेखिल केव्हां केव्हां वेणा जोराच्या येत नाहींत व यामुळें फूल फांकून मूल बाहेर निघण्यास उशीर लागतो. केव्हां केव्हां आंतड्यामध्यें मळाच्या गांठी असल्यामुळें किंवा मूत्राशयाच्या तोंडावर गर्भाशयाचा दाब असल्याकारणानें मूत्राशयांत मूत्र राहतें त्यामुळें वेणा जोराच्या येत नाहींत व बायको बाळंतीण होण्यास अडचण पडते. याकरितां अशा वेळीं गांठी काढून टाकण्याकरितां ऊन साबणाच्या पाण्याचा बस्ति द्यावा व मूत्र कोंडलें असल्यास डाक्टराकडून सळईनें काढवावें.

दुसरी गोष्ट मुलांचें आंगचे व्यंग. वर सांगितलेंच आहे कीं, मूल बहुतकरून डोक्यानें जन्मतें व तें डोकें गर्भाशयाच्या तोंडांतून निघून जननेंद्रियाचेद्वारें बाहेर येतें. केव्हां केव्हां मुलाचें डोकें मोठें असतें त्यामुळें गर्भाशयाचे तोंडांतून निघून जननेंद्रियाचे द्वारें बाहेर येण्यास

अडचण पडते, व केव्हां केव्हां मुलाचे डोक्यामध्यें पाणी सांचून तें फारच मोठें होतें. मग गर्भाशयाच्या तोंडांतून बाहेर निघतच नाहीं. तेव्हां बायको निखालस नडते. अशा वेळीं मुलाचें डोकें साधारण मोठें असून मूल जिवंत निघण्याचा संभव असल्यास डाक्टर लोक चिमट्यानें धरतात व ओढून सुटका करितात. आंत पाणी सांचून मुलास रोग होऊन डोकें मोठें झालें असल्यास तें कात्रीनें फोडतात. त्याचे आंतून मेंदू काढला म्हणजे तें लहान होतें; व मग चिमट्यानें धरून बाहेर काढतात. यायोगें बाळंतिणीची सुटका होते. बायको नडण्याचें आणखी एक कारण असें आहे कीं, गर्भाशयाचे तोंडांतून मुलाचें डोकें न निघतां एक हात निघतो. डाक्टर लोक गर्भाशयांत हात घालून मुलाला फिरवतात, व तें पायाचे बाजूनें किंवा डोक्यानें जन्मास यावें अशी व्यवस्था करितात; किंवा बाळंतीण होण्यास बायकोस उशीर होऊन गर्भाशयाचीं इंद्रियें आकुंचित झालीं असल्यास व डाक्टराचा हात गर्भाशयांत जात नसल्यास बालहत्या करून सुटका करावी लागते. केव्हां केव्हां डोक्याच्या ऐवजीं एक किंवा दोन पाय निघतात. अशा वेळीं बायकोची सुटका होते व डाक्टरची गरज लागत नाहीं. केव्हां केव्हां मूल ढुंगणानें निपजतें. अशा वेळींहि बाळंतीण होण्यास उशीर लागतो, पण बायको बहुधा नडत नाहीं.

तिसरी गोष्ट ज्या मार्गानें मूल निपजतें त्या मार्गाचे व्यंगाची आहे. तो मार्ग म्हटला म्हणजे गर्भाशय व जननेंद्रिय हीं होत. यांमध्यें गांठी होऊन फोड होणें किंवा कोणत्याहि रोगाच्या कारणानें व्रण होऊन तें आकुंचित होणें.

इत्यादि अनेक गोष्टींवरून स्त्रिया बाळंत होण्यास नडतात. असें झालें म्हणजे डाक्टराशिवाय आपले हातून किंवा सुइणीचे हातून कांहींएक होणें नाहीं.

सौ० जिऊताई मंत्री.

शिवणकाम आणि कशिद्याचीं कामें.

जेवणखाण आटोपलें व घरांतल्या कामांतून मोकळीक झाली ह्मणजे मग बाकीचा वेळ कसा घालवावा, याविषयीं कित्येक उद्योगी स्त्रियांस मोठी विवंचना पडते. ज्या स्त्रिया सुशिक्षित असतात व ज्यांनां शिवणें टिपणें, कशिदा वगैरेंची माहिती असते, त्यांच्या वेळाचा बहुतकरून सद्व्यय होत असतो. परंतु ज्यांनां या गोष्टींचा गंधहि नसतो त्यांच्या वेळाचा रिकाम्या गोष्टींत किंवा आळसांत दुरुपयोग होतो. अशा स्त्रियांसाठीं कशिदा, शिवणकाम वगैरेची कांहीं माहिती सांगावी असा विचार आहे.

सुगृहिणी ह्मणविणाऱ्या प्रत्येक स्त्रीस अवश्य माहित असलींच पाहिजेत अशा कामांपैकींच शिवणकाम हें एक महत्वाचें काम आहे. प्राचीन काळीं या आपल्या भरतखंडांतच नव्हे, तर दुसऱ्याहि अनेक देशांत स्त्रिया सुताचीं वगैरे वस्त्रें विणून क्वचित् प्रसंगीं त्यावर कशिदाहि काढून तीं पुरुषांस देत असत. या गोष्टीची प्राचीन इतिहासग्रंथ साक्ष देत आहेत. सुभद्रेनें मोठ्या आवडीनें कशिदा काढून अर्जुनास दिलेला शेला, हें, आपल्याकडील उदाहरण आहे. परंतु, ग्रीस, रोमन लोकांच्या इतिहासांतहि अशीं बरींच उदाहरणें सांपडतात. तात्पर्य सांप्रतच नव्हे तर अगदीं प्राचीन काळापासून हें कशिद्याचें काम स्त्रियांच्या आवडीचा विषय होऊन राहिलें आहे.

उत्तम गृहिणी बनावयास प्रत्येक स्त्रीला ज्या ज्या गोष्टींचें ज्ञान झालें पाहिजे, तें करून देण्याचा या 'महाराष्ट्र महिला' मासिक पुस्तकानें जो स्तुत्य प्रयत्न आरंभिला आहे, त्यास यथाशक्ति साहाय्य करणें हें प्रत्येक सुशिक्षित स्त्रीचें कर्तव्य आहे. माझ्या सुशिक्षित भगिनी या मासिकाच्या द्वारें आपलें कर्तव्य बजावून आपल्या इतर भगिनींस योग्य साहाय्य देतील अशी मला मोठी उमेद आहे. महिलेनें विनंति केल्यावरून माझ्या अल्प सामर्थ्याप्रमाणें कशिदा, शिवणकामासंबंधीं त्रोटक माहिती देण्याचें मीं योजिलें आहे. माझ्या एकटीच्यानें हा विषय पूर्णपणें पार पडणें मुळींच

संभवनीय नाहीं. महिलेच्या इतर महाराष्ट्र भगिनीहि या विषयासंबंधींचा आपआपल्या ज्ञानाचा लाभ सर्व भगिनींला करून देतील आणि या उपयुक्त व फार महत्वाच्या विषयाची निरनिराळी माहिती पुढें आणितील, अशी आशा आहे.

वारंवार असें पहाण्यांत येतें कीं, माझ्या कित्येक भगिनी कशिद्याच्या कामांत त्याचप्रमाणें लोंकरीच्या व सुताच्या विणकामांत फार प्रवीण असतात. परंतु नेहमीं प्रचारांत लागणाऱ्या शिवणकामाची त्यांनां बिलकूल माहिती नसते. यासाठीं प्रथमतः संसारांत नेहमीं लागणाऱ्या शिवणकामाचीच माहिती देण्याचें मीं योजिलें आहे. कशिद्याच्या कामाची व सुताच्या विणकामाचीहि माहिती मधून मधून दिली जाईल; तथापि शिवणकामाकडे जास्त लक्ष्य देण्यांत येईल. शिवणकामाची माहिती सुलभ रीतीनें व्हावी यासाठीं जरूर तेवढ्या आकृतीहि देण्यांत येतील. असो.

शिवण तीन प्रकारची असते. १ टीप, २ दोरा, आणि ३ गोट.

१ लहान लेंकरांच्या कपड्यांचे प्रकार.—१ कुचडीं. २ कुंचीं. ३ तेलटोपी. ४ कपाळटोपी. ५ आंगीं. ६ झबलीं. ७ इजारी. ८ चड्ड्या. ९ फ्रॉक. १० गवनें. ११ यागचें गवन. १२ पिनी फोर. १३ एप्रन. १४ परकर. १५ घागरे. १६ फ्रिलचे घागरे. १७ प्लेटीचे घागरे. इ.

२ चोळ्यांचे प्रकार.—१ कटोरीची चोळी. २ बटणांची चोळी. ३ गांठीची चोळी. ४ अर्ध्या हातांची चोळी. ५ पोलक्याच्या तऱ्हेवरची चोळी. इ.

३ पोलक्यांचे प्रकार.—१ कफच्या हाताचे पोलके. २ चुणीच्या हाताचे पोलके. ३ साध्या हाताचे पोलके. इ.

४ सदऱ्यांचे प्रकार.—१ कळीचे सदरे. २ साधे सदरे. ३ पुढील बटणांचे सदरे. ४ एका आंगच्या बटणांचे. ५ खांद्यावरील बटणांचे. इ.

सौ. कृष्णाबाई तालचेरकर.

स्वयंपाकघरांतील गोष्टी.

स्वयंपाकघर ह्मणजे बहुधा घराच्या मागील भागांत असावयाचें. तेथें नेहमीं धूर वगैरे होत असतो; तेव्हां तें घराच्या मागील भागांतच असलेलें बरें. परंतु, यावरून स्वयंपाकघराची योग्यता कांहीं कमी आहे, असें मात्र कोणीं समजूं नये. आह्मां हिंदुलोकांच्या घरांत आह्मां स्त्रियांच्या दृष्टीनें स्वयंपाकघराचें महत्व फार मोठें आहे. घर ह्मणजे आह्मां स्त्रियांचें स्वराज्य आणि या आमच्या स्वराज्याची राजधानी ह्मणजे स्वयंपाकघर. आतां कालमाहात्म्यानें हें राजधानीचें ठिकाण स्वयंपाकघरांतून उठून बरेंच पुढें, ह्मणजे जवळ जवळ पुढील दिवाणखाण्यांत येऊं पहात आहे, ही गोष्ट खरी आहे; परंतु हें स्थानांतर हितावह होईल किंवा कसें, हें, मला तरी सांगतां येण्याजोगें नाहीं. एकंदर राष्ट्रांतील समाजस्थितीचें ज्यांनां परिपूर्ण ज्ञान आहे, त्या माझ्या विद्वान् बंधूंनींच याचें अनुमान काढिलें पाहिजे. मी त्याबद्दल येथें विचारच करित नाहीं. आह्मी हिंदु स्त्रिया आमच्या स्वयंपाकघराला आजवर तरी हें महत्व देत आलों आहों, ही गोष्ट निर्विवाद आहे. आह्मी आमच्या स्वयंपाकघराला इतकें महत्व देत आलों, आमचें सर्व शहाणपण तेथेंच खर्च करित आलों, ह्मणूनच तर पुरुषमंडळी "बायकांचें शहाणपण चुलीपुढें!" असें ह्मणून आह्मांला जेव्हां तेव्हां हिणवीत असते!

एकंदरींत सारांश इतकाच कीं, आह्मां स्त्रियांच्या दृष्टीनें आमच्या एकंदर घरांत स्वयंपाकघराची योग्यता फार मोठी आहे. आमच्या लहानपणच्या शिक्षणापैकीं बरेंचसें उपयुक्त शिक्षण आह्मांला या स्वयंपाकघरांतच मिळत असतें. स्वयंपाकघरांतील कारभार सुरळीतपणें चालवितां येऊं लागला ह्मणजे आमच्या शिक्षणाची एक अति महत्वाची बाब पुरी झाली. आणखी एक गोष्ट सांगितली पाहिजे. घरांत जसजशी गरिबी अधिक, तसतसें या स्वयंपाकघराचें महत्वहि अधिक होत असतें. आणि तसतसें गृहिणीला या स्वयंपाकघरांत आपलें बुद्धिकौशल्यहि अधिकाधिक दाखवावें लागतें. आणि सुगृहिणी घरांत असेल तरच गरिबीचे दिवस कांहीं अब्रूनें जाण्याची आशा.

बरें, या स्वयंपाकघरावर ह्मणजे आह्मां स्त्रियांचाच कायतो इतका लोभ असतो, असेंच केवळ नाहीं. घरांतील एकंदर लहानथोर मंडळींचा-देखिल स्वयंपाकघराकडे ओढा अंमळ अधिकच. मुलांची तर गोष्टच विचारूं नका! स्वयंपाक तयार होई होईपर्यंत त्यांचें एकसारखें आंत बाहेर, आंत बाहेर चाललें असतें. त्यांतून सणावाराच्या दिवशीं कांहीं अधिक उणें गोडघड शिजत असलें, मग तर बोलूंच नका. त्याचप्रमाणें पुरुषांची हपीसांत जाण्याची वेळ झाली कीं स्वयंपाकघरांत कशा येरझारा होत असतात, हें काय मींच सांगितलें पाहिजे? संध्याकाळीं कामाकाजावरून दमूनभागून परत आल्यावरदेखिल स्वयंपाक करण्यांत गढून गेलेल्या आपल्या प्रिय पत्नीबरोबर, या स्वयंपाकघराच्या उंबरठ्यावर बसून मौजेनें तास अर्धा तास गप्पागोष्टी सांगितल्याशिवाय कित्येक पुरुषांनां चैनच पडत नाहीं! त्यांतहि प्रत्यक्ष अन्नपूर्णेच्या रूपानें या स्वयंपाकघरांत विराजमान होणारी गृहिणी, सुदैवानें, जर कां हंसतमुख आणि मधुर भाषण करणारी असली, मग तर त्याच्या आंगीं विलक्षणच आकर्षणशक्ति येत असते. आणि स्वयंपाकघरांची वास्तविक योग्यता तेव्हांच अनुभवास येते.

गृहराज्याच्या या राजधानींत रोज केवढाल्या तरी उलाढाली होत असतात. 'कोंड्याचा मांडा' देखिल येथें होण्यास विलंब लागत नाहीं. केवढें हे जबरदस्त स्थित्यंतर! तेव्हां अशा या विलक्षण स्वयंपाकघरांत घडून येणाऱ्या कित्येक गोष्टी मीं यथाशक्ति येथें सांगण्याचें योजिलें आहे. आणि माझी पक्की खात्री आहे कीं, माझ्या इतर भगिनीहि स्वयंपाकघरांत सिद्ध होणाऱ्या नूतन नूतन सुरस स्वादिष्ट पदार्थांची माहिती मधून मधून महिलेच्या वाचक भगिनींनां करून देण्यास कधींहि अनमान करणार नाहींत.

सौ. गंगाबाई जयवंत.

नवल विशेष.

श्रीमंत सौ. महाराणी चिमणाबाई साहेब गायकवाड, या आपल्या प्रिय पतिसह विलायतची सफर करून चालू महिन्याच्या ११ व्या तारखेस सुखरूप परत आल्या.

***

ता. ८ रोजीं श्रीमती लेडी नार्थकोट साहेब, आपल्या मुंबईच्या गव्हर्नर साहेबांच्या दयाळु पत्नी, यांनां बांद्रें येथील 'सेंट जोसेफ कान्व्हेंट' शाळेंतील इंग्लिश, पारशी आणि मराठी मुलींनीं, अनुक्रमें इंग्रजींत, गुजराथींत आणि मराठींत मानपत्रें दिलीं. आपल्या परम पूज्य विक्टोरिया महाराणी साहेबांप्रमाणें या बाईसाहेबहि हिंदुस्थानी शिकल्या असून यांनां मराठी व गुजराथीचेंहि साधारण ज्ञान आहे, असें समजतें.

***

गेल्या मॅट्रीक्युलेशनच्या परीक्षेंत कुमारी अनुसूयाबाई भांडारकर, कुमारी यमुनाबाई केळवकर आणि श्रीमती काशीबाई देवधर या तीन विद्यार्थिनी पास झाल्या. कुमारी अनुसूयाबाई यांचा नंबर बराच वर आला असून कुमारी यमुनाबाईनां 'यमुनाबाई दळवी संस्कृत स्कालरशिप' मिळाली आहे. या सर्व भगिनींचें **महिला** प्रेम पुरःसर अभिनंदन करित आहे.

***

मुंबईतील 'हिंदु युनियन क्लब'च्या आश्रयाखालीं होणाऱ्या 'हेमंतव्याख्यान मालें'त यंदा श्रीमती गुलाबबाई जव्हेरभाई या गुर्जर विदुषींनीं एक व्याख्यानपुष्प गुंफिलें. विषय **स्त्रीधर्म** हा होता. या प्रसंगीं मुंबईतील मोठमोठ्या घराण्यांतल्या स्त्रियांचा बराच समूह जमला होता. श्रीमती सौ. माणकबाई कोठारे यांनींहि समयोचित भाषण केलें. असे समारंभ वारंवार झाल्यानें आम्हां स्त्रियांनां फार फायदा होणार आहे.

***

आपल्या परम पूज्य मातुश्री महाराणी विक्टोरिया साहेब या फारसें जवाहीर मुळींच वापरित नसतात. त्यांचे हातांत नेहमीं दोन आंगठ्या मात्र असतात. उजव्या हातांतील आंगठींत त्यांचे प्रिय पतीची तसबीर बसविलेली आहे व डाव्या हातांतील आंगठींत सर्वांत धाकट्या पणतवंडाची तसबीर आहे. महाराणीसाहेब ह्मणत असतात कीं "माझें पहिलें व फार मोठें प्रेम मीं उजवे हातांत ठेविलें आहे, व देवानें कृपाळू होऊन प्रेमाची शेवटची कळी जी मला दिली आहे, ती डाव्या हातांत ठेवली आहे."

महाराष्ट्र महिला.

दोन दुःखद मृत्यु.

सद्विद्येचा जो पुरुष । तो उत्तम लक्षणीं विशेष ।
त्याचे गुण ऐकतां संतोष । परम वाटे ॥ १ ॥
जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष महा भला ।
कित्येक लोक तयाला । शोधित फिरती ॥ २ ॥

रामदास.

पौष्य वद्य एकादशी, किंवा ता० १६ जान्युआरी, हा दिवस आह्मां महाराष्ट्रीयांनां चिरस्मरणीय होऊन रहाणार आहे. आमचे परम पूज्य अर्वाचीन महर्षि महादेव गोविंद रानडे यांच्या पुण्यतिथीचा दिवस आह्मांला सदोदित पूज्य आणि पवित्रच वाटावयाचा.

अगदीं अंतकाळापर्यंत या पुण्यपुरुषाचे सर्व नित्य व्यवहार अस्खलितपणें चालले होते. वाचन, अध्ययन, मनन, ईशस्मरण, सदुपदेशकथन इत्यादि सर्व गोष्टी नित्याप्रमाणें झाल्या. रायबहादुर कांतिचरण मुकरजी, जयपूरचे लोकमान्य दिवाण व 'फॅमिन कमिशन'चे नेटिव्ह मेंबर, यांच्या आकस्मिक मृत्यूची बातमी कळतांच "आपलें कर्तव्य बजावित असतां मृत्यु यावा आणि हेंच अत्युत्तम मरण !" असे उद्गार या महापुरुषाच्या वाणींतून बाहेर पडले; आणि ईश्वरी संकेतानें हे शब्द हीच आह्मांला या सत्पुरुषाची शेवटची देणगी झाली. कारण पुढें अर्ध्याच तासाचे आंत तेंच अत्युत्तम मरण—इच्छामरण—ईश्वरानें त्यांनां दिलें. आपल्याला मृत्यु कसा यावा ही जणुं त्यांनीं इच्छा प्रदर्शित करण्याचाच कायतो अवकाश होता! असो. रानडे यांची शेवटची इच्छा अशा रीतीनें पूर्ण झाली, हें पाहून त्यांच्या

आकस्मिक मृत्यूनें झालेल्या दुःसह दुःखांतदेखील किंचित् समाधान वाटतें व त्या कृपाळु जगत्पालकाच्या भक्तवत्सलतेचा पूर्ण प्रत्यय येतो.



मरण माझें मरोनि गेलें । मज केलें अमर ॥ तुकाराम

रानडे यांचा पवित्र आत्मा या जन्मींच्या आपल्या कर्तव्यांची यथाशक्ति सांगता करून धारण केलेलें नश्वर शरीर पंचमहाभूतांच्या स्वाधीन करून या कर्मभूमीमध्यें लोककल्याणार्थ पुनश्च नूतन देह धारण करण्यापूर्वी त्या जगत्पित्याच्या मंगल दर्शनाला निघून तर गेलाच. परंतु आह्मी अद्य जत त्यांच्या दुःसह वियोगदुःखानें एकसारखा विलाप करित राहिलों आहों.

संपूर्ण भरतभूमि या श्रेष्ठ पुरुषाच्या आकस्मिक वियोगानें दुःखमय झाली आहे; रामदास स्वामींनीं म्हटल्याप्रमाणें ॥ 'उत्तम गुणें शृंगारिला । तो बहुतांमध्यें शोभला । प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड जैसा. ॥' हा आमचा ज्ञानसूर्य एकाएकीं अस्तंगत झाल्यामुळें आम्ही दुःखितांतःकरणानें त्या महात्म्याचे विद्वत्ता, बुद्धिमत्ता, मुत्सद्दीपणा, चातुर्य, दीर्घोद्योग, परगुणग्रहण, प्रोत्साहन, कर्तृत्व, शुद्ध शील आदिकरून गुणसमुच्चय आठवित अंधारांत चांचपडत आहों, तोंच वर्षाकाळीं घनघोर अंधकार पडला असतां मध्येंच वज्राघात व्हावा आणि संपूर्ण जगत् त्या आघातासरसें स्तंभित होऊन जावें, तशीच आम्ची स्थिति होऊन गेली. आमच्या मस्तकावर खरोखरच वीज कडाडली. आमच्या परम कृपाळु, परम न्यायी आणि परम भाग्यशाली श्रीमन्महाराणी व्हिक्टोरिया या अगदीं अत्यावस्थ असल्याची बातमी इकडे येऊन थडकली. रानड्यांसारख्या महापुरुषाच्या दुःखकारक निधनामुळें हताश झालेली भरतभूमींतील राणीसाहेबांची प्रजा, आपलें असह्य दुःखहि क्षणभर बाजूला ठेवून आपल्या परम पूज्य राज्ञीच्या प्रकृतीला आराम पडावा ह्मणून आपापल्यापरी भक्तिभावानें ईश्वराला आळवूं लागली; परंतु आमच्या दुर्दैवानें या भक्तिभावाचा आणि या प्रार्थनेचा या प्रसंगीं कांहींएक उपयोग होऊं नये असा त्या जगच्चालकाचा पूर्वींच संकेत ठरला होता, असें दिसतें.

आमच्या परम पूज्य आणि वयोवृद्ध महाराणीसाहेबांच्या निधनाची हृदयभेदक बातमी घेऊन येणाऱ्या त्या निर्दय विद्युल्लतेच्या एका आघातासरसें संपूर्ण भरतखंड दुःखाग्नींत होरपळूं लागलें. अशी सद्गुणी आणि प्रजेचें पुत्रवत् पालन करण्यांत सदैव दक्ष असणारी राज्ञी पुनः लवकर दृष्टीस पडणें कठीण आहे. महाराणी व्हिक्टोरिया यांनीं आपल्या अंगच्या अलौकिक गुणांनीं, महाराणी या श्रेष्ठ पदाला खरोखरच श्रेष्ठता आणि शोभा आणिली होती. या महाराणी ह्मणजे स्त्रियांच्या उन्नत स्वरूपाचें, उन्नत गुणांचें आणि उन्नत स्थितीचें एक मूर्तिमंत उदाहरणच होत्या. त्या पराकाष्ठेच्या कर्तव्यदक्ष, सत्वशील आणि सदाचरणी होत्या.

एकंदर स्त्रीजातीला त्या स्वतः जशा भूषणभूत होऊन गेल्या, तद्वतच त्यांचा चरित्रक्रमहि एकंदर स्त्रीसमूहाला अत्यंत अनुकरणीय असाच होऊन राहिला आहे. दया, क्षमा, शांति, आदिकरून स्त्रीजातीला शोभविणाऱ्या सद्गुणांनीं त्यांनीं इंग्लंडासारख्या जगांतील पहिल्या प्रतीच्या राष्ट्राच्या सिंहासनाला गेलीं ६४ वर्षें सतत शोभा आणिली होती.



इंग्लंडच्या राजनीतिसंबंधीं प्रसंगविशेषीं कोणी कांहीं बोलूं शकेल, परंतु या भाग्यशाली राज्ञीविरुद्ध एक शब्दहि कोणाला उच्चारतां येणार नाहीं.

एवढ्या मोठ्या अफाट राज्याचा राज्यकारभार सुयंत्रितपणें चालवून शिवाय संसारसंबंधीं हरएक कर्तव्यें त्यांनीं पूर्णपणें बजाविलीं आहेत. कन्या, पत्नी आणि माता या तिन्ही स्थितींत त्यांचें वर्तन अत्यंत प्रशंसनीय आणि एकंदर महिलावर्गास अभिमानार्ह असेंच होतें. या सद्गुणमंडित महाराज्ञीचें विमल यश कितीहि वर्णिलें तरी तें थोडेंच होणार आहे.

महाराज्ञी व्हिक्टोरिया यांची ही अलौकिक कारकीर्द हिंदुस्थानांतील स्त्रीवर्गाच्या तर विशेष कृतज्ञबुद्धीला कारणीभूत झाली आहे. आमच्या स्त्रीवर्गाची पुनः जी कांहीं थोडीबहुत उन्नति झाली आहे, निदान उन्नति होण्याचीं साधनें हल्लीं जीं कांहीं सुलभ झालीं आहेत, तीं सर्व यांच्या उज्वल कारकीर्दीतच झालीं आहेत; आणि त्याला परलोकवासी रानडे यांच्या सारख्या महात्म्यांचे अव्याहत परिश्रम कारणीभूत झाले आहेत हेंहि लक्ष्यांत ठेविलें पाहिजे. जवळ जवळ एकाच वेळीं झालेल्या या दोन थोर व्यक्तींच्या वियोगामुळें आमच्या महिलावर्गाची जी अपरंपार हानि झाली आहे, ती कधींहि भरून येण्याचा संभव नाहीं. आणि याबद्दल हिंदुस्थानांतील संपूर्ण स्त्रियांस परमावधीचें दुःख होणें साहजिकच आहे. परंतु आतां त्याबद्दल कितीहि दुःख केलें, कितीहि शोक केला तरी तो व्यर्थ आहे. जुन्या शतकाबरोबर जुनीं माणसेंहि आह्मांस अंतरावयाचींच. यास्तव आतां या नवीन शतकाबरोबर नवीन मंडळीनें जुन्या माणसांची सत्कृत्यें रात्रंदिवस डोळ्यांपुढें ठेवून त्या जगत्पालकाच्या इच्छेस मान्य होऊन आपलें कर्तव्य योग्य रीतीनें बजाविण्यास तत्पर राहिलें पाहिजे.

शेवटीं तो परम कृपाळु परमात्मा आमचे नवीन बादशाहा सातवे एडवर्ड यांनां दीर्घायु करून त्यांचा सदोदित जयजयकार करो व त्यांच्या सत्वशील मातुश्रीप्रमाणेंच त्यांच्या हातूनहि महिलावर्गाची उन्नति करवो, एवढीच प्रभुपदीं प्रार्थना आहे.

सुशीला.

'आईबापांनीं आपल्या मुलांस लहानपणीं असें योग्य शिक्षण द्यावें आणि असा उत्तम मार्ग दाखवावा, कीं, पुढें मोठेपणीं त्या शिक्षणाचा त्यांनां उत्तम फायदा होईल आणि आईबापांनीं दाखविलेल्या मार्गाबाहेर जाण्याची त्यांनां कधींहि इच्छा उत्पन्न होणार नाहीं.' ही जी एका थोर पुरुषाची उक्ति आहे ती नेहमीं लक्ष्यांत वागवून सुशीलेची आई आपल्या मुलांनां हितकर शिक्षण देत असे. आपल्या मुलांनीं नीतिमान् व्हावें, सद्धर्मी व्हावें, त्याचप्रमाणें नम्र, उद्योगी, सुशिक्षित, सद्गुणी व्हावें, एवढीच सुशीलेच्या आईची महत्वाकांक्षा नव्हती. हे गुण मुलांमध्यें असलेच पाहिजेत, असा तिचा समज असून शिवाय मुलांनीं लहानपणापासून संसारांतील लहान मोठ्या प्रत्येक गोष्टींत दक्ष असलें पाहिजे, अशी तिची इच्छा असे व त्याप्रमाणें ती आपल्या मुलांस अशाच प्रकारचें उत्तम शिक्षण देण्याविषयीं फार काळजी घेई. यःकश्चित् एखादी क्षुल्लक का गोष्ट असेना, तिचा व्यर्थ नाश होऊं देणें, आणि त्याचप्रमाणें कोणत्याहि वस्तूचा उधळेपणानें व्यय करणें, हें फारच वाईट होय, असें तिच्या मनामध्यें पूर्णपणें बिंबलें होतें. अशा वर्तनानें गरीबीचाच नव्हे, मोठ्या श्रीमंतीचाहि संसार धुळीस मिळाल्यावांचून राहणार नाहीं, असें ती वारंवार ह्मणे. आणि ह्मणूनच आपल्या मुलांच्या अंगीं हे दुर्गुण जडूं नयेत, ह्मणून ती फारच काळजी घेई.

एक दिवस संध्याकाळच्या वेळीं काड्यांची एक पेटी घेऊन सुशीलेनें घरांतील दिवे लाविले व अभ्यासाच्या गडबडींत तिच्या हातून ती पेटी कुठें सांडली. पुढें पेटीची गरज लागतांच ती सांपडेना, सुशीलेनें ती हरवली, हें तिच्या आईला कळतांच ती हातांतलें काम पुरें करून बाहेर दिवाणखान्यांत आली व सुशीलेला जवळ घेऊन किंचित् वाईट मुद्रा करून शांत स्वरानें ह्मणाली "सुशीले! काड्यांची पेटी ही यःकश्चित् वस्तु होय असें समजून तूं तिची घ्यावी तितकी काळजी न घेतां ती हरवलीस, हें तूं

फार वाईट काम केलेंस. आज ती पेटी तूं हरवली नसती तर आपल्यास आणखी आठ दिवसपर्यंत ती चालली असती. श्रीमंत ज्याप्रमाणें मूल्यवान् वस्तूंची काळजी बाळगून त्या जपून वापरतात, त्याप्रमाणेंच गरीबांनीं साधारण वस्तूंचीहि फार काळजी घेऊन फार जपून वागलें पाहिजे. क्षुल्लक गोष्ट आहे असें समजून तिची हयगय करतां कामा नये. असें केल्यास गरीबच कां, मोठमोठे राजेलोकहि भिकेला लागतील. पेटीचें काम होतांच ती तूं जर जागचे जागीं ठेविली असतीस तर ती हरवती कशाला?"

सुशीलेची आई याप्रमाणें मुलीला उपदेश करित होती इतक्यांत गांवांतील दोघे गृहस्थ विष्णुपंतांचे घरीं येत होते. चार दिवसांपूर्वीं गांवांतील मंडळीची एक सभा झाली होती व गांवांतल्या 'हास्पिटला'स सर्व लोकांनीं मिळून थोडथोडी वर्गणी देऊन मदत करावी, असें त्या सभेंत ठरलें होतें. विष्णुपंतांनींहि आपल्या शक्तीप्रमाणें या वर्गणीचे यादीमध्यें आंकडा घातला होता व ती वर्गणी वसूल करण्यासाठींच सभेनें नेमलेले हे दोघे गृहस्थ विष्णुपंतांकडे आज आले होते. परंतु एका दीड दमडीच्या काड्यांच्या पेटीसाठीं विष्णुपंतांचें कुटुंब आपल्या मुलीवर रागावलें आहे, हें पाहून या येणारे गृहस्थांस वाटलें कीं, यःकश्चित् काड्यांचे पेटीसाठीं जर यांचा जीव इतका खालींवर होत आहे, तर या कृपणांचे हातून वर्गणीचा पैसा सुटणें ह्मणजे जवळ जवळ वंध्याप्रसवच होय! या कंजुषांकडून कांहींएक मदत मिळण्याची आशा नाहीं, यास्तव आपण पुढें जावें हेंच बरें, असा पोक्त विचार करून ते पुढें जाऊं लागले. परंतु त्यांनां परत जातांना पाहून विष्णुपंतांनीं त्यांस मुद्दाम हाक मारून बोलाविलें आणि यादीमध्यें लिहिलेले दोन रुपये आणि त्यांच्या पत्नीनें आपल्या स्वताकडचे दिलेले आणखी तीन रुपये मिळून पांच रुपये त्यांचे हवालीं केले. विष्णुपंतांकडून पांच रुपये मिळतांच त्या गृहस्थांस मोठा विस्मय वाटला व ते मनांतल्या मनांत हंसले. त्यांनां विस्मय वाटण्याचें कारण विष्णुपंतांनीं तेव्हांच ओळखलें. विष्णुपंत ह्मणाले "खरोखरच आह्मी अगदीं गरीब आहों. माझें कुटुंब प्रत्येक वस्तु फारच काटकसरीनें खर्च करितें ह्मणूनच आमचा निभाव लागतो, एवढेंच नव्हे तर

माझी अमदनी अल्प प्राप्ति असतांहि आमचा सर्व खर्चवेंच भागून दरमहा एक दोन रुपये तरी शिल्लक रहातात. आह्मी जर काटकसरीनें वागलों नसतों तर आमच्या कुटुंबाचा कधींहि निभाव लागला नसता. फार कशाला, तुह्मांला यःकश्चित् वाटणाऱ्या या काड्यांच्या पेटीसारख्याच लहान-सहान गोष्टींची आह्मीं जर उपेक्षा केली असती, तर आमचा खर्च आह्मांला पुरा करतां आला नसता, आह्मी कर्जबाजारी झालों असतों व मनांतून जरी आह्मांला पुष्कळ वाटलें असतें, तरी आज हास्पिटलासारख्या चांगल्या संस्थेस आह्मांला एका पैचीहि मदत करतां आली नसती. गरीबांनीं काय किंवा श्रीमंतांनीं काय, क्षुल्लक गोष्ट आहे असें समजून तिची हयगय किंवा वृथा खर्च कधींहि करतां कामा नये. आह्मी कृपण आहों असें वाटून तुह्मी हंसलां असाल, परंतु आह्मी कृपण नाहीं अशी आतां तुमची खातरी झालीच असेल. फक्त आह्मी उधळे नाहीं. कृपणपणा एखादे वेळीं पुरवेल, परंतु उधळेपणाचा दुर्गुण मात्र सर्वस्वी भयंकर आहे."

विष्णुपंतांचें हें भाषण ऐकून ते दोघेहि गृहस्थ त्यांची क्षमा मागून आश्चर्य करित पुढें गेले.

सुशीलेची आई सुशीलेस नेहमीं उपदेश करी "मुली, तूं आपलें कर्तव्य नीट करित रहा, आपल्या आयुष्याचा एक क्षणहि कधीं फुकट घालवूं नको. ज्या वेळीं जें काम करावयाचा निश्चय केला असेल, त्या वेळीं तेंच काम करावें. वेळच्या वेळीं काम करण्याची हयगय केल्यास मग कोणतेंहि काम सुरळीतपणें होत नाहीं. नाना प्रकारच्या अडचणी उभ्या रहातात व एकंदरींत फार अहित होतें. ज्या वेळचें काम त्या वेळीं केलें नाहीं तर कधीं कधीं प्राणाशींहि गांठ येते. मीं माझ्या डोळ्यांनीं पाहिलेलीच एक गोष्ट तुला सांगतें. एका बाईच्या मुलास ज्वर येत होता. मुलाला ज्या दिवशीं ताप आला, त्याच दिवशीं त्याला एक लहानसा जुलाब देण्याविषयीं तिच्या नवऱ्यानें त्या बाईला सांगितलें; परंतु जुलाबाचें कडु व घाणेरडें औषध मूल घेणार नाहीं, रडेल ह्मणून त्या बाईनें त्या दिवशीं कांहीं मुलाला जुलाब दिला नाहीं. तो दिवस गेला. दुसराहि दिवस गेला. तिसरे

दिवशीं तर मुलाचा ताप फारच वाढून मूल अगदीं हैराण झालें. तरीहि मोठ्या पहांटेस उठून वैद्याकडे कोणीहि गेलें नाहीं. कोणचा वैद्य चांगला, कोणाला चांगली परीक्षा आहे, याला बोलवावें कीं त्याला बोलवावें, या विचाराखालींच बराच वेळ घालविला. पुढें एका वैद्याला बोलावण्यासाठीं एका मनुष्याला पाठविलें; परंतु या वेळीं वैद्य कांहीं त्याला भेटला नाहीं. याप्रमाणें त्या दिवशींहि कांहीं मुलाला योग्य उपचार झाले नाहींत; यामुळें मुलाचा ताप अतिशय भडकून त्यांतच त्याचा शेवट झाला. वेळच्या वेळीं काम न केल्याचा हा भयंकर परिणाम होय. अशीच दुसरीहि एक गोष्ट मीं एका पुस्तकांत वाचिली आहे, ती तुला सांगतें. युरोपांत पूर्वी रोम नांवाचें एक राज्य होतें. तेथें एके वेळीं ज्यूलियस सीझर नांवाचा राजा राज्य करित होता. राजाच्या विरुद्ध पक्षाच्या कित्येक कारस्थानी मंडळीनें गुप्त कट करून राजसभेमध्येंच अमुक एका दिवशीं राजाचा वध करायाचा बेत केला. राजाच्या वधाची ही गुप्त बातमी राजाच्या विश्वासांतील एका मनुष्यास कळतांच तत्संबंधींच्या इशारतीचें त्यानें राजाला एक पत्र पाठविलें. परंतु राजा या वेळीं दुसऱ्याच कांहीं व्यवसायांत मग्न असल्यामुळें त्यानें त्याच दिवशीं कांहीं तें पत्र वाचलें नाहीं. फुरसतीअंतीं सावकाश वाचूं, असा विचार करून त्यानें तें आपल्या प्रधानाजवळ ठेवायास दिलें. परंतु दुसरे दिवशीं पत्र वाचण्यास तो कांहीं जिवंत राहिला नाहीं. तेंच जर पत्र मिळतांच तो तें वाचता, तर त्याला आपल्या प्राणाचा असा भयंकर रीतीनें बळी द्यावा लागला नसता. त्यानें आपल्या रक्षणाची कांहींतरी अवश्य व्यवस्था केली असती. यास्तव सुशीले, ज्या दिवशीं व ज्या क्षणीं जें काम करावयाचें त्या दिवशीं व त्या क्षणीं तूं तें करित जा. पुढील वेळावर कधींहि टाकूं नको. तसें करशील तर वर सांगितलेल्या उदाहरणासारखें कधींहि भरून न येणारें असें भयंकर नुकसान होईल, हें तूं पक्कें लक्ष्यांत ठेव."

रमाबाई रानडे यांस शांतवनपर पत्रें.

आर्यमातेचे सुपुत्र, देशाचे पुढारी, राष्ट्राचे आधारस्तंभ, स्त्रीशिक्षणाचे कैवारी, परम विद्वान्, लोकमान्य, महात्मे नामदार महादेव गोविंद रानडे यांच्या आकस्मिक मृत्यूनें साऱ्या हिंदुस्थान देशाचें कधींहि भरून न येणारें असें नुकसान झालें आहे, ही गोष्ट तर अगदीं निर्विवाद आहे. परंतु त्यांतहि रानडे यांच्या निधनानें त्यांच्या सुशील, सद्गुणी, साध्वी भार्येची जी अत्यंत हानि झाली आहे तिला सीमाच नाहीं. जगांत मृत्यु हें भयंकर दुःख होय, असें मानण्यांत येतें. मृत्यूपेक्षां दुसरें एकहि अति भयंकर दुःख नाहीं, असा समज आहे. परंतु पतिव्रता स्त्रीला पतिवियोग होणें, हें मृत्यूच्या पेक्षांहि अत्यंत भयंकर व ज्याला दुसऱ्या कशाचीहि उपमा देतां येणार नाहीं, असें दुःसह दुःख आहे. आमच्या पूज्य भगिनी रमाबाईसाहेब यांच्या वांट्याला आज तें अति दुःसह दुःख आलें आहे, याबद्दल त्याचशा काय परंतु सारें भरतखंड दुःखनिमग्न झालें आहे. ज्याला ज्याला रानडे यांचें नांव आणि कीर्ति माहीत होतीं तें तें ही दुष्ट वार्ता ऐकतांच रडलें नाहीं, असें हिंदुस्थानांत एकहि सहृदय मनुष्य आढळणार नाहीं. रमाबाईवर तर दुःखाचा डोंगरच कोसळला आहे. आणि ह्मणूनच रमाबाईच्या कष्टप्रद स्थितीविषयीं सर्वांनां फार वाईट वाटत आहे. रमाबाईच्या दुःखाचा भार कमी करण्यासाठीं हिंदुस्थानचे व्हाईसरॉय लॉर्ड कर्झनसाहेब, मुंबईचे गव्हर्नर लॉर्ड नार्थकोटसाहेबप्रभृति थोर थोर राजपुरुषांनीं; त्याचप्रमाणें श्रीमंत शाहुछत्रपतीमहाराज, श्रीमंत सयाजीरावमहाराज प्रभृति महाराजांनीं; त्याचप्रमाणें हिंदुस्थानांतील बहुतेक लहानमोठ्या गांवांतील लोकांनीं सार्वजनिक सभा भरवून त्यांनां शांतवनपर पत्रें पाठविलीं आहेत. पुरुषवर्गाप्रमाणें आमच्या महिलावर्गानेंहि या प्रसंगीं आपलें कर्तव्य बजावून आपल्या पूज्य भगिनी रमाबाईसाहेबांनां पाठविलेल्या शांतवनपर पत्रांपैकीं एक दोन पुढें दिलीं आहेत.

ता० २३ जान्युआरी रोजीं येथील 'लेडीज सोशिअल क्लब'च्या मुद्दाम भरलेल्या सभेंत लेडी भालचंद्र यांचें सुरस भाषण झाल्यावर श्रीमती सौ० माणकबाई कहानजी, श्रीमती सौ० शंभोगौरी मदनलाल, श्रीमती सौ० गंगुताई भांडारे यांचींहि समयोचित भाषणें होऊन खालील आशयाचें दुखवट्याचें पत्र रमाबाईसाहेबांकडे पाठविण्याचें ठरलें. या पत्रावर क्लबांतील बऱ्याच भगिनींनीं सह्या केल्या होत्या.

"प्रिय भगिनी रमाबाई रानडे यांसी,

विनंति विशेष. आपल्यावर हल्लीं जो दुःखाचा डोंगर कोसळला आहे, त्यामुळें आम्हां सर्वांनां किती दुःख होत आहे, तें पत्री लिहितां येत नाहीं. स्त्रीला पतिवियोगासारखें दुसरें मोठें दुःख नाहीं. त्यांत आपली प्रीति लोकोत्तर होती आणि आपले पति आज सर्व हिंदुस्थानांत रत्न होते. आपणहि त्यांच्या ऐश्वर्याला व थोरवीला साजेल अशा वर्तत होतां. अशा सौभाग्याचा उच्छेद होऊन आपण एकदम शोकसागरांत बुडालां, हें पाहून आपल्या सर्व मैत्रिणींनां अत्यंत दुःख होत आहे. आपलें मन अतिशय प्रेमळ आहे, त्यामुळें आपली दुःखाची वेदना सहजच तीव्र असेल. तथापि आपण विचारी आहां. स्वताशीं विवेक करून आपलें दुःख आपण आवरावें असें आपल्याजवळ आमचें मागणें आहे. दुःखाची वांटणी तर होत नाहींच. तरी आपल्या इष्टमित्रांनां आपल्याविषयीं अत्यंत वाईट वाटत आहे, ह्या विचारानें जर दुःख कांहींसें हलकें होईल तर पहावें. अशा स्थितीत मनाच्या स्थैर्याला मुख्य साधन परमेश्वरावर सर्वथा हवाला ठेवणें हेंच होय. त्याच्याच चिंतनानें आपलें अनिवार दुःख सोसण्यास आपल्याला बळ येवो, असें आमचें परमेश्वरापाशीं मागणें आहे. विशेष काय लिहावें, लोभ करावा, हे विनंति."

याचप्रमाणें ता० २५ जानेवारी रोजीं धुळें येथेंहि स्त्रियांची एक सभा होऊन त्यांनीं पुढील आशयाचें पत्र रमाबाईसाहेबांनां पाठविलें.

" श्रीमती सकलगुणमंडित रमाबाईसाहेब रानडे यांचे सेवेशीं—

स्नेहांकित धुळें येथील कुलस्त्रिया यांजकडून प्रेमपुरःसर विनंति सादर करण्यांत येते, ऐसीजे—

आपले प्रिय पति नामदार न्यायमूर्ति माधवराव गोविंद रानडे, यांना गेल्या बुधवारीं देवाज्ञा झाली. हें ऐकून आम्हां सर्वजणींस अत्यंत वाईट वाटत आहे. आपल्यावर जी ही आकाशाची कुऱ्हाड पडली, तिनें केवळ आपलेंच दुर्दैव ओढवलें असें नसून सर्व हिंदुस्थान देशाची फार मोठी हानि झाली आहे. आपलें सर्वस्व बुडालें हें तर खरेंच, पण आमच्या देशांतील अत्यंत मौल्यवान् हिरा गमावला, सर्व विद्वान् मनुष्यांचा शिरोमणि लोपला, देशकल्याणाकरितां झिजणाऱ्या पुरुषांना जिवापाड मेहनत करणारा पुढारी नाहींसा झाला, अत्यंत कळकळीनें व गोड शब्दांनीं सदुपदेश करणारा, प्रपंचांत राहून परमार्थ साधणारा, राजा व प्रजा या दोघांनांहि खरा मार्ग दाखविणारा, उत्तम लेखक, उत्तम वक्ता, अश्रांत परिश्रम करणारा, स्वदेशजननीचा केवळ कुलदीप, स्वदेशसेवेचा आधारस्तंभ एकाएकीं परमेश्वरानें ओढून नेला, असा सर्व देशबांधव शोक करित आहेत. परंतु ' आलें देवाजीच्या मना, तेथें कोणाचें चालेना ' अशी साधु तुकारामबुवा यांची उक्ति आहे. आपण व आह्मी आतां कितीहि आक्रोश केला तरी माशानें गिळलेलें माणीक परत येणार नाहीं, ह्या न्यायाकडे दृष्टि देऊन आपण आपला शोक विसरावा. आपल्या प्रिय पतीच्या आपण खऱ्या खऱ्या सहधर्मचारिणी होतां. त्यांच्या भाग्योदयांत आपला वांटा होता. तसा त्यांचे देशहितार्थ जे अनेक उद्योग चालू होते, त्यांतहि आपला वांटा होताच. पुरुषांचा पुढाकार जसा त्यांनीं घेतला होता, तसा आह्मां बायकांचा पुढाकार आपण पत्करला आहे; आपल्या प्रिय पतीचे उद्योग चालू ठेवणें, देशहिताचे कामाला मदत करणें, हीच त्या महात्म्याची उत्तम सेवा होय व हीच त्यांचे आत्म्यास परलोकीं मान्य होणार आहे, याकडे दृष्टि देऊन आपण शोकाचें आकलन करावें, आपल्या दुःखांत सर्व हिंदुस्थानचे लोक वांटेकरी झाले आहेत ह्यांतच समाधान मानावें, अशी आमची सर्वांची हात जोडून प्रार्थना आहे. ती आपण अवश्य मनास आणाल अशी उमेद आहे.

कळावें, बहुत काय लिहिणें, लोभ असावा, ही विनंति."

याशिवाय मुंबई येथील 'आर्यमहिलासमाजा'कडून व ब्राह्मण स्त्रियांकडूनहि रमाबाईनां पत्रें गेल्याचें समजतें. याचप्रमाणें उमरावती, सोलापूर, पुणें वगैरे ठिकाणाहूनहि अशींच पत्रें गेलीं असतीलच.

ज्या ज्या भगिनींनीं आपल्या पूज्यभगिनी रमाबाई रानडे यांनां शांतवनपर पत्रें पाठवून आपलें कर्तव्य बजाविलें, त्या त्या सर्वांचें महिला गौरव करिते. आपल्या दुःखाचा सारा देश वांटेकरी झाला आहे हें पाहून व सृष्टिक्रमाकडेहि लक्ष्य देऊन रमाबाईसाहेबांनीं आतां विवेकानें आपल्या मनाचें शांतवन केलें पाहिजे. महिलावर्गाची उन्नति करण्याचें रानडे साहेबांचें ब्रीदच होतें. तेंच रमाबाईसाहेब पुढें चालवून आपल्या पतिप्रेमाचें सार्थक्य करून धुळेकर भगिनींनीं ह्मटल्याप्रमाणें 'पुरुषांचा पुढाकार जसा रानडे यांनीं घेतला होता, तसा आह्मां बायकांचा पुढाकार आपण पत्करला आहे. आपल्या प्रिय पतीचे उद्योग चालू ठेवणें हीच त्या माहात्म्याची सेवा होय व हीच त्यांचे आत्म्यास परलोकीं मान्य होणार आहे.' ही गोष्ट नेहमीं लक्ष्यांत वागवून महिलावर्गाच्या उन्नतीसाठीं आपलें उरलेलें आयुष्य त्या खर्च करतील व परमेश्वर त्यांनां तसें करण्यास सामर्थ्य देवो, एवढेंच महिला परमेश्वरापाशीं मागणें मागते.

मोक्षसाधनाचा राजमार्ग.

मनुष्यजन्माचें सार्थक्य ह्मटलें तर मोक्षसाधन हें होय. मनुष्यप्राणी हा सर्व प्राण्यांत श्रेष्ठ आहे. त्याचा आत्मा ह्मणजे परमेश्वराचाच एक अति अति सूक्ष्म अंश किंवा परिमाणू असें ह्मटलें आहे व तो शेवटीं जेथून आला, तेथें जावयाचा आहे; हें जाणें ह्मणजे ईश्वररूपीं मिळून जाणें व ह्यासच मोक्षप्राप्ति ह्मणतात; आणि जन्मास येऊन जें अत्यंत श्रेष्ठ कार्य करायचें, जें उत्तम फळ संपादावयाचें, तें हेंच.

आपल्या मनांत एखादें काम करायचें असलें, ह्मणजे आपण तें कसें करावें, त्यास साधनें कोणतीं व तीं आपणांस कशीं अनुकूल होतील, हें अगोदर पहात असतों. 'गरज ही युक्तीची जननी होय', अशी एक प्रसिद्ध ह्मण आहे. ह्मणजे गरज भासूं लागली, कीं युक्तीहि आपली आपोआप सुचायचीच, असें बहुतकरून घडतें; कारण परमेश्वराची योजनाच तशी आहे. प्राणिमात्रावर त्याचें अत्यंत प्रेम असल्यामुळें ज्याला त्याला आपापलें हितसाधन करण्याचीं साधनें त्यानें अगोदरच देऊन ठेविलीं आहेत. ह्या साधनांच्या योगानें अत्यंत दुर्बळ प्राण्यालादेखील इष्ट फळप्राप्ति करून घेतां येते, हें आपणांस सृष्टींत नेहमीं दिसून येतें. मुंगीपासून हत्तीपर्यंत कोणताहि लहान मोठा प्राणी पहा. कोणी उपाशीं रहात नाहीं, किंवा विनाकारण संकटांतहि पडत नाहीं. आपापल्या सुखापुरती ज्याची त्याला स्वतंत्र व योग्य तजवीज ईश्वरानें करून दिली आहेच. त्याच दयाळु देवानें आह्मां मानवप्राण्यांनां बुद्धि वगैरे उत्तम मानसिक शक्ति दिल्या आहेत, कीं जेणेंकरून आह्मीं ज्ञानप्राप्ति करून घेऊन इहपरलोकचीं सर्व सुखें संपादन करून घ्यावीं.

वर ह्मटलेंच आहे कीं, जगांत येऊन जें अति उत्तम फळ साध्य करायचें, तें मुक्तिसाधन हें होय. स्त्रीपुरुषांनीं हें कसें साधावें—याविषयीं साधु पुरुषांनीं आपापल्या ग्रंथांतून पुष्कळ सांगितलें आहे. ज्या रस्त्यानें गरीब दुर्बळ माणसांनां निर्भयपणें जातां येतें व जो सर्वांनां अनुकूळ

किंवा सोपा, त्यास सुलभ किंवा राजमार्ग ह्मणतात. तर मग स्त्रियांनां मोक्षप्राप्तीचा राजमार्ग कोणता? असा राजमार्ग एकच. तो हा—
"कर्तव्यकर्म हाच कीर्तीचा व मुक्तीचा राजमार्ग होय."

कर्तव्यकर्म ह्मणजे जन्मभर जें जें केलेंच पाहिजे तें तें. कर्तव्याची मर्यादा हवी तशी वाढवितां येते. आपलें सामर्थ्य, बुद्धिबळ, ऐपत, ऐश्वर्य व इच्छा हीं जशीं असतील, त्या मानानें आपलीं इहलोकचीं कर्तव्यें कमजास्त होऊं शकतात; परंतु अगदीं सामान्य प्रतीच्या स्त्रियांचेंच उदाहरण घेतलें तरी त्यांसहि पुढें लिहिलेलीं कर्तव्यें करावीं लागतातच. सासूसासरे, आईबाप, वडील माणसें वगैरे गुरुजनांचें आज्ञापालन, त्यांची सेवा करणें व त्यांचा संतोष होईल असें वागणें; पतिव्रताधर्म ह्मणजे पतीची सेवा, हरएक कामीं त्याचा संतोष व साह्य करणें, व त्याच्या हितासाठीं झटणें; त्याशीं सदैव अकृत्रिम प्रेमभावानें वागणें वगैरे; गृहिणीधर्म ह्मणजे संसारांत दक्षपणानें वागणें, कुटुंबाच्या आरोग्यास, हितास, व सुखास अनुकूल होईल अशी घरांतली व्यवस्था ठेवणें; मातृधर्म ह्मणजे आई ह्या नात्यानें बालकांचें संगोपन, त्यांचें शिक्षण व पालन चांगल्या रीतीनें करणें वगैरे. हीं केवळ स्त्रियांचीं मुख्य कर्तव्यें होत. ह्यांशिवाय समाजासंबंधीं ह्मणून कांहीं गोष्टी करावयाच्या असतात. आल्या गेल्याचा समाचार घेणें, गरीबगुरिबांस, अनाथ अपंगांस होईल तें साह्य करणें, शेजारधर्म पाळणें वगैरे. स्वधर्म ह्मणजे स्वतः सदाचरणानें वागणें, ईश्वरभक्ति, दुसऱ्याच्या सुखासाठीं स्वतः घस सोसणें, आत्मसंयमन करणें इ०. ह्याहि गोष्टींची कर्तव्यांतच गणना होते.

हीं सारीं कर्तव्यें स्त्रियांच्या हातून जितकीं नीट पार पडतील, तितका मोक्ष त्यांच्या जवळ जवळ असतो. साधु पुरुषांनीं संसारत्याग करून, अचाट तपश्चर्येनें किंवा नानाविध सिद्धींच्या योगानें मोक्षप्राप्ति करून घेतल्याचीं उदाहरणें पुराण ग्रंथांतून सांपडतात. स्त्रियांनां हे सर्व मार्ग अनुकूल नाहींत ह्मणून त्यांच्या अगदीं हाताशीं, अगदीं आटोक्यांतला सोपा परंतु

त्याच फलप्रद, असा हा कर्तव्यमार्ग ईश्वरानें परम कृपाळूपणानें योजून ठेविला आहे. एवढेंच नव्हे, तर या मार्गात परमेश्वर जन्मतांच त्यांस आणून सोडून अडचणीच्या ठिकाणीं साह्य करण्यास सदैव तत्पर असतो. आयुष्यांत स्त्रियांनां नानाप्रकारचीं संकटें असतात. परतंत्रता, दुर्बळता व प्रपंचांतल्या अनेक अडचणी स्त्रियांनां जन्मभर अनुभवाव्या लागतात; परंतु ईश्वर त्यांचें हरएक प्रसंगीं साह्य करण्यास सिद्ध असतो, ह्मणूनच त्या निभावतात. अशक्त किंवा अज्ञान मुलांवर आईची ममता विशेष असते, असें कधीं कधीं दिसतें; तद्वतच देवाचें हें करणें आहे. स्त्रीजाति दुर्बल आहे, ह्मणून तिच्या हिताचीं साधनें विशेष तऱ्हेनें नेमिलेलीं आहेत. तिचें महत्त्व रहावें, ह्मणून तिला मातृपदप्राप्ति, विनय, मृदुलता, प्रेमळ अंतःकरण, कोमलता इत्यादि गुणांचें साह्य दिलें आहे. संसारसागरांतून सुखानें निभावून जाण्यास ह्या गुणांचा फार उपयोग होतो. ह्यांच्या अभावीं कर्तव्यें पार पडणार नाहींत ह्मणूनच ह्यांची अनुकूलता मनुष्यस्वभावांत निर्माण केली आहे, व त्यांचा उपयोग होण्यास संसार हें उत्तम स्थळहि जवळच ठेविलें आहे. तेव्हां मुमुक्षूंनीं ह्या साऱ्या साधनांचा उपयोग करावा व आपल्या जन्माचें सार्थक्य करून घ्यावें, हाच ईश्वरी हेतु आहे, हें निराळें सांगण्याची गरज नाहीं. आपल्या देशांतल्या किंवा कोणत्याहि देशांतल्या सत्पुरुषांचीं व साध्वी स्त्रियांचीं चरित्रें बारकाईनें पाहिलीं, तरी हाच बोध होतो. ईश्वरानें मनुष्यप्राण्यांस सद्गुण व सद्वृत्ति दिल्या आहेत, त्यांच्या धोरणानें वागून व कर्तव्याची निर्मळ प्रीति धरून ज्यांनीं जगांत आचरण केलें, तींच माणसें धन्य होऊन गेलीं आहेत. कर्तव्याविषयीं मनांत प्रीति वागत असली ह्मणजे तें आपल्या हातून चांगलें होतें. ही प्रीति मनांत धरावी ह्मणजे सद्गति मिळाल्यावांचून रहाणार नाहीं.

सौ. काशीबाई हेरलेकर.

महाराज्ञीनिधन.

हा! हा! स्वर्गति पावली अजि सती व्हिक्टोरिया माउली,
झाली सौख्यकरी प्रजाजनमनां तीची कृपासाउली;
वर्षें अर्धशताहुनी अधिक ती सिंहासनीं बैसली,
'राज्ञीराष्ट्रिं न मावळे कधिं रवि' कीर्ती अशी पावली. १
पादाक्रांत करूनि शत्रुगण ते, विस्तारिली राज्यभू,
केलें गौरवुनि महामुदभरें त्यां मांडलीक प्रभू;
कर्तव्यीं रत सर्वदा, स्थिरमती, दक्ष प्रजापालनीं,
स्त्री कीं बोलति जे कुबुद्धि 'अबला' त्यां लाजवी ती क्षणीं. २
तारायंत्र, विमान, अग्निरथ हीं संपादुनी साधनें,
पृथ्व्यादी तिस पंचतत्वगणही संतोष दे सेवनें;
ज्यांची संस्थिति एक ठायिं कधिं ना दृष्टी पडे भूवर,
वैरा टाकुनि रंगल्या पदिं तिचे श्री-शारदा सादर. ३
एकामागुनि एक संकटतती आल्या बहूतां परी,
जाणोनी भवशाश्वती अचिर, ती दुःखा न घे अंतरीं;
जैसा कीं अलि मग्न हो कमलिनी-कोशीं मधुप्राशनीं,
ईशाचे पदिं भाव ठेवुनि तसा, संतोष घेई मनीं. ४
चक्रें दोन समाकृती तरि सुखें हो स्यंदनाची गती,
तैशीं स्त्रीपुरुषें समान असल्या येई प्रपंचा स्थिती;
जें विद्यादिगुणीं दुजाहुनि उणें स्त्रीचक्र तें देखुनीं,
यत्नातें करि ती सदैव महिला-वर्गाचिये शिक्षणीं. ५
गेली देह मही त्यजूनि तरि ती सत्कीर्तिरूपें वसे,
नाना तत्कृति देखतांचि रुचिरा तन्मूर्ति दृष्टीं दिसे;
वाजे भूमिवरी तदीय निधनीं हा जो यशोदुंदुभी,
तन्नादें भरुनी पहा दशदिशा संचार केला नभीं. ६

श्रीमन्महाराणी व्हिक्टोरिया यांचें गृहसौख्य.

"सर्व जण मला असें सांगतात कीं, मजवर लोकांचें जितकें प्रेम आहे, तितकें दुसऱ्या कोणत्याहि राजाला पूर्वीं कधींहि संपादितां आलें नाहीं; आणि याचें कारण काय, तर आमचें अप्रतिम गृहसौख्य आणि आमची अनुकरणीय गृहव्यवस्था."



प्रिय वाचक भगिनी हो! वरील शब्द आपल्या दयाळु महाराणीसाहेबांनीं इ० स० १८४४ त आपल्या मामाला एका पत्रांत लिहिले होते. त्यांच्या त्या वेळच्या सौख्यपूर्ण अंतःकरणांतून अगदीं सहजगतीनें हे शब्द निघाले होते; आणि ते अक्षरशः खरेहि होते. जरी त्यांनां पूर्ण गृहसौख्याचा

अनुभव केवळ २१ वर्षेंच घेतां आला, तथापि, या भाग्यशाली स्त्रीची गृहव्यवस्था अगदीं अखेरपर्यंत खरोखरच अनुकरणीय होती. आपला सतीधर्म त्यांनीं आमरणांत पाळिला. आज जें संपूर्ण जग त्यांच्यासाठीं एकसारखें हळहळत आहे, त्याचें कारण पूर्वजन्मींच्या सबळ पुण्याईनें इंग्लंडासारख्या बलाढ्य राष्ट्राच्या त्या स्वामिनी झाल्या होत्या, हेंच केवळ नव्हे, तर असें अपूर्व वैभव प्राप्त झालें असतांहि त्यांचा अत्यंत सरळ व साधा वर्तनक्रम, अलौकिक नीतिमत्ता, पराकाष्ठेचा दयाळु स्वभाव, प्रजेवर असलेलें पुत्रवत् प्रेम, परोपकारबुद्धि इत्यादि त्यांच्या अंगचे अनेक सद्गुण होत. इंग्लंडासारख्या बलाढ्य आणि प्रचंड राष्ट्राचीं सूत्रें आज ६३।६४ वर्षें एका अबलेनें अगदीं अव्याहतपणें चालवावीं, इतकेंच नव्हे, तर तीं चालविण्यांत विलक्षण कर्तबगारी दाखवावी, जेणेंकरून आपल्या प्रजेची सुखवृद्धि होईल, राज्याची उत्तरोत्तर भरभराट होत जाईल, संपूर्ण प्रजेची आपल्यावर भक्ति जडेल, अशा रीतीनें आपलें एकंदर धोरण अखेरपर्यंत कायम ठेवावें, या एवढ्याच गोष्टीदेखील त्या अबलेच्या अलौकिक कर्तृत्वशक्तीची, तिच्या श्रेष्ठतर योग्यतेची स्पष्टपणें साक्ष देण्यास पुरेशा आहेत. परंतु त्यांतहि आमच्या महाराणीसाहेबांच्या अंगीं वरील लोकोत्तर सद्गुण वास करित असल्यामुळें त्यांच्याविषयीं आह्मां सर्वांच्या अंतःकरणांत अतोनात पूज्यबुद्धि उत्पन्न झाली होती; आह्मी त्यांच्यावर मातृवत् प्रेम करित होतों; 'देवी श्री व्हिक्टुरिया सार्वभौमिनी' अशा श्रेष्ठ विशेषणांनीं आह्मी त्यांचा गौरव करीत होतों. 'नाविष्णुः पृथिवीपतिः' असा आह्मां आर्यलोकांचा पूर्वापार समज आहे; परंतु त्याची सत्यता आमच्या परम पूज्य महाराणीसाहेबांनीं जितकी आमच्या निदर्शनास आणून दिली, तितकी अलीकडच्या दुसऱ्या कोणत्याहि राज्यकर्त्यास आणून देतां आली नाहीं.

ज्या राज्यावर सूर्यदेखील कधीं मावळत नाहीं, अशा या अवाढव्य राज्याचीं सूत्रें चालविण्यांत त्या सदोदित मग्न झाल्या असतांहि मानवी प्राण्याच्या इहलोकींच्या इतर कर्तव्यांकडे त्यांचें तिळमात्र दुर्लक्ष्य झालें

नव्हतें. धार्मिक, कौटुंबिक, सामाजिक, व इतर सर्व कर्तव्यें त्यांनीं यथासांग बजाविलीं. कन्या, पत्नी, आणि माता या तिन्ही अवस्थेंतील त्यांची वर्तणूक फारच प्रशंसनीय आहे. आणि ह्मणूनच आमच्या महाराणीसाहेबांचा चरित्रक्रम उदात्त, वंदनीय आणि अत्यंत अनुकरणीय असा झाला आहे. राजनीतीचें आणिं त्याचप्रमाणें बुद्धिकौशल्याचें कदाचित् सर्वांनांच आकलन करतां येणें शक्य नाहीं; त्याचप्रमाणें राज्यपदाचीं सुखदुःखें काय आहेत हेंहि प्रत्येकाला समजणें शक्य नाहीं; परंतु गृहसौख्याला अवश्य असे जे सद्गुण आहेत, त्यांची योग्यता प्रत्येकाला सहज जाणतां येते. सुशील, सद्गुणी, कर्तव्यदक्ष पत्नी किंवा माता कोठेंहि असली, तरी तिची योग्यता प्रत्येकाला सहज कळून येते. आमच्या महाराणीसाहेबांचा गेल्या साठ वर्षांतील चरित्रक्रम ह्मणजे पत्नीधर्म आणि मातृधर्म उत्तम रीतीनें कसा पाळावा, याचें प्रत्यक्ष उदाहरणच आहे. आणि ह्मणूनच त्यांच्याविषयीं आमच्या मनांत इतकी पूज्यबुद्धि वसत आहे– ह्मणूनच आह्मी त्यांच्यावर एवढें अकृत्रिम प्रेम करित आलों.

महाराणीसाहेबांच्या या उदात्त आणि अनुकरणीय चरित्रक्रमाचें मूळ बीज बाळपणीं त्यांच्या मातुश्री डचेस ऑफ केंट यांनीं त्यांच्या शिक्षणाविषयीं जी अतिशय काळजी घेतली, त्यांत आहे. राजकन्या व्हिक्टोरिया यांचा जन्म २४ मे १८१९ रोजीं लंडन शहरांत केन्सिग्टन नामक राजवाड्यांत झाला. यांचे वडील, ड्यूक ऑफ केंट, हे इंग्लंडचे राजे तिसरे जॉर्ज यांचे चौथे चिरंजीव होत. महाराणीसाहेबांच्या जन्मानंतर आठच महिन्यांनीं त्यांचे वडील वारले. परंतु त्यांच्या मातुश्रींनीं पुढें इंग्लंडांतच राहून आपल्या या मुलीला योग्य शिक्षण देऊन आपला मातृधर्म पूर्णपणें पाळिला हें त्यांनां फार भूषणावह आहे. राजकन्या व्हिक्टोरिया यांनांच पुढें इंग्लंडची गादी मिळेल, असें मानण्याला त्या वेळीं तरी कांहींएक कारण नव्हतें; परंतु ईश्वरी सूत्रानें लवकरच तसा योगायोग जुळून आला. ही गोष्ट समजली असतां आपली मुलगी कदाचित् गर्वानें फुगून जाईल

या भीतीनें डचेस ऑफ केंट यांनीं ही गोष्ट व्हिक्टोरिया यांनां त्या अकरा वर्षांच्या होईपर्यंत मुळींच कळूं दिली नाहीं. आणि पुढेंदेखील ती त्यांनां तोंडानें न कळवितां त्यांच्या वाचावयाच्या इतिहासाच्या एका पुस्तकांत राजघराण्याचा वंशवृक्ष घालून कळविली. राजकन्येनें अगदीं लक्ष्यपूर्वक तो वंशवृक्ष पाहिला आणि ती ह्मणाली "मीं हें पूर्वी कधींच पाहिलें नव्हतें. मला वाटत होतें त्यापेक्षां इंग्लंडच्या गादीशीं माझा बराच निकट संबंध आहे, हें आतां मला समजलें." असें ह्मणून ती क्षणभर विचार करित स्तब्ध राहिली आणि नंतर पुनः गंभीर मुद्रेनें ह्मणाली "पुष्कळ मुलांनां हें एक बढाई मारण्याला साधन होईल; परंतु त्यांत काय काय अडचणी आहेत, हें त्यांनां कळत नसतें. वैभव मोठें आहे खरें, पण त्यापेक्षां जबाबदारी फारच अधिक आहे." या प्रसंगीं ती असेंहि ह्मणाल्याचें सांगतात कीं "आपल्या शिक्षणाविषयीं इतके परिश्रम कां घेतले, व लॅटिन भाषा, व्याकरण वगैरे आपल्यास शिकावयास कां लाविलें, हें आतां माझ्या लक्ष्यांत आलें. शक्य तेवढें करून मी नेहमीं चांगुलपणा संपादीन." व्हिक्टोरिया यांच्या या उद्गारांवरून त्यांच्या आईनें पुढें प्राप्त होणाऱ्या अत्युच्च वैभवाला सर्वतोपरी योग्य असेंच शिक्षण त्यांनां देण्याचा कसा क्रम ठेविला होता, व त्यांच्या मनाची मूळचीच प्रवृत्ति कशी होती, हें स्पष्ट दिसून येतें.

राजकन्या व्हिक्टोरिया या एकदां एका जवाहिऱ्याचे दुकानीं गेल्या होत्या. त्या वेळीं त्यांच्याच वयाची दुसरी एक मुलगी सोन्याच्या एका मौल्यवान् सांखळीकडे बराच वेळ अगदीं आशाभरित मुद्रेनें पहात असल्याचें त्यांनीं पाहिलें. सरते शेवटीं त्या मुलीनें अगदीं हिरमुसलें तोंड करून ती मोठ्या किंमतीची सांखळी ठेवून दिली आणि दुसरी एक अल्प किंमतीची विकत घेऊन आपलें समाधान मानून घेतलें व ती तेथून निघून गेली. राजकन्या व्हिक्टोरिया यांनीं ती मुलगी निघून जातांच तिजविषयीं त्या दुकानदारापाशीं कांहीं चौकशी करून त्याला आपल्या नांवाच्या कार्डाबरोबर त्या दोन्ही सांखळ्या त्या मुलीकडे

पाठविण्यास सांगितलें. त्या कार्डावर पेन्सिलीनें फक्त इतकेंच लिहिलें होतें कीं "आपला शहाणपणा पाहून राजकन्या व्हिक्टोरिया इला फार आनंद झाला आहे; तिची अशी इच्छा आहे कीं, आपल्या मनांत भरलेली ही सांखळी आपण स्वीकारावी आणि या प्रसंगीं जो आपण प्रशंसनीय आत्मत्याग दाखविला, तसेंच पुढेंहि नेहमीं वर्तन ठेवण्याचा प्रयत्न करावा."

इ. स. १८३७ च्या जून महिन्याच्या २० व्या तारखेस रात्रीं अडीच वाजतां इंग्लंडचा राजा चौथा विल्यम मृत्यु पावला. त्याबरोबर कँटरबरीचे 'आर्चबिशप' आणि 'लॉर्ड चेंबरलेन' हे नव्या राणीसाहेबांनां भेटण्याकरितां केन्सिंग्टन राजवाड्यांत मोठ्या तांतडीनें येऊन दाखल झाले. त्या वेळीं नुकते कोठें पांच वाजले होते. प्रथम त्या राजवाड्यांत प्रवेश होण्यालाच त्यांनां किती वेळ तरी तिष्ठत बसावें लागलें. पुढें आंत आल्यावरहि "राजकन्या गाढ झोंपेंत आहे; तिची झोंपमोड करितां येत नाहीं." असा त्यांनां जबाब मिळाला. त्याबरोबर त्यांनीं सांगितलें कीं "आह्मी जरूरीच्या कांहीं राजकारणासाठीं आमच्या राणीसाहेबांनां भेटावयास आलों आहों; आणि अशा प्रसंगीं त्यांची झोंप मोडली तरी हरकत नाहीं." त्यांनीं अगदीं निक्षून सांगितलेले हे शब्द आंत राणीसाहेबांच्या मातुश्रींच्या कानीं गेले व त्यांनीं राणीसाहेबांनां तात्काळ जागें केलें. या वेळीं व्हिक्टोरिया रात्रीच्या पोषाखांत होत्या. एक पांढरा शुभ्र झगा त्यांनीं परिधान केला होता, अंगावर एक शाल होती, केश पाठीवर मोकळेच पडलेले होते, आणि पायांत सपाता होत्या. चुलत्याच्या दुःखकारक मृत्यूची बातमी समजतांच तशाच रात्रीच्या पोषाखानें त्या बाहेर आल्या. या वेळीं त्यांच्या डोळ्यांतून अश्रू गळत होते; परंतु त्यांची मुद्रा अगदीं शांत आणि गंभीर दिसत होती. मोठें वैभव प्राप्त झाल्याचें ऐकून उच्छृंखल होऊन न जातां त्यांनीं प्रथम अगदीं शांतपणानें ईश्वराची प्रार्थना केली, आणि नंतर चौथ्या विल्यमचे विधवा राणीस दुखवट्याचें पत्र लिहिलें. पत्रावर 'इंग्लंडच्या राणीसाहेब' असा पत्ता लिहिला. हें पाहून जवळच्या बाईनें त्यांनां नम्रतेनें सुचविलें कीं

"इंग्लंडच्या राणीसाहेब आतां त्या नसून आपणच आहांत!" त्यावर राणीसाहेबांनीं अगदीं सौम्यतेनें त्या बाईला सांगितलें "ही गोष्ट खरी आहे; पण ती पहिल्यानें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आणण्याचें काम माझें नव्हे." या लहानशा गोष्टीवरून अगदीं लहानपणापासूनच राणीसाहेबांचें अंतःकरण कसें कोमल, स्वभाव किती साधा, त्याचप्रमाणें दुसऱ्याचें मन कधींहि न दुखविण्याकडे मुळापासूनच त्यांची कशी प्रवृत्ति होती, हें चांगलेंच दिसून येतें. अशी ही सद्गुणमंडित राणी सर्वांनां कां प्रिय होऊन रहाणार नाहीं?

लागलेंच अकरा वाजतां 'प्रीव्ही काउन्सिला'ची सभा भरून त्यांत महाराणीसाहेब प्रमुखस्थानीं विराजमान झाल्या आणि सर्व राज्यांत त्यांच्या नांवाची द्वाही फिरविण्यांत आली. या वेळेपासून आपल्यावर केवढी जबाबदारी येऊन पडली आहे, हें राणीसाहेब पूर्णपणें जाणून होत्या. त्याच सभेंत त्यांनीं जें आपलें पहिलें भाषण वाचून दाखविलें त्यांत त्या ह्मणाल्या "ही भयंकर जबाबदारी आपल्यावर इतकी आकस्मिक आणि इतक्या अल्प वयांत येऊन पडली आहे कीं, ज्या जगत्पालकानें ही कामगिरी मजवर सोंपविली आहे, तोच मला ती योग्य रीतीनें बजाविण्यास सामर्थ्य दिल्यावांचून रहाणार नाहीं, अशी जर माझ्या मनाची पक्की खातरी नसती, तर माझें अंतःकरण खास दडपून गेलें असतें. आणि त्याचप्रमाणें माझी अशीहि खातरी आहे कीं, वयमानानें आणि पुष्कळ दिवसांच्या अनुभवानें प्राप्त होणारीं साधनें आणि साह्य, हें मला माझ्या हेतूंच्या पवित्रतेंत आणि प्रजेचें कल्याण करण्याविषयींच्या माझ्या सदैव तत्परतेंतच मला मिळेल."

खालील शब्दांत तर जणों त्यांनीं आपल्या पुढील कारकीर्दीविषयीं अगदीं बरोबर भविष्यच करून ठेविलें होतें. त्या ह्मणाल्या "मी आपल्या प्रजेच्या हक्कांचें नेहमीं संरक्षण करीन आणि त्यांचें कल्याण होऊन त्यांच्या सुखाची वृद्धि होईल असें करण्यास मी आपल्या सामर्थ्याप्रमाणें नेहमीं झटेन."

पुढें सन १८४० च्या फेब्रुवारी महिन्याच्या १० व्या तारखेस राणीसाहेबांचा प्रिन्स आलबर्ट यांच्याशीं विवाह झाला. राणीसाहेबांनीं आपण होऊनच प्रिन्स आलबर्ट यांजपाशीं विवाहाची गोष्ट काढिली व त्यांची संमति मिळतांच त्यांनीं स्वताच ती गोष्ट 'प्रीव्ही काउन्सील'पुढें जाहीर केली. त्या ह्मणाल्या "या विवाहापासून मला गृहसौख्याचा पूर्ण लाभ होईल आणि माझ्या राज्याचेंहि कल्याण होईल." हें त्यांचें ह्मणणें सर्वथैव खरें होतें. या विवाहाशीं राजकारणाचा मुळींच संबंध नसून परस्परांचें परस्परांवर जें प्रेम जडलें होतें त्यामुळेंच तो जुळून आला होता. या विवाहासंबंधीं एक गोष्ट ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. हा विवाहविधि कसा साजरा करावयाचा, हें ठरविण्याकरितां मुख्य मुख्य मंडळी जमली असतां कँटरबरीचे 'आर्चबिशप' यांनीं महाराणीसाहेबांस विचारिलें कीं "आपण आमच्या राणीसाहेब आहां, तेव्हां विवाहप्रसंगीं ह्मणावे लागणाऱ्या मंत्रांतून 'आज्ञा पाळणें' हे शब्द मला वाटतें काढून टाकावे हें बरें."

त्यावर राणीसाहेबांनीं तात्काळ उत्तर दिलें "आर्चबिशपसाहेब! असें भलतें सलतें कांहीं करण्याच्या मुळींच भानगडींत पडूं नका. मी स्त्री या नात्यानेंच लग्न करूं इच्छित आहें, राणी या नात्यानें नाहीं."

आणि स्त्री या नात्यानेंच त्यांचें लग्न झालें. पुढें २१ वर्षें राणीसाहेबांनीं आपल्या सद्गुणी पतीच्या समागमांत गृहसौख्याचा पूर्ण अनुभव घेतला. या राजदंपत्याचें एकमेकांवर पराकाष्ठेचें प्रेम होतें. दोघांचा स्वभाव अगदींच एकसारखा; कोणत्याहि गोष्टींत त्यांचा मतभेद झाल्याचें ऐकिवांतच नाहीं. राणीसाहेबांचें आपल्या पतीवर इतकें निस्सीम प्रेम होतें कीं, तसें प्रेम करणारी पत्नी, त्यांच्या एवढ्या अफाट प्रजेमध्येंदेखील सांपडणें कठीण! लग्न होऊन बरींच वर्षें लोटल्यावर राणीसाहेबांनीं आपल्या पतीविषयीं लिहिलें आहे "ते जेव्हां जवळ नसतात तेव्हां मला किती चुकल्या चुकल्या सारखें वाटतें, कांहींच सुचेनासें कसें होतें, आणि ते परत येईपर्यंत मी तासामागून तास कशी मोजित बसतें, याची तुह्मांला कल्पना देखील करतां यावयाची नाहीं. ते गेले ह्मणजे सगळ्या घरादाराची कळाच निघून गेल्यासारखें मला वाटूं लागतें."

परंतु, राणीसाहेबांचें आपल्या सद्गुणी पतीवर जरी असें अकृत्रिम प्रेम होतें, तरी त्यांतहि कांहीं विशेष लक्ष्यांत ठेवण्याजोगी गोष्ट होती. इतर पतिव्रता स्त्रियांप्रमाणें केवळ पतिप्रेमांतच गुंग होऊन जाऊन त्या आपला मातृधर्म विसरल्या नव्हत्या. राणीसाहेब आणि त्यांचे पति यांच्यापेक्षां अधिक प्रेमळ स्वभावाचीं आणि कर्तव्यदक्ष आईबापें या एवढ्या मोठ्या अफाट ब्रिटिश राज्यांतदेखील सांपडणें मुष्कील आहे. त्यांच्या गृहव्यवस्थेचें खरें मर्म त्यांच्या मुलांच्या बसण्या उठण्याच्या आणि अभ्यास करण्याच्या जागींच दिसून येई.

राणीसाहेबांनां मुलांची ह्मणजे सर्व गोष्टींपेक्षां अतोनात आवड. प्रत्येक मुलाला कांहींतरी आवडीचें नांव दिलेलें असावयाचेंच. त्यांनां एकंदर नऊ मुलें झालीं. चार मुलगे आणि पांच मुली. पहिली मुलगी ह्मणजे जर्मनीच्या हल्लींच्या विख्यात बादशहाची आई, ही सन १८४० च्या नोव्हेंबर महिन्यांत जन्मली. आणि तिच्या पाठीमागून प्रिन्स ऑफ वेल्स ह्मणजे आमचे हल्लींचे बादशहा, ७ वे एडवर्ड, यांचा जन्म सन १८४१ च्या नोव्हेंबर महिन्याच्या ९ व्या तारखेस झाला. राणीसाहेबांचें शेवटचें अपत्य ह्मणजे त्यांची फार आवडती मुलगी प्रिन्सेस बिआट्रिस; ही १८५७ च्या एप्रील महिन्यांत जन्मली.

युवराजांचा जन्म झाल्यानंतर थोड्याच दिवसांनीं आपल्या मामांनां पाठविलेल्या एका पत्रांत राणीसाहेब लिहितात "माझा हा मुलगा कोणासारखा होईल, याचें राहून राहून मला आश्चर्य वाटत आहे. रूपांत, गुणांत आणि प्रत्येक गोष्टींत तो अगदीं थेट आपल्या वडिलांसारखाच निपजावा, ह्मणून मी रात्रंदिवस ईश्वराची कशी प्रार्थना करित असतें हें तुह्मांला माहीतच आहे. मीचशी काय, पण मला वाटतें कोणीहि स्त्री अशीच इच्छा करील."

आणखी दुसऱ्या एका पत्रांत त्या लिहितात "दुःखें आणि संकटें हीं सर्वांच्याच पाठीशीं लागलीं आहेत; पण, गृहसौख्याची जर मनुष्याला

अनुकूलता असेल, तर मग तें त्या दुःखांनां आणि संकटांनां मुळींच जुमानणार नाहीं!"

पुत्रलाभाचा हा काळ ह्मणजे महाराणीसाहेबांच्या आयुष्यांतील अत्यानंदाचा काळ होता. त्या वेळची त्यांची स्थिति अगदीं सौख्यपूर्ण आणि उल्हासमय अशी होती. ईश्वरकृपेनें अनुरूप पति प्राप्त झाल्यामुळें आधींच त्या आनंदांत होत्या. त्यांच्या त्या सद्गुणी पतीवर त्यांच्या प्रजेचेंहि उत्तरोत्तर अधिकाधिक प्रेम जडत चाललें होतें. अशा वेळीं युवराजांचा जन्म ह्मणजे राणीसाहेब आणि त्यांची प्रजा यांमध्यें एक पवित्र बंधनच निर्माण झालें. एवढ्या मोठ्या अफाट राज्याचा भार वहाण्याच्या काळजीचें देखील त्यांनां कांहींच वाटेनासें झालें. त्यांच्या सौख्यसागराला जणों तुडुंब भरती आली.

राणीसाहेब आपल्या मुलांनां अगदीं जीव कीं प्राण करित असत; परंतु त्यांच्या मातृधर्माची येथेंच परिसीमा होत नसे. मुलांनां सदोदित चांगलें वळण लागेल, त्यांचें शिक्षण चांगलें होईल, याविषयीं त्या फार काळजी वहात व फार दक्ष रहात. मुलांच्या बसण्याउठण्याच्या आणि अभ्यासाच्या जागेंतील एकंदर व्यवस्थेवर त्यांची नेहमीं स्वताची देखरेख असावयाची. त्याचप्रमाणें आपल्या मुलांनां धार्मिक शिक्षण देण्यांत तर त्यांनां मोठा आनंद वाटावयाचा. या संबंधानें अशी गोष्ट सांगतात कीं, लंडनचे 'आर्चडीकन' हे एकदां एका लहानग्या राजकन्येला धर्मसंबंधीं कांहीं प्रश्न विचारित असतां ह्मणाले "तुह्मांला शिक्षण देण्यांत तुमची मास्तरीण जी काळजी घेते, तीबद्दल तिची खरोखर तारीफ केली पाहिजे." हें ऐकून त्या 'आर्चडीकनां'च्या अज्ञानाचें त्या मुलांनां फारच आश्चर्य वाटलें. तीं ह्मणालीं "आपल्याला माहित नाहीं, या गोष्टी आह्मांला आईच शिकविते!"

राणीसाहेबांच्या गृहराज्यांत संसारसुखाची कशी उन्नति झाली होती, आणि संसारांत आनंद देणाऱ्या यःकश्चित् गोष्टीदेखील समाधानकारक

रीतीनें करण्यांत त्या सदैव कशा दक्ष असत, याचें त्यांच्या प्रजेपैकीं देखील पुष्कळांनां आश्चर्य वाटेल. प्रत्येक मुलाच्या जन्मदिवशीं कांहींना कांहीं मौजहि व्हावयाचीच! लहान लहान मुलांकरितां करमणुकीचे खेळ नेहमीं व्हावयाचे. नाताळ आणि नूतन वर्षारंभाचा काळ ह्मणजे तर या राजकुटुंबांत पूर्ण आनंदाचा पर्वकाळच ह्मणावयाचा. सन १८६५ च्या वर्षप्रतिपदेच्या दिवशीं राजकन्या ॲलिस हिनें आपल्या आईला लिहिलें आहे "आपल्या घरीं हा आजचा आनंदाचा दिवस कसा साजरा होत असे, तुझ्या खोलीच्या बाहेर आह्मी सर्व मुलें सकाळच्या प्रहरीं उत्सुकतेनें उभीं राहून 'आई हें नूतन वर्ष तुला सुखाचें जावो,' ह्मणून एकदम कशीं ओरडत असूं, आणि कित्येक आठवडेच्या आठवडे मेहनत घेऊन आह्मीं तयार केलेलीं चित्रें, लेख वगैरे तुला आणि बाबांनां देण्याकरितां आमचीं कशी गडबड उडत असे, हें आज सकाळपासून मी त्यांनां (पतीला) सांगत बसलें आहे!"

हीं वर सांगितलेलीं चित्रें ह्मणजे राजवाड्यांत चालणाऱ्या उद्योगांतील एक प्रमुख गोष्ट होती. स्वतः राणीसाहेबसुद्धां वेळांत वेळ काढून या कलेचा अभ्यास करित असत. आणि गाण्याच्या कामांत तर त्या बऱ्याच प्रवीण होत्या. एखादा तास तरी गाणीं ह्मणण्यांत गेल्याविना सायंकाळचा वेळ मौजेनें गेला, असें या गृहराज्यांत मानलें जात नसे.

याप्रमाणें एकवीस वर्षेपर्यंत राणीसाहेबांचा हा संसारक्रम असाच अबाधित आणि उत्तम रीतीनें चालला होता. केवळ उत्तम रीतीनें चालला होता इतकेंच नव्हे, तर तो इतका कांहीं सौख्यदायक होत होता कीं, या कामीं राणीसाहेबांची बरोबरीच कोणाला करितां येणार नाहीं. परंतु पुढें दुर्दैवाच्या एका झटक्यासरसें या अप्रतिम गृहराज्याचें एकंदर स्वरूप बदललें.

सन १८५६ त प्रिन्स आलबर्ट हे एक नवीन गोदी उघडण्याच्या समारंभाकरितां लिव्हरपूल येथें गेले असतां राणीसाहेबांनीं एका पत्रांत

लिहिलें आहे "मला त्यांच्याशिवाय मुळींच चैन पडत नाहीं; अगदींच उदासवाणें वाटत आहे. किती तरी पतिपत्नींनां परस्परांचा नित्यशः वियोग होत असतो, पण मला तो मुळींदेखील सहन होत नाहीं. त्यांच्याशिवाय मला कशांतहि गोडी लागत नाहीं. त्यांच्यापासून दोन दिवस जरी दूर रहाण्याचा प्रसंग आला, तरीदेखील माझें हृदय व्याकूळ होतें. मी रात्रंदिवस देवाची प्रार्थना करित आहें कीं, त्यांच्या मागें मला एक क्षणभरहि ठेवूं नको. माझ्या प्रिय पतीची दृष्टि आणि प्रेम हीं सदोदित मजवर असलीं ह्मणजेच मला मोठी धन्यता वाटेल."

राणीसाहेब ईश्वराची अशी प्रार्थना करित होत्या खऱ्या, परंतु दैवयोग कांहीं निराळा होता. त्यांच्यासारख्या प्रेमळ मनाच्या आणि पतीवर निस्सीम प्रेम करणाऱ्या पत्नीला एक दोन नव्हे तर जवळ जवळ तीस वर्षें पतिविरहाच्या असह्य दुःखांत काढावीं लागलीं.

राणीसाहेबांचे सद्गुणी पति प्रिन्स आलबर्ट यांवर १४ डिसेंबर सन १८६१ रोजीं निर्घृण काळानें झडप घालून आमच्या राणीसाहेबांस असह्य वियोगदुःखांत लोटून दिलें. राणीसाहेबांच्या गृहराज्यांतील आनंददीप मालवला. जिकडे तिकडे अंधार पडला. राजवाड्यांतून या वर्षी गेलेल्या एका पत्रांत लिहिलें आहे "राणीसाहेबांचा चांगुलपणा, परोपकारबुद्धि, दयाळु स्वभाव हीं नेहमींप्रमाणें कायम आहेत; परंतु या जागेचें एकंदर स्वरूप साफ बदलून गेलें आहे. जिकडे तिकडे शांतता आणि स्तब्धता यांचें साम्राज्य सुरू झालें आहे. पूर्वी मी जेव्हां इकडे आलें होतें, तेव्हांच्या आणि आतांच्या स्थितींत केवढें तरी हें महदंतर! तेव्हां जिकडे तिकडे गडबड आणि आनंदीआनंद चाललेला असावयाचा. सकाळच्या प्रहरीं प्रिन्स आलबर्ट यांची सहल करून परत येण्याची वेळ झाली ह्मणजे राणीसाहेब आपल्या परिचारिकांसह त्यांनां भेटण्याकरितां राजवाड्याबाहेर जावयाच्या. आणि मग सर्व दिवस जो कांहीं आनंदांत जावयाचा, त्याची आतां आठवणदेखील नको."

तो आनंदाचा काळ गेला; कायमचाच गेला. पतिवियोगाच्या असह्य दुःखानें राणीसाहेब इतक्या होरपळून गेल्या कीं, त्यांची सर्व शक्ति क्षीण झाली. त्या बिछान्याला खिळून गेल्या. त्यांच्या स्वास्थ्याविषयीं सर्व राष्ट्र चिंतेंत पडलें. परंतु पुढें लवकरच त्यांनां किंचित् आराम पडूं लागला. प्रिन्स आलबर्ट यांचा प्रेतसंस्कारविधि होण्याच्या पूर्वीच राणीसाहेबांनीं त्यांच्या प्रकृतिमानामुळें विंडसर राजवाड्यांतून दुसरीकडे जावें ह्मणून त्यांनां पुनः पुनः आग्रह करण्यांत आला; परंतु यावर त्या हृदयभेदक शोक करीत व ह्मणत कीं "माझ्या प्रजेपैकीं कोणावर असा प्रसंग आला तर त्यांनां त्यांच्या प्रियकर मृत आप्तांनां सोडून दुसरीकडे जाण्याचा कधींहि उपदेश करण्यांत येत नाहीं." सरते शेवटीं जेव्हां मुलांच्या शरीरस्वास्थाची सबब त्यांच्या पुढें मांडण्यांत आली, तेव्हां त्या तें ठिकाण सोडून ऑसबॉर्न येथील आपल्या स्वताच्या राजवाड्यांत जाऊन राहण्याला कबूल झाल्या. वैधव्यसूचक पोषाखानें कोणाच्याहि दृष्टीस न पडतां मोठ्या दुःखानें त्यांनीं हें स्थानांतर केलें. त्या वेळीं त्यांच्या बरोबर फक्त युवराज प्रिन्स ऑफ् वेल्स आणि राजकन्या ॲलिस आणि हेलेना हीं तिघें कायतीं होतीं. विंडसर राजवाडा सोडण्यापूर्वीं त्यांनीं आपल्या सद्गुणी पतीच्या शेवटच्या संस्काराची जागा फ्रॉगमोर येथें आपण स्वतां नेमस्त केली. तेथेंच त्यांच्या प्रिय पतीच्या शेजारीं त्यांच्या स्वताच्या अचेतन शरीराचाहि अंत्यसंस्कार नुकताच करण्यांत आला. याप्रमाणें एकमेकांवर निस्सीम प्रेम करणाऱ्या या राजदंपत्याचीं नश्वर शरीरें एकमेकांशेजारीं शेवटच्या महानिद्रेचा अनुभव घेत पडलीं आहेत. तो कृपाळु जगदात्मा त्यांच्या अविनाशी आत्म्यांनां असाच एकमेकांच्या समागमांत चिरंतन शांतीचा लाभ देवो, हीच आह्मां एकनिष्ठ प्रजाजनांची त्याजपाशीं नम्र विनंति आहे.

स्त्रियांची प्रसूति व तत्संबंधीं उपचार.

[२]

बायको बाळंत झाल्यावर तिला फार थकवा आलेला असतो व तिचीं सर्व गात्रें दुखूं लागतात, याकरितां कांहीं दिवसपर्यंत तिला मोठ्या सौम्य रीतीनें वागविणें जरूर असतें.

प्रथम मुलाचें नाळ कापून मुलास बाजूस करावें व बाळंतिणीची वार पडली असल्यास ठीक, नसल्यास ती काढून टाकवावी. वार ही बाब सर्व बाळंतपणांत अतिशय महत्वाची आहे. ही किंवा हिचा थोडासाहि तुकडा गर्भाशयांत राहिला तर तो सर्व बाळंतपणाचा नाश करितो व या योगानें बाळंतिणीचा जीव फार धोक्यांत पडण्याचा संभव असतो. वार गर्भाशयांत राहिली ह्मणजे ती सडते व त्याचें विष उत्पन्न होऊन तें शरीरांत भिनून भयंकर ताप येतो. तो ताप औषधालाहि जुमानित नाहीं व वाढत जातो. पुढें बाळंतिणीला वायु होतो व शेवटीं त्यांतच तिचा अंत होतो. जसें नाळेचें बाहेरील टोंक मुलाचे बेंबीवर चिकटलें असतें तसेंच दुसरें टोंक वारेला चिकटलेलें असतें. ही वार जोंधळ्याच्या भाकरीसारखी व तेवढीच मोठी असून गोलाकृति व मऊ असते; परंतु भाकरीपेक्षां दुप्पट किंवा अडीचपट जाड असते. या वारेचा उपयोग हा आहे कीं, आईचें रक्त जें मुलाचे पोषणास लागतें तें प्रथम या वारेंत येतें व त्यांतून नाळेचे द्वारें बेंबीमधून मुलाचे रक्तवाहिन्यांतून मुलाचे शरीरांत पसरतें. तेथें शरीरपोषणाचें काम करून त्याच मार्गानें दुसऱ्या दोन वाहिन्यांच्या द्वारें तें पुन: परत बाहेर येतें व आईच्या अशुद्ध रक्ताशीं मिळतें. वार काढून टाकण्याची महत्वाची गोष्ट सर्व बाळंतपणांत फार महत्वाची आहे. कारण वर सांगितल्याप्रमाणें या वारेचा प्राणाशीं संबंध आहे. वार बाहेर निघाल्यानंतर ती अगदीं वाटोळी आहे किंवा नाहीं हें पहावें, व ती तशी नसून एखादा तुकडा आंत राहिला असल्यास गर्भाशयांत हात घालून तो काढल्याशिवाय राहूं नये.

प्रथम बाळंतिणीला ऊन पाण्यानें न्हाऊं घालावें व ती फारच थकली असल्यास ऊन पाण्यांत कपडा भिजवून तिचें अंग पुसून स्वच्छ करावें व तिला स्वच्छ कपडा नेसवून बाजेवर अगर पलंगावर निजवावें. विटाळांत आपल्या लोकांमध्यें बाळंतिणीला अगदीं घाणेरडे व अशा वेळीं जे कपडे मुळींच देऊं नयेत ते देतात. बाळंतिणीचें सर्व अंग दुखत असतें व तिला तापहि आलेला असतो व तिचे जिभेची चव गेलेली असते. याकरितां तिला ज्या हितावह गोष्टी करणें इष्ट आहेत त्या न करितां उलट तिला त्रास होऊन तिची प्रकृति बिघडेल, अशाच गोष्टी आपल्यामध्यें करितात, ही फार दुःखाची गोष्ट आहे. तिचें अंग दुखत असतें यामुळें तिला मऊ व नरम बिछान्याची व उशांची फार गरज असते; पण तें न देतां त्याच्या ऐवजीं एखादें जुनें घामट पटकूर किंवा घोंगडें तिला देतात; याचप्रमाणें तिला पांघरण्याकरितां असेंच एखादें घाणेरडें घोंगडें देतात.

स्त्री बाळंत झाल्यानंतर कांहीं दिवसपर्यंत ह्मणजे निदान एक महिना-पर्यंत तिचें पोट बांधावें लागतें. हें जाड कपड्याचे पट्टीनें किंवा काच्यानें बांधावें. तो वीतभर रुंद व १२—१५ हात लांब, जाड्या कपड्याचा असावा. वीतभर रुंद, दीड वीत लांब व तीन बोटें उंच अशी ओटीवर कपड्याची एक घडी ठेवावी व त्यावर ह्या पट्टीनें अगर काच्यानें सारखा दाब पडेल अशा रीतीनें कंबर बांधावी. गर्भाशय मोठा व त्याच्या भिंती प्रसृत झालेल्या असतात. तो आपल्या पहिल्या स्थितींत आला पाहिजे हें इष्ट आहे. दाबाचे योगानें गर्भाशय आपल्या पूर्वीच्या स्थितींत येतो. याकरितां कंबर बांधावी लागते. या गोष्टीची हयगय झाली तर गर्भाशय पूर्वीच्या पेक्षां कांहींसा मोठा राहतो व त्याचें वजनहि पूर्वीपेक्षां जास्त राहतें व यामुळें ज्या बंधनांचे योगानें तो ओटीमध्यें उभा राखलेला असतो त्या बंधनांवर जोर पडून तीं ताणलीं जाऊन शिथिल होतात व गर्भाशय मोठा व जड झाल्याकारणानें तो मागें पुढें अगर बाजूला पडतो. यामुळें बायकोला कायमची इजा होते व हा रोग दुरुस्त करण्यास फार मेहनत पडते.

स्त्री बाळंत झाल्यानंतर तिच्या ओटींत केव्हां केव्हां फार दुखूं लागतें. याचें कारण गर्भाशय मोटा झालेला असून तो आकुंचित होण्याचा प्रयत्न करूं लागतो, हें होय. या करितां 'एक्सट्र्याक्ट अरगट लिक्विड' ४० थेंब व 'लाडेनम' किंवा अफूचा अर्क ३० थेंब, दोन तीन घोट पाण्यांत मिसळून प्रत्येक तीन तीन तासानें पोटांतील दुखणें बंद होईपर्यंत द्यावें. याचे योगानें पोट दुखणें हटकून बंद होतें, असें माझे अनुभवास आलें आहे.

स्त्री बाळंत झाल्यानंतर तिला पथ्य देण्याच्या रीति निरनिराळ्या देशांत निरनिराळ्या आहेत. वऱ्हाडामध्यें बायको बाळंत झाल्यानंतर तीन दिवसपर्यंत तिला नुसता सांजा देतात व कोठें कोठें तीन दिवसपर्यंत कांहींच खावयास देत नाहींत. दक्षिण हिंदुस्थानामध्यें १० दिवसपर्यंत तूपभात खावयास घालतात व उत्तर हिंदुस्थानामध्यें १० दिवस नुसता सांजा खावयास घालितात; आणि अशा पथ्याबरोबर जेवढें कढत पाणी पिववेल तेवढें कढत पाणी प्यावयास देतात. याचप्रमाणें पुढें बाळंतिणीला गोंदाचे लाडू, मेथीचे लाडू, आळीवाचे लाडू, व शेपाची खीर तिचे हिताकरितां ह्मणून देतात. पण त्यांपासून कांहींएक फायदा न होतां उलट केव्हां केव्हां तोटा मात्र होतो.

लोकांमध्यें असा समज आहे कीं, बाळंतिणीला वारा लागला असतां ताप येऊन वायु होतो किंवा तिचें अंग वगैरे सुजतें. याकरितां ते बाळंतिणीच्या खोलींत बिलकुल वारा न शिरण्याची कडेकोट तयारी ठेवतात. खोलीच्या खिडक्या, दारें, मोऱ्यांचीं तोंडें व आणखी कांहीं वारा येण्याचे मार्ग असतील ते कपड्याचे बोळ्यानें बुजवून टाकतात. खोलींत दिवे व निखाऱ्याच्या शेगड्या ठेवितात व घरांतील व शेजारपाजारच्या बायकांचा सर्व घोळकाच्या घोळका त्या खोलींत बसलेला असतो. या सर्व कारणामुळें श्वासोच्छ्वासास लागणारी जी स्वच्छ हवा ती नाहींशी होऊन तिच्या ऐवजीं दूषित हवा आंत उत्पन्न होते. व याला आणखी दुसरीं कित्येक कारणें मिळालीं ह्मणजे बाळंतिणीस ताप येतो व वायु होतो. स्वच्छ

हवा खोलींत शिरूं दिल्यानें बाळंतिणीचें कांहींएक नुकसान न होतां उलटा फायदाच होतो, हें मी माझे स्वताचे चार वेळचे अनुभवावरून सांगतें.

या संबंधानें माझे चुलत्यानें मला सांगितलेली एक चमत्कारिक गोष्ट मी येथें सांगतें. एका मोठ्या श्रीमान् व विद्वान् गृहस्थाची बायको बाळंतीण होऊन आजारी झाल्यामुळें त्यानें माझे चुलत्यास तार करून एकदम बोलावून नेलें. त्या गृहस्थाचे गांवीं जाऊन बाळंतिणीला पाहतांच माझे चुलत्याला असें दिसून आलें कीं, तिचे अंगांत थोडासा ताप होता, तिची नाडी क्षीण झाली होती, श्वास झालेला असून ती बेचैन होती. बाळंतीण झाल्या दिवसापासून तो सातवा दिवस होता. तिला अन्न नकोसें झालें होतें, झोंप बिलकूल येत नव्हती व मधून मधून उलट्याहि होत असत. खोली पाहिली असतां प्रशस्त व स्वच्छ होती. खिडक्यांचे वगैरे दरवाजे बंद केले होते. मोऱ्यांचीं भोंकें व इतर छिद्रें कपड्याचे बोळ्यानें बंद केलीं होतीं; दोन तीन दिवे व एक शेगडी खोलींत होती व दहा वीस बायकांचा घोळका आंत जमला होता. माझे चुलत्यानें त्या गृहस्थास सांगितलें कीं, स्वच्छ हवा आंत न येऊं देण्यानें हा सर्व रोगाचा प्रकार झाला आहे; आंत स्वच्छ हवा येऊं देण्याची व्यवस्था केली असतां बायकोला कांहींएक औषध द्यावयास नको. ही गोष्ट त्या गृहस्थानें आंतील बायकांस कळविली; परंतु अशा कामामध्यें बायका पुरुषांचें ऐकत नाहींत, ही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे. आंत हवा येऊं दिल्यानें बाळंतिणीस वायु होईल आणि शेगड्या व समया काढल्यानें तिला जास्त तकलीफ होईल, अशी आंतील ज्ञात्या व या कामांत शाहण्या ह्मणविणाऱ्या बायकांनीं कल्पना काढली. या घराण्याचा व आमचा बराच घरोबा असून माझे चुलत्याचे डाक्तरीचे कुशलतेवरहि त्या घराण्याचा पूर्ण भरंवसा होता व विशेषें-करून त्या बाळंतीणबाईचा तर अधिकच होता, कारण पुष्कळ वेळां माझे चुलत्याचे कुशलतेचा त्यांनां अनुभव आला होता. माझा चुलता खोलींत शिरला व त्यानें त्या वृद्ध व शाहण्या ह्मणविणाऱ्या बायांनां बाहेर घालविलें

आणि एक खिडकी हवा येण्याकरितां उघडी केली. दिवे सर्व बाहेर काढविले व फक्त एक मेणबत्तीचा दिवा ठेविला. शेगड्याहि बाहेर काढविल्या. लगेच खोलींत बाहेरील मोकळी हवा येऊन खोलींतील हवा स्वच्छ व थंड झाली. बाळंतिणीस लगेच झोंप लागली. तिचा ताप, श्वासोच्छ्वास, उलट्या वगैरे सर्व नाहींसें झालें. तिला औषध देण्याचें कांहींएक काम नव्हतें व नंतर तें दिलेंहि नाहीं.

पुष्कळ लोक बाळंतिणीला रोज दोन वेळ तेल लावून कढत पाण्यानें न्हाऊं घालतात; शेगड्या करून तिचें अंग शेकतात; ऊन पाणी प्यावयाला देतात; घामट आणि तेलकट कपडा वापरण्यास लावितात; डोक्याला टोपरें घालण्यास देतात. त्याचप्रमाणें डोळ्यांत काजळ घालण्यास देतात; तिला ओंवा, लसणीचे पाचोळे इत्यादि पदार्थांची धुरी देतात; नाना तऱ्हेच्या उष्ण पदार्थांचे काढे व मसाले तिला खाऊं घालितात. या सर्व गोष्टींनीं ती जर पूर्वीची सशक्त बायको नसेल तर तिची प्रकृति साफ बिघडून जाते व ह्या दुष्ट चालीचा परिणाम जरी लगेच दृष्टोत्पत्तीस आला नाहीं तरी अशा वेळीं कित्येक रोगांचें बीजारोपण होतें. त्याचे परिणाम हळू हळू कालांतरानें दिसूं लागतात व अशा वेळीं जडलेले रोग पुढें औषधोपचार करून दुरुस्त करण्यास एक तर फार कठीण पडतें किंवा या रोगांतच तिचा अखेर शेवट होतो. आतां कोणी असें विचारतील कीं, या सर्व गोष्टी करूं नयेत तर करावें तरी काय? तर माझें उत्तर एवढेंच आहे कीं, बाळंतपणामध्यें फार करावयाचें नसतें व जें करावयाचें असतें तें मात्र सुरळीत, सशास्त्र व चांगलें केलें पाहिजे.

बाळंतपण ही क्रिया जिवावरची आहे, यांत शंका नाहीं. बाळंत होतांना काय काय केलें पाहिजे, हें व बाळंत झाल्यानंतर मोठा झालेला गर्भाशय पूर्वस्थितींत आणण्याकरितां पट्टा अगर काच्या बांधण्याची किती आवश्यकता आहे, हें वर सांगितलेंच आहे. बाळंतिणीनें निदान एक महिना पावेतों तरी बिछान्यावर पडून असावें. फारशी हालचाल करूं नये. बाळंतिणीच्या बारेच्या संबंधाच्या गोष्टीकडे विशेष लक्ष्य असावें व सर्व बाळंतपणांत

हीच मुख्य गोष्ट आहे. बाळंतिणीला फारसें पथ्य नको आहे. तिची प्रकृति अशक्त झाली असते ह्मणून पहिले १० दिवसांत मात्र तिला साधें व बिनमसाल्याचें अन्न खाऊं घालावें. तूपभात, दूधभात, साबूदाण्याची खीर व साध्या भाज्या ह्मणजे मेथी, भेंड्या, दुधीभोपळा वगैरे देण्यास हरकत नाहीं. नंतर हळू हळू तिला नेहमीं जें अन्न खाण्याची संवय असेल तें अन्न सुरू करावें. ज्यांनां मांस खाण्याची शास्त्रानें हरकत नसेल त्यांनीं तें बेलाशक खावें. प्यावयास पाणी थंड द्यावें, ऊन देऊं नये. खोलींतील व्यवस्था वर सांगितलीच आहे.

बाळंतिणीला जो वायु होतो तो स्वच्छ हवेनें होत नाहीं, हें पक्कें लक्ष्यांत ठेवावें. ज्या बाजूनें वारा वाहतो त्या बाजूच्या खिडक्या मात्र बंद कराव्यात, बाकीच्या उघड्या असल्यास हरकत नाहीं. बाळंतिणीचे प्रत्यक्ष अंगास मात्र वारा लागूं देऊं नये; इतर लोकांनां कोणच्याहि कारणानें ताप येऊन तो ताप दूषित झाला व डोक्यांत गेला ह्मणजे ज्याप्रमाणें वायु होतो, त्याचप्रमाणें बाळंतिणीस कोणच्याहि कारणानें ताप आला व तो दूषित होऊन डोक्यांत चढला ह्मणजे वायु होतो व अशा वेळीं तिची प्रकृति नाजूक झाल्यामुळें त्याचा परिणामहि लगेच वाईट होतो. बाळंतिणीस ताप न येण्याच्या कारणाचा चांगला बंदोबस्त ठेवला तर बाळंतिणीस कधींहि वायु होणार नाहीं. थंड पाणी व हवा यांचा वायूशीं कांहींएक संबंध नाहीं. उलटें वायु झाला असतां तीं तो कमी करण्याचे कामांत मदत करतात. बाळंतिणीस ताप येण्याचीं मुख्य कारणें जननेंद्रियाचा स्राव, दुसरें वार गर्भांतच राहणें व तिसरें दुधाचा ताप.

स्त्री बाळंत झाल्या दिवसापासून कांहीं दिवसपर्यंत जननेंद्रियांतून एक प्रकारचा स्राव होत असतो. तो प्रथम तांबडा असतो, नंतर पांढरा होतो; नंतर पाण्यासारखा पातळ व बेरंगी होतो व अखेर नाहींसा होतो. हा स्राव कोणच्याहि कारणानें आंत राहिल्यास विषारी होतो. त्याचें शरीरांत पोषण झालें ह्मणजे तो विषारी असल्या कारणानें ताप येतो व वायु होतो.

याकरितां हा स्राव रोज दिवसांतून दोन वेळां ऊन पाण्यानें धुऊन काढण्याची तजवीज ठेवावी. या कामीं रबराचे 'एनिमा'चा किंवा कांचेच्या पिचकारीचा उपयोग करावा.

बाळंतिणीला ताप येण्याचें दुसरें कारण गर्भाशयांत वार किंवा वारेचा कोणचाहि भाग राहणें हें आहे. वार गर्भाशयांत राहिल्यापासून काय भयंकर परिणाम होतात, हें वर सांगितलेंच आहे व यापासून ताप आला ह्मणजे वायु होऊन बाळंतिणीच्या जिवाची बहुतेक निराशाच होते. याकरितां वार बाहेर काढून टाकण्याचा पुरा बंदोबस्त केला पाहिजे.

तिसरें कारण बाळंतिणीचा दुधाचा ताप. हा ताप बाळंत झाल्यापासून तिसरे दिवशीं येतो. हा मोठासा नसतो. लगेच दोन तीन दिवसांनीं आपोआप नाहींसाहि होतो. केव्हां केव्हां हा जोरावतो व बाळंतिणीस वायूचे झटकेहि येतात. याला थोडासा घाम येऊन ताप उतरण्याचें औषध दिलें ह्मणजे लगेच ताप उतरून बाळंतीण मोकळी होते. घाम येण्याचें उत्कृष्ट औषध 'फेनासिटीन' हें आहे व हें दवाखान्यांत मिळतें. याचे ५ ग्रेन ह्म. १० गुंजा, पांच सहा थेंब मधांतून चाटावयास द्यावे ह्मणजे लगेच घाम येऊन ताप उतरतो. याशिवाय इतर कारणांनीं दुसऱ्या माणसांनां जे ताप येतात, ते बाळंतिणीसहि येण्याचा संभव असतो. व अशा वेळीं तिची प्रकृति नाजूक झाल्याकारणानें तिला वायु होण्याचा जास्त संभव आहे. याकरितां ताप येण्याचीं तींहि कारणें टाळावींत.

कित्येकांचा असा समज आहे कीं, शेगड्या, घामट कपडे, हवा बंद करणें, इत्यादि गोष्टी ज्या मीं वर सांगितल्या, त्या इंग्रजलोकांमध्यें बाळंतिणीस लागत नाहींत व याचें कारण ते लोक आपले बाळंतिणीला दारू पाजतात व इतर औषधें देतात ह्मणून! परंतु मी पक्क्या खात्रीलायक आधारावरून सांगतें कीं, ही गोष्ट सर्वथैव खोटी आहे. माझ्या चार वेळचे बाळंतपणांस यांपैकीं मला एक थेंब दिलाहि नाहीं व मीं तो घेतलाहि नाहीं किंवा याचा इतर तऱ्हेनें कोणचाहि उपयोग केला नाहीं.

आतांपर्यंत वर सांगितलेल्या व्यावहारिक सर्व गोष्टींचा अनुभव मीं स्वतः घेऊन पाहिला आहे व त्यापासून मला अतोनात फायदा झाला आहे; इतकेंच नव्हे, परंतु बाळंतिणीच्या संबंधानें जुन्या सर्व गोष्टी ह्मणजे खोलींत हवा येऊं न देणें, घामट कपडे, अंगास तेल, दोन वेळ न्हाऊं घालणें, आंथरण्यास पटकुरें, निरनिराळे पथ्याचे जिन्नस, गरम मसाल्याचें खाणें, शेगड्यांनीं अंग शेकणें इत्यादि अनेक गोष्टी, ज्यांपासून शरीराचे हाल होतात त्या सर्व मीं टाळल्या होत्या व त्यापासून माझा अतोनात फायदा झाला हें मी खात्रीलायक सांगतें. याकरितां माझ्या सर्व भगिनींनीं मीं थोडक्यांत सांगितलेल्या वरील गोष्टींवर भरंवसा ठेवून त्यांचा अनुभव घ्यावा ह्मणजे त्यांनांहि सुख व फायदा होईल.

सौ० जिऊताई मंत्री.

प्लेगक्यांपांतील हकीकत.

दिसेंबर महिना आला कीं, गेलीं चार वर्षें मुंबईतील लोकांची पळापळ सुरू होती. यंदाचे सालीं लांब जाण्याचा फार त्रास पडतो ह्मणून कुठें तरी जवळपास जागा घ्यावी, असें ठरवून आह्मी त्या शोधास लागलों. शेवटीं बी. बी. रेल्वेच्या नवीनच बांधलेल्या 'व्हिन्सेंटरोड' स्टेशनावर आनंदाश्रमांत आह्मांला इवीतशी एकदाची सोईवार जागा मिळाली. मुंबईच्या बाहेर राहणें ह्मणजे आह्मां बायकांनां मोठी संकटाची गोष्ट आहे. घरांतून आगगाडीचा वेळ साधायचा असतो; कधीं लौकर जायचें असतें ह्मणून स्वयंपाकाची घाई करावी लागते; कधीं यायला उशीर होतो ह्मणून तिष्ठत बसावें लागतें; एकंदरींत बाहेर गांवचें राहणें त्रासदायकच खरें. पुरुषमंडळी एकदा का जेवून गेली ह्मणजे मग आह्मां बायकांची घरीं सभा भरायची; व तींत गोष्टी कोणत्या, तर 'तुह्मीं हो आज काय भाजी केली होती?' दुसरीनें विचारावें 'तुमच्या इथें आज कढी कसली होती?' साहजिकच आहे. प्रत्येकजण जो धंदा करित असतो, त्या त्या धंद्याच्या तो गोष्टी बोलत असतो. हपीसवाले हपीसांतल्या गोष्टी करायचे. 'आज साहेब असें ह्मणाला, तसें ह्मणाला.' तीच गत भिक्षुकांची. 'आज अमक्याकडचें बोलावणें आलें होतें तेथें लघुरुद्र झाला. अमक्याचें वर्षश्राद्ध झालें, इ.' असो.

आमच्या सभेचे सभासद पहिल्या पहिल्यानें सात आठ होते. ते वाढत वाढत लवकरच पंचवीस तीस झाले. आमच्या शेजारीं सगुणाबाई नांवाच्या एक पोक्त आणि सुशिक्षित बाई रहात असत. त्यांनीं आमचा वेळ फुकट चकाट्या पिटण्यांत जातो हें बरें नाहीं, असें पाहून आह्मां सर्वांस बोलावून एक दिवस दोन उपदेशाच्या गोष्टी सांगितल्या. त्या प्रत्येक स्त्रीनें आपल्या हृत्पटलावर लिहून ठेवण्यासारख्या आहेत ह्मणून त्यांच्या भाषणांतील जेवढा भाग आतां मला आठवत आहे, तेवढा येथें देण्याचा मी प्रयत्न करितें. सगुणाबाई ह्मणाल्या—

"प्रिय भगिनींनो! तुह्मी आपला अमूल्य वेळ अशा गप्पा मारण्यांत घालवितां, हें पाहून मला फार वाईट वाटतें. तुह्मी जोंपर्यंत तुमचं

कर्तव्यकर्म काय आहे हें जाणणार नाहीं, किंवा जाणण्याचा प्रयत्न करणार नाहीं, तोंपर्यंत तुमची व तुह्मांस होणाऱ्या संततीची कधींहि उन्नति व्हायची नाहीं. आपल्या हिंदु पांढरपेशांच्या बायका खेरीज करून दुसऱ्या कोणत्याहि धर्माच्या बायकांकडे लक्ष द्या, त्या तुह्मांस कधीं तरी आपला वेळ फुकट घालवितांना दृष्टीस पडतील काय ? साहेबांच्या मडमा व पारशिणी ह्या कित्येक जरी स्वयंपाक करित नसल्या, तरी त्यांची गडीमाणसांवर, घरांतील एकंदर चीजवस्तूंवर केवढी नजर असते, हें तुह्मीं पाहिलं आहे काय ? त्या स्वतः बाजारांत जाऊन त्यांस हवी तशी वस्तु खरेदी करून आणित असतात. बाजारांत जाऊन चीजवस्तु खरेदी करणं हें आपलं हिंदुबायकांचं काम नाहीं खरं, तरी पण आपल्या घरांतील मनुष्यांनीं आणलेलं सामान जागच्या जागीं लावून ठेवणं, हें आपलं काम आहे. घरांत जिकडे तिकडे जर अडगळ दिसून आली तर पहाणाराला तें कसं बरं बरं वाटेल ? पुरुष सगळा दिवस काम करून थकून आला व त्याला जर घरांत जिकडे तिकडे साफसूफ दिसलं नाहीं व तुमच्यापासून सुख मिळालं नाहीं, तर त्यांत पुढें नुकसान कुणाचं बरं होईल ? बरं तुमच्या सुना किंवा तुमच्या मुली ह्या तुमचा कित्ता गिरविण्यास कमी करतील काय ! ह्मणजे तुमच्या एका आळसानें व फुकट वेळ घालविण्यानें, तुह्मी तुमच्या कुटुंबाचे नुकसानास कारण नाहीं का झालां ? ह्मणून आपलं वर्तन आपण सुधारलं पाहिजे. पुरुष आपणांवर किती नजर ठेवील. गृहाची सुधारणा ही बायकांकडूनच झाली पाहिजे. कोणत्याहि देशाकडे नजर द्या. त्या देशांत एकट्या पुरुषाच्यानें गृहसुधारणा अगर देशसुधारणा झाली नाहीं व होणारहि नाहीं. कारण पुरुष हा पुरुषांचंच काम करूं शकतो व स्त्री ही स्त्रियांचंच काम करूं शकते. पण पुरुषाचं काम स्त्री ह्मणेल मी करीन व स्त्रीचं काम पुरुष ह्मणेल मी करीन, तर तें कधींहि चांगल्या रीतीनें व्हायचं नाहीं. परमेश्वरानें स्त्रियांच्या व पुरुषांच्या शरीराची

रचना व प्रत्येकाचे प्रकृतिगुण हे निरनिराळे करून ठेविले असल्या-कारणानें प्रत्येकजण आपापलं काम उत्तम रीतीनें बजावूं शकतो. व त्यांनीं तें तसं बजावलं ह्मणजे संसाराचं गाडं सुरळीत चालतं. स्त्री ही घरांतील मालकीण असल्याकारणानें तिला गृहिणी ही संज्ञा दिली आहे; व पुरुष घरांत वास करतो, आल्या गेल्या पाहुण्यांचा, अतिथिअभ्यागतांचा समाचार घेतो व संसारांत दक्ष असतो, ह्मणूनच त्यास गृहस्थ ही संज्ञा आहे. पुरुषानें बाहेरचा उद्योगधंदा मोठ्या चातुर्यानें चालवून पैसा मिळवावा व आपल्या पत्नीचं, आपल्या मुलाबाळांचं व कुटुंबांतील इतर मंडळींचं उत्तम रीतीनें पाळणपोषण करावं व त्यांजवर देखरेख ठेवावी; पण घरांतील व्यवस्था पाहण्याचं काम त्याचं नसून तें आह्मां स्त्रियांचंच आहे, व तें आपण उत्तम तऱ्हेनें केलंच पाहिजे व तें आपण तसं करतों ह्मणूनच आपल्यास पुरुषांची अर्धांगी असं ह्मटलं आहे. करितां प्रत्येक स्त्रियेनें हें पक्कं लक्ष्यांत ठेविलं पाहिजे कीं, गृहकृत्यांत जेवढं दक्ष राहवेल तेवढं राहून चारचौघांच्या तोंडून धन्य ह्मणवून घेईन व त्यांतच कीर्ति मिळवीन. कित्येक बाया मोठमोठीं लुगडीं, चोळ्या व दागिने ह्यांकरितां हट्ट घेऊन बसतात. घरांतील कामकाज करण्याऐवजीं निजून रहायचं, स्वयंपाकच करायचा नाहीं. पण हें त्यांचं करणं तुह्मांस गोड वाटतं काय? आपला पति जिवापाड मेहनत करून जे दोन पैसे आणतो, त्या पैशांत आपण आनंद करून त्यालाहि आनंद दिला नाहीं, तर त्यांत तोटा कुणाचा आहे बरं! आपलीं मुलं चांगलीं व्हावीं व त्यांस उत्तम वळण लागून तीं प्रत्येक गोष्टींत आपलाच कित्ता गिरवितील असं स्वताचें चोख वर्तन ठेवल्यानें स्त्रियांचं चारचौघांत नांव होऊन त्या दुसऱ्याच्या आदरास पात्र होतील व त्यांतच मोठेपणा आहे. तो अंगावर दागदागिने घातल्यानें किंवा लुगडीं नेसल्यानें येणारा नाहीं. आपल्या घरांतील वडील माणसांविषयीं आपण नेहमीं पूज्यबुद्धि धरली पाहिजे. आपल्यास मान मिळावा अशी जर आपली इच्छा असली तर आधीं आपण

दुसऱ्यास मान दिला पाहिजे. आपल्या मुलांस पहिल्यापासूनच खरें भाषण, सत्याचरण, स्वधर्मनिष्ठा व धर्माचें खरें तत्व काय आहे ह्यासंबंधीं जर आपण माहिती करून दिली, तर तीं नीतिमान् व पापभीरु होतील. प्रत्येक स्त्रीनें लिहिणंवाचणं, हिशेब ठेवणं, कणारांगोळी काढणं, शिवणंटिपणं वगैरे गोष्टींची माहिती अवश्य करून घेतली पाहिजे. भारत, भागवत, रामायणादि पवित्र ग्रंथांचं वाचन त्यांजकडून झालं पाहिजे. ह्मणजे त्यापासून अनेक तऱ्हेचा बोध मिळून आपलं वर्तन पुराणप्रसिद्ध थोर महिलांप्रमाणें ठेवण्याची त्यांस साहजिकच जिज्ञासा उत्पन्न होईल. अहिल्या, द्रौपदी, सीता, मंदोदरी वगैरे थोर व पतिव्रता स्त्रियांचीं चरित्रं वाचल्यापासून मनावर चांगला संस्कार घडल्याविना रहाणार नाहीं. कुटुंबांत नेहमीं लागणाऱ्या औषधापाण्यासंबंधेंहि आपल्याला अवश्य माहिती असली पाहिजे. घरांतील माणसांची प्रकृति बिघडल्यास त्यांस औषधापाण्याची कोणत्या रीतीची तजवीज ठेवावी, कोणतं औषध कसं द्यावं, खाण्यापिण्यास काय द्यावं, झालेला रोग कोणत्या रीतीनें नाहींसा होईल वगैरे विषयाची माहिती असणं अत्यंत हितकारक व आवश्यक आहे. त्याचप्रमाणें दरेक स्त्रीला गरोदर राहिल्या दिवसापासून खाणं पिणं कसं ठेवावं, आपल्या गर्भाच्या रक्षणाकरितां दरमहिन्यास कोणतं औषध घ्यावं, बाळंत झाल्यावर खाण्यापिण्याची, औषधपाण्याची वगैरे संबंधाची साधारण माहिती करून घेऊन आपल्या तान्ह्या बाळाची कोणत्या रीतीनें शुश्रूषा ठेवावी वगैरे गोष्टींची माहिती असणं अत्यंत जरूरीचं असून शहाणपणाचं आहे. त्याचप्रमाणें बाळंत झाल्या दिवसापासून एक वर्षपर्यंत बाळंतिणीनें कसं वर्तन ठेवावं, कोणते नियम पाळावे हेंहि ठाऊक असणं अत्यंत महत्वाचं आहे. आंबट, तिखट, शिळे वगैरे पदार्थांचं सेवन केल्यानें इटकून नसतील ते रोग होतात. कित्येक

स्त्रिया भाजींत तिखट मीठ जास्त घातलें ह्मणजे उत्तम स्वाद येईल किंवा मिठाईमध्यें वाजवीपेक्षां जास्त मसाला घातल्यानें ती विशेष गोड होईल ह्मणून घालित असतात. वाजवीपेक्षां फाजील मसाला घातला तर तो प्रकृतीला अपायकारक होतो; परंतु तोच माफक घातला तर पदार्थांची रुचि वाढवून प्रकृतीला माफक पडून वात कफ पित्त प्रकोप ह्यांचा नाश करून पाचनशक्ति जागृत करितो. खारट, आंबट, तिखट, वगैरे पदार्थ पित्ताला जागृत करून शरीर आणि बुद्धि यांस मंदपणा आणतात. पण दूध, तूप, साखर, गहूं इत्यादि सत्वगुणी पदार्थांचं सेवन करणं अत्यंत हितकारक असून बुद्धिवर्धक व पौष्टिक असून त्यानं मनुष्यामध्यें सात्विकगुण येतो. करितां जेणेंकरून आपल्या अंगांत सत्वगुण जास्त उत्पन्न होईल असा प्रयत्न केला पाहिजे. पण तो पाकशास्त्राची माहिती करून घेतल्यावांचून येणं अशक्य आहे. आजकाल घरोघर स्वयंपाकिणी पुष्कळ पाहण्यांत येतात. त्यांस भात शिजवितां येण्याची मारामार, मग पक्वान्नांची गोष्ट लांबच राहिली! ह्मणून प्रत्येक स्त्रीस साधारण रोज लागणाऱ्या औषधांची तशीच पाकशास्त्राची माहिती अवश्य पाहिजे व ती त्यांस असली ह्मणजे घरांतील पुरुषांचे मागचा थोडासा त्रास चुकलाच ह्मणायचा. उठल्या बसल्या डाक्तर किंवा वैद्य ह्यांचेकडे जावं लागणार नाहीं. पण आह्मीं जर आवश्यक अशा गोष्टींची माहिती करून घेतली नाहीं तर ह्यांत दोष कोणाचा? आह्मांस दुसऱ्याकडे नांदायचं असतं, सासरच्या बऱ्यांवाईट माणसांशीं गांठ पडते, तेव्हां वरील शिक्षणांत आह्मांस सहनशीलपणाचं शिक्षण मिळालं पाहिजे. पण ह्या गोष्टी जर एखाद्या कर्कशा बाईची संगत न लागेल तर साधतील. अशिक्षित व मूर्ख बायका आपल्या पतीची व मुलाबाळांची खाण्यापिण्याची व्यवस्था बघण्याचं सोडून देऊन उगाच इकडच्या तिकडच्या गप्पा मारित बसतात. स्त्रियांचें आराध्य दैवत जो पति त्याची व तशीच सासुसासऱ्यांची निंदा करून ज्याच्या कल्याणांत आपलं कल्याण, ज्याच्या सुखांत आपलं सुख, व ज्याच्या वैभवांत आपलं वैभव अशा पतीचा अवमान करून घरांत क्लेशरूपी

आग लावून देतात व कुटुंबांतील आनंद व शांतता नाहींशी करून घराचा आव घालवितात. पण हें खचीत चांगलं नव्हे. आह्मां स्त्रियांचा मुख्य धर्म घरांतील वडील माणसांस योग्य मान देऊन आपल्या मुलांबाळांस आपला उत्तम धडा घालून द्यायचा, त्यांस थोडथोडं* शिक्षण द्यायचं, पतिव्रताधर्म पाळायचा व जीं जीं उत्तम कामं असतील तीं तीं करून देवीपदाला पोंहचायचं व अशा देवीपदास पोंहचण्यासारखं जर आह्मांस लहानपणापासून शिक्षण मिळालं तरच त्यांत आमचं हित आहे.''

मला वाटतें प्रत्येक स्त्रीनें वरील गोष्टी ध्यानांत धरून आपलें वर्तन त्याप्रमाणें ठेविलें तर घरांत लक्ष्मी वास करील ह्यांत काडीमात्र संशय नाहीं. पण तें आमचेकडून झालें मात्र पाहिजे.

सौ० काशीबाई शिंगणे.

शिवणकाम आणि कशिद्याचीं कामें.

शिवणकामाचीं साहित्यें आणि साधनें.

शिवणकामाच्या विषयांची एक साधारण यादी गेल्या अंकीं दिलीच आहे. तरी त्यांतील कोणत्याहि विषयास हात घालण्याच्या पूर्वी शिवणकामास काय काय साहित्य लागतें व त्याचे गुणधर्म काय ह्याविषयीं थोडकीशी माहिती देऊन नंतर क्रमाक्रमानें एक एक विषय घ्यावा तें बरें. कोणताहि हुन्नर घ्या, त्यास उत्तम स्वरूप आणण्यास त्या त्या हुन्नरांतील कलेच्या निपुणतेपेक्षां त्या हुन्नरास लागणारीं शस्त्रें, साहित्यें, व इतर मालमसाला ह्यांची खरी पारख करून तींत निपुण असणें अधिक जरूरीचें आहे. चितार्‍यास चित्रकलेपेक्षां चित्रास लागणार्‍या निरनिराळ्या रंगांची व कुंच्यांची व इतर साहित्यांची माहिती अधिक असली पाहिजे. शिवणकाम करणारासहि तीच गोष्ट लागू पडते. ह्मणून शिवणकामाचें साहित्य, अंगुस्तान, सुई, दोरा, कातर, इत्यादि कोणत्या प्रकारचीं असावींत व त्यांचा कसा व केव्हां उपयोग करावा, ह्याची माहिती विशेष असली पाहिजे, कारण त्यावरच वर नमूद केल्याप्रमाणें हुन्नराची शिताफी व सफाई अवलंबून असते.

सुई.

सुयांत मुख्य प्रकार चार आहेत (१) गोल छिद्राची अथवा गोल नाकी. (२) लांबट छिद्राची अथवा चिरनाकी. (३) लांबट सुया. (४) जाड आंखूड सुया. दुसर्‍या प्रकारच्या सुया ह्मणजे चिरनाकी. त्यांत लांबट छिद्र पाडण्याची पद्धत वेधनी दाबून केली असल्याकारणानें धातूस कमकुवत करून टाकिते. त्याप्रमाणें वर्तुळ छिद्र, जें वेधनी फिरफिरवून पाडिलेलें असतें, तेथील धातु अधिक मजबूत राहते. ह्मणून वर्तुळ छिद्राची सुई अधिक मजबूत समजावी.


शिवणकामास ५ पासून ९ नंबरापर्यंतच्या सुयांचा उपयोग होतो. नंबर ९ ची सुई अगदीं पातळ असते व नाजूक, बारिक, विरळ, कपड्याचें काम करण्यास तिचा उपयोग होतो. नं. ५ पासून नं. ९ पर्यंत क्रमाक्रमानें जाडींत जास्त अशा सुया आहेत व त्यांचा उपयोग तशाच प्रकारच्या जाड किंवा पातळ अशा शिवणकामास होतो. केव्हां केव्हां जाडे कपडे किंवा गोधड्या शिवण्याच्या कामीं नं. ३ च्या सुयांचाहि उपयोग करावा लागतो. सुई ही फार ताट किंवा लवचीकहि असूं नये. परंतु हे दोन्ही गुण तींत असावेत. एक विशेष गुण जो तींत हवा, तो ती सुळसुळीत असणें हा होय. सुयांचें 'पॉलीश' जाऊं न देण्याकडे शिवणकाम करणारांचें विशेष लक्ष्य हवें, व ह्मणून उष्ण अशा जागेंत किंवा सर्दी न लागेल अशा रीतीनें सुया गुंडाळून ठेवणें हें उत्तम. आमच्या स्त्रीवर्गांत सुई कुठेंहि व कशीहि ठेवण्यासंबंधी जी हयगय दिसण्यांत येते, ती फारच घातक आहे. डोकींतील बुचड्यांत, दारांच्या किंवा खिडक्यांच्या फटींत, भिंतीच्या भेगांत कुठेंतरी, किंवा वाटेल त्या ठिकाणीं बिछान्यांत, तक्क्यांत अथवा लोडांत कां होईना, सुया ठेवणें हें मुलांबाळांच्या घरांत किती घातक आहे, ह्याविषयीं लिहिण्याची जरूरच आहे असें नाहीं. धोक्याची गोष्ट सहज कळण्यासारखी असूनहि तेथें दुर्लक्ष्य होतें, ह्यास कारण काय तर आळस, दुसरें कांहींएक नाहीं. सुया व्यवस्थेनें नीट ठेवणें असल्यास गरम कपड्याची एक घडी करून तींत त्या अडकवून ठेवाव्यात, ह्मणजे त्या सुरक्षित राहून त्यांस सर्दीची बाधा न होतां कीटहि येत नाहीं व त्या चांगल्या स्थितींत राहतात. किंवा कापसाची अगदीं लहानशीच गिर्दी करून तींतहि सुया किंवा टांचण्या रोंवून ठेवल्यानें त्या चांगल्या रहातात. लांबट सुयांचा उपयोग बहुशा कापसाचीं वस्त्रें शिवण्याकडेसच विशेष होतो व जाड आंखूड सुयांचा उपयोग लोंकरीचीं ह्मणजे बनातीचीं वस्त्रें व जाडींभरडीं कापडें शिवण्याकडेस होतो.

अंगुस्तान.

अंगुस्तान घालून शिवणकाम करण्याची संवय अगदीं प्रारंभापासून असणें फार उत्तम. चांगलें शिवणकाम करणाऱ्या कित्येक बायांस अंगुस्तान घालून बिलकुल काम करितां येत नाहीं व त्यामुळें त्यांच्या बोटांची केव्हां केव्हां फार कींव येण्यासारखी स्थिति झालेली असते; व कांहीं दिवस बोटें बरीं होईतों शिवणकाम बंद ठेवणेंहि त्यांस भाग पडतें. अशी ही गैरसोईची संवय करून घेण्याच्या आधींच काळजीपूर्वक नेहमीं अंगुस्तान घालून शिवणकाम केल्यास वर सांगितलेली ही वाईट संवय अजिबात नाहींशी होईल, व शिवणकाम हें आनंदानें व मौजेनें कर्मणूक करून घेण्याचेंच एक काम आहे असें वाटेल. अंगुस्तान हें बहुधा धातूचें व केव्हां केव्हां लांकडाचेंहि केलेलें असतें. तें शिवणकाम करितांना उजव्या हाताच्या मधल्या बोटांत किंवा ज्या बोटास अनामिका अशी संज्ञा आहे त्या बोटावर चढवितात. शिवतांना सुई पुढें ढकलण्यास, सुईच्या नाकावर जोर देण्यास त्याचा उपयोग करितात. अंगुस्तानाच्या उपयोगानें थोड्या श्रमांत पुष्कळ काम होऊन तें जलद होतें व त्यामुळें बोटासहि इजा होत नाहीं.

सौ. कृष्णाबाई तालचेरकर.

प्रीति.



[चाल—झाली ज्याची०]

हृदयोद्यानीं[1] सुंदर लतिका[2]
उगवे, नांव तियेचें प्रीती. । ध्रु. ।

उष्णें[3] जळती इतर लता परि
विरहाग्नित[4] ही वाढत जाती. १

दुःख, शोक, अश्रूंची वृष्टी
ह्या वेलीचें पोषण करिती. २

आलिंगिल ज्या तरुला त्यासह
वसती, रमती, जगती, मरती. ३

आपत्तींचा वणवा पेटे
त्यांत हिला नव पुष्पें येती. ४

क्षमा शांति कीं सहनशीलता
दिव्य फळें ही लतिका देती. ५

काम मोह विषतरू निराळे
कल्पलता ही नष्ट न होती. ६

'टिळक.'

---

१ हृदय+उद्यानीं=हृदयरूपी बागेंत. २ वेल. ३ उन्हानें. ४ विरह—अग्नीत=एकमेकांचा विरह होणें हाच एक अग्नि त्यांत.

नवल विशेष.

श्रीमती लेडी कर्झन आपले लोकप्रिय व्हाइसराय नामदार लॉर्ड कर्झन यांच्या पत्नी, या आपल्या मुलांनां घेऊन येत्या महिन्याच्या २३ व्या तारखेस विलायतेस जाणार आहेत. तिकडून पुनः सप्टेंबर महिन्यांत हिंदुस्थानांत परत येतील.

***

मिसेस बैरामजी नसरवानजी कोयाजी नांवाच्या एका पारशी स्त्रीनें आपल्या परलोकवासी पतीच्या स्मरणार्थ ६००० रुपये येथील युनिव्हर्सिटीला दिले आहेत. या रुपयांच्या व्याजांतून युनिव्हर्सिटीनें 'सायन्स'मध्यें सर्वांत जास्त मार्क मिळविणाऱ्या पारशी विद्यार्थ्याला आपल्या नवऱ्याच्या नांवाची एक स्कालर्शीप द्यावी, अशी तिनें व्यवस्था केली आहे. या बाईनीं विद्यादानासाठीं दिलेली ही देणगी प्रशंसनीय होय.

***

मद्रास युनिव्हर्सिटीच्या पहिल्या बी. ए. च्या परीक्षेंत या वर्षी दोघी हिंदु स्त्रिया पास झाल्या, ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय.

***

वऱ्हाडांतील केळीवेळी नांवाच्या गांवांत कांहीं दिवसांपूर्वी बालचकृत्वसभेचा समारंभ झाला, त्यांत भाषण करण्यासाठीं आलेल्या वक्त्यांत एक मुलगी व दोन तीन महारांचीं मुलेंहि आलीं होतीं, असें समजतें. वऱ्हाड प्रांत चिमुकलाच आहे खरा, परंतु त्यांत घडणाऱ्या बहुतेक गोष्टी मात्र मोठ्या असतात!

***

कलकत्ता येथें महाराणीसरकारच्या स्मारकासंबंधीं एक सभा झाली. तींत बसल्या बैठकींतच ५० लाख रुपयांचे आंकडे पडले. ग्वाल्हेरच्या शिंदेसरकारांनींच १० लाख रुपये दिले!

***

परलोकवासी महाराणी व्हिक्टोरिया यांनां हातखर्चासाठीं म्हणून सालिना ९ लक्ष रुपयांची नेमणूक होती. त्यांनां शिवाय खासगी खर्चासाठीं २५,८७,५००, नोकर लोकांच्या पगारासाठीं १९,६८,९००, आणि धर्मादायासाठीं म्हणून १,९८,००० रुपये निराळे मिळत. सर्व खर्चवेंच जाऊन महाराणीसाहेबांकडे दरसाल सुमारें १,२०,००० रुपये शिल्लक रहात. मृत्युसमयीं त्यांचे जवळ सरासरी दीड कोट रुपये शिल्लक असावे असें म्हणतात.



श्रीमन्महाराणी अलेक्झॅन्ड्रा.

महाराष्ट्र महिला.

महिलेचे उद्गार.

देशाची उन्नति होण्यास ज्या कित्येक गोष्टी अवश्य झाल्या पाहिजेत त्यांत देशांतील स्त्रियांस सुशिक्षण मिळणें, ही पहिली आणि अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. देशांतील माता सुशिक्षित झाल्या म्हणजे इतर सर्व सुधारणा आपोआपच होतील, याबद्दल यत्किंचित्‌हि शंका नाहीं. हल्लीं मोठमोठ्या शहरांतून मुलींकरितां शाळा स्थापन होत आहेत खऱ्या, परंतु या शाळांतून स्त्रियांनां उपयुक्त असें शिक्षण फारच थोडें मिळत असतें आणि लग्न होईपर्यंतच शाळेमध्यें त्यांनां जें कांहीं थोडेसें शिक्षण मिळत असतें त्यावरहि शाळा सोडली म्हणजे बहुतेक पाणीच पडतें. तात्पर्य आपल्या देशांत स्त्रीशिक्षणाविषयीं एकंदरींत सर्वत्र अनास्थाच दिसून येते. परंतु समाधानाची गोष्ट कीं, आमच्या गुर्जर बंधूंनीं या बाबतींत नुक्ताच एक स्तुत्य प्रयत्न आरंभिला आहे. अहमदाबाद येथें 'गुजरात व्हरनॅक्युलर सोसाइटी' म्हणून एक उत्तम संस्था आहे. या संस्थेच्या आश्रयाखालीं 'स्त्रीशिक्षणपरीक्षा' म्हणून एक परीक्षा घेण्याचें गुर्जर पुढाऱ्यांनीं ठरविलें आहे. शाळा सोडल्यावरहि स्त्रियांस आपलें शिक्षण वाढविण्यास उत्तेजन मिळावें आणि स्त्रियोपयोगी ज्ञानाची वृद्धि व्हावी, हाच ही परीक्षा घेण्याचा प्रशंसनीय हेतु आहे. या परीक्षेचे 'प्राथमिक परीक्षा' आणि 'उच्च परीक्षा' असे दोन प्रकार केले आहेत. ही परीक्षा अहमदाबाद येथें दरसाल नोवेंबर महिन्यांत घेण्यांत येईल व परीक्षेच्या हालांत होतां होईल तों सर्व स्त्रियाच हजर रहातील. 'उच्च परीक्षे' साठीं ३०, २५, २०, १५ आणि १० रुपयांचें, अशीं एकंदर १०० रुपयांचीं ५ बक्षिसें ठेवण्यांत आलीं असून 'प्राथमिक परीक्षे' साठीं

१ लें २५ चें, २ रें २० चें, ३ तीं ६ पर्यंत प्रत्येकीं १५ चें, ७ तीं १२ पर्यंत प्रत्येकीं १० चें आणि १३ तीं १९ पर्यंत प्रत्येकीं ५ रुपयांचें, अशीं २०० रुपयांचीं एकंदर १९ बक्षिसें ठेविलीं आहेत. एका वर्षापूर्वी शाळा सोडलेल्या सर्व स्त्रियांस व त्याचप्रमाणें शाळेंतील शिक्षकिणींसहि या परिक्षांस बसण्याची परवानगी आहे. आमच्या गुर्जर बंधूंनीं आरंभिलेला हा प्रयत्न खरोखर अत्यंत प्रशंसनीय आणि अनुकरणीय आहे. आमच्या महाराष्ट्र समाजांतहि अशाच प्रकारची कांहीं तरी चळवळ झाल्यास बरें होईल. येथील 'आर्यमहिलासमाज,' 'लेडीज सोशियल क्लब,' किंवा उमरावतींतील 'वनितासमाज' यांसारख्या सुशिक्षित आणि सधन स्त्रियांच्या समाजांनीं, आपल्या इतर भगिनींच्या ज्ञानवृद्धीसाठीं अशा प्रकारें कां झटूं नये, हें कळत नाहीं!

***

बेळगांव जिल्ह्यांतील यल्लम्मा गडगे नांवाच्या एका बाईच्या स्वप्नांत नेहमीं तिची सासू येत असे. सासूच्या भुतानें बिचारी यल्लमा फारच हैराण होऊन अगदीं भिऊन गेली. त्या भुताशिवाय तिला दुसरें कांहींएक दिसत नव्हतें. भुतांनीं पछाडलेल्या यल्लमासारख्या बायांनां संकटापासून सोडविणारे महात्मे गांवोगांव असताच. आणि त्यांतहि या भोंदू पंचाक्षऱ्यांचें खेडेगांवांतून तर विशेष प्राबल्य असतें, हें सर्वांनां ठाऊकच आहे. अशा पंचाक्षऱ्यांतलाच एक पंचाक्षरी यल्लमाला भेटला व तिच्याकडून बरेचसे पैसे उपटून भूतबाधा समूळ नाहींशी व्हावी, म्हणून त्यानें भुताला दोन पायांचा प्राणी बळी देण्यास सांगितलें. भुतानें घेरलेल्या बिचाऱ्या भोळ्या यल्लमास दोन पायांचा प्राणी म्हणजे कोंबडा, हें काय ठाऊक! तिनें आपल्या शेजारणीच्या दोन वर्षांच्या सुकुमार बालकाचा निर्दयपणें वध करून आपल्या सासूच्या भुताला बळी दिला! बिचाऱ्या त्या निरपराध बालकाची दीन माता सांप्रत ऐकणारांचें काळिज तुटण्यासारखे हंबरडे फोडित राहिली आहे व यल्लमाबाई काळेपाण्यावर गेली आहे! भोळ्या बिचाऱ्या यल्लमाप्रमाणेंच आमच्या समाजांतील तीन चतुर्थांशाहूनहि जास्त

स्त्रियांस निरनिराळ्या भुतांनीं रात्रंदिवस घेरलेलें आहे. या स्त्रियांची या भुतांपासून मुक्तता करण्यासाठीं खेड्यापाड्यांतील ढोंगी पंचाक्षरी आपापल्या परीनें खटपट करित आहेत खरे, परंतु या पंचाक्षऱ्यांकडून ती भूतबाधा कमी न होतां दिवसेंदिवस वृद्धिंगतच होत आहे. भुतांनीं पछाडलेल्या आमच्या हजारों स्त्रियांस भूतबाधेपासून मुक्त करण्यासाठीं आमचें दयाळु सरकार, श्रीमंत गायकवाड महाराजांसारखे विद्याभिलाषी महाराजे, परलोकवासी मान्यवर रानडेसाहेबांसारखे महात्मे, अशांसारखे पुष्कळ पंचाक्षरी पुढें आले पाहिजेत व या भुतांस दोन पायांच्या प्राण्यांचा बळी न देतां आपल्या भांडारांतील असंख्य धनाचा आणि आपल्या अंगच्या सर्व कर्तृत्वशक्तीचाच बळी दिला पाहिजे. असें झालें म्हणजे हीं भुतें संतुष्ट होऊन भोळ्याभाबड्या स्त्रियांनां पीडा देणार नाहींत व त्यांच्या हातून बिचाऱ्या यल्लमासारखीं अविचाराचीं व अमानुष कृत्येंहि घडणार नाहींत.

***

परलोकवासी महाराणी व्हिक्टोरिया यांचे स्मारकार्थ फंड गोळा करण्यासाठीं संपूर्ण ब्रिटिश राज्यांत जिकडे तिकडे जारीनें खटपट चालली आहे. आमच्या हिंदुस्थानांतहि ही चळवळ सुरू आहे. कलकत्त्यास गव्हर्नरजनरल साहेब जंगी फंड जमवित आहेत; मुंबई, मद्रास येथील गव्हर्नरहि आपापल्या इलाख्यांतून फंड गोळा करित आहेत; त्याचप्रमाणें पुणें, कोल्हापुर, नागपुर, हैद्राबाद, उमरावती, रंगून वगैरे प्रत्येक मोठमोठ्या शहरीं फंड गोळा करण्याचे प्रयत्न अधिकाऱ्यांकडून आणि लोकांकडून जारीनें चालले आहेत. पुरुषवर्गाची याप्रमाणें फंड जमविण्यांत जशी एकमेकांशीं चढाओढ लागली आहे, तशीच स्त्रियांनींहि जारीनें खटपट चालविली आहे. कलकत्त्यास गव्हर्नर जनरल साहेबांच्या पत्नी लेडी कर्झन यांनीं लेडी डफ्रीन फंडाला जास्त नर्सीस देतां याव्या म्हणून त्यांच्या करितां स्कालरशिपा स्थापण्यासाठीं जंगी फंड गोळा करण्याचें आरंभिलें आहे; या फंडांत आजपर्यंत सुमारें पावणे तीन लक्ष रुपये जमले आहेत. पुण्यांतहि तेथील सेशन

जज्जांच्या पत्नी मिसेस ॲस्टन या फंड जमविण्याची खटपट करित आहेत. मुंबईस आमच्या दयाळु गव्हर्नर साहेबांच्या पत्नी लेडी नार्थकोटसाहेब यांनीं पुढाकार घेतलेल्या स्मारकफंडांत मुंबईतील स्त्रियांकडून आजपर्यंत सुमारें दहा हजार रुपये जमले आहेत. या फंडाची काय व्यवस्था करावी हें ठरविण्यासाठीं गेल्या महिन्याच्या १५ व्या तारखेस लेडी जेन्किन्स साहेबांचे बंगल्यावर मुंबईतील स्त्रियांची एक सभा भरली होती. या प्रसंगीं अध्यक्ष-स्थानीं लेडी नार्थकोट बाई होत्या. स्त्रियांनां उच्च प्रतीचें शिक्षण देण्याकडे जमणाऱ्या पैशांचा व्यय करावा, अशी एक उत्तम सूचना सभेपुढें आली होती; परंतु तिला बहुमत मिळालें नाहीं. दुसरी सूचना अशी होती कीं, रोग्यांच्या शुश्रूषेसाठीं नर्सीस वाढविण्याकडे या पैशांचा उपयोग करावा. हा फंड लेडी कर्झनच्या फंडांत हवा तर सामील करावा, अगर स्वतंत्र ठेवावा. परंतु ही सूचनाहि नापसंत ठरली. शेवटीं बहुमतानें असें ठरलें कीं, जमणारे पैशांचा एक कायमचा फंड स्थापन करावा आणि मुंबईतील कामा हास्पिटल, आल्ब्लेस हास्पिटल, बाई मोटलाबाई हास्पिटल, सर दिनशा पिटीट हास्पिटल, स्त्रीमहारोग्यांचें हास्पिटल आणि युरोपियन जनरल हॉस्पिटल, या हॉस्पिटलांच्या मुख्याधिकाऱ्यांकडे या फंडाच्या व्याजाची रकम विभागून पाठवावी व हास्पिटलांमधून बऱ्या होऊन बाहेर जाणाऱ्या स्त्रिया आणि मुलें यांनां महाराणी व्हिक्टोरिया साहेबांच्या मृत्यूचे दिवशीं कपडे आणि खुराक यांसाठीं त्यांतून मदत देण्याविषयीं त्यांनां विनंति करावी. या फंडाची व्यवस्था पहाण्यासाठीं पुढील चार गृहस्थ ट्रस्टी नेमिले आहेत. मुंबईचे अकाउंटंट जनरल, सर्जन जनरल, कारपोरेशनचे प्रेसिडेंट आणि मुंबई ब्यांकेचे मॅनेजर. महाराणी व्हिक्टोरिया यांच्या स्मारकाचा स्त्रियांनींच पुढाकार घेऊन सर्व पैसे स्त्रियांनींच जमविले असतां व त्यांचा विनियोग स्त्रियांकरितांच व्हावयाचा असतां, व्यवस्था पहाणाऱ्या ट्रस्टींमध्यें एकहि स्त्री नसावी, हें अमळ चमत्कारिक दिसतें. वरील ट्रस्टींच्या पत्नींकडेच हें ट्रस्टचें काम सोंपविलें असतें तर आपल्या पतीच्या साह्यानें आणि सल्ल्यानें त्यांनीं तें उत्तम प्रकारें पार पाडलें असतें.

स्त्रियांकडून पुरुषांची बरोबरी कधींहि होणार नाहीं, असा जो साऱ्या जगभर समज आहे, तो काल्पनिक आहे, असें भासविण्याकरितांच कीं काय न कळे, एकानें स्त्रीरत्नांचीं कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. तो ह्मणतो—

"दुनियेंत स्त्रियांचे पुष्कळ प्रकार आढळतात. रंभा, मेनका यांच्यासारख्या गायनवादन पटु; सीता, मंदोदरी यांच्यासारख्या पतिव्रता; जनाबाई, मिराबाईसारख्या धर्मपरायण; कृष्णाकुमारी, ल्युकेशियासारख्या कुलाचें नांव राखण्यासाठीं विषहि प्राशन करणाऱ्या; अहल्याबाईसारख्या दीनदयाळ; गार्गी, मैत्रेयीसारख्या वेदांतविशारद; झांशीच्या राणी लक्ष्मीबाई, जोन ऑफ् आर्कसारख्या लढवय्या; झांटिफी, कैकयीसारख्या कैदासिणी; आनंदीबाई, मॅकबेथसारख्या राज्यलोभानें खूनहि करविणाऱ्या; रशिया, सेमिरामिससारख्या राज्यपदारूढ; पन्नेसारख्या स्वामिभक्तिपरायण; सुभद्रा, जीजाबाईसारख्या वीरमाता; चांदबिबीसारख्या मुत्सद्दी; क्रिमियाचे लढाईस परोपकाराच्या कृत्यांनीं माधुर्य आणणारी फ्लॉरेन्स नाइटिंगेल; पानिपतच्या लढाईतून पळून आल्याबद्दल मल्हारराव होळकर यांची निर्भत्सना करणारी गौतमाबाई; दुर्गाकृत दुष्काळांत दक्षिणेंतील लोकांचें पोटच्या मुलांप्रमाणें पोषण करणारी दुर्गाबाई; विद्याध्ययनासाठीं पाताळ खंडांतहि जाणारी आनंदीबाई जोशी; युक्तीनें मुसलमानांवर हल्ला करून नवऱ्यास सोडवून आणणारी राणी पद्मिनी; पृथ्वीराजाची निधनवार्ता ऐकतांच काष्ठ भक्षण करणारी सती संयुक्ता, अशा असंख्य लोकोत्तर स्त्रियांप्रमाणें विचित्र गुणावगुणांचे व स्वभावांचे पुरुष सांपडतील काय?"

परंतु या प्रश्नांत कांहीं ह्मणण्यासारखा जीव आहेसें दिसत नाहीं. वरील गुणांत पुरुष, स्त्रीवर्गाला आजपर्यंत कधीं हार गेले आहेत, किंवा पुढें जातील, ही कल्पनाहि नको. चांगल्या कृत्यांतच काय परंतु अति निंद्य कर्मांतहि स्त्रियांपेक्षां पुरुषच श्रेष्ठ मानाला पात्र आहेत.

सुशीला.

याप्रकारें सुशीलेला घरीं आईकडून आणि शाळेंत शिक्षकिणीकडून व्यवहार, धर्म, नीति इत्यादिकांचें ममतेनें उत्तम प्रकारचें शिक्षण मिळत असल्यामुळें ती दिवसेंदिवस अत्यंत व्यवहारदक्ष, सद्गुणी आणि धर्मपरायण होत चालली. आतां ती चौदा वर्षांची झाली होती. सुशीला चौदा वर्षांची होतांच देशकालवर्तमानाकडे नजर देऊन तिचा विवाह करण्याचा तिच्या आईबापांनीं निश्चय केला. मुलीला ती पांच सहा वर्षांची झाली ह्मणजे शाळेंत पाठवित असतात; तेथपासून तेरा चौदा वर्षांचें तिचें वय होईपर्यंत, ह्मणजे सरासरी सात आठ वर्षें, तिचें शाळेमध्यें शिकणें होत असतें, आणि आजकाल मध्यम स्थितींतील मुलींनां एवढें शिक्षण पुरेसेंहि असतें. मुलीची विद्येविषयींची अभिरुचि प्रबळ असल्यास माहेरीं आईबाप, बंधुभगिनींकडून आणि सासरीं पतीच्या साह्यानें तिला आपली विद्या वाढवितां येते आणि आपल्या प्रौढ मुलींनां असें घरचें शिक्षणच अत्यंत हितावह होय, असे सुशीलेच्या आईबापांचे विचार असल्यामुळें त्यांनीं तिला आतां शाळेंत न पाठवितां घरींच ठेवून घेऊन स्वतां दररोज तिला शिकवूं लागले आणि तिच्यासाठीं अनुरूप वराचाहि शोध करूं लागले.

जवळच दोन तीन कोशांवरील एका गांवीं वामनराव कुळकर्णी या नांवाचे एक कुलीन परंतु गरीब स्थितींतील गृहस्थ रहात असत. एक वेळ यांनीं मोठ्या ऐश्वर्यांत दिवस घालविले होते. परंतु या भवसागराच्या रहाटगाडग्यांत कांहीं दिवस सुखाचे तर कधीं कधीं कांहीं दिवस दारुण विपत्तीचेहि येत असतात, याचा प्रत्यक्ष अनुभव वामनरावांचें कुटुंब सांप्रत अनुभवित होतें. वामनरावांचा कोची येथें मोठा व्यापार असे. परंतु एकदा कोचीहून बाहेर ठिकाणीं माल भरून पाठविलेलीं

त्यांचीं दहा बारा जहाजें वाटेंत तुफानांत सांपडून बुडाल्यामुळें त्यांनां एकदम फारच मोठी ठोकर बसली व आजवर कमविलेलें सर्व कांहीं एका घटकेंत ते गमवून बसले. उरलेंसुरलेलें जें कांहीं थोडेंसें होतें, तेंहि सावकारांनीं हिरावून नेल्यामुळें ते अगदींच कंगाल होऊन आपल्या वडिलांच्या गांवीं येऊन कसेबसे दिवस घालवित राहिले होते. वामनरावांस सदाशिव या नांवाचा बात्रीस तेवीस वर्षांचा एक सुशील, सद्गुणी, नम्र आणि आज्ञाधारक मुलगा होता. वामनरावांची चलती असल्यावेळीं त्यांनीं आपल्या या सद्गुणी मुलास उत्तम प्रकारचें शिक्षण दिलें होतें. साऱ्या गांवांत सदाशिवासारखा सुशिक्षित, नम्र, निर्व्यसनी, परोपकारी धार्मिक असा एकहि होतकरू तरुण नव्हता. परंतु अंगीं केवढेहि गुण असोत तथापि ज्याच्याकडे आजकाल पैसा नाहीं, त्याला कोणीहि विचारित नाहींत. आणि ह्मणूनच सदाशिवाचें लग्नाचें वय होऊन गेलें असतांहि घरची गरीब स्थिति असल्याकारणानें त्याला आपली मुलगी देण्याला कोणीहि बाप धजला नाहीं व ह्मणूनच तो आजवर अविवाहित राहिला होता. सदाशिवाची पुढें कालेजांत जाऊन शिकण्याची मोठी इच्छा होती; परंतु दैवयोग तसा नसल्यामुळें आईबापांचें पाळणपोषण करण्याची जबाबदारी अल्प वयांतच त्याच्या डोक्यावर येऊन पडली होती व ह्मणून त्यानें आपल्या सर्व इच्छा बाजूस ठेऊन त्याच गांवांतील भाऊसाहेब देशपांडे या नांवाच्या एका वतनदाराच्या येथें लहानशा पगाराची नोकरी पत्करिली होती. सदाशिवाच्या आईचें आणि विष्णुपंतांचें लांबचें थोडेंसें नातें होतें, यामुळें या उभयकुटुंबांचा मुळापासून मोठा घरोबा असे. यामुळेंच प्रसंगानुसार एकमेकांच्या घरीं एकमेकांचें जाणेंयेणेंहि असे. सुशीला ही जात्या फारच सालस मुलगी असल्यामुळें ती सर्वांस प्रिय असे. सदाशिवाच्या आईचें तर तिजवर फारच प्रेम जडलें असल्यामुळें ती सुशीलेला कधीं कधीं आपल्या घरीं नेऊन महिना पंधरा दिवस ठेवून घेत असे. अशा प्रकारें वामनरावांच्या घरीं सुशीला मधून मधून जात येत असल्यामुळें

ती त्यांच्या घरांतीलच एका माणसासारखी होऊन गेली होती. पुष्कळ प्रसंगींच्या सहवासामुळें सदाशिव आणि सुशीला या दोघांस उभयतांचे स्वभाव, गुणधर्म, आवडीनावडी वगैरे संबंधाची खडान्‌खडा माहिती पूर्णपणें होऊन चुकली होती. एकमेकांच्या मनांत एकमेकांविषयीं परकाष्ठेचा आदर असे. एकमेकांचें एकमेकांवर सख्ख्या बहिणभावंडांपेक्षांहि अधिक प्रेम जडलें होतें. परंतु उभयतांचा कधीं विवाहसंबंध घडेल अशी उभयतांपैकीं कोणीएकानेंहि आजवर कधीं कल्पना सुद्धां केली नव्हती. असो.

सुशीला उपवर होतांच तिच्या विवाहाची काळजी उत्पन्न होऊन तिचे आईबाप ज्याप्रमाणें तिच्याविषयीं अनुरूप वराच्या शोधांत होते, तसेच तिची मागणी करणारेहि बरेच होते. सुशीला जरी गरीब घराण्यांतील मुलगी होती तरी गुणरूपानें ती फार श्रीमंत असल्याकारणानें मोठमोठ्या श्रीमंत आणि थोर घराण्यांतूनहि तिला मागण्या येऊं लागल्या. एके दिवशीं विष्णुपंत ओटीवर सहज विश्रांति घेत बसले होते, अशा वेळीं सखाराम भटजी नांवाचे एक शेजारच्या गांवचे पुरोहित त्यांच्याकडे येऊन त्यांनां ह्मणाले "विष्णुपंत, आमच्या गांवचे सरदार नानासाहेब मंत्री, आपल्यास ऐकून ठाऊकच असतील. त्यांच्या घराण्याचें आणि त्यांच्या धनदौलतीचें मीं वर्णन करायास नको आहे. लहानापासून थोरापर्यंत सर्वजण त्यांनां ओळखित आहेत. तुमच्या सुशीलेची कीर्ति नानासाहेबांच्या कानीं पडल्यामुळें त्यांनीं तुमच्या मुलीला आपली सून करण्याचें योजिलें आहे आणि त्यासाठींच मुद्दाम मला तुमच्याकडे पाठविलें आहे. आज तुमच्या घरीं कामधेनुच चालून आली आहे, असें ह्मटलें पाहिजे. मी खरोखर सांगतों, नानासाहेबांच्या या शब्दास मान देऊन त्यांचे घरीं जर तुह्मी आपली मुलगी द्याल, तर मग तिच्यासारखी नशिबाची कोणीहि नाहीं, असें तुह्मी खात्रीनें समजा. तुमच्या मुलीला अन्नवस्त्राची कधींहि ददात राहणार नाहीं.

सुग्रास पंचपक्वान्नें दररोज खावयास मिळतील. कपड्यालत्त्यांस तर विचारूं नका. दागदागिन्यांची गोष्ट कशाला सांगितली पाहिजे? तुमच्या मुलीला सोन्यामोत्यांनीं नुसती मढवून काढतील! घरांत नोकर चाकरांचीहि वाण नाहीं. तात्पर्य कोणत्याच गोष्टीची कमतरता नाहीं. सर्व कांहीं अनुकूळ आहे. देवानेंच असें सोन्यासारखें स्थळ पाठविलें आहे असें समजा व दुसरा तिसरा कांहींएक विचार न करतां डोळे मिटून निमूटपणें होय ह्मणा. बोला, कोणता मुहूर्त ठरवितां?"

विष्णुपंत नम्रवाणीनें ह्मणाले "भटजी, नानासाहेबांसारख्या श्रीमंत सरदारांनीं माझ्यासारख्या गरिबावर एवढा अनुग्रह करण्याचें योजिलें आहे, हें त्यांचें मोठेपण ह्मणावयाचें. त्यांचे घराण्याविषयीं मीं पुष्कळांचे तोंडून ऐकिलें आहे व आपण सांगितल्याप्रमाणें ते मोठे श्रीमंत आणि घरंदाज आहेत हें मलाहि ठाऊक आहे. नानासाहेबांच्या चिरंजीवां-विषयीं मात्र मला बरोबरशी माहिती नाहीं. त्यांच्या चिरंजीवांचें नांव काय, उमर केवढी आहे, शिक्षण कुठपर्यंत झालें आहे, वर्तन कसें काय आहे याविषयीं थोडीशी हकीकत सांगितल्यास मोठी मेहरबानी होईल."

पुरोहित ह्मणाले "विष्णुपंत, आमच्या अण्णासाहेबांविषयीं तुह्मी मनांत कसलीच शंका बाळगूं नका. अंगकांती कशी राजबिंड्याप्रमाणें सतेज आहे. त्यांच्यासारखा सुंदर मुलगा तुह्मांला एकहि आढळावयाचा नाहीं. गर्भश्रीमंतांचीं मुलें सुस्वरूप असणार नाहींत तर काय तीं आमच्या-सारख्या भटाभिक्षुकांचीं असणार? आमच्या अण्णासाहेबांनां सांप्रत १५ वें वर्ष चाललें आहे. आईबापांचे ते एकुलते एक अतिशयच लाडके असल्यामुळें व त्याचप्रमाणें घरीं देवदयेनें कधींहि न संपणारी अपरंपार धनदौलत असल्यामुळें त्यांच्या नाजुक प्रकृतीला त्रास होऊं नये ह्मणून त्यांच्या मातोश्री विद्याभ्यासाचे फारसे श्रम त्यांनां पडूं देत नाहींत. तरी ते अगदींच मूर्ख आहेत, असें समजूं नका हो. त्यांनां शिकविण्यासाठीं नानासाहे-

बांच्या कुटुंबांनीं मुद्दाम एक मास्तरहि ठेविलेला आहे. तो कधीं कधीं त्यांनां थोडथोडें शिकवितहि असतो. हल्लीं आमच्या अण्णासाहेबांनां लिहितां वाचतां येत आहे. त्यांच्यासारख्या श्रीमंतांनां अधिक विद्या शिकून तरी हो काय करावयाचें आहे? त्यांनां दुसऱ्याची नोकरी थोडीच करावयाची आहे? ईश्वरानें त्यांची अशी उत्तम सोय करून ठेविली आहे कीं, आज त्यांच्याच पदरीं कितीतरी नोकरचाकर राबत आहेत. अण्णासाहेब सर्वांचे फार लाडके असल्यामुळें त्यांचा सांप्रत किंचित् एककली आणि जरामा तापट स्वभाव आहे खरा; परंतु पोरवय आहे, त्यांचें त्यांनांच समजूं लागलें, ह्मणजे सर्व कांहीं बेतावर येईल. वर्तनाविषयीं आजच कसें सांगतां येईल. घरीं मनाजोगती सुंदर स्त्री असली ह्मणजे बाहेरचा नादहि यदाकदाचित् असला तर तोहि आपोआप सुटेल. अहो, थोरा मोठ्यांच्या मुलांत मी ह्मणतों एखादा दोषहि असला तर तिकडे अमळ कानाडोळाहि केला पाहिजे. पहाणारानें दूरवर नजर पोंचविली पाहिजे. आजकाल मुलीला सुस्थळ मिळणें किती प्रयासाचें झालें आहे, हें तुमच्या सारख्या मुलीच्या बापास मीं भटानें सांगावयास नको आहे. असें दुर्मिळ स्थळ प्रयत्न केल्यानेंहि मिळण्यासारखें नाहीं. त्यांचे घरीं मोठमोठे श्रीमान्, घरंदाज असे कितीतरी मुलींचे बाप सारख्या येरझारा करित राहिले आहेत. मोठमोठे हुंडेहि देण्यास एका पायावर तयार आहेत. देवाच्या दयेनें आज मुलींनां हो त्यांनां काय कमी आहे? लोटांगणें घालून चालून येतील. तुह्मी होय ह्मणा मग तुमचेंहि जन्मदारिद्य फिटलें ह्मणून समजा. नानासाहेबांच्या पश्चात् जांवईबोवा अगदीं तुमचेच आहेत ह्मणून समजा. कारण जरा आपली आहे अंमळ सांबाच्या पुढलीच स्वारी ह्मणाना! जहागिरीची सारी व्यवस्था तुमच्याच हातीं येईल. मग मात्र मला विसरूं नका हो! मग माझी कसली आठवण व्हायला?"

अण्णासाहेब मंत्र्यांच्या मूर्खपणाची आणि दुश्चरित्राची बरीच ख्याति विष्णुपंतांनीं पूर्वीच ऐकिली होती व या भोळ्या ब्राह्मणाकडूनहि ती

युक्तीनें काढून घेऊन आपल्या मनाची पक्की खात्री करून घेऊन ते ह्मणाले "भटजी, ठीक आहे. मी या गोष्टीविषयीं आमच्या स्नेह्यांचा, आप्तइष्टांचा सल्ला घेऊन आपल्याला मागाहून कायतें कळवितों." वगैरे कांहींतरी सांगून त्यांनीं पुरोहितांस निरोप दिला.

पुरुषापेक्षां स्त्रियांस आणि त्यांतहि आईला आपल्या मुलीचें लग्न लवकर व्हावें, ती थोरा मोठ्याच्या घरीं पडावी, तिच्या अंगावर पुष्कळसे डागडागिने पडावे, तिचे सुखसोहळे पहाण्यास मिळावे, अशी इच्छा असते व ती साहजिकहि आहे; आणि म्हणूनच सुशीलेविषयीं मागणी करण्यासाठीं बाहेर कोणी आलें आहे हें समजतांच सुशीलेची आई सर्व काम बाजूस ठेवून तेथें आली व दाराच्या आड उभी राहून तिनें वरील सर्व भाषण चित्त लावून ऐकिलें. भटजी उठून जातांच ती पतीला ह्मणाली "चांगलं सोन्यासारखं स्थळ आपण होऊन चालून आलं असतां विचार करून कळवितों, असं कां बरं सांगणं झालं? तिकडे दिल्यास मुलीला कमलीच ददात रहाणार नाहीं. चार डागिनेहि अंगावर पडलेले डोळे भरून पहायला मिळतील. घरीं चाकर नोकरहि पुष्कळ आहेत. मुलीला अशा ठिकाणीं पडलेली पहाण्यापेक्षां आईबापांनां दुसरें सुख कोणतं आहे? मला वाटतं रुकार द्यावा व याच वर्षीं उरकून टाकावं."

पत्नीच्या या भाषणावर विष्णुपंत ह्मणाले "मुलीला अन्नवस्त्राची व डागडागिन्यांची रेलचेल होईल हें खरें; परंतु आईबापांनीं केवळ अन्नवस्त्र आणि डागडागिने पाहूनच मुलीचें लग्न करणें उचित नव्हे. सर्वांत मुख्य गोष्ट जी पाहिली पाहिजे, ती तिच्या नवऱ्या संबंधींची होय. इतर सर्व गोष्टींची पूर्ण अनुकूलता असली, परंतु नवरा जर असावा तसा नसला, तर बिचाऱ्या त्या मुलीच्या दुःखास पारावार नाहीं. या अण्णासाहेबांचीच स्थिति पहा. अगोदर त्यांचें वय १५ वर्षांचें आहे. वैद्यशास्त्रांत स्पष्ट सांगितलें आहे कीं, वधूवरांच्या वयांत कमींत कमी आठ दहा वर्षांचें तरी अंतर असलेंच पाहिजे. त्याहून कमी किंवा

फारच जास्त अंतर असल्यास तें ज्याप्रमाणें खुद्द त्यांच्या स्वताच्या त्याचप्रमाणें त्यांच्या संततीच्याहि प्रकृतिमानास अपायकारक होतें. शिवाय या विजोड जोडप्यानें परस्परांत असावा तसा प्रेमभावहि उत्पन्न होत नाहीं. यास्तव फक्त वयाच्या मानानें पाहतांहि हें स्थळ अगदींच अयोग्य आहे. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, अण्णासाहेबांनां विद्येचा संस्कार फारच थोडा झालेला आहे. ते अगदीं मूर्ख, मंदबुद्धि आणि व्यवहारशून्य असे आहेत. अशा मनुष्याच्या हातीं कुबेराची संपत्ति जरी आली, तरी ती त्याला सोडून कधीं जाईल, याचा मुळींच नियम नाहीं. कन्येला जो वर पहावयाचा, तो तिच्याहून विद्वान्, बुद्धिवान् असाच असला पाहिजे. त्याचप्रमाणें तो कुलीन, सुशील, सद्वर्तनी, धर्मपरायण आणि निर्व्यसनी असला पाहिजे. आपल्या सुशीलेची कुशाग्रबुद्धि, विद्याभ्यास, धर्मनीतिपरायणता इत्यादि गुणांच्या मानानें अण्णासाहेब तिचे पति होण्यास अगदींच अपात्र आहेत. त्यांच्याशीं सुशीलेचा विवाहसंबंध झाल्यास तिला कधींहि सुख व्हावयाचें नाहीं. तिसरी गोष्ट अशी कीं, अण्णासाहेब हे श्रीमंतांचे चिरंजीव असल्यामुळें आणि त्यांच्या अशिक्षित मूर्ख आईनें त्यांचे भलतेच लाड केले असल्यामुळें ते अगदीं बहकून गेलेले आहेत हें पुरोहितांच्या बोलण्यावरून तूंहि ताडलेंच असशील. लोक आपल्यास काय ह्मणतील याची श्रीमंतांनां मुळींच पर्वा नसते व त्यामुळें ते मनसोक्त हवेतसे वागत असतात. या अल्प वयांतच जर ते अति निंद्य व्यसनांत पडले आहेत तर पुढें काय अनर्थ करतील, हें कोणीं सांगावें? पतीच्या दुराचरणामुळें अतिशय दुःखी होऊन अविचाराच्या आणि संतापाच्या भरांत नदी, विहिरींत उडी घेऊन किंवा विष प्राशन करून आत्महत्या केलेल्या व त्याच प्रमाणें मोठमोठ्या कुलीन घराण्यांतील महान् सद्गुणी म्हणविणाऱ्या स्त्रियाहि आपल्या परम पवित्र पातिव्रत्यधर्मावर पाणी सोडून भ्रष्ट झालेल्या व कित्येक तर परपुरुषाबरोबर निघून जाऊन उभय कुलांस कलंक लावून इहपरलोकीं नरकांत पडलेल्या स्त्रियांचीं बरींच उदाहरणें तुलाहि माहित असतीलच. यास्तव

पती नेहमीं निर्व्यसनी, पापाचें भय बाळगणारा आणि धर्मनीतिपरायण असाच असला पाहिजे. या गोष्टीचा विचार केला तर हें स्थळ अगदींच त्याज्य आहे. आणखीहि एक महत्वाची गोष्ट अशी आहे कीं, वर आणि कन्या यांच्या घराण्यांची स्थितीहि समसमान असली पाहिजे. वराचें घराणें अतिशय श्रीमान् असून कन्येचें घराणें अतिशयच गरीब आहे, अशा स्थितींत जर परस्परांचा शरीरसंबंध घडला, तर त्या बिचाऱ्या कन्येच्या हालांस विचारूंच नको! या अण्णासाहेबांचीच गोष्ट पहा. त्यांच्या वडिलांपाशीं आज जेवढी संपत्ति आहे, त्याच्या लक्षांशानेंहि मजपाशीं नाहीं. आणि अशा धनिकाशीं जर म्यां दरिद्यानें सोयरिक करण्याचें धाडस केलें, तर मग माझे हाल कुत्र्याच्यानेंहि खाववणार नाहींत ते नाहींतच, परंतु मुलीलाहि पदोपदीं ज्या मानखंडणा आणि दुःखें सोसावीं लागतील, त्यांचें वर्णनहि करवणार नाहीं. मी माझ्या गरिबीच्या सामर्थ्याप्रमाणें वराला जे कांहीं वस्त्रालंकार वगैरे देईन ते त्यांनां कस्पटा-सारखे भासतील. बरें त्यांच्या इतमामाप्रमाणें करण्याचें योजिल्यास मला भयंकर कर्जाच्या ओझ्याखालीं बुडून जावें लागेल. त्याचप्रमाणें आह्मी गरीब आहों हें नेहमीं लक्ष्यांत वागवून नवऱ्याची आई आणि बहीण मुलीचा पदोपदीं अपमान करतील. मुलीला जर कधींकाळीं भेटावयास जावयाची इच्छा झाली, किंवा दोन दिवस तिला माहेरीं आणावी असें वाटलें, तर तेंहि आह्मांला अशक्य होऊन जाईल. आह्मी दरिद्री असल्यामुळें ते आमची पर्वा करणार नाहींत व मुलीला आमच्या घरीं कधींहि पाठविणार नाहींत. अशा हजारों अडचणी उत्पन्न होतील. यास्तव प्रत्येकानें समानशील आणि समान स्थितीच्याच मनुष्यांशीं संबंध करणें हेंच परि-णामीं हितावह असतें. या सर्व गोष्टींचा विचार करशील तर तुलाहि सुशीलेला हें स्थळ अगदींच अपात्र आहे, असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं."

विष्णुपंतांच्या या उपदेशपर भाषणानें सुशीलेच्या आईच्या हृदयांत लख्ख प्रकाश पडून दूरवर विचार न करतां डागिन्यांच्या मोहास भुलून तिच्या हातून जो अविचार होत होता तो तिला आतां ढळढळित दिसूं लागला. ती किंचित् ओशाळी होऊन आपली चुकी कबूल करून नम्रवाणीनें पतीला ह्मणाली "खरंच, प्राण गेला तरी अशा ठिकाणीं मी माझ्या सुशीलेला कधींहि देणार नाहीं. बरं मग सुशीलेला आपल्या यशोदा वन्संच्या सदाशिवाला दिल्यास चांगलं नाहीं का होणार? मला तर तें स्थळ वावगं दिसत नाहीं. सदाशीव हा आमच्या सुशीलेला सर्व गुणांनीं योग्य आणि अनुरूप असा पति आहे. शिवाय उभयतांची एकमेकांनां पूर्ण माहितीहि आहे. एवढेंच नव्हे, तर माझ्या सुशीलेचें सदाशिवावर प्रेमहि जडलेलें आहे. त्या दिवशीं सदाशीव आपल्या घरीं जेवायला आला होता. सुशीला त्याला मोठ्या प्रेमानें वाढित होती. तेव्हां मीं सहज विनोदानें तिला ह्मटलें 'सुशीले, तुला सदाशीव नवरा आवडेल का?' त्यावर ती कांहींएक न बोलतां लाजून खालीं पाहूं लागली व तिनें आनंदी मुद्रा केली. तिच्याहि मनांत जर तो नवरा भरला असेल तर सदाशिवालाच तिला द्यावी हें चांगलें. उभयतांचा जोडा कसा लक्ष्मीनारायणासारखा सुरेख शोभेल."

पत्नीच्या तोंडून ही हकीकत ऐकतांच विष्णुपंतांनांहि फार समाधान झालें. ते ह्मणाले "सदाशिवाशीं सुशीलेचें लग्न केल्यास त्या उभयतांसहि सुख होईल, असें मलाहि वाटतें. बऱ्याच दिवसांपासून हीच गोष्ट माझ्याहि मनांत घोळत होती. आणि सदाशिवावर सुशीलेचें प्रेमहि जडल्याचें ऐकून तर मला फारच आनंद वाटतो. लग्नापूर्वी वधूवरांनां परस्परांची पूर्ण माहिती असून त्या उभयतांनां जर उभयतां आवडूं लागलीं तर यापरता आईबापांस दुसरा आनंद कोणता आहे? पतिपत्नींस आपला सारा जन्म उभयतांच्या सहवासांत घालवावयाचा असतो. तेव्हां त्या परस्परांस लग्नापू-

वींच परस्परांच्या गुणधर्मांची पूर्ण माहिती असणें अत्यंत आवश्यक आहे. व परस्परांनीं परस्परांची निवड करणें हेंच परिणामीं हितावह आहे. आतां तरुणपणच्या अल्लडपणामुळें एखादे वेळीं त्यांच्या हातून चुकीहि होण्याचा संभव आहे हें खरें आणि ह्मणूनच त्यांच्या वडील माणसांनीं त्यांची निवड योग्य आहे कीं अयोग्य आहे हें पाहून त्याला आपली संमति देणें न देणें हें त्यांचें कर्तव्य आहे. ज्यापक्षीं सुशीलेचें सदाशिवावर पूर्ण प्रेम जडलें आहे व तो वरहि सर्व प्रकारें तिला अनुरूप असाच आहे, त्यापक्षीं त्याच्याशींच सुशीलेचा विवाह करावा, हें चांगलें. मी उद्यांच या गोष्टीचें काय तें नक्की करून येतों. तूं अगदीं स्वस्थ रहा."

पतीच्या या आश्वासनाच्या भाषणानें सुशीलेची आई संतुष्ट होऊन आपल्या कामास लागली व विष्णुपंतहि या बाबतींत आपल्या एका स्नेह्याची सल्ला घेण्याकरितां बाहेर निघून गेले.

विष्णुपंतांच्या स्नेह्यांनींहि नवगबायकोच्या या विचारास आपली पूर्ण समंति दिल्यामुळें 'शुभस्य शीघ्रं' असा विचार करून दुसरेच दिवशीं मोठ्या पहांटेस उठून विष्णुपंत वामनरावांच्या घरीं गेले व त्यांनां आपला विचार सांगितला. सुशीलेवर वामनरावांच्या घरांतील सर्व मंडळीचें पराकाष्ठेचें प्रेम होतेंच. ती आपली सून होण्याचा हा असा अकल्पित सुयोग आल्याचें पाहून त्यांनां जो कांहीं आनंद झाला आणि जें कांहीं समाधान वाटलें, त्याची कल्पनाच केली पाहिजे. सर्वांत सदाशिवाच्या आनंदास तर पारावार राहिला नाहीं. उपाध्यायास बोलावून आणून त्याच बैठकीस मुहूर्त निश्चितहि झाला व हीं दोन्हीहि कुटुंबें लग्नाच्या तयारीस लागलीं.

लवकरच ही बातमी गांवभर पसरली. अण्णासाहेबांसारख्या श्रीमंतांस मुलगी न देतां सदाशिवासारख्या दरिद्री मनुष्यास ती दिल्याबद्दल गांवांतील कित्येक मंडळीस फार वाईट वाटलें व बरेच जण उघड उघड विष्णु-

पंतांस आणि त्यांच्या कुटुंबास दोषहि देऊं लागले. परंतु त्या खंबीर मनाच्या दांपत्यानें कोणाचीहि पर्वा न करितां आपला निश्चय कायम केला व वैशाख शुद्ध १३ च्या सुमुहूर्तावर उभय कुटुंबांनीं कांहींएक कर्जवाम न करितां व रिकामा डामडौल न दाखवितां आपापल्या सामर्थ्याप्रमाणें गरिबीच्याच थाटानें मोठ्या आनंदानें सुशीलेचें सदाशिवाबरोबर लग्न केलें.

दुरितेच्छानिरसन.

"पूर्ण तमोमय रजनी–काळीं करितां गृहांत झांकोनी—
माझीं अवलोकाया कृत्यें, भूवर असेल का कोणी?" १

"आहे, सर्वाठायीं ईश्वर मूर्त प्रकाशमय सार
अनुपम शक्ति जया जो शक्त कराया प्रकाश अंधार." २

"असतां मदितर सगळी जनता शयनीं सुषुप्त मी कां न—
दुरिताचरण करावें? विशंकया झांकुनी तमीं कान?" ३

"छे, छे, तृण पर्ण डुले, किंवा हाले वनांत मुक शील
तेंही कळे जिला त्या कैसा तूं दृष्टिंतून हुकशील?" ४

"वदलों असत्य कोणाजवळीं, किंवा मनांत पुटपुटलों,
ऐकेल तो कसा? मी कां मग त्याच्या न दृष्टिंतुनि सुटलों?" ५

"नाहीं, ज्यानें केलें मन, तें शोधावयास शक्य न का—
त्या? स्वर्णकार त्याला जाणाया कठिण कायसें कनका? ६

देऊं नकोचि थारा तव हृदयीं विभ्रमांस बाळा या
तो पूर्ण सर्वसाक्षी, कोण तयाला समर्थ टाळाया! ७

रानीं, वनीं, स्मशानीं, किंवा गिरिकंदरीं दिशा दाहीं,
त्रैलोकीं, सप्ततलीं, एकांतीं त्याविणें नसे कांहीं! ८

जेथें जेथें जाशिल तें तें स्थल तो भरोनियां राहे
त्या भीतां दुरिताला स्थान नुरे हृत्स्थलींहि तो आहे. ९

करितो मानव जें जें, तें तें, त्या त्या स्थलीं, तया कळतें,
दुरिताचरणें सदया–हृदयाचें चित्त फार हळहळतें!" १०

श्रीमन्महाराणी ॲलेक्झॅन्ड्रा.

श्रीमन्महाराणी ॲलेक्झॅन्ड्रा, आमचे हल्लींचे बादशहा सातवे एडवर्ड यांच्या पट्टराणी, यांचा जन्म इ. सन १८४४ च्या दिसेंबर महिन्याच्या १ ल्या तारखेस कोपेनहेगन येथें गुले पॅलेस नामक राजवाड्यांत झाला. डेन्मार्कचे हल्लींचे राजे ९ वे ख्रिश्चन, हे यांचे वडील होत. महाराणींचें संपूर्ण नांव ॲलेक्झॅन्ड्रा कॅरोलीन मेरी शार्लट लुईस जुली, असें आहे.

महाराणी ॲलेक्झॅन्ड्रा यांचें बरेंचसें शिक्षण त्यांचे वडील आणि मातोश्री यांच्याकडूनच त्यांनां मिळालेलें आहे. राजकन्या ॲलेक्झॅन्ड्रा यांच्या जन्माचे वेळीं त्यांच्या वडिलांचा डेन्मार्कचे गादीवर येण्याचा विशेषसा संभव नसल्यामुळें त्या वेळीं त्यांची रहाणी विशेष थाटामाटाची नव्हती. या राजदम्पत्यानें आपले तासच्या तास आपल्या मुलांच्या शिक्षणांत घालविल्याबद्दल जागोजाग लिहिलेलें आढळतें. प्रिन्स ख्रिश्चन यांचा स्वभाव फार मनमिळाऊ आणि दयाळु असून त्यांचें आपल्या मुलांवर पराकाष्ठेचें प्रेम असे. त्यांच्या शिक्षणाची ते स्वतः काळजी घेत. राजकन्या ॲलेक्झॅन्ड्रा एकदां असें ह्मणाल्याचें सांगतात कीं "मला शिकावेंच लागे; कारण शिक्षण हें अत्यावश्यक आहे, असें लहानपणापासूनच आमच्या मनावर पक्कें ठसविलें होतें." यांच्या मातोश्रीहि फार सुशिक्षित, हुशार आणि गुणवान् असून पराकाष्ठेच्या रूपसंपन्न होत्या. त्यांनां गाण्याचा फार नाद असे. अनेक प्रकारचीं वाद्यें वाजविण्यांतहि त्या फार प्रवीण होत्या. प्रिन्स ख्रिश्चन यांच्याशीं झालेला त्यांचा विवाह ह्मणजे केवळ प्रेमविवाह होता. आणि त्यांच्या अंतःकाळापर्यंत तें प्रेम उत्तरोत्तर वृद्धिंगतच होत होतें. त्यांचें सौंदर्य आणि त्याचप्रमाणें त्यांच्या अंगचे अनेक सद्गुण, त्यांच्या ज्येष्ठ कन्येच्या, ह्मणजे आपल्या सांप्रतच्या महाराणीसाहेबांच्या अंगीं ओतप्रोत उतरले आहेत.

डेन्मार्कच्या राजघराण्यांतील कांहीं मंडळी एकदां बर्न स्टॉर्फच्या सभोंवतालच्या रमणीय वनप्रदेशांत वनभोजनास गेली असतां तेथें राजकन्या ॲलेक्झॅन्ड्रा ही आपल्या दोन लहान बहिणींसह मौजेनें गोष्टी सांगत बसली होती. बोलतां बोलतां त्या बहिणी आपल्या भावी स्थिती-बद्दल बोलूं लागल्या. राजकन्या डाग्मार ह्मणाली "माझ्याविषयीं ह्मणाल तर जगांत अत्युत्तम ह्मणून जें जें कांहीं असेल, तें तें सर्व मला मिळावें, अशी माझी इच्छा आहे. त्याचप्रमाणें श्रेष्ठ आणि बलिष्ठ व्हावें, अशीहि मला महत्वाकांक्षा आहे; कारण असें झाल्याविना मला माझ्या स्वतां-करितां किंवा इतरांकरितां फारसें कांहीं करतां येणार नाहीं." हीच राजकन्या पुढें रशियाची बादशाहीण झाली.

सर्वांत धाकटी बहीण थीरा, जी या वेळीं केवळ चार वर्षांची होती व जी पुढें डचेस ऑफ कंबरलंड झाली, ती साध्या आणि गोड शब्दांनीं ह्मणाली "मला आपली चांगलें व्हावें एवढीच इच्छा आहे. आणि मी तशी झालें ह्मणजे मला फार सुख होईल."

त्या दोघींपेक्षां वडील आणि रूपसंपन्न असलेली बहीण राजकन्या ॲलेक्झॅन्ड्रा ह्मणाली "मी कोणत्याहि स्थितीत पडलें तरी त्याचें मला कांहीं वाटणार नाहीः परंतु प्रेम मात्र मला सदोदित लाभलें पाहिजे."

महाराणी साहेबांच्या बालपणांतील ही गोष्ट आहे; परंतु त्या वेळीं त्यांनीं प्रदर्शित केलेली इच्छा विलक्षण रीतीनें परिपूर्ण झाल्याचें दिसून येईल. आपल्या आप्तवर्गाच्या प्रेमास तर त्या प्राप्त झाल्या आहेतच; परंतु एकंदर राष्ट्रांतहि त्यांच्याविषयीं परकाष्ठेचें प्रेम आणि आदरबुद्धि वास करित आहे.

आमचे हल्लींचे एडवर्ड बादशहा, ह्मणजे त्या वेळचे प्रिन्स ऑफ वेल्स, यांचा आणि डेन्मार्कच्या या रूपगुणसंपन्न भाग्यशाली राजकन्येचा प्रेमसंबंध कसा जुळून आला, याविषयीं अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. असें सांगतात कीं, त्या वेळच्या आमच्या तरुण युवराजांची स्वारी एकदां डचेस ऑफ केम्ब्रीज यांच्या-कडे गेली असतां तेथें त्यांच्या भावी पत्नीची तसबीर त्यांच्या नजरेस पडली.

तसबिरींतील त्या राजकन्येचें अप्रतिम लावण्य पाहून स्वारी थक्क होऊन गेली. ती तसबीर कोणाची हें समजून घेण्याची त्यांनां प्रबळ उत्कंठा झाली; परंतु डचेस ऑफ केम्ब्रीज यांनां उघडपणें ती गोष्ट विचारणें प्रशस्त नव्हतें; निरुपायास्तव त्या वेळीं ती उत्कंठा दाबून धरून ते तेथून निघून गेले. आणि नंतर एका स्नेह्यामार्फत त्यांनीं त्या तसबिरीसंबंधी चौकशी करविली. तेव्हां त्यांनां समजून आलें कीं, ती तसबीर डचेस ऑफ केम्ब्रीज यांच्या एका नातीची असून ती भाग्यशाली नात ह्मणजे डेन्मार्कची राजकन्या अॅलेक्झॅन्ड्रा, ही होय.

ही वरील गोष्ट खरी असो किंवा खोटी असो; परंतु, आमचे एडवर्ड बादशहा आणि आमच्या महाराणी साहेब यांची प्रथम भेट वोर्म्स येथें असलेल्या फार पुरातन प्रार्थनामंदिरांत झाली. राजकन्या अॅलेक्झॅन्ड्रा यांचें वय त्या वेळीं केवळ सतरा वर्षांचें होतें. पुढें बेलजिअमचे राजे लिओपोल्ड यांच्या लेकन येथील राजवाड्यांत बरेच दिवस उभयतांनां एकमेकांच्या सहवासांत घालविण्याचा सुयोग जमून आल्यामुळें या तरुण राजदम्पत्याचें विशेष प्रेमसंवर्धन झालें. आणि आमच्या प. लो. महाराणी व्हिक्टोरिया यांनीं आपल्या परम प्रिय पतीच्या चिरवियोगानंतर थोड्याच दिवसांनीं याच ठिकाणीं आपली भावी सून प्रथम पाहिली.

महाराणी व्हिक्टोरिया आणि त्यांच्या मुली, विशेषतः राजकन्या ॲलीस, यांचें राजकन्या अलेक्झॅन्ड्रा यांजवर लवकरच पराकाष्ठेचें प्रेम जडलें. सौंदर्य, मग तें कोठेंहि असो, महाराणी व्हिक्टोरिया यांचें मन तिकडे तात्काळ वेधत असे; मग आपल्या भावी सुनेचें तें अपूर्व सौंदर्य पाहून तिजवर त्यांचें तात्काळ प्रेम जडलें, यांत नवल तें कसलें? एकदा अशाच बायका बायका जमल्या असतां महाराणी व्हिक्टोरिया यांच्या एका कुत्र्याच्या शहाणपणाची गोष्ट निघाली. तो कुत्राहि तेथेंच होता. तेव्हां त्याची परीक्षा पहाण्यासाठीं त्याच्या तोंडांत एक पुष्पगुच्छ देऊन तेथें असलेल्या स्त्रियांत जी स्त्री अधिक सुंदर असेल तिला तो द्यावा,

असें त्याला सांगण्यांत आलें. त्याबरोबर तो कुत्रा तडक महाराणी व्हिक्टोरिया यांच्या पाशीं येऊन उभा राहिला; परंतु महाराणी साहेबांनीं त्याला दूर केला आणि आपल्या सुनेकडे जाण्याविषयीं त्याला सांगितलें. असो.

इंग्लंडच्या राजघराण्यांतील सांप्रदायाला अनुसरून युवराजांचा विवाह लंडन येथेंच होण्याचें निश्चित झालें; आणि त्याप्रमाणें राजकन्या ॲलेक्झॅन्ड्रा ही आपल्या वाडवडील मंडळीसह मोठ्या लवाजम्यानिशीं इंग्लंडांत येऊन पोहोंचली. या राजकन्येच्या आगमनानें इंग्लंडांतील लोकांनां फार आनंद झाला. त्यांनीं आपल्या भावी राज्ञीचा मोठ्या थाटानें आदरसत्कार केला. लंडन येथें राजकन्येच्या आगमनार्थ झालेल्या आनंदोत्सवाचीं अनेकांनीं अनेक वर्णनें लिहिलीं आहेत; त्यांतहि हल्लीं वयोवृद्ध झालेले सुप्रसिद्ध इतिहासकार जुस्टिन मॅककार्थी यांनी लिहिलेलें वर्णन फारच मनोरम आहे. ते लिहितात "सन १८६३ च्या मार्च महिन्यांतील एके दिवशीं, ट्रॅफलगार स्क्वेअरमधील एका धक्क्यावर मी उभा असतां तेजःपुंज आणि सौंदर्यभरित असें एका तरुणीचें मुखकमल माझ्या दृष्टीस पडलें. ती अपूर्व लावण्यसंपन्न तरुणी, ज्यावर स्मित हास्य विलसत आहे असें आपलें मुखकमल क्षणोक्षणीं नम्र करून सभोंवतीं जमलेल्या अफाट जनसमुदायाचे आदरपूर्वक मुजरे घेत चालली होती. डेन्मार्कची राजकन्या ॲलेक्झॅन्ड्रा हिचें तें अपूर्व लावण्य, विनय आणि शालीनता पाहून मी तर चकित झालों."

राजकन्येच्या या नम्रतेचा आणि विनयशीलतेचा परिणाम किंचित् चमत्कारिक झाला. अगदीं शेवटपर्यंत ती मस्तक खालीं वांकवून सर्वांचे मुजरे घेत होती; परंतु तिच्या नाजुक प्रकृतीला इतके श्रम सहन झाले नाहींत. उइंडसर कॅसलमध्यें येऊन पोहोंचतांच ती एकाएकीं घेरी येऊन पडली. हें पाहून आमच्या प. लो. दयाळु महाराणी व्हिक्टोरिया यांनीं सक्तीचा हुकूम सोडला कीं, विवाहविधि होण्यापूर्वी राजकन्येला दोन दिवस पूर्ण विश्रांति मिळाली पाहिजे.

सन १८६३ च्या मार्च महिन्याच्या १० व्या तारखेस प्रिन्सेस ॲलेक्झॅन्ड्रा यांचा त्या वेळचे प्रिन्स ऑफ वेल्स यांच्याशीं मोठ्या थाटानें विवाह होऊन त्या प्रिन्सेस ऑफ वेल्स झाल्या. हा समारंभ सेंट जॉर्ज चॅपेल नामक देवळांत झाला. डेन्मार्कच्या या भाग्यशाली राजकन्येचा टेनिसनसारख्या विख्यात कवींनीं आपल्या हृदयंगम कवित्वशक्तीनें सन्मान करून हा महत्वाचा दिवस संस्मरणीय करून ठेविला आहे.

लग्न झाल्यानंतर थोड्याच महिन्यांनी वेस्ट मिनस्टरच्या डीन साहेबांनीं आमच्या महाराणी साहेबांचें मनोवेधक वर्णन केलें आहे. 'राजप्रासादांतील देवता' हें नांवदेखील याच डीन साहेबांनीं त्यांनां दिलें असावेंसें वाटतें. ते ह्मणतात "मी त्यांनां नेहमीं पहातों; आणि मी खात्रीनें सांगतों कीं, यक्षिणींच्या कल्पित गोष्टींतदेखील इतकी अनुपम सौंदर्यसंपन्न राजकन्या आली नसेल!"

स. १८६४ च्या जानेवारी महिन्याच्या ८ व्या तारखेस महाराणीसाहेबांनां प्रथमापत्यलाभ झाला. प्रिन्स ऑलबर्ट व्हिक्टर यांचा जन्म सातव्या महिन्यांतच फ्रॉगमोर हाऊस येथें झाला. या राजपुत्राची एकंदर कारकीर्द बरीच घाईची झाली, असें मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें. योग्य वेळेपूर्वींच यांचें या जगांत आगमन झालें. ह्मणून त्यांच्याबद्दल सर्व मंडळी चिंतेंत होती. परंतु त्यांच्या आईनें ह्मणजे आमच्या महाराणी साहेबांनीं त्यांच्याबद्दल इतकी कांहीं काळजी घेतली कीं, त्यांची प्रकृति लवकरच सुदृढ झाली. त्यांच्याबद्दल चिंता करण्याचें मुळींच प्रयोजन राहिलें नाहीं. हे तरुण राजपुत्र थोड्याच वर्षांपूर्वीं हिंदुस्थानांत आले होते. त्या वेळीं त्यांच्या आगमनाप्रीत्यर्थ एकंदर प्रजाजनांनीं आनंदोत्सव करून महाराणी व्हिक्टोरिया यांच्या विषयींची आपली प्रेमबुद्धि व्यक्त केली. हिंदुस्थानांतील प्रवास पुरा करून हे तरुण राजपुत्र इंग्लंडांत परत गेल्यावर लवकरच त्यांचें लग्न होण्याचें ठरलें. जिकडे तिकडे जारीनें तयारी सुरू झाली. परंतु दैवयोग कांहीं निराळा होता. या जगांत येण्याची जशी

या राजपुत्रानें घाई केली होती, तशाच घाईनें अगदींच अल्पवयांत त्यानें या नश्वर जगाचा त्याग केला आणि राजघराण्यांतील एकंदर मंडळीला शोकसागरांत ढकलून दिलें. असो.

लग्न होऊन चार वर्षें लोटलीं असतील, तोंच महाराणी साहेबांनां धनुर्वातानें पछाडलें. त्यांच्या प्रकृतीबद्दल सर्वांनां मोठी चिंता पडली. पुढें पुढें तर त्यांची अवस्था फारच कठीण झाली. त्यांचे वडील आणि त्यांच्या मातोश्री डेन्मार्कहून त्यांनां मुद्दाम भेटण्यास आलीं. प्रिन्सेस ॲलिस हिनें आपल्या आईला ह्मणजे महाराणी व्हिक्टोरिया यांनां एका पत्रांत लिहिलें आहे "माझ्या परम प्रिय ॲलेक्ससाठीं माझा जीव तिळतिळ तुटत आहे. मला मुळींच चैन पडत नाहीं. ती या दुखण्यांतून लवकर उठेलसें वाटत नाहीं. कितीतरी दुःख हें."

महाराणी ॲलेक्झॅन्ड्रा यांचें हें दुखणें खरोखरच लवकर बरें झालें नाहीं; बरेच दिवस त्या पडून होत्या; परंतु शेवटीं ईश्वरकृपेनें त्यांच्या प्रकृतीला आराम पडूं लागला आणि पुढें त्या साफ बऱ्याहि झाल्या.

महाराणी ॲलेक्झॅन्ड्रा यांनीं आपल्या पतीबरोबर बराच प्रवास केला आहे. इजिप्तमध्यें नाईल नदींतून त्या जात असतां त्यांच्या गलबतावर एकाएकीं आग लागली; आणि प्रिन्स ऑफ् वेल्स यांनीं त्या संकटसमयीं विलक्षण दूरदृष्टी आणि धैर्य दाखविलें नसतें तर मोठा भयंकर प्रसंग ओढवला असता. आमच्या बादशहांनीं मोठी चलाखी करून राणी साहेबांनां सुरक्षितपणें किनाऱ्यावर उतरविलें आणि ह्मणूनच तो प्रसंग टळला. या प्रवासांतून परत येतांना त्या तुर्कस्थानांत कॉन्स्टॉन्टिनोपल येथेंहि गेल्या होत्या. त्या वेळीं सुलतान साहेबांनीं त्यांचा पराकाष्ठेचा आदरसत्कार केला. त्यांच्या सन्मानार्थ मोठी मेजवानी दिली. सुलतान साहेबांनीं ख्रिश्चन धर्मांतील राजांनां दिलेली हीच पहिली मेजवानी होय. इतकेंच नव्हे, तर सुलतान साहेबांनीं आमच्या महाराणी साहेबांनां आपल्या

स्नानखान्यांत जाण्याची देखील परवानगी दिली होती. हा अपूर्व मान या पूर्वी कोणालाच मिळाला नव्हता; इतकेंच नव्हे, तर त्यानंतरहि जर्मनीच्या महाराणी साहेबांनां मात्र कायतो तो एकवार मिळाल्याचें समजतें.

रोग्यांची शुश्रूषा चांगली रहावी, अशाविषयीं या महाराणी साहेब फार दक्ष आहेत. या कामासाठीं चालू असलेल्या संस्थांनां यांचा नेहमीं आश्रय असतो. सन १८७१ सालीं आमच्या एडवर्ड बादशहांच्या अगदीं जिवावरचें दुखणें गेलें. तेव्हां त्या दुखण्यांत त्यांची सेवाशुश्रूषा महाराणी साहेबांनीं स्वतः ठेविली होती. आमच्या देशांतील स्त्रीवाचकांनां यांत प्रथमदर्शनीं कांहीं विशेष वाटणार नाहीं, हें खरें; परंतु पाश्चिमात्यांच्या समाजस्थितीकडे लक्ष्य दिलें असतां महाराणी साहेबांची ही कृति अत्यंत प्रशंसनीय आहे, असें वाटल्यावांचून रहाणार नाहीं.

लग्न झाल्यानंतर बरींच वर्षे या राजदम्पत्यानें मोठ्या सौख्यांत आणि पूर्ण विश्रांतींत घालविलीं; परंतु पुढें मात्र मोठमोठ्या सामाजिक समारंभांत महाराणी व्हिक्टोरिया यांची जागा युवराज आणि त्यांची पत्नी म्हणजे आमचे हल्लींचे बादशहा आणि आमच्या महाराणी साहेब यांनांच भरून काढावी लागे आणि यामुळें यांनां पूर्ण स्वस्थता क्वचितच मिळे.

महाराणी साहेबांनीं एके ठिकाणीं आपल्या स्वतांविषयीं आपल्या हातानें लिहून ठेविलें आहे कीं, आपल्या आवडीची कला म्हणजे स्त्रियांचे पोषाख वगैरे तयार करण्याची होय; आणि त्याचप्रमाणें आपला फार आवडता धंदा म्हटला म्हणजे 'आपलें स्वतांचें काम करणें' हा होय. आणि यांत प्रतिपादन केलेलें तत्व त्यांनीं इंग्लंडांत पाय टाकल्या दिवसापासून तों आज तागायत पूर्णपणें अमलांत आणिलें आहे.

आपली इज्जत कायम राखणें, राजकीय गोष्टींत यत्किंचितहि ढवळाढवळ न करितां त्यापासून अगदीं अलिप्त रहाणें, कोणाचेंहि मन न दुखविणें आणि इतक्या मोठ्या राष्ट्राकडून वाहवा करून घेऊन त्याचें

प्रेम सदैव कायम राखणें, ही गोष्ट कांहीं अशीतशी नव्हे. महाराणी साहेबांचा गोड आणि मनमिळाऊ स्वभाव आणि त्यांची चित्ताकर्षकता हीं तर यावरून व्यक्त होतातच, परंतु त्यांच्या अंतःकरणाच्या दृढतेचीहि यानें चांगलीच ओळख पटण्याजोगी आहे.

दुखणाईत मनुष्य पाहिला कीं अंतःकरण कळवळणें, हा स्त्रियांनां शोभविणाऱ्या अनेक सद्गुणांपैकीं एक मुख्य सद्गुण आहे. गरीब दुबळा प्राणी पाहिला कीं स्त्रियांचें कोमल हृदय तळमळूं लागतें. आमच्या महाराणी साहेबांच्या अंगीं तर हा सद्गुण विशेषेंकरून भरला आहे. त्यांचा अंगस्वभावच असा झाला आहे. सन १८६७ त या महाराणी साहेब बऱ्याच आजारी पडल्या असतां सेंट बार्थोलोम्यू नामक हॉस्पिटलामधून मिसेस जोन्स या नांवाची एक दाई यांच्या शुश्रूषेकरितां आली होती. या बाईवर महाराणी साहेबांचें फार प्रेम जडलें. त्यांनीं तिला 'जॉनी' असें आवडीनें नांव दिलें. दुर्दैवानें पुढें मिसेस जोन्स हीच स्वतः आजारी पडली आणि तिची प्रकृति अगदींच अत्यवस्थ झाली. त्या वेळीं कोणालाहि न जुमानतां महाराणी साहेबांनीं कित्येक रात्रीच्या रात्री आपल्या आवडत्या 'जॉनी'च्या बिछान्यावर बसून काढल्या. परंतु त्या बिचाऱ्या दाईचा त्याच दुखण्यांत शेवट झाला; आणि ब्रॉमप्टन येथील स्मशानांत तिचा प्रेतसंस्कारविधि करण्यांत आला. महाराणी साहेब स्वतः तेथें गेल्या आणि आपल्या दाईच्या थडग्यावर त्यांनीं मोठ्या दुःखितांतःकरणानें आपल्या हातांनीं पुष्पहार घातला. पुढें कांहीं दिवसांनीं तर त्यांनीं तिचें स्मारकहि केलें.

सॅन्ड्रिंघॅम हें महाराणी साहेबांचें आतांपर्यंतचें फार आवडीचें रहाण्याचें ठिकाण आहे. येथें त्यांच्या परोपकारबुद्धीचा त्यांनां यथास्थित उपयोग करितां येत असे. शहरांतील बडेजावापेक्षां खेड्यापाड्यांतील साधेपणाच त्यांनां विशेष आवडतो. सॅन्ड्रिंघॅम हाऊसच्या आसपास असणाऱ्या गोरगरिबांच्या झोंपड्यांत स्वतः जाऊन त्यांत रहाणाऱ्या मंडळीशीं मोकळ्या मनानें

बोलण्याची, त्यांचीं सुखदुःखें दयार्द्र अंतःकरणानें ऐकून घेण्याची यांनां फार आवड असे. यासाठीं बरोबर कोणीहि चाकर मनुष्य घेतल्याशिवाय त्या पायानेंच वारंवार जातांनां दिसत असत. फार झालें तर यांची नेहमींची सोबतीण मिस नॉलिस ही क्वचित् प्रसंगीं त्यांच्या बरोबर असावयाची. मिस नॉलिस ही बाईहि आपल्या यजमानणीप्रमाणेंच दयाळु स्वभावाची आहे. आणि यामुळें कोणाहि भणंग भिकाऱ्याला आपल्या दुःखाची किंवा दुर्दैवाची कहाणी--मग ती खरी असो किंवा खोटी असो--महाराणी साहेबांच्या किंवा त्यांच्या सोबतिणीच्या कानांवर घालण्याला उत्तम संधी ह्मणजे हीच. सुदैवानें महाराणी साहेबांच्या तैनातींत असलेल्या शिपाईप्याद्यांपैकीं या वेळीं कोणी जवळ नसलें कीं त्या याचना करणाऱ्या भिकाऱ्याची चंगळ झालीच ह्मणून समजावें. धर्म करण्यांत महाराणी साहेबांचा हात फार सढळ आहे. धर्मकृत्यांकरितां काढिलेल्या संस्था किंवा अशा संस्थांनीं घातलेले निर्बंध, यांची त्यांनां मुळींच पर्वा वाटत नाहीं. कोणालाहि संकटांतून मुक्त करावयाचें ह्मणजे तें तात्काळ आणि इतर कोणतीहि चौकशी करण्यापूर्वीं केलें पाहिजे, हें जें ईश्वरप्रणीत तत्व आहे, त्यावर महाराणी साहेबांचा विशेष भरंसा आहे असें दिसतें. त्यांचें वर्तन सदोदित याच तत्वानुरूप होत असतें.

त्यांच्या अंतःकरणाच्या दृढतेची आणि त्याचप्रमाणें एखाद्यावर उपकार करण्याच्या -मग तो त्या उपकाराला अगदीं अपात्र असला तरी हरकत नाहीं--त्यांच्या अनावर बुद्धीची पुढील गोष्टीवरून चांगलीच साक्ष पटते. सॅन्ड्रिघॅम येथील इस्टेटीची व्यवस्था पहाण्याचें काम मि. बेक या गृहस्थांकडे असतां आळशी, कामचुकाऊ अशा एका भिकाऱ्यानें त्या इस्टेटींतील ओसाड जमिनीच्या एका तुकड्यांत येऊन बेधडक ठाणें दिलें. इतकेंच नव्हे, तर त्यानें आपली बायको आणि मुलें यांचें वारा आणि पाऊस यांपासून रक्षण व्हावें अशा बेताचें एक कसेंबसें कुडामेढीचें झोंपडेंहि कोणाला न विचारतां तेथें उभारलें. हा धाडशी मनुष्य भिक्षा

मागून किंवा चोरूनमारून रानांतील पांखरें पकडून त्यांवर आपली उपजीविका करित असे. तेथील रखवालदारांनीं आपली पराकाष्ठा करून पाहिली, परंतु हा सभ्य गृहस्थ कांहींकेल्या त्यांच्या तडाक्यांत सांपडेना. त्याच्या वर्तनाबद्दल जिकडे तिकडे ओरड सुरू झाली. त्याला तेथें कां राहूं दिला होता, हेंच कोणाला कळेना! परंतु त्या इस्टेटीच्या मालकिणीच्या पराकाष्ठेच्या दयाळु स्वभावाचाच हा परिणाम होता, हें सांगावयास नकोच. आमच्या महाराणी साहेबांच्या कानांवर ही गोष्ट जातांच त्याला हांकून लावण्याचा हुकूम देण्याऐवजीं त्यांनीं लागलेंच ठरविलें कीं, त्या मनुष्याला आणि त्याच्या कुटुंबाला रहाण्याला चांगलीशी झोंपडी बांधून द्यावी. मि. बेक यांनां महाराणी साहेबांची ही इच्छा कळविण्यांत आली; परंतु अशा सर्वथैव अपात्र मनुष्याला झोंपडी बांधून देण्याम त्यांची मनोदेवता लवेना. अशा आळशी, उनाड, कामचुकाऊ मनुष्यावर असे भलतेच उपकार करणें, हें त्यांनां योग्य वाटेना. इकडे महाराणी साहेबांची तर कांहीं केल्या समजूत पडेना. त्या मनुष्याची बायको आणि मुलें यांचे होत असलेले हाल पाहून त्यांचें कोमल अंतःकरण तळमळत होतें. दुसरा तिसरा विचार ह्मणून तेथें नव्हता. सरतेशेवटीं मि. बेक यांनां या बाबतींत प्रिन्स आणि प्रिन्सेस ऑफ वेल्स यांच्या समोर बोलाविण्यांत आलें, आणि महाराणी साहेबांची इच्छा पुनः एकवार त्यांच्या कानांवर घालण्यांत आली. ही दया अगदीं अपात्रीं होत आहे, त्या मनुष्याकडून त्याचें मुळींच चीज होणार नाहीं, अशाबद्दल बेक साहेबांनीं आपल्याकडून पुष्कळ सांगून पाहिलें; परंतु त्याचा कांहींएक उपयोग झाला नाहीं. शेवटीं आमच्या एडवर्ड बादशहांनीं "बेक, महाराणींची इच्छा काय आहे तें तुह्मीं ऐकलेंत. आतां या विषयावर मुळींच कांहीं अधिक बोलायचें राहिलें नाहीं." असें ह्मणून बेक साहेबांनां रजा दिली.

याप्रमाणें शेवटीं ती झोंपडी तयार झाली. परंतु त्या उनाड आळशी मनुष्यानें या उपकारांची फेड फारच विलक्षण रीतीनें केली. त्यानें त्या

नीटनेटक्या आणि सुखावह अशा झोंपडींत रहाण्यास जाण्याचें माफ नाकारिलें!

लहानपणीं महाराणी साहेबांचा स्वभाव कसा होता, याचें पुढील लहानशा गोष्टीवरून चांगलेंच दिग्दर्शन होईल. लग्नानंतर थोड्याच दिवसांनीं गिब्सन नांवाच्या प्रख्यात कारागिराला या तरुण राजपत्नीचा पुतळा तयार करण्याचें काम फरमाविण्यांत आलें होतें. मार्लबरोनामक राजवाड्यांत गिब्सन आणि त्याचा जोडीदार फ्रिथ असे दोघे हा पुतळा तयार करण्याच्या कामास लागले. परंतु ही तरुण राजपत्नी कांहीं केल्या स्थीर चित्तानें त्यांच्या समोर बसेना. त्यांच्या कामांत वारंवार व्यत्यय येऊं लागला. ही गोष्ट अखेरीस युवराजांच्या ह्मणजे आमच्या एडवर्ड बादशहांच्या कानीं गेली आणि हंसत हंसत युवराजांनीं आपल्या तरुण पत्नीला किंचित् वेळ स्थीर बसण्यास सांगितलें. त्याबरोबर महाराणी साहेब मुळींच नाखुष न होतां त्या कारागिरांकडे वळल्या आणि विनोदानें ह्मणाल्या "तुह्मी दोघेहि अगदीं वाईट मनुष्य आहां झालं!" परंतु त्या वेळेपासून त्यांनीं त्या दोघांनांहि आपल्या श्रमाचें योग्य चीज होईल कीं नाहीं अशी चिंता करण्याला मुळींच जागा ठेविली नाहीं.

महाराणी साहेबांचा स्वभाव किंचित्सा छांदिष्ट आहे ह्मटलें असतां चालेल; परंतु त्यांचे छंद नेहमीं कांहींतरी परोपकाराचें कृत्य करण्याचेच असतात. कोणाचें नुकसान त्यापासून आजवर कधीं झालेंच नाहीं. याविषयीं वर एक उदाहरण आलेंच आहे, परंतु पुढील गोष्टहि लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. सॅन्ड्रिंघॅम येथें त्या प्रथमच येऊन फार दिवस झाले नव्हते. त्या प्रदेशाची किंवा तेथें आसपास रहाणाऱ्या मंडळीची यांनां बरोबर माहितीहि झाली नव्हती. अशा वेळीं तेथें रहाणाऱ्या कांहीं मंडळीकडे अचानक जावयाचें, असें त्यांच्या मनानें घेतलें. त्यांच्या रक्षणार्थ नेमलेल्या अमलदारानें "पूर्वीं कांहींएक सूचना न देतां त्या मंडळीवर एवढा मोठा अनुग्रह करणें कधींहि योग्य होणार नाहीं."

ह्मणून नम्रपणानें त्यांनां सांगितलें. शिवाय “अशा सन्मान्य आणि श्रेष्ठ पाहुण्यांचें आयत्या वेळीं यथायोग्य आदरातिथ्य करणें त्यांनां फार जड जाईल” असेंहि त्यानें आदरपूर्वक सुचविलें. महाराणी साहेबांचा हेतु पूर्ण होण्याला दुसरीहि एक अडचण आली. ज्यांनां आपल्या भेटीचा बहुमान देण्याचें त्यांनीं मनांत आणिलें होतें, ती मंडळी बरीच दूर रहात असल्यामुळें राजवाड्यांतून त्यांनां बराच वेळ बाहेर रहावें लागलें असतें. ही गोष्टहि त्यांच्या पुढें मांडण्यांत आली; परंतु त्या तरुण राजपत्नीच्या मनावर याचा कांहींएक परिणाम होईना. “आपल्या मनास येईल तसें आपण कां करूं नये, हें आपल्याला बरोबरसें समजत नाहीं” असें त्या ह्मणाल्या आणि शेवटीं तर त्यांनीं स्पष्ट सांगितलें कीं “येऊन जाऊन अडचण जर काय आपल्या न्याहारीचीच असेल तर ती आपण आपल्या बरोबर घेऊन जाऊं; मग तर झालें कीं नाहीं?” परंतु तो इमानी अमलदार कांहीं केल्या ऐकेना. त्यानें असें न करण्याविषयीं त्यांची पराकाष्ठेची विनवणी केली; तेव्हां निरुपायास्तव राणीसाहेबांनां आपला हट्ट सोडून द्यावा लागला. परंतु या गोष्टीमुळें त्या अमलदाराचा आपल्याला असा कांहीं राग आल्याचें त्यांनीं दाखविलें कीं, पुढें तीन दिवसपर्यंत त्या त्याच्याजवळ एक शब्ददेखील बोलल्या नाहींत. तीन दिवस याप्रमाणें लोटल्यावर मात्र महाराणी साहेबांनां वाटलें कीं, ही शिक्षा पुरेशी झाली. त्यांच्या नेहमींच्या स्वभावाला अगदींच विरुद्ध अशी ती कठोरवृत्ति त्यांनां फार दिवस चालवितां येईनाशीहि झाली. दयाळु वृत्तीनें त्यांच्यावर पुनः आपला अमल बसविला. तेव्हां चौथ्या दिवशीं सकाळींच तो इमानी अमलदार त्यांच्या दिवाणखान्यावरून चालला असतां त्या अकस्मात् बाहेर आल्या आणि विनोदानें त्याला किंचित् ढकलल्यासारखें करून हंसत हंसत ह्मणाल्या “ आपण ह्मणजे शुद्ध नंदीच आहां ! ” हे शब्द त्या तरुण आणि अनुपम रूपसंपन्न राजपत्नीनें अशा कांहीं मधुर स्वरानें उच्चारले आणि हा प्रसंग असा कांहीं

अपूर्व झाला कीं, त्याचें वर्णन करणेंच अशक्य! असो. याप्रमाणें त्या इमानी अमलदारावरील इतराजी दूर झाली.

आमच्या महाराणी साहेबांच्या संबंधानें अशा कितीतरी गोष्टी प्रसिद्ध आहेत. आणि त्या सर्वांत सदयता, कोमलवृत्ति, परोपकारबुद्धि, स्वभावसरलता इत्यादि त्यांच्या अंगच्या अनेक सद्गुणांचा प्रत्यय येऊन महाराणींविषयींची आमची पूज्यबुद्धि अधिकाधिक वाढत जाते. आणि आमच्या परमपूज्य, दयाळु महाराणी व्हिक्टोरिया यांच्या मागून राज्यपदावर आरूढ झालेले आमचे सातवे एडवर्ड बादशहा यांच्याबरोबर अशा सद्गुणी महाराणीचा आपणास लाभ झाला, ही खरोखरच मोठ्या सुदैवाची गोष्ट आहे, असें ह्मटल्यावांचून रहावत नाहीं.

योग्य वेळीं योग्य शब्द बोलतां येणें आणि त्याचप्रमाणें योग्य वेळीं योग्य गोष्ट करावयास सुचणें, ही एक ईश्वरी देणगीच आहे; आणि आमच्या महाराणी साहेबांच्या अंगीं बऱ्याच प्रमाणानें ती दिसून येते. याशिवाय वक्तृत्वाचीहि देणगी त्यांच्या अंगीं आहे. डचेस ऑफ आरगाईलप्रमाणेंच वक्तृत्वांत या फार नाणावलेल्या आहेत. लहानसहान गोष्टी घ्या, किंवा आयुष्यांतील मोठमोठ्या महत्वाच्या गोष्टी घ्या, राणी साहेबांची कुशाग्रबुद्धि त्यांत तात्काळ दिसून येते. कोणीहि जावो, त्याच्याशीं महाराणी साहेब दोन ममतेचे शब्द बोलल्या नाहींत, असें झालेंच नाहीं. पशुपक्षी बाळगण्याची यांनां फार आवड आहे. त्यांनां निर्दयतेनें कोणींहि वागवूं नये, किंवा निष्कारण त्यांचा कोणीं संहार करूं नये, अशाविषयीं यांचा मोठा कटाक्ष आहे.

संगीतशास्त्रांत या फार प्रवीण आहेत. त्यांनां त्या शास्त्रांतील **'डॉक्टर आफ म्यूझिक'** ही बहुमानाची पदवी मिळाली आहे. 'बायसिकल'-वर बसण्यांतहि या पटाईत आहेत. सुधारणेच्या प्रगतीकडे यांच्या मनाचा विशेष ओढा आहे. पुरुषांप्रमाणें स्त्रियांनांहि प्रत्येक बाबतींत पूर्ण

स्वातंत्र्य असावें, परंतु त्यांनीं त्या स्वातंत्र्याचा दुरुपयोग मात्र करूं नये, असेंहि यांचें मत असल्याचें वाचनांत आलें आहे.

रशियाचे माजी झार तिसरे ॲलेक्झॅन्डर यांच्या मृत्युसमयीं महाराणी साहेब आपल्या पतीबरोबर रशियांत जाऊन वैधव्यांत सांपडलेल्या आपल्या बहिणीजवळ त्या बरेच दिवस राहिल्या होत्या. पुढें सन १८९८ त त्यांच्या मातोश्री–डेन्मार्कच्या राणी साहेब—बऱ्याच आजारी असल्याचें समजल्यावरून त्या आपल्या मातृभूमींत गेल्या होत्या. दुर्दैवानें त्यांच्या मातोश्रीचा त्याच दुखण्यांत अंत झाला. त्यांच्या और्ध्वदेहिक क्रियेच्या वेळींहि महाराणी साहेब आपले चिरंजीव ड्यूक ऑफ यॉर्क यांसह तेथें हजर होत्या. महाराणी साहेबांचें आपल्या आईवर पराकाष्ठेचें प्रेम होतें आणि त्यामुळें हा मातृवियोग त्यांनां फारच दुःसह झाला.

महाराणी साहेबांनां एकंदर सहा अपत्यें झालीं. तीन मुलगे आणि तीन मुली.

प्रिन्स आलबर्ट व्हिक्टर यांचा जन्म इ. स. १८६४ च्या जानेवारी महिन्याच्या ८ व्या तारखेस झाला. आणि इ. स. १८९२ त आपल्या वयाच्या २९ व्या वर्षीं हे मृत्यु पावले.

जार्ज फ्रेडरिक अर्नेस्ट आलबर्ट ड्यूक ऑफ कॉर्नवालिस ॲन्ड यॉर्क यांचा जन्म इ. सन १८६५ च्या जून महिन्याच्या ३ ऱ्या तारखेस 'मार्लबरो हाऊस' मध्यें झाला. हेच राजपुत्र सांप्रत युवराजपदाधिकारी असून आमचे भावी बादशहा होत.

लुइस व्हिक्टोरिया ॲलेक्झॅन्ड्रा डाग्मार डचेस ऑफ फाइफ यांचा जन्म इ. स. १८६७ च्या फेब्रुवारी महिन्याच्या २० व्या तारखेस 'मार्लबरो हाऊस' मध्यें झाला.

व्हिक्टोरिया ॲलेक्झॅन्ड्रा व्होल्गा मेरी यांचा जन्म 'मार्लबरो हाऊस' मध्यें इ. स. १८६८ च्या जुलई महिन्याच्या ६ व्या तारखेस झाला.

मॉड शार्लट मेरी व्हिक्टोरिया या 'मार्लबरो हाऊस' मध्यें इ. स. १८६९ च्या नोव्हेंम्बर महिन्याच्या २६ व्या तारखेस जन्मल्या.

प्रिन्स ॲलेक्झॅन्डर यांचा जन्म इ. स. १८७१ च्या एप्रिल महिन्याच्या ६ व्या तारखेस होऊन पुढें थोडक्याच वेळांत त्यांचा अंत झाला.

या अत्यंत भाग्यशाली महाराणीच्या सौख्यपूर्ण आयुष्यांत एक प्रसंग मात्र फार दुःखाचा आहे; आणि तो त्यांच्या ज्येष्ठ पुत्राचा अत्यंत उद्वेगजनक मृत्यु हा होय. हें दुःख कांहीं केल्या त्यांच्या स्मृतिपटलांतून जात नाहीं. तरीदेखील आपला दुःखावेग दुसऱ्यांच्या दृष्टोत्पत्तीस येऊं देऊन त्यांच्या आनंदाचा विरस त्या कधींहि करित नाहींत. त्यांच्या ओळखीचा ज्यांनां ज्यांनां बहुमान मिळाला आहे, ती सर्व मंडळी असेंच सांगते कीं, तो हृदयविदारक प्रसंग घडल्या दिवसापासून महाराणी साहेब पूर्वीप्रमाणें आनंदांत कधींच दिसत नाहींत!

आमच्या महाराणींचें हें अल्प चरित्र पुरें करितांना ईश्वरापाशीं आमची एवढीच नम्र विनंति आहे कीं, त्यानें महाराणींला दीर्घायुरारोग्य देऊन प्रजेच्या प्रेमाला उत्तरोत्तर अधिकाधिक पात्र करावें. ही विनंति तो परम कृपालु जगच्चालक पूर्ण करो.

खासगी पत्रें.

गिरगांव, **मुंबई,**

[१] ता. ८ मार्च १९०१.

परम प्रिय ताइ,

इकडे आल्याबरोबर इकडील सविस्तर हकीकतीचें तुला पत्र पाठवीन, असें तुझ्या पराकाष्ठेच्या आग्रहावरून मीं कबूल केलें खरें, व गेले चार पांच दिवस पत्र लिहिण्याचा बेत करून मी त्याप्रमाणें लिहिण्यासदिखील बसतें; पण कांहीं सुचेल तर शपथ! तूं आपली काय पाहिजे तें ह्मण, पण बायकांनीं आपलें काम सोडून पुरुषांसारखें तासच्या तास लिहित बसणें, हें मला कांहीं बाई आवडत नाहीं. आणि ताई, खरेंच सांग, करायचें आहे तरी काय आह्मांला सारा दिवस तसें करून? सविस्तर हकीकत ह्मणजे लिहायचें तरी काय, तेंच मेलें मला सुचत नाहीं. आली आहे कसली गेज उठून हकीकत घडायला? येऊन जाऊन मोठें जें कांहीं लिहायचें तें हेंच किं नाहीं, कीं 'आह्मी सर्व अगदीं खुशाल आहों; आमच्या बद्दल मुळींच काळजी करूं नये.' पण ताई, यांत लिहायचें तें काय आहे? तूं आपली आग्रहच धरून बसलीस, तेव्हां कसेंतरी हें पहिलें पत्र लिहून तुझ्या ऋणांतून एकदांची मुक्त झालें. आतां मला कंटाळा आला आहे, आणि अधिक लिहिण्यालाहि कांहीं नाहीं, तेव्हां पुरेंच करतें मी हें पत्र आतां—

पण हो, बरी आठवण झाली. एक गोष्ट तुला कळविलीच पाहिजे. ताई, सारा दिवस लिहिणें वाचणें तरी चांगलें का? पुरुषांनां झालें ह्मणून अष्टौप्रहर हें बरें का? आमच्या इकडे तरी लिहिण्यावाचण्याखेरीज या जगांत दुसरें कांहीं असेलसें वाटत नाहीं. सारा दिवस तें न तेंच. मनुष्याला मेली आवड हौसदिखील कशी-कशी ती नसावी, ह्मणजे काय!

कसा नाहीं येत कंटाळा तरी त्या लिहिण्याचा आणि वाचण्याचा ! ताई, तूं हवी तशी माझी समजूत घाल, पण हीं पुस्तकें कांहीं या जन्मींतरी आमची पाठ सोडित नाहींत. आपल्याला एक नसेल कांहीं आवड हौस, पण मेलें दुसऱ्यासाठीं तरी कांहीं ! कुठं जाणें आहे, कीं येणें आहे? अग, दुसरें सगळें राहो, पण दोन घटका कोणी समाधानाच्या गोष्टी तरी बोलेल? कांहीं—कांहीं नाहीं. सारा दिवस आपण नी आपलीं पुस्तकें ! असें त्या पुस्तकांत मेलें भरलें तरी आहे काय? वाचण्याचा कंटाळा आला कीं लिहिणें, आणि लिहिण्याचा कंटाळा आला कीं वाचणें, दुसरा धंदाच नाहीं ! कधीं काळीं साठां वर्षांनीं सुंठ फुलली आणि दोन शब्द बोलायला फुरसत मिळालीच तर तेदिखील लिहिण्यावाचण्यासंबंधींच ! 'तें अमकें पुस्तक तूं वाचलें आहेस का? त्या तमक्या मासिकांत आलेला निबंध तूं पाहिलास का? हीं अमकीं पुस्तकें स्त्रियांनीं अवश्य वाचलींच पाहिजेत. ती तमकी बाई कशी सुरेख लिहिते, तसें लिहितां आलें पाहिजे.' मिळून एकंदरींत काय, तर लिहिणें आणि वाचणें. जगांत जणूं यापलीकडे कांहीं नाहींच ! मला नाहीं बाई हें असलें आवडत. तीं मोठीं मोठीं पुस्तकें पाहिलीं ह्मणजे माझ्या तर कपाळची शीरच उठते. मला वाटलें होतें कीं, ही एकदाची परीक्षा झाली ह्मणजे तरी हीं पुस्तकें सुटतील; पण छे ! तीं मुळीं दिवसेंदिवस अधिकाधिकच पाठीशीं लागत आहेत. असो. त्याबद्दल कांहीं अधिक लिहिण्यांत अर्थच नाहीं ह्मणा. मला मुळीं आतां जास्त लिहिण्याचाच कंटाळा आला आहे. कसें तरी हें पत्र आज पुरें करायचेंच ह्मणून बसलें आहें इतका वेळ. आधीं चार पांच दिवस नुसते विचार करण्यांत आणि बेत ठरविण्यांत गेले आणि आतां जर का हें पत्र लिहिण्यांत आणखी दिवस मोडले, मग तुला किती राग येईल तें कांहीं मी येथें लिहित नाहीं. पण ताई, मी तरी करूं काय? मला नाहींच या लिहिण्यांत आणि वाचण्यांत कांहीं केल्या गोडी लागत.

ते दिवशीं किंनाहीं ताई, अशीच एक मौज झाली. बराच वेळ कसल्याशा पुस्तकांत अगदीं गढून जाणें झालें होतें. मीहि एक पुस्तक हातांत घेऊन तिकडच्या समजुतीसाठीं त्याचीं पानें उलटित बसलें होतें. इतक्यांत आपलें चटकन् मला विचारणें झालें 'लहानपणीं लग्न करणें चांगलें कीं प्रौढ वयांत लग्न करणें चांगलें? तुला काय वाटतें याबद्दल?'

मी एकदम चकित झालें. काय उत्तर द्यावें तेंच मला सुचेना. ताई, तूंच सांग, आम्हां स्त्रियांनां एखाद्या गोष्टीसंबंधीं वाटायचें तें आहे काय? आणि त्याची मेली मातब्बरी ती कितीशी? मी आपली कांहीं एक न बोलतां पहातच राहिलें तिकडे. पण विचारून विचारून माझें अगदीं डोकेंच उठविलें. शेवटीं मी त्रासलें आणि चक्क सांगितलें कीं 'मला त्याबद्दल कांहीं वाटतहि नाहीं आणि माझं उगाच डोकंहि उठवूं नये.' त्यावर 'हं! असेंच का शेवटीं? मग आपल्या या शिक्षणाचा तो उपयोग काय?' इतकेंच अगदीं खिन्न स्वरानें बोलून स्वस्थ बसणें झालें. मला तर त्या वेळीं मुद्रा रागावल्यासारखी दिसली. ताई, हें पाहून मात्र मला फार वाईट वाटलें. तुला माहितच आहे कीं, एक वेळ मी काय पाहिजे तें सहन करीन, पण तिकडचा राग म्हणून कांहीं मला सहन व्हायचा नाहीं. कोणी कांहीं का म्हणेना, पण तिकडे राग येईल अशी गोष्ट मी प्राण गेला तरी करणार नाहीं. तिकडे राग आला हें पाहून मला फार दुःख झालें. खरेंच सांगूं का ताई, माझे डोळे एकदम पाण्यानें भरून आले. त्याबरोबर तिकडे काय झालें असेल त्याची तुला सहज कल्पना करतां येईल. तिकडचा स्वभाव किती प्रेमळ आणि किती मायाळू आहे, हें तुला माहित आहेच. तेव्हां पुढें काय झालें तें मीं लिहिलेंच पाहिजे असें नाहीं व तें येथें लिहिणेंहि इष्ट नाहीं. हातांतील पुस्तक दिखील बाजूला ठेवून अगोदर माझें समाधान करणें झालें. माझें तात्काळ समाधान तर झालेंच पण मला त्या प्रेमळ वर्तनानें फार आनंदहि झाला. रात्रीं भोजनोत्तर पुनः ममतेनें हीच गोष्ट विचारणें झालें.

तेव्हां मींहि मोकळ्या मनानें सांगितलें कीं 'मी जें कांहीं थोडेंसें लिहिणें वाचणें शिकलें आहें, तें केवळ माझ्या ताईच्या समजुतीसाठींच. मला स्वतांला त्यांत कांहीं विशेष वाटत नाहीं, आणि मला तें आवडतहि नाहीं. सगळ्याच बायकांनीं करायचं आहे काय लिहायला आणि वाचायला शिकून?' त्यावर हंसत हंसत अगदीं संथपणानें सांगणें झालें 'बरें, पुढें कधीं तरी बोलूं आपण याविषयीं. तोंपर्यंत तूं जें कांहीं सांगितलेंस त्याचा आपल्याशींच चांगला विचार कर. आतांच कांहीं मीं सांगितलें तर पटणार नाहीं तुला तें बरोबरसें.'

ताई, तूं का थोडा वेळ या गोष्टींत माझी समजूत घातली आहेस! तुझ्यावर याबद्दल मी रागावलें तरी असेन कितीदा? पण माझ्या डोक्यांत नाहींच ती गोष्ट शिरत, त्याला मी काय करूं? मला मुळीं तें आवडतच नाहीं. आतांच पहाना, हें पत्र तर कांहीं केल्या पुरें होत नाहीं आणि मला तर असा कांहीं कंटाळा आला आहे कीं, अगदीं विचारूं नको. पण कसें तरी तें पुरें करून हें आज टाकलेंच पाहिजे, ह्मणून मोठ्या शिकस्तीनें बसलें आहें झालें. अद्यापि कितीतरी लिहायचें राहिलें आहेच. वर मींच लिहिलें आहे कीं, काय लिहावें तें सुचत नाहीं—पण आतां मला इतकें कांहीं सुचत आहे कीं, माझें मलाच आश्चर्य वाटत आहे! पण सुचत आहे तर लिहिण्याचा कंटाळा आला आहे; मिळून एकूण एकच! येथें वेळाला मात्र कांहीं कमी नाहीं हो! सारा दिवस पाहिजे तरी लिहित आणि वाचित बसावें; कोणी ह्मणून आड यायचें नाहीं. तिकडे तर उलट याचा आनंदच होईल. पण तसें करणें चांगलें नाहीं, आणि चांगलें असलें तरी माझ्यानें तें कांहीं होणें नाहीं. मी आपली आतां हें पुरेंच करितें. तरी पण एक गोष्ट तुला कळविलीच पाहिजे. कारण ती तुझ्या संबधींच आहे. परवां तुझा तो प्रसिद्ध झालेला लेख वाचून जें कांहीं कौतुक वाटलें आहे आणि जो कांहीं आनंद झाला आहे ह्मणून सांगूं! सारा दिवस पुनः पुनः तो वाचणें होत होतें. फारच आवडला तिकडे तुझा तो लेख बरें का! मलादिखील तो वाचून दाखविणें झालें. पण तेवढ्यानेंच समाधान झालें नाहीं! शेवटीं माझ्या

मनांत नसतांहि मजकडून बळेंच तो वाचवून घेतला! त्या वेळीं तर मला असें झालें कीं, तुझ्या नादाला लागून मी हें लिहिणें शिकलें नसतें तरी बरें झालें असतें.

किती वेळां तरी मला हिणवणें झालें कीं 'तुझी ताई कशी आणि तूं कशी? तिच्याकडे पाहून तरी तुला कांहीं वाटलें पाहिजे. येथें तुला सर्व साधनें अनुकूल असूनहि तूं ही अशी, आणि त्या तुझ्या बिचाऱ्या ताईची स्थिति सर्व प्रकारें चमत्कारिक असूनहि तिनें कुठवर मजल मारली आहे पहा. शाबास तिची. स्त्रियांनींच प्रकट केलेले विचार स्त्रियांनां जेवढे पटतील तेवढे पुरुषांनीं कितीहि कळकळीनें प्रकट केले तरी ते पटणार नाहींत; आणि त्यांचें तितकें चीजहि होणार नाहीं. स्त्रियांनींच आपली स्थिति सुधारण्यास झटलें पाहिजे.' असें कितीतरी सांगणें झालें. तें मला आतां नीटसें आठवतहि नाहीं. एकंदरींत तुझ्याविषयीं जो कांहीं अभिमान वाटत आहे, तो विचारूं नकोस! कोणींहि विचारिलें तरी त्याला आपलें चट्दिशीं सांगायचें होतें कीं 'हा लेख लिहिणाऱ्या बाई म्हणजे आमच्या अमुक अमुक लागतात बरें!' ताई फार काय सांगूं, मलादिखील याचा मोठा आनंद वाटतो. असो. आतां नाहींच माझा हात चालत. पण मीं हें इतकें लांब पत्र लिहिल्यामागखें तूं उत्तरहि असेंच धाडलें पाहिजेस हो!

बाबू माझी आठवण तरी काढतो का? कधीं? का झाला गुलाम तिकडेच दंग! दंगामस्ती पूर्वीप्रमाणेंच चालली असणार! मला त्याची राहून राहून आठवण होत असते. ताई, माझें हें वेडेंवांकडें पत्र भावोजींनां दाखविण्याची तसदी बरिक घेऊं नकोस हो! नाहीं तर आपला नेहमींचा ठराव आहे कीं, एखादी पाल जरी कुठें खुटखुटली तरी तें वर्तमान प्रथम यजमानांच्या कानांवर घालायचें! मग हें तर काय प्रत्यक्ष बहिणीनें लिहिलेलें पत्र! तें तर गेलेंच पाहिजे पुढें. मला समजूं दे मात्र असें, कीं पुनः तुला पत्र म्हणून लिहीन तर पहा! बाबांचें कांहीं पत्र तिकडे आलें होतें कीं काय? तुझ्या पत्राकडे डोळे लावून बसलेली

तुझी लाडकी चिंगू.

लेडी नार्थकोटबाईची पडदापार्टी.

थोड्याच दिवसांपूर्वीची गोष्ट. सायंकाळच्या शांत आणि रमणीय वेळीं नित्यनियमाप्रमाणें श्री वालुकेश्वराच्या दर्शनासाठीं ह्मणून मी माझ्या अंगीं असलेल्या अद्भुत शक्तीच्या प्रभावानें आकाशमंडळांतून आसमंतात्भागींची शोभा पहात पहात अदृश्यरूपानें चाललें होतें. आकाशमंडळांतून अदृश्य रूपानें त्या भूतनाथाच्या दर्शनाला मी चाललें होतें, एवढ्यावरून मी कोणीतरी भूतपिशाच्च असेन, असें मात्र कोणीं समजूं नये. मी त्या भोलानाथाच्याच वरप्रसादानें आज अनादिकाळापासून या ब्रह्मांडांत भ्रमण करणारी एक 'योगिनी' आहें. पाहिजे तेव्हां, पाहिजे तेथें, आणि पाहिजे त्या रूपानें संचार करण्याची अद्भुतशक्ति माझ्या अंगीं आहे. मला अगम्य किंवा अगोचर असें या मृत्युलोकीं तरी कांहीं नाहींच! असो.

सायंकाळीं साडेचारांची वेळ होत आलेली. मी चौपटीवरील अपूर्व शोभा पहात पहात पुढें चाललें होतें. त्या शोभेचें मी येथें वर्णन करित बसत नाहीं. जातां जातां गव्हर्नर साहेबांच्या बंगल्याकडे रस्ता फिरतो त्या ठिकाणीं बरोबर येऊन मीं मोठ्या आश्चर्यानें क्षणभर वातावरणांत थांबलें. हें काय गूढ आहे, तें प्रथमदर्शनीं मला समजेना. एकामागून एक अशा कितीतरी सुंदर सुंदर गाड्या भराभर त्या रस्त्याला वळत होत्या. कित्येक गाड्या आल्या ह्मणजे फक्त घोड्यांच्या टापांचाच कायतो आवाज ऐकूं येई. चाकांची घरघर वगैरे कांहींएक नाहीं. या गाड्यांच्या चाकांनां रबराच्या धांवा बसविल्या आहेत, हें तात्काळ मला समजून आलें. या ज्या एकसारख्या एका मागून एक कितीतरी गाड्या आज गव्हर्नर साहेबांच्या बंगल्याकडे जात आहेत, तर असें आज गव्हरनरसाहेबांकडे आहे तरी काय? याचेंच मला आश्चर्य वाटूं लागलें. बरें त्या गाड्यांकडे पहावें तर एकंदर गाड्यांत तरुण, प्रौढ, वृद्ध अशा स्त्रियाच असल्याचें दिसून येत होतें. ताबडतोब मीं तर्क केला कीं, या बंगल्यांत आज कांहींहि असो, परंतु गव्हरनरसाहेबांपेक्षां त्यांच्या पत्नीचाच त्यांत अधिक संबंध असावा. एरव्हीं सगळ्या स्त्रियाच तिकडे जात्याना. इतक्यांत एकामागून

एक अशा दोन तीन गाड्या त्या रस्त्याला वळल्या. त्यांत सर्व हिंदु स्त्रियाच माझ्या दृष्टीस पडल्या. त्याबरोबर आज लेडी नॉर्थकोटबाईकडे हळदीकुंकवाचा समारंभ तर नाहींना? असा आपला विचार क्षणभर माझ्या मनांत आला. आणि या विलक्षण विचाराचें माझें मलाच हंसूं येऊन मी खालीं पाहूं लागलें. तों दोन घोड्यांची एक सुंदर गाडी माझ्या दृष्टीस पडली. पहातें तों गाडींत एक आपली वृद्ध विधवा आजीबाईच! हळदीकुंकवाचा हास्यास्पद विचार मला तात्काळ वातावरणांत सोडून द्यावा लागला.

गाड्या सारख्या एकामागून एक चालल्याच होत्या. हिंदु, पारशी, मुसलमान इत्यादि जातींच्या स्त्रिया अगदीं नट्टूनथट्टून गाड्यांतून भराभर चालल्या होत्या. मडमींची तर गोष्टच विचारूं नका. सगळ्यांत जास्ती भरणा त्यांचाच दिसला. पारशी स्त्रियाहि साधारण बऱ्याच दिसून येत होत्या. हिंदु, मुसलमान व खोजे या जातींच्या स्त्रिया मात्र फार जात असल्याचें दिसून आलें नाहीं. हा एवढा स्त्रीसमुदाय वस्त्रालंकारांनीं विभूषित होऊन घाईघाईनें चालला आहे, तर गव्हरनरसाहेबांच्या बंगल्यांत आज असें आहे तरी काय? या विचारापुढें मला कांहीं सुचेना. शेवटीं त्याच वेळीं खालून एक गाडी चालली होती व त्यांतील स्त्रिया एकमेकींशीं कांहीं बोलत होत्या, ही संधी पाहून मीं गुप्तरूपानें तात्काळ त्या गाडींत प्रवेश केला. सुदैवानें माझा हेतुहि तात्काळ पूर्ण झाला. त्या तरुणींच्या संभाषणावरून मला समजून आलें कीं, आज गव्हरनरीणबाईकडे **'पडदापार्टी'** आहे.

हें काय प्रकरण आहे? **'पडदापार्टी'** ह्मणजे काय! अनादिकालापासून जरी या आर्यावर्तांत माझा वास आहे, तरी **'पडदापार्टी'** हे शब्द आज प्रथमच माझ्या कानीं आले, हें मी मोकळ्या मनानें सांगतें. नाहीं ह्मणायला राजा रविवर्मा यांनीं काढलेली एक सुंदर तसबीर मीं एकवार पाहिली होती. हा कुशल चित्रकार देवादिकांच्या, नानातऱ्हेच्या पौराणिक प्रसंगाच्या, त्या काळच्या सुशील साध्वींच्या, आपल्या सौंदर्यानें संपूर्ण जगतालाहि मोहून टाकणाऱ्या अप्सरांच्या वगैरे सुंदर सुंदर तसबिरी काढित असल्याचें समजल्यावरून मी वारंवार त्या तसबिरी पहाण्यास जात असतें.

अशाच एका प्रसंगीं वरील तसबीर माझ्या पहाण्यांत आली. तींत अमूल्य वस्त्रालंकारांनीं शृंगारलेली एक अपूर्वरूपसंपन्न युवती पडदा बाजूला करून त्यांतून पहात असल्याचें दाखविलें आहे. तशाच प्रकारें लेडी नार्थकोटबाई पडद्यांतून डोकावून या जमलेल्या बायांचा आज आदरसत्कार तर करणार नमतीलना? अशी कल्पना माझ्या मनांत आली. सारांश काय, तर गव्हर-नरीणबाईप्रमाणें एक अति श्रेष्ठ दर्जाची आंग्ल स्त्री आणि 'पडदापार्टी' हे शब्दच मला परस्पर विसंगत वाटले आणि हें बंड आहे तरी काय, हें जाणण्याच्या प्रबळ जिज्ञासेनें मला पक्की भुरळ घातली. वालुकेश्वराच्या दर्शनाला जाण्याचेंदेखील मला भान राहिलें नाहीं. मी तडक गव्हरनर साहेबांच्या बंगल्याकडे वळलें, आणि त्या बंगल्याच्या मुख्य पायऱ्या चढून मधल्या भव्य दालनांत जाण्याचा जो दरवाजा आहे त्यावर क्षणभर विश्रांती घेण्यासाठीं ह्मणून बसलें. कोठें बसलें असतां तेथील एकंदर मौज दृष्टीस पडेल हें ठरविण्याकरितां त्या एकंदर जागेचें मी बारकाईनें निरीक्षण करित आहें, तोंच कांहीं हिंदु स्त्रिया पायऱ्या चढून वर आल्या. तेथें दरवाजापाशीं एक आंग्ल स्त्री उभी होती, तिनें त्यांच्याजवळ मोठ्या विनयानें कांहींसें मागितलें. त्यांपैकीं दोघी तरुणींनीं आपल्याजवळ असलेले दोन कागदाचे तुकडे पुढें केले. बाकीच्या स्त्रियांनीं मात्र देण्यासाठीं कांहीं आणिलें नव्हतें, तेव्हां त्या दोघी तरुणींपैकीं एकीनें, त्या स्त्रिया कोण, कुठल्या, कोणत्या घराण्यांतल्या, त्यांचीं नांवें काय, वगैरे हकीकत त्या आंग्ल स्त्रीस समजावून सांगितली व त्या सर्वजणी मग लेडी नार्थकोट-बाईच्या हातांत हात घालण्यासाठीं कचरत कचरत पुढें गेल्या.

या मुंबई शहरांतील सौ. सावित्रीबाई भाटवडेकर, सौ. लक्ष्मीबाई चंदावरकर, सौ. काशीबाई बाळकृष्ण व त्यांची कन्या, सौ. मंजुळाबाई लाड, सौ. सुमतीबाई नानूजी, सौ. रमाबाई वैद्य, कुमारी सुलोचनाबाई तालचेर-कर, आदिकरून बऱ्याच दक्षिणी हिंदु स्त्रिया तेथें माझ्या पहाण्यांत आल्या.

हा गव्हरनरसाहेबांचा बंगला अगदीं समुद्रकांठीं असल्यामुळें सायंका-ळचा शीतल सुगंधित वायु मंद मंद वाहून चित्ताला फारच आल्हाद देत होता.

तो सर्व बंगला मोठमोठीं झुंबरें व तऱ्हतऱ्हेचे लहानमोठे इंग्रजी दिवे लावून सुप्रकाशित केला होता. जिकडेतिकडे वाखाणण्याजोगी टापटीप आणि स्वच्छता दिसून येत होती. आपल्या इकडे होणारीं तांब्याचीं तपेलीं आणि हांडे यांचा मुद्दाम कुंड्यांप्रमाणें उपयोग करून त्यांत नानातऱ्हेचीं शोभिवंत झाडें लावून तीं जागजागीं ठेविलीं होतीं. कित्येक ठिकाणीं भिंतींवर जरीकांठी शेले वगैरे मोठ्या कुशलतेनें सोडून दिले होते. एका दालनांत सुंदर कपाटाप्रमाणेंच दिसणारें असें लांकडाचें कायसें मांडून ठेविलें होतें. त्यावर फार नाजुक नक्षीकाम कोरलेलें असून त्याच्या मध्यभागीं काढलेली श्रीगजाननाची मूर्ती अत्यंत प्रेक्षणीय होती. परदेशीय लोकांची इकडील कलाकौशल्याविषयींची ही विलक्षण अभिरुची पाहून मला तर फारच आश्चर्य वाटलें. बाजूच्याच एका दालनांत खाण्याचे पदार्थ मेजावर ठेवविले होते. आपल्या हिंदु स्त्रिया तिकडे नुस्ती नजर मात्र टाकून येत होत्या.

हा सर्व देखावा पाहून मला आपल्याकडील हळदीकुंकवाची पुनः एकवार आठवण झाली. सर्व जातींच्या आणि सर्व धर्मांच्या स्त्रियांचा हा एक हळदीकुंकवाचाच समारंभ नव्हे का? तेथें जमलेल्या त्या स्त्रिया मधून मधून एकमेकींशीं बोलत होत्या. एकमेकींच्या वस्त्रालंकारांविषयीं आपापलें बरें वाईट मत प्रदर्शित करित होत्या. जंजिऱ्याच्या बेगमसाहेबांच्या रत्नालंकारांची तर तेथें फारच वाहवा झाली. सारांश, तो स्त्रीसमूह तेथें अगदीं मोकळ्या मनानें वागत होता.

आमच्या दक्षिणी हिंदु स्त्रियांची तेथें बरीच तारांबळ उडत असल्याचें मला दिसून येत होतें. इंग्रजी भाषेचें ज्ञान असल्याविना अशा समारंभाचे ठिकाणीं फार पंचाईत पडते. तेथें जमलेल्या त्या आंग्ल स्त्रिया कितीतरी उत्सुकतेनें 'नेटिव्ह लेडीज'ची ओळख करून घेत होत्या. परंतु हिंदु स्त्रियांपैकीं दोघी तिघीच काय त्या युरोपिअन स्त्रियांमध्यें मिळूनमिसळून त्यांच्याशीं मोकळ्या मनानें इंग्रजींत बोलत होत्या. बाकीच्यांनां केव्हां एकदां हें प्रकरण आटोपतें आहे, आणि केव्हां आपली येथून सुटका होते आहे, असें होऊन गेल्याचें त्यांच्या मुद्रेवरून स्पष्ट दिसून येत होतें.

नाहीं ह्मणायला मीं मघां सांगितलेल्या वृद्ध विधवा आजीबाईचें मात्र मला मोठें आश्चर्य वाटलें. या आजीबाई ह्मणजे सध्यांचे तरुण जहागीरदार बिवलकर ऊर्फ आंग्रे यांच्या मातोश्री, असें मग मला समजून आलें. त्या वृद्ध आजीबाई कितीतरी धिटाईनें प्रत्येक आंग्ल स्त्रीची ओळख करून घेत फिरत होत्या. कितीतरी प्रश्न त्यांनां विचारित होत्या. त्या आंग्ल स्त्रियाहि त्यांनां मोठ्या आदरानें वागवित होत्या व त्यांच्या प्रश्नांचीं उत्तरें देत होत्या. आणि मोठ्या आश्चर्याची गोष्ट ह्मटली ह्मणजे त्या आजीबाईचा हा सर्व प्रकार केवळ हिंदुस्थानी भाषेच्या साह्यानें चालला होता. मला मोठा चमत्कार वाटला! त्या वृद्ध आजीबाईकडे पाहून तेथें त्या वेळीं असलेल्या कित्येक तरुण स्त्रियांची मला फार कींव वाटूं लागली. एकंदरींत असे समारंभ वारंवार होतील तर बरें. कारण आंग्लदेशीय स्त्रियांच्या सहवासानें आमच्याकडील स्त्रियांच्या मनावर इष्ट परिणाम घडण्यास हे असले समारंभ बरेच उपयुक्त होतील, असें हल्लींच्या काळावेळाकडे पाहून मला देखील वाटूं लागलें. असो.

इंग्रजी गायनहि थोडें बहुत तेथें झालें. पियानो तर वाजतच होता. एका आंग्ल स्त्रीनें एक प्रकारचा सर्पाकृती नाचहि तेथें करून दाखविला.

लेडी नॉर्थकोटबाई आदरपूर्वक आपल्या पाहुण्यांची विचारपूस करित होत्या. यांचा स्वभाव फारच वाखाणण्याजोगा आहे. गर्व कसा तो त्यांच्या स्वप्नींहि नाहीं; दया तर त्यांच्या मुद्रेंत मूर्तिमान् भरलेली आहे आणि ह्मणूनच या 'पडदापार्टी'ला कांहीं अपूर्व शोभा आली होती. असो.

हा मौजेचा समारंभ याप्रमाणें मोठ्या उत्कृष्ट रीतीनें पार पडला. सव्वासहा वाजतां आमच्या बऱ्याच हिंदुस्त्रियांनां वाटणारें हें 'प्रचंड प्रकरण' एकदाचें आटोपलें. लेडी नार्थकोटबाईचा निरोप घेऊन सर्व स्त्रिया आपापल्या घरीं जाऊं लागल्या. मलाहि वालुकेश्वराच्या दर्शनाला जाण्याचें स्मरण झालें. त्याबरोबर घाईघाईनें मीं आपली जागा सोडून पुनः वातावरणांत संचार केला. बंगल्याच्या बाहेर पडतें न पडतें तोंच 'सुटलें बाई एकदाची कचाट्यांतून!' असे कोणीं मृदुस्वरानें उच्चारलेले मधुर शब्द माझ्या कानीं आले!

'तारा.'

शिवणकाम आणि कशिद्याचीं कामें.

शिवणकामाचीं साहित्यें आणि साधनें.

दोरा.

शिवणकामास लागणारा दोरा शिवणकाम ज्या कपड्याचें करावयाचें असतें त्याच्या गुणांवर अवलंबून असतो. विरळ, बारिक अशा कपड्यास सूतहि बारिक व नरम लागतें; जाड कपड्यास जाड व मजबूत; त्याचप्रमाणें बनातीच्या कपड्यास रेशमी सूत लागतें. नेहमीं प्रचारांत असणारा दोरा ह्मटला ह्मणजे 'रिली'चा, गुंडीचा नरम किंवा मजबूत, टिकिटीचा आणि रेशमी. सूत बहुशः नं० २० पासून नंबर ६० पर्यंत असतें. तरी नेहेमींच्या कामास ४० नंबरी सूत फार उत्तम. गुंडीच्या किंवा टिकिटीच्या सुतापेक्षां 'रिली'चें सूत अधिक मजबूत असतें. ४० नं० किंवा ६० नं० 'रिली'चें सूत दोन, तीन, चार किंवा सहा धाग्यांचें असें मिळून केलेलें असतें. कोणत्याहि नंबराचें सूत जितकें अधिक धाग्यांचे बनलेलें असतें, तितकें तें अधिक मजबूत असतें. उदाहरणार्थ दोन धाग्यांचें ४० नंबरी सूत चार किंवा सहा धाग्यांच्या ४० नंबरी सुतापेक्षां मजबुतींत कमी असतें. नरम सुताच्या गुंडींत धागा ८० वार, १२० वार, किंवा १६० वारपर्यंत असतो व त्या सात आठ आणे डझनापर्यंत विकत मिळतात. ह्या सुताचा उपयोग काजें करण्यास, टाके मारण्यास, व गुंडीचीं सुताचीं बटनें करण्यास बहुधा करितात. वर लिहिलेल्या नं० ४०, नं० ५०, नं० ६० सुताच्या 'रिली' एक डझनास १ रु० २ आ० पासून १ रु० ४ आ० पर्यंत विकत मिळतात. रेशमी सुताच्या एका रिलीस, जी हलक्या कामाकरितां उपयोगांत आणितात तिची किंमत सुमारें ३ आ० ६ पै पडते व तींत २०० वार धागा असतो; परंतु उत्तम उंची कामाकरितां लागणाऱ्या एका रेशमी धाग्याच्या 'रिलीची किंमत १ रु० २ आ० पर्यंतहि असते व तींत ८०० वार रेशमी धागा असतो. सुताची किंमत करतांना

गुंडींत किंवा रिळींत तें किती वार आहे, किती नंबरचें आहे व किती धाग्यांचें बनलेलें आहे ह्याचा तलाश करावा. अधिक वार अधिक नंबरी व अधिक धाग्यांच्या बनलेल्या सुतास अधिक किंमत पडते.

सुताचा नंबर ह्मणजे काय, ह्याविषयीं थोडक्यांत माहिती माझ्या जिज्ञासु भगिनींसाठीं येथें दिल्यास ती वावगी होईल असें वाटत नाहीं. सुताचा नंबर ठाडण्याचें ज्या मुख्य गोष्टीवर अवलंबून आहे, ती गोष्ट ही कीं, ८४० वार सुताचें वजन १ पौंड किंवा ७००० ग्रेन झाल्यास तें सूत १ नंबरी समजायाचें. २० नंबरी सूत १ पौंडामध्यें किंवा ७००० ग्रेन मध्यें ८४०×२०=१६८०० वार असलें पाहिजे. त्याचप्रमाणें १ पौंडामध्यें किंवा ७००० ग्रेनमध्यें ५०×८४० वार सूत असल्यास त्या सुताचा नंबर ५० समजावा. रेशमी धाग्यांचा नंबरहि कापसाच्या सुताप्रमाणेंच ताडावा. तो लिहिण्यांत थोडीशीच तफावत असते. उदाहरणार्थ दोन ८० नंबरी सुताचा एकत्र बनवलेला दोरा ४० नंबरी होय व तो लिहितांना २ ८० असा लिहिलेला असतो; परंतु दोन ८० नंबरी रेशमाचा धागा एकत्र असल्यास तोहि ४० नंबरीच होय; परंतु लिहितांना ४० २ असा लिहिलेला असतो.

शिवण्याच्या कापसाच्या दोऱ्यांत जे मुख्य गुण हवेत ते खालीं लिहिल्याप्रमाणें होत. (१) जाडींत सारखेपणा. (२) नेमक्या लांबींत वजनाची साम्यता. (३) जोर अथवा मजबुती. (४) गोलत्व किंवा वर्तुलता. (५) लवचीकपणा व स्थितिस्थापकता. (६) गुळगुळीत व तकतकाइतपणा. (७) पिळांत सारखेपणा इ. वरील सर्व गुण सुतांत असणें शिवणकामास फार अगत्याचें आहे व ह्या सर्व गुणांची पारख प्रचीतीनें व संवईनें सहज करितां येते.

कातरी.

कातर पोलादाची असून चालण्यास तलख, सफाईदार व धरण्यास हलकी अशी असावी. बोजड नसावी. शिवणकामास जिचा घास मोठा अशी कातर असलेली फार उत्तम. घरगुती साधारण शिवणकामास लागणारी कातर ४ इंचांपासून ७ इंचांपर्यंत असते व शिंपीलोकांची कातर ११ इंचांपासून १३ इंचांपर्यंत असते.

कातरताना कातरण्याचा भाग प्रारंभापासून तों शेंड्यापर्यंत एका रेषेंत धरून नंतर कातरावें व लांबपर्यंत कातरणें असल्यास कातरीच्या सर्व घशाचा उपयोग करावा. नाहींतर तेवढा मोठा घास घेण्याचें प्रयोजन नाहीं. कशिद्याची कातर व शिवणकामाची कातर ह्यांत बरीच तफावत आहे. कशिद्याची कातर अग्रभागीं फार निमुळती असते व लांबींत तीन साडेतीन किंवा चार इंच असते. घरकामाकरितां शिवणकामाच्या कातरीचा उपयोग करूं नये. त्या कामाकरितां एखादी निराळीच कातर असूं द्यावी. फार तर काय परंतु शिवणकामाच्या कातरीनें कागदहि कापूं नयेत. कातरीस गरम कपड्याची लहानशी पिशवी करून तींत ती नेहमीं ठेवावी ह्मणजे कोणत्याहि प्रकारची तीस इजा न होतां ती सुरक्षित राहते. कातर दोन पातींची बनलेली असते व त्या दोन्ही पाती खिळ्यानें किंवा मळसूत्रानें एकत्र बसविलेल्या असतात. मळसूत्रानें बसविलेल्या पातींची कातर वापरण्यास चांगली असते. कारण पाहिजे त्या वेळीं पाती ढील झाल्या असल्यास त्यांस मळसूत्र फिरवून घट्ट करितां येते. कातरीला बोटें घालण्यास दोन गळे असतात, ते लहान कातरीस सारखेच असतात परंतु मोठ्या कातरीस एक लहान व एक मोठा असे असतात. लहान गळा आंगठ्यास बसता असतो त्यांत उजव्या हाताचा आंगठा घालून मोठे गळ्यांत मावल्यास करांगुली व तिच्या जवळचीं दोन बोटें अनामिका व मध्यमा घालावीं व आंगठ्याजवळचें बोट तर्जनी, गळ्याचे पुढचे बाजूस ताणून ठेवावी, ह्मणजे कातरींचा जोरदार रीतीनें उपयोग करितां येतो. कशिद्याच्या कामाच्या कातरीची किंमत १ रुपयापेक्षां जास्त असूं शकत नाहीं. साधारण घरगुती शिवणकामाच्या कातरीची किंमत तिच्या निरनिराळ्या लांबीप्रमाणें १ रुपयापासून २ रु. १२ आ. पर्यंत असूं शकते व शिंप्याच्या मोठ्या कातरींची किंमत त्यांच्या लांबीप्रमाणें तीन सव्वातीन रुपयांपासून ९ रु. पर्यंत असूं शकते.

खडू.

निरनिराळ्या रंगांच्या खडूच्या पेनसिलींच्या हल्ल्या फारच स्वस्त किंमतींत मिळतात त्यांचा उपयोग कपड्यावर खाणाखुणा करितांना करावा. ह्मणजे ज्या रंगीत वस्त्रावर जो रंग ठळक समजे असा असेल त्या पेनसिलीचाच उपयोग होऊन मोजांत किंवा आकारांत चुका होत नाहींत. आपली देशी रीत फारच ओंगळ आणि किळीस वाटणारी असते. ह्मणजे ज्या ठिकाणचा माप घेणें असेल त्या ठिकाणावर तें वस्त्र लांबींत धरून घामानें खूण करायाची व जर ती खूण चांगली समजे अशी न झाली तर शरीरावर मळकट अशा भागीं तें वस्त्र जोरानें घांसायाचें व ती निशाणी अथवा खुणा चांगल्या ठळक करावयाच्या. हा मापण्याचा व खुणा करून घेण्याचा प्रकार इतका किळीस आणण्या-सारखा असतो कीं, अगदीं पुसूं नये. वर सांगितलेल्या खडूनें वस्त्रावर खुणा करितांना जरा हलक्या हातानें कराव्या ह्मणजे कपडा झटकल्यास, अथवा कपडे साफ करण्याच्या ब्रशानें साफ केल्यास ह्या खडूच्या खुणा दिसूं नयेत.

सौ. कृष्णाबाई तालचेरकर.

नवलविशेष.

श्रीमती सौ. मुद्रामणी मुदलियार, या नांवाची एक मद्रासी बाई, चालू सालीं मद्रास युनिव्हर्सिटीच्या म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत पहिल्या नंबरास पास झाली, ही स्त्रीवर्गास अभिमानाई गोष्ट होय.

***

मिसेस सत्यनाथन नांवाच्या एक देशी ख्रिस्तीबाई, मद्रास युनिव्हर्सिटीच्या एम्. ए. च्या परीक्षेंत पास झाल्या आहेत. मद्रास युनिव्हर्सिटींतून एम्. ए. ची डिग्री मिळविण्याचा पहिला मान याच हिंदी बाईनीं मिळविला आहे. कलकत्ता येथें कुमारी चंद्रमुखी बोस, कुमारी निर्मलाबाला; अलाहाबाद येथें कुमारी शरत्-चक्रवर्ती; लखनौ येथें कुमारी लीलावती सिंह आणि अहमदाबाद येथें मिसेस मारगारेट घोस, ह्या स्त्रिया एम्. ए. ची परीक्षा पास झालेल्या आहेत. परंतु या सर्व बंगाली ख्रिस्ती स्त्रिया आहेत. साऱ्या हिंदुस्थानांत एम्. ए. पास झालेली एकहि हिंदु स्त्री नाहीं व त्याचप्रमाणें मुंबई युनिव्हर्सिटींतून एम्. ए. ची डिग्री घेणारी एकहि बाई आजपर्यंत निर्माण झाली नाहीं, हें एकंदर हिंदुज्ञातीस व त्याचप्रमाणें मुंबई इलाख्यास किंचित् कमीपणा आणणारें आहे.

***

मिस् एज्ज या बाईनां मुंबई सरकारानें येथील युनिव्हर्सिटीचे फेलो नेमलें आहे. फेलोशिपचा मान स्त्रियांमध्यें याच बाईनां पहिल्यानें मिळाला आहे.

***

श्रीमन्मातोश्री महाराणी सौ. चिमणाबाईसाहेब गायकवाड यांनीं, परलोकवासी श्रीपाद बाबाजी ठाकूर यांच्या विदुषी पत्नी, श्रीमती यशोदाबाई ठाकूर, यांची आपल्या प्रायव्हेट सेक्रेटरींच्या जागीं योजना केली आहे. मिसेस ठाकूर या बी. ए. पर्यंत शिकल्या आहेत. महाराणीसाहेबांनीं ही निवड फारच उत्कृष्ट केली व याबद्दल सुशिक्षित स्त्रियांस फारच आनंद आणि समाधान वाटणार आहे. त्याचप्रमाणें बडो-द्यांच्या स्त्रीशिक्षणाभिलाषी महाराजांनीं आपल्या संस्थानांतील लेडी सुप्रिंटेंडंटच्या जागीं पुण्याच्या फीमेल हायस्कुलांतील मिस मेरी भोर, आणि लेडी डॉक्टरच्या जागीं मुंबईतील डॉक्टर मिस मेहरबाई नानाभाई खारेघाट या नेटीव विदुषींचीच नेमणूक केली आहे, हीहि आनंदाचीच गोष्ट होय.

***

श्रीमती लेडी कर्झन, यांनीं महाराणी व्हिक्टोरिया यांच्या स्मारकार्थ सुरू केलेल्या फंडाची रक्कम पावणे तीनलक्षांजवळ जमली असून त्यांत बडोद्याच्या गुणग्राही महाराणीसाहेब श्रीमंत सौ. चिमणाबाईसाहेब गायकवाड यांनीं २० हजार रुपये भरले आहेत.

***

परलोकवासी भट्ट मोक्षमुलर यांच्या पत्नी आपल्या पतीचें चरित्र लिहित आहेत. आमच्या परमपूज्य भगिनी श्रीमती रमाबाई रानडे या याचप्रमाणें आपल्या विद्वान् प्रिय पतीचें जर एखादें लहानसें चरित्र लिहितील तर महिलावर्गास त्याचा फारच उपयोग होईल.

***

अहमदनगर येथें तेथील शाळाखात्याचे डे. ए. इन्स्पेक्टर रा. सा. कीर्तने यांच्या मुलाचें पुण्याचे प्रसिद्ध डाक्टर गर्दे यांच्या पुतणीशीं गेल्या फाल्गुन वद्य ४ स लग्न झालें व दुसऱ्याच दिवशीं बिचारीचा नवरा निवर्तला! असें समजतें की, नवरा मुलगा अतिशय आजारी असतांहि मुलीच्या वडिलांनीं बळजबरीनें लग्न लावून देऊन बिचारीला आजन्म विधवा केली! तिच्यासाठीं हळहळणारे पुष्कळ आढळतील परंतु बिचारीला आतां आजन्म दुःखांतच कंठावा लागेल. नशीब बिचारीचें!

***

अमेरिकेंत स्त्रीशिक्षणाचा प्रसार कसा जारीनें होत आहे हें पुढील आंकड्यांवरून कळून येईल:—

धंदा	१८७० मध्यें	१८९० मध्यें व	१८९७ मध्यें.
वर्तमानपत्रकर्त्या	३५	८८८	१४३६
शास्त्रीय विषयावर ग्रंथ लिहिणाऱ्या	१५९	२७२५	६१६८
गाणाऱ्या	५७५३	३४५१८	४७३०९
कारकुनीचें काम करणाऱ्या	४०९६	६४०४८	९२८२४
शार्ट हॅण्ड रायटर्स	७	२९१८५	३०६६३
सरकारी नोकरी करणाऱ्या	४१८	४८७५	६७१२

***

परलोकवासी महाराणी व्हिक्टोरिया यांनीं एकंदर ६२ वर्षें राज्य केलें. तेवढ्या मुदतीत त्यांनीं फक्त २० च वेळ राजमुगुट धारण केला होता.



श्रीमती लेडी कर्झन.

CHITRSTEHUCK PRESS

KOLBHAT ST BOMBAY

महाराष्ट्र महिला.

महिलेचे उद्गार.

गेल्या महिन्याच्या १ ल्या तारखेला उमरावती येथील 'वनितासमाजां'त सुप्रसिद्ध विदुषी मिसेस आनी बिसांट यांचें स्त्रियांनां उपदेशपर असें एक भाषण झालें. त्यांतील सारांश असा होता कीं "मी पुणें, मुंबई, नागपूर, मद्रास, कलकत्ता इत्यादि पुष्कळ ठिकाणीं फिरलें आहें; परंतु दक्षिणी स्त्रियांचा आजच्याएवढा मोठा आणि सुशिक्षित समाज मीं कुठेंहि पाहिला नव्हता, तो आज येथें पाहून मला फारच आनंद आणि समाधान होत आहे. या शहरांतील तुह्मा स्त्रियांनां बरेंच स्वातंत्र्य आणि शिक्षण मिळालेलें आहे असें दिसतें व खरोखर ही मोठ्या संतोषाची गोष्ट होय. पण प्रिय भगिनींनों ! या स्वातंत्र्याचा आणि शिक्षणाचा तुह्मी आपल्या पतीला साह्य करण्याकडेच उपयोग करा. पतीची आज्ञा उलंघन करून त्यांनां असंतुष्ट केल्यास तुमच्या शिक्षणाचा आणि स्वातंत्र्याचा काय उपयोग बरें ? आजकाल या देशांत साधारण दुर्लभ असें स्वातंत्र्य तुह्मांला मिळालें आहे त्याचा तुह्मी आपल्या सर्व जुन्या चांगल्या रीतीभाती कायम ठेवून आज ज्या सुधारणा अवश्य आहेत त्या करण्याकडे उपयोग करा. स्त्रियांनां शिक्षण द्यावें कीं देऊं नये हा या देशांत अझूनहि वादविषयक प्रश्न राहिला असेलसें मला वाटत नाहीं. तर आज जो वाद चालला आहे तो स्त्रियांनां कोणतें शिक्षण दिलें पाहिजे या विषयींचाच आहे. स्त्रियांनां शिवणकाम, गायनवादनाची थोडीशी माहिती, ड्रॉइंग, थोडेंसें वैद्यकीय ज्ञान, जमाखर्चाची माहिती, इतिहासभूगोलाची साधारण माहिती व दुसऱ्या सामान्य गोष्टींची माहिती एवढें शिक्षण अवश्य मिळालेंच पाहिजे.

याहून जास्त मिळाल्यास तें उत्तमच होईल. प्रत्येक स्त्रीला शिवणकाम करतां येऊं लागलें ह्मणजे मुलाबाळांचे कपडे, स्वतांच्या चोळ्या, पुरुषांचे सदरे वगैरे किरकोळ काम घरींच होऊन शिंप्याची मजुरी व चोरीस जाणारें कापड यांची बचत होऊन संसाराला थोडीशी मदत होईल. गायन, वादन हीं करमणुकीचीं साधनें आहेत. ह्यायोगें मनोरंजन फार चांगल्या प्रकारें होतें. तुमच्या प्राचीन इतिहासाकडे लक्ष्य द्याल तर पूर्वीं ही कला तुमच्या स्त्रियांस उत्तम प्रकारें अवगत होती व ती कुलीन स्त्रियांच्या हातीं होती, असें तुह्मांला आढळून येईल. ड्रॉइंगचें थोडेसें ज्ञान असलें ह्मणजे जे मजेदार देखावे कधीं कधीं आपल्या दृष्टीस पडतात त्यांचें चित्र काढून करमणुकी-साठीं आपल्याकडे ठेवतां येतें. वैद्यकीची साधारण माहिती असल्यानें स्वताच्या संसारांत तिचा फारच उपयोग होतो, एवढेंच नव्हे तर धर्माचे जे अनेक प्रकार आहेत त्यांतील परोपकार हा जो मोठा गुण तो आपल्या भगिनी-वर्गावर करतां येतो. जमाखर्च शिकल्यानें संसारांतील खर्च चोख रीतीनें व व्यवस्थेनें ठेवतां येतो व आपला आदा काय, खर्च किती झाला, शिल्लक किती राहिली, खर्च जास्त होत असल्यास तो कुठें कमी करतां येईल वगैरे समजून संसार सुरळितपणें चालवितां येतो. इतिहास भूगोलाच्या वाचनानें निरनिराळ्या प्रांतांची, प्रसिद्ध स्थळांची व पुरुषांची माहिती होते. प्राचीन काळीं काय उलाढाली झाल्या, कोणकोणत्या स्त्रीपुरुषांनीं कसकशीं कारस्थानें रचिलीं व त्यांचा पुढें काय परिणाम झाला वगैरे बोधप्रद व संसारांत पदोपदीं उपयुक्त अशी माहिती कळते. स्त्रियांनां आपली मातृ-भाषा चांगल्या प्रकारें अवगत असून इंग्रजीचेंहि थोडेसें ज्ञान असणें आवश्यक आहे. परंतु आपली पवित्र धर्माची जी संस्कृत भाषा तीहि स्त्रियांनीं साध्य करून घेतली पाहिजे. संस्कृताचें ज्ञान झाल्यानें रामायण, महाभारत इत्यादि पवित्र ग्रंथ वाचतां येतील आणि या पुस्तकांच्या वाच-नानें आपल्या सनातन धर्मांत काय आहे हें कळूं लागेल. प्रत्येकीनें निय-मानें रोज गीता वाचावी. गीता हें फारच अमोलिक पुस्तक आहे. तुह्मी

याप्रमाणें वागत गेल्यानें तुमच्या मुलींबाळींस उत्तम किता लागून भावी प्रजा सद्वर्तनशाली आणि कर्तव्यपरायण होऊन देशाचें भाग्य उदयास आणील."

आनी बिसांट बाईनीं उमरावतीकर स्त्रियांनां केलेला हा उपदेश प्रत्येक स्त्रीनें मुखोद्गत करण्याच्या योग्यतेचा आहे, यांत संशय नाहीं!

***

येथील हायकोर्टाचे चीफ जस्टिस साहेबांची पत्नी लेडी जेन्किन्स व पोलिस कोर्टाचे चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटची पत्नी मिसेस स्लेटर, या दोन आंग्ल स्त्रिया, कांहीं दिवसांपूर्वी राजपिंपळ्याच्या डोंगरांत वाघाची शिकार करून आल्या. या जंगलांत दोन वाघ मारण्यांत आले. पैकीं एक वाघ लेडी जेन्किन्स यांनीं मारिला. त्याचप्रमाणें नुक्तीच कोल्हापुरच्या जंगलांतहि लेडी जेन्किन्स शिकार करून आल्या व तेथेंहि त्यांनीं एका चित्त्याला ठार केला. खरोखर ही कौतुक करण्याजोगी गोष्ट होय. एखाद्या पुरुषानें वाघ मारिला तर त्यांत मोठेंसें कांहीं नाहीं! परंतु एखाद्या अबलेनें असें शौर्याचें काम केल्यास त्याबद्दल सर्वांस कौतुक वाटणें साहजिक आहे. अशीं शौर्याचीं कामें फक्त युरोपियन स्त्रियांकडूनच होऊं शकतात, असें नाहीं. आपल्याकडेहि अलौकिक शौर्यशाली स्त्रिया होऊन गेल्या आहेत. झांशीची राणी लक्ष्मीबाई यांचें एकच उदाहरण याला पुरे होईल. परंतु सांप्रत आमच्या स्त्रियांची स्थिति मात्र फारच शोचनीय झाली आहे. 'सांगे वडिलांची कीर्ति' अशासारखी आज आमची अवस्था आहे. सिंह, व्याघ्र यांनां ठार करण्याची गोष्ट दूर राहो, परंतु एखादी चिचुंदरी किंवा बेडकी पाहिल्याबरोबर भीतीनें किंकाळी फोडणाऱ्या पराक्रमी स्त्रियाच आज घरोघर आढळतील! स्त्रियांचे अंगीं आणि त्यांच्या संसर्गानें मुलांचे अंगींहि आज जिकडेतिकडे जो फाजील भित्रेपणा दिसून येतो, याचें मुख्य कारण स्त्रियांनां अशिक्षित, परतंत्र, आणि घरांत कोंडून ठेवणें हेंच आहे. पुरुषवर्गापेक्षां स्त्रीजात जात्याच किंचित् भित्री आहे, ही गोष्ट खरी; परंतु ती उंदराबेडकांसारख्या क्षुल्लक प्राण्यांसहि भिणारी बनण्यास बहुतेक अंशीं

पुरुषवर्गच कारणीभूत झालेला आहे. रणभूमीवर जाणें, सिंहव्याघ्रादि हिंस्र पशूंची शिकार करणें, इत्यादि कामें स्त्रियांचे योग्यतेचीं नव्हत, हें खरें, परंतु अंगीं शौर्याचा अंकुर असणें हें पुष्कळ वेळीं हितकारक होतें. निदान स्त्रीजातीला प्राणापेक्षांहि प्रिय जी अब्रू ती बचावण्याचे कामीं तरी त्याचा फारच उपयोग होतो. यास्तव स्त्रियांनीं व त्याचप्रमाणें पुरुषांनींहि त्यांचे अंगचा भित्रेपणा अधिकाधिक न वाढवितां तो कमी करण्याचेच प्रयत्न केले पाहिजेत; आणि असें होण्यास स्त्रियांचें अज्ञान दूर करून त्यांस अतिशय कळकळीनें योग्य शिक्षण दिलें पाहिजे.

***

बडोद्याच्या महाराणी श्रीमन्मातोश्री चिमणाबाईसाहेब गायकवाड ह्या आपल्या राज्यांतील स्त्रीशिक्षणाच्या प्रसाराविषयीं फार आस्था बाळगित असतात, ही खरोखर मोठ्या समाधानाची गोष्ट आहे. श्रीमन्महाराज सयाजीराव गायकवाडांसारख्या विद्याभिलाषी राजास त्यांच्याच प्रमाणें विद्याव्यसनप्रिय पत्नीचें साह्य मिळावें, ही मोठ्या भाग्याचीच गोष्ट समजली पाहिजे. गेल्या महिन्याच्या १६ वीला महाराणी साहेबांनीं देवासहून आलेल्या आपल्या पाहुण्या श्रीमंत यमुनाबाईसाहेब व तारा राजासाहेब यांच्या सन्मानार्थ बडोद्यांतील मुलींच्या शाळेंतील सर्व मुलींचा एक जंगी मेळा लक्ष्मीविलास राजवाड्यांत भरविला होता. या समारंभाचे वेळीं महाराणी साहेबांनीं शिक्षकवर्गास असा उपदेश केला कीं "तुह्मांवर जीं जबाबदारीचीं कामें सोंपविलीं आहेत तीं तुह्मीं योग्य रीतीनें बजाविलेलीं पाहून तीं सोपविणारांसहि एक प्रकारचें उत्तेजन येतें व ज्या सद्धेतूनें द्रव्याचा व्यय करण्याचा संकल्प असतो त्यासाठीं अधिक साह्य करण्याची इच्छा वृद्धिंगत होते. ह्मणून या स्त्रीशिक्षणाची जबाबदारी ज्या शिक्षक लोकांवर आहे त्यांनीं आपलीं कामें योग्य दक्षतेनें करित जावीं ह्मणजे त्यांत आह्मांला आनंद होऊन त्यांनां भूषण होणार आहे. व यायोगें आपल्या समाजाची उन्नति सत्वर होऊन सर्व प्रकारें सार्थक्य झाल्यानें सर्वांसच समाधान होणार आहे."

महाराणी चिमणाबाईसाहेबांच्या या उत्तेजनपर आणि कळकळीच्या उपदेशाबद्दल बडोद्यांतील शिक्षकवर्गानेंच नव्हे तर सर्व महाराष्ट्रीयांनींहि आभार मानिले पाहिजेत. बडोदें राज्यांत स्त्रीशिक्षणाची जी झपाट्यानें वाढ होत आहे, त्याचें बहुतेक श्रेय आमच्या या विदुषी महाराणींसच दिलें पाहिजे. महाराणी साहेब आपल्या विद्वान पतीप्रमाणेंच आपला फुरसतीचा बहुतेक वेळ स्वभाषेंतील व त्याचप्रमाणें परभाषेंतील उत्तमोत्तम पुस्तकें, वर्तमानपत्रें वगैरे वाचण्याकडे घालवित असतात. युरोप अमेरिका खंडांतील सुधारलेल्या देशांतील राजघराण्यांतील स्त्रियांनींहि पुरुषांप्रमाणेंच विद्याध्ययन केलेंच पाहिजे अशी पद्धति असल्यामुळें तिकडील राजमहिषी विद्वान, बहुश्रुत असल्यास नवल नाहीं; परंतु आमच्या देशांतील प्रकार फार भिन्न आहे. साधारण गरीब कुटुंबांतील स्त्रियांनांहि जेथें शिक्षणाची आवश्यकता भासत नाहीं तेथें श्रीमंतांच्या आणि त्यांतहि राजस्त्रियांस ती भासण्याचा मुळींच संभव नाहीं. श्रीमंतांच्या पुरुष मंडळीस विद्या नसली तरी चालेल, असा आपल्या देशांत अझूनहि समज आहे. आणि ह्मणूनच श्रीमंतांमध्यें विद्वान पुरुष फारच क्वचित आढळतात. श्रीमंत स्त्रियांमध्यें तर विद्येचा गंध मुळींच नसतो. ईश्वरानें ज्या कित्येक भाग्यवान् स्त्रियांस ऐश्वर्य दिलें आहे त्यांचा असा समज असतो कीं, खाणें पिणें, नटणें मुरडणें, ऐष आराम भोगणें आणि आळसांत वेळ घालविणें हेंच ईश्वरानें आपल्या नशिबीं लिहिलें आहे. आणि पुष्कळांचा असाच समज असल्यामुळें आपला समाज अवनतीस पोंचला आहे. परंतु महाराणी चिमणाबाईसारख्या राजपत्नी आपलें कर्तव्य पूर्णपणें ओळखून यथाशक्ति झटत आहेत ही मोठ्या समाधानाची गोष्ट होय. श्रीमंत सौ. महाराणी चिमणाबाईकडून महिलावर्गाची उन्नति होण्याचे असेच प्रयत्न व्हावे एवढीच महिलेची इच्छा आहे.

सुशीला.

गांवांतील बहुतेक मंडळीनें मोठ्या प्रेमानें येऊन सुशीलेचा लग्नसमारंभ साजरा केला. सुशीलेवर सर्वांचा फार लोभ असल्यामुळें पुष्कळांनीं आपापल्या सामर्थ्याप्रमाणें तिला निरनिराळ्या वस्तु नजर केल्या होत्या. कोणीं तिला वस्त्रेंभूषणें दिलीं, कोणीं संसारोपयोगी वस्तु दिल्या, कोणीं पुस्तकें वगैरे दिलीं व कोणीं द्रव्याचीहि भेट दिली. अशा रीतीनें लग्नाचे वेळीं तिला बऱ्याच वस्तूंचा लाभ झाला. सुशीलेच्या नवऱ्याच्या गरिबीविषयीं जमलेल्या मंडळी-पैकीं कोणींहि खेद प्रदर्शित केला नाहीं. उलट वधूवरांचे स्वभाव, गुणधर्म, विद्यादि गोष्टींत साम्य पाहून सर्व मंडळीनें संतोषच प्रकट केला. जमलेल्या मंडळीचा संतोष पाहून सुशीलेच्या आईबापांसहि फार समाधान वाटलें व परमेश्वराच्या कृपेनें आपल्या परमप्रिय सद्गुणी कन्येला तिच्या अनुरूप सद्गुणी आणि सुविद्य पति मिळाला याबद्दल तीं कृतार्थ झालीं. सदाशिवाच्या लग्नाच्या वेळीं त्याच्या यजमानानेंहि त्याला बरेंच साह्य करून त्याचा पगारहि दरमहा पांच रुपये वाढविला होता. असो.

लग्नानंतर दोन वर्षेंपर्यंत सुशीला माहेरींच राहिली. आतां तिला नव-ऱ्याच्या घरीं पाठविण्याचा तिच्या आईबापांनीं विचार केला व तिच्या पाठवणीची तयारी चालविली. विष्णुपंतांनीं आपल्या सामर्थ्याप्रमाणें अल्प-स्वल्प भांड्यांपासून तों एकंदर कपड्यालत्त्यापर्यंत सर्व संसारोपयोगी वस्तूंची सिद्धता केली. आणखी एक महिन्यानें तिला सासरीं पाठविण्याचें ठरलें होतें. इतक्यांत सुशीलेला तिच्या मावशीकडून बोलावणें आलें. सुशीलेच्या मावशीच्या वडील मुलाला प्रथमच पुत्ररत्न झालें होतें व त्याच्या बारशासाठीं तिनें आपल्या नात्याच्या सर्व मंडळीस आमंत्रण केलें होतें. त्याप्रमाणें सुशीलेलाहि मावशीकडे जावें लागलें.

सुशीलेच्या मावशीचें घर जवळच पांच सहा कोसांवर होतें. तिच्या मावशीचा नवरा मोठा श्रीमंत गृहस्थ असून त्याचा जमीनजुमलाहि

पुष्कळ असे. देवदयेनें त्याच्या कुटुंबाचा परिवार फार मोठा होता. संतति संपत्ति भरपूर होती. जमिनीचें वगैरे उत्पन्न पुष्कळच येत असे. घरीं नोकरचाकरहि बरेच होते. परंतु सुशीलेच्या लवकरच दृष्टोत्पत्तीस आलें कीं, सुदैवानें मावशीच्या घरीं धनधान्याची आणि गडीमोलकरणींची जरी विपुलता आहे, तरी घरांत व्यवस्था ह्मणून कसली ती मुळींच नाहीं. सर्वत्र गोंधळाचा आणि अव्यवस्थेचा कारभार पाहून सुशीलेला फारच वाईट वाटलें. एवढ्या मोठ्या कुटुंबांत अशी अंधाधुंदी असावी याबद्दल तिला राहून राहून फार खेद वाटूं लागला. एके दिवशीं सुशीलेचा धाकटा मावसभाऊ स्नानास जात होता. अंग पुसण्याचा टुवाल पाहूं लागला, परंतु टुवाल कुठेंच सांपडेना. माजघरांत पाहिला, दिवाणखाना धुंडाळला, सर्व घर शोधिलें, परंतु टुवाल ह्मणून आढळेना. तो खूप संतापला, जळफळला, मोलकरणीवर आणि आपल्या बायकोवरसुद्धां बराच रागावला व अखेरीस टुवालाशिवायच त्याला आंघोळ करावी लागली. त्याचप्रमाणें एके दिवशीं गुरांनां चारा कापून आणण्यासाठीं गडी घरांत कोयतीचा शोध करूं लागला परंतु ती जाग्यावर असेल तर ना ? कोयतीसाठीं त्यानें सारें घर उलथें पालथें केलें, परंतु कांहीं केल्या कोयती ह्मणून सांपडली नाहीं. अर्थात् त्या दिवशीं त्याला चारा कापण्यास जातां आलें नाहीं. त्याचा दिवस फुकट गेला. दुसरे दिवशीं सकाळीं ती कोयती कोठी झाडित असतांना एका पेटीच्या खालीं एका मोलकरणीला सांपडली.

अगदीं लहानपणापासून आईकडून आणि शिक्षकांकडून सुव्यवस्थेचें व टापटिपीचें शिक्षण मिळालेल्या सुशीलेच्या दृष्टीस मावशीच्या घरांतील हा सांवळा गोंधळ पडतांच तिला मुळींच चैन पडेना व तिच्यानें कांहीं केल्या स्वस्थ रहावेना. संध्याकाळीं मावशी खोलींत एकटीच कांहीं करित बसली आहे अशी संधी पाहून सुशीला हळुच गोष्ट काढून ह्मणाली "मावशी, तूं जर रागावणार नाहींस तर तुला मी एक विनंति करितें. त्या दिवशीं विनू-भाऊला आंघोळीचे वेळीं टुवालच सांपडला नाहीं. काल गड्याला कोयती मिळाली नाहीं ह्मणून त्याचा दिवस फुकट गेला. असें जर घटकोघटकीं

होऊं लागलें तर संसार कसा बरें सुरळित चालावा. एका क्षणाच्या गोष्टीला घटका लागूं लागली व घटकेच्या गोष्टीला जर दिवस लागूं लागला तर कसें बरें चालेल ? वेळापरी वेळाचा नाश होऊन नेहमीं अडचणी सोसाव्या लागावयाच्या. आमच्या आईला प्रत्येक वस्तु जागच्या जागीं आणि वेळचे वेळीं जर आढळून आली नाहीं तर ती कधींहि उगी ह्मणून रहावयाची नाहीं. घरांत टापटीप आणि प्रत्येक वस्तु जागचे जागींच ठेवण्याविषयीं तिची आह्मांस सक्त ताकीद असते. आणि एक दिवस कधीं आमचे घरीं इकडची वस्तु तिकडे झाली आहे असें आढळावयाचें नाहीं. तूं तसें कां करित नाहींस ?"

गावशी ह्मणाली " सुशीले तुझ्या वडिलांनीं लग्नानंतर तुझ्या आईला विद्या शिकविली आहे. तुलाहि लहानपणापासून शाळेंत घालून चांगलें शिक्षण दिलें आहे. तेव्हां तुह्मी सगळी मंडळी शहाणी असल्यामुळें तुमच्या घरांत अव्यवस्था कशी बरें होईल ? तुझ्या वडिलांप्रमाणेंच तुझ्या विनु-भाऊच्या वडिलांनीं मलाहि जर विद्या शिकविली असती, तुझ्या दोघी वहिनीहि जर शाळेंत जाऊन शिकल्या असत्या तर आजच्यासारखी आमच्या संसाराचीहि अव्यवस्था झाली नसती. मला याबद्दल फार वाईट वाटतें, परंतु, बाळ काय करूं! मला कांहींएक सुचत नाहीं. गडीमोलकरणींच्या कानीं कपाळीं नेहमीं ओरडतें, सुनांनांहि वारंवार रागें भरतें, परंतु कांहीं केल्या अव्यवस्था ह्मणून मोडत नाहीं. "

सुशीला ह्मणाली " मावशी, स्त्रियांनीं विद्या शिकणें हें त्यांचा संसार सुरळित चालण्यास अत्यंत अवश्य आहे, हें खरें; परंतु केवळ लिहिणें वाचणें आलें नाहीं ह्मणजे घरांत योग्य व्यवस्था अगदींच ठेवतां येणार नाहीं, असें कांहीं नाहीं. घरांतील प्रत्येक वस्तु जागचे जागीं ठेवण्याविषयीं व कोणतेंहि काम वेळचे वेळीं करण्याविषयीं थोडीशी काळजी घेतली व शरीराला थोडेसे कष्ट दिले ह्मणजे मला वाटतें हें काम तुला जितकें अशक्य वाटतें तितकें मुळींच नाहीं. तूं मला सांगशील तर उद्यां सकाळ-पासूनच मी एकंदर व्यवस्था उत्तम लावून देतें. "

सुशीलेचें हें भाषण ऐकून मावशीला फार संतोष वाटला. ती तिला मोठ्या प्रेमानें ह्मणाली "बाळ, तूं जर माझ्या दोन्ही सुनांनां आणि मोलकरणींला चांगली गीत लावशील तर तुझे आह्मांवर मोठे उपकार होतील."

दुसरे दिवशीं सकाळीं सुशीला आपल्या दोघी भावजयांनां व एकदोन मोलकरणींनां बरोबर घेऊन पहिल्यानें मावशीच्या खोलींत गेली. मावशीची खोली बरीच मोठी होती खरी, परंतु तींत निरनिराळें सामान इतकें कांहीं भरलेलें होतें कीं, खोलींत जिकडे तिकडे अगदीं अडगळ होऊन गेलेली होती. मोकळी हवा खेळण्याची कांहींच व्यवस्था नव्हती. पलंगाखालीं तर जें कांहीं गन माजलें होतें, तें विचारूंच नये. केर तर ढोंपरायेवढा सांचला होता. कोनांत आणि भिंतीवर थुंकीचीं किटें सांचलीं होतीं. भिंती खराब झालेल्या होत्या. सुशीलेनें ही सर्व अडगळ काढवून टाकून पहिल्यानें गड्याकडून भिंतींला चुना लावून घेतला. पलंगाखालीं फक्त एक ट्रंक व दुसऱ्या एकदोन लहान महान पेट्या ठेवून दिल्या. कपाटं नीट व्यवस्थेनें योग्य जागीं ठेविलें. मध्यभागी टेबल ठेविलें. खुर्च्या उगीच दहा पांच पडल्या होत्या त्या काढवून फक्त एक आरामखुर्ची व दोन साध्या खुर्च्या तेथें व्यवस्थेनें ठेविल्या. कपडे ठेवण्यास खुंट्या ठोकून दिल्या. तसबिरीहि व्यवस्थित लाविल्या व दुसऱ्या आवश्यक तेवढ्याच वस्तु योग्य ठिकाणीं ठेवून बाकीच्या सर्व वस्तु तेथून दुसरीकडे नेल्या. एकाच ठिकाणीं गर्दी झालेलें सामान दोनचार ठिकाणीं जातांच व आवश्यक वस्तु योग्य ठिकाणीं जाऊन बसतांच पूर्वीची तीच खोली आतां कितीतरी प्रशस्त व सुंदर दिसूं लागली व जिकडे तिकडे अगदीं लख्ख झाल्यामुळें त्या खोलीची शोभा अपूर्व भासूं लागली. आपल्या खोलीचें हें विलक्षण स्थित्यंतर रात्रीं मावशीच्या नवऱ्याच्या दृष्टीस पडतांच त्याला जो कांहीं आनंद झाला व हें सारें सुशीलेचें कृत्य होय हें समजतांच त्याला जें कांहीं समाधान आणि कौतुक वाटलें तें सांगावयाला नकोच.

सगळ्या घरांतील अव्यवस्था एकाच दिवसांत दूर करतां येणें शक्य नव्हतें. सतत तीनचार दिवस अतिशय मेहनत घेऊन सुशीलेनें आपल्या मावशीच्या घरांतील एकंदर वस्तूंची उत्कृष्ट व्यवस्था लावून दिली. आपल्या दोन्ही मावसभावांच्या व त्यांच्या बायकांच्या उपयोगाच्या वस्तु त्यांच्या त्यांच्या खोलीमध्यें; स्वयंपाकघरांतील वस्तु स्वयंपाकघरामध्यें; डाळ, तांदूळ, तेल वगैरे सर्व सामुग्री कोठीचे खोलींत; कपडेलत्ते, दागदागिने, सणाकार्याचे प्रसंगीं वापरावयाचीं भांडीं व दुसऱ्या वस्तु एका खोलीमध्यें; कोयते, कुऱ्हाडी, कुदळी, खोरीं वगैरे हरहमेष लागणारें सामान एका खोलीमध्यें; गड्याचें व मोलकरणीचें वगैरे सामान निराळ्या एका जागेंत अशी जिकडे तिकडे सुरेख व्यवस्था लावून दिली. प्रत्येक वस्तूला अगदीं नियमित जागा नेमून काम आटोपतांच ती वस्तु परत त्याच जागीं ठेविली पाहिजे, असाहि तिनें निर्बंध करून ठेविला. इकडची वस्तु तिकडे कधींहि होतां कामा नये, अशी तिनें सक्त ताकीद सोडली.

प्रत्येक गोष्टीला नियम हा पाहिजे. नियम नसला तर कोणतीच गोष्ट व्यवस्थितपणें व्हावयाची नाहीं. त्याचप्रमाणें कोणत्याहि कामाची कोणातरी एकावर जबाबदारी असली पाहिजे. ज्या कामाला कोणीच जबाबदार नाहीं त्या कामाची अव्यवस्था झाल्यावांचून रहावयाची नाहीं. ही गोष्ट सुशीलेनें सगळ्यांच्या मनांत पूर्णपणें बिंबवून देऊन घरांतील प्रत्येक माणसानें कोणत्या तरी एका कामाची जबाबदारी पत्करलीच पाहिजे, असें सांगितलें. मावशीच्या खोलींतील एकंदर वस्तूंविषयीं मावशीनें व मावसभावांच्या बायकांनीं आपापल्या खोलीविषयीं जबाबदारी घ्यावी असें ठरवून कोठींतील वस्तु मोठ्या भावजयीनें व स्वयंपाकघरांतील वस्तु धाकट्या भावजयीनें सांभाळाव्या, असें सांगितलें. घरांतील मोल्यवान वस्तु मावशीच्या हवालीं केल्या व किरकोळ सामान मुख्य मोलकरणीच्या स्वाधीन केलें. अशी सुरेख व्यवस्था लावून दिल्यामुळें व प्रत्येक वस्तूविषयीं निरनिराळे मनुष्य जबाबदार ठरलें असल्यामुळें एकंदर व्यवस्था सुरेख रीतीनें चालू लागली.

पूर्वी कोणीच कसल्याहि कामासंबंधीं जबाबदार नसल्यामुळें जो सर्वच गोंधळ होत होता तशी स्थिति आतां राहिली नाहीं. कोणाची चुकी झालीच तर ताबडतोब ती कळूं लागली व तिचा योग्य बंदोबस्तहि होऊं लागला. अशा प्रकारें थोडक्याच दिवसांचे आंत सुशीलेच्या मावशीच्या घरांतील एकंदर व्यवहार सुरळितपणें चालूं लागला.

सुशीलेनें कशिद्याच्या व शिवणकामाच्या माहितीचीं एकदोन पुस्तकें, कणारांगोळीसंबंधींचें पुस्तक, बालसंगोपन, गृहव्यवस्था, गाण्याचें पुस्तक, एकदोन उपदेशपर व मनोरंजक गोष्टींचीं पुस्तकें वगैरे कित्येक स्त्रियोपयोगी पुस्तकें घरीं येतांना आपल्याबरोबर आणिलीं होतीं. जेवणखाण आटोपल्यावर या पुस्तकांपैकीं एखादें पुस्तक घेऊन सुशीला तें आपल्या मावसभावांच्या बायकांनां वाचून दाखवित असे. न समजलेल्या भागाची ती त्यांस चांगली समजूत घालून देई. दुर्दैवानें सुशीलेच्या दोघीहि भावजयी अशिक्षित होत्या. परंतु सुशीला त्यांस वाचून दाखवित असलेल्या पुस्तकांतील उत्तम गोष्टी व ज्ञानपर माहिती ऐकून आपल्यालाहि सुशीले-प्रमाणेंच जर अशीं सुंदर पुस्तकें वाचतां येतीं तर फार बरें झालें असतें, असें त्यांसहि वाटूं लागलें व लिहिणें वाचणें शिकण्याची अनावर इच्छा उत्पन्न झाली. हें पाहून सुशीलेलाहि फार आनंद झाला. ती त्यांस अधिकाधिक उत्तेजन देऊं लागली.

अल्पवयी सुशीलेचें हें अलौकिक बुद्धिकौशल्य आणि संसारदक्षता पाहून सुशीलेच्या मावशीला व तिच्या घरांतील एकंदर मंडळीला फारच विस्मय वाटला. सुशीलेचें प्रत्यक्ष उदाहरण पाहून त्या सर्वांची पक्की खात्री होऊन चुकली कीं, विद्या शिकल्यावांचून स्त्रिया कधींहि उत्तम गृहिणी व्हावयाच्या नाहींत. दरेक आईबापांनीं आपल्या मुलींनां शिक्षण देणें हें त्यांचें अवश्य कर्तव्य होय. विद्या शिकल्यानें स्त्रिया गर्विष्ठ, अनीतिमान आणि गृहकृत्यांत निरुपयोगी होतात असा जो सुशीलेच्या मावशीच्या नवऱ्याचा आजपर्यंत ग्रह असे व त्यामुळें तो जो स्त्रीशिक्षणाचा कट्टा विरोधी असे, त्याला सुशीलेचें नम्र वर्तन, सद्गुणीस्वभाव आणि अप्रतिम संसारदक्षता पाहून

आपली चुकी स्पष्ट कळून आली. मावशीच्या नवऱ्यानें आपल्या दोघी सुनांनां लिहिणें वाचणें शिकविण्याचा निश्चय केला व त्याहि त्या गोष्टी-विषयीं उत्सुक असल्यामुळें झटून शिकूं लागल्या. दोन वर्षांच्या आंतच त्यांनां उत्तम प्रकारें लिहितां वाचतां येऊं लागलें व सुशीलेच्या उपदेशा-प्रमाणें वागत गेल्यामुळें लवकरच त्याहि सुगृहिणी झाल्या.

चार दिवसांकरितां ह्मणून बोलावून आणलेल्या सुशीलेला आतां जवळ जवळ महिना होत आला तरीहि ती आणखीहि कांहीं दिवस आपल्या घरीं रहावी, असेंच सर्वांस वाटूं लागलें. परंतु तिच्या वडिलांकडून पत्रांवर पत्रें येऊं लागल्यामुळें अखेरीस तिला तिच्या आईकडे पाठविण्याची मावशीनें तयारी केली. सुशीलेनें आपल्या घरांत उत्तम शिस्त लावून दिल्यामुळें तिच्या मावशीच्या नवऱ्याचा तिच्याविषयीं फारच चांगला ग्रह झाला होता. जातांना त्यानें मोठ्या प्रेमानें सुशीलेच्या अंगावर एकदोन दागिने घातले. मावशीनेंहि तिला कित्येक वस्त्रालंकार दिले. दोन्ही मावसभावांनीं व दोघी भावजयां-नींहि सुशीलेला कांहीं वस्तु नजर केल्या. मावशीच्या घरून निघतांना सुशीलेला इतक्या कांहीं वस्तु बक्षिस मिळाल्या कीं, त्या एका गाडींतहि मावल्या नाहींत. निरोप घ्यावयास जेव्हां सुशीला आली तेव्हां सर्वांचे डोळे भरून आले. मावशीच्या नवऱ्याला सुशीलेनें नमस्कार करतांच तो तिला आशीर्वाद देतांना अगदीं गहिंवरून बोलला "बाळ, देव तुला अखंड सौभाग्यवती करून पतिसह सुखांत ठेवो. वंशरक्षणासाठीं लोक पुत्राची इच्छा करित असतात; परंतु मी परमेश्वरापाशीं एवढेंच मागतों कीं, आमच्या वंशांत तुजसारखें एक सद्गुणी कन्यारत्न व्हावें. ह्मणजेच आमचा वंश उज्वल झाला, असें मी समजेन." नंतर मावशीला व घरांतील एकंदर मंडळीस वंदन करून सुशीलेनें सर्वांचा निरोप घेतला. सुशीलेला निरोप देतांना सर्वांनां फारच कष्ट वाटले. शेवटीं थोरल्या भावजयीच्या मुलाला कडेवर घेऊन मोठ्या कौतुकानें त्याचें चुंबन घेऊन पुनः एकदा सर्वांचा निरोप घेतला व सर्वांकडून मंगल आशीर्वाद घेऊन सुशीला आपल्या आईकडे जाण्यासाठीं गाडींत बसली.

एका बालविवाहित स्त्रीचा विलाप.

[चाल—अजि अक्रूर हा नेतो श्रीकृष्णाला.]

मम जन्माची ऐक सकल ग कहाणी
जरि इच्छा तव मैत्रीणी ! । ध्रु० ।
सहावे वर्षीची मम लग्नसोहळा केला,
सकलां बहु हर्षचि झाला;
पुढती षण्मासें सासुरवास कपाळा,
लागला सततची मेला;
त्यांचा तरि बाई अभ्यासीं जिव रमला,
मग कोण विचारिल मजला !
सर्वही घरांतिल सत्ता,
मम सासुबाईच्या हाता,
जडली मज बहुतचि चिंता
त्यजिलें अन्न पहा ह्मणतिल गे मज ह्मणुनी—
आधाशी खादाडीणी !

[२]

यापरि लोटियले तीन मास नच पुरते,
तों अन्य दुःख मजवरतें -
पडले, भावोजी क्षयरोगी बहु होते
जाहलेचि देवाधिन ते;
नणदा ह्मणती ' पायगुण माझा गे '
सर्वही बघति मज रागें;
सासुबाई, जावा, नणदा,
लागल्या छळायासि सदा,
सुखशब्द न ये तोहि कदा,

धरिला रुद्राचा अवतारचि सर्वांनीं !
मज साह्य नसे गे कोणी !

[३]

यापरि घालविलीं दोन पहा मीं वर्षें
दुःखांत परी बहु हर्षें;
कारण पतिरायावरि ठेवुनि विश्वासा
परि झाली तीहि निराशा;
पुढती लवकरची गेले ते दुरवरती
जोडाया विद्या पुरती;
पुसतेस काय मग बाई !
छळिती मज सासूबाई !
सुखझोंप कशी ती नाहीं,
धरिला रुद्राचा अवतारचि सर्वांनीं !
मज साह्य नसे गे कोणीं !

[४]

आणुनि एकटिनें ओतावें जें पाणी
तें होती सर्व नहाणीं !
कामापुरती गे ह्मणती वर वर 'वहिनी'
परि आंतुनि जशि वैरीणी !
गुंफावी गे मींच कशीतशि वेणी
घालिती न कारण कोणी !
बोलुं नये कवणापाशीं,
कीं ह्मणतिल मज बहुभाषी,
या भीनें सखये तैशी
निःशक्ताई जडली, मानसिं झुरणी,
आसवें वाहती नयनीं !

[५]

सर्वांमागोनी निजुनी आधिं उठावें,
उन्ह पाणी सकलां द्यावें;
तेव्हां तोंडधुणीं सकलांचीं तीं होती
नातरी बहू चडफडती;
ह्मणती ' दांडगिला काय उठाया झालें—
निर्लज्ज करीते चाळे !
शेराचें अन्नहि पचतें,
तिन तिनदां चोरुनि खाते,
मग काय धाड इस भरते !
लवकर उठण्यातें का भरते ग उसणी,
मज नकळे सांगा कोणी !'

[६]

कधिं लगबगिनें गेलें माडीवरती
' निर्लज्ज दांडगी ' ह्मणती
कधिं मंदगती-नें मी सखये गेलें
तर ' हातीं पायीं आलें
ऐसें चालाया काय इला गे ? ' ह्मणती
सर्वस्वी माझी फजिती !
काढिले तेहि मी दिन,
मज बारा वरुषें पूर्ण,
जाहला प्राप्त ऋतु जाण,
आनंदचि ही ऐकुनि वार्ता स्वजनीं
लागली परी मज झुरणी.

[७]

पुढती अष्टदिनीं पतिराया आणविलें—
अभ्यासें जे क्षिण झाले;
शुभ दिन पाहुनियां वडिलें मज घातियली
नाथाची गांठचि पहिली;
सहजचि जाच जरा पडला तो मग मागें,
तंव दुसरी चिंता लागे !
षण्मास येपरी गेले,
पतिसंगें सखये अपुले,
तों गर्भिणीत्व तें आलें
भाळीं अल्पवयीं; हर्ष बहु परि स्वजनीं
होईल पौत्र गे ह्मणुनी !

[८]

त्रासुनि कष्टानें लोटियले नव मास,
जिव हो बहु कासावीस;
गिळति न अन्नाचे दोन सुधांहि घांस,
जाहले शुद्ध उपवास !
दिसली नच मातें धडगत माझी श्वास,
लागले होउं आयास;
लागती फुटाया पाय,
खोकला करी मधिं साह्य,
नच परि करि कोणिहि सदुपाय,
हयगय झाली गे येपरि बहु मैत्रीणी !
शक्ति तरी राहिल कुठुनी !

[९]

झालें प्रसुत, असे होउनि हाल जिवाचे,
तों वाटे, मूल न वांचे !
हातापायांच्या काड्या जणुं ना शक्ति
येईल तरी कुठुनी ती !
जरि उभयांची निःशक्तचि गे प्रकृति
येईल तरी कुठुनी ती !
दुग्धाचा थेंब न कसला,
बाळंतरोग वरि डसला,
सुतशोक त्यांतची बसला,
उठतें मग मी त्यांतुनि कशि परतोनी !
लागली अंतिंची झुरणी.

[१०]

ह्मणुनी शेवटची करितें विनति आजी,
तुह्मि व्हाल ह्मणोनी राजी;
व्यर्थचि जाचुं नका स्वसुनां मुलिंपरि माना
सखयांनों द्या या दाना.
सोळाहुनि आधीं घालुं नका नरहातीं,
ऋतुप्राप्त जरी अबला ती;
नातरी पहा हीच गती—
होईल ह्मणुनि कथितें ती
तुह्मांसि हिताच्या गोष्टी;
आतां येतें मी, लोभ असों द्या स्मनीं,
कथिलें तें ठेवा ध्यानीं.

श्रीमती लेडी कर्झन.

राजवाड्यांत किंवा राजकुलांत जन्मास येऊन हातीं कांहींच अधिकार नसावा, किंवा अंगीं कांहींच योग्यता नसावी, यापेक्षां एखाद्या अप्रसिद्ध स्थळीं, साधारण कुळांत जन्म होऊन अंगीं स्वाभाविक योग्यता असणें, मोठा अधिकार प्राप्त करून घेण्याची पात्रता असणें, आपल्या कुळाची ख्याती करून घेण्याजोगी कर्तृत्वशक्ति असणें. हेंच खरें सुदैव ह्मणावयाचें. आमच्या प्रस्तुतच्या विद्वान, न्यायी आणि लोकप्रिय व्हॉइसरॉय साहेबांच्या पत्नी श्रीमती लेडी कर्झन, यांची गोष्ट बऱ्याच अंशीं अशीच आहे. अमेरिकेंतील चिकागो शहरांतील धनाढ्य व्यापारी मि. एल. झेड. लीटर हे यांचे वडील होत. लेडी कर्झन यांचें माहेरचें नांव मेरी लीटर असें आहे. लहानपणीं यांनां परिस्थिति कांहीं अंशीं अनुकूल होती आणि त्याचप्रमाणें त्यांच्या वडिलांच्या अफाट संपत्तीचीहि त्यांनां चांगलीच मदत झाली, ही गोष्ट जरी अगदीं खरी आहे, तरी देखील यांच्या अंगीं वास्तविक योग्यता आणि अधिकारपात्रता नसती तर नुसत्या संपत्तीचा किंवा अनुकूल परिस्थितीचाहि मोठासा उपयोग झाला नसता. आपल्या परिस्थितीवर आपलेंच वर्चस्व त्या लहानपणापासून स्थापन करण्यास शिकल्या आहेत. आणि त्याचप्रमाणें कोणतीहि पदवी प्राप्त झाली असतां तिला साजे शोभेसें वर्तन त्यांनां करितां येतें, इतकेंच केवळ नव्हे तर आपल्या वर्तनानें त्या जागेला देखील शोभा आणण्याची त्यांच्या अंगीं योग्यता आहे. कोणत्याहि स्थितींत आपला योग्य जम बसविण्याचा अमेरिकन मुलींचा जो उपजत गुण त्या गुणाला मेरी लीटर इनें, आपल्या कर्तृत्वशक्तीनें मोठमोठे योग जमवून आणणें, आयुष्याच्या प्रत्येक क्षणाचा योग्य उपयोग करणें, कोणत्याहि वस्तूच्या क्षणिक महत्वाला न भुलतां तिच्या वास्तविक योग्यतेकडे लक्ष्य पुरविणें, इत्यादि अनेक गुणांची भर घातली. आपल्याला काय पाहिजे आहे हें तिला पूर्णपणें समजत असे आणि तें मिळविण्याकरितां मध्यंतरीं उपस्थित होणाऱ्या क्षणिक लाभांकडे दुर्लक्ष्य करण्यास ती सदैव तयार असे.

मेरी लीटर हिची हकीकत अशी कांहीं विलक्षण आहे कीं, ती वाचून कादंबरीकारापेक्षां एखाद्या इतिहासकारालाच अधिक अचंबा वाटेल. परस्पर विरुद्ध अशा गोष्टीच त्यांत बऱ्याच आढळून येतात; परंतु त्या प्रत्येक गोष्टीपासून या भाग्यशाली मुलीनें कांहींना कांहींतरी शिक्षण संपादन केलें आहे. अनिष्ट प्रसंग देखील तिला हितप्रदच झाले आहेत. इष्ट हेतूच्या मनोऱ्यावर चढतांना वाटेंत आलेल्या अडथळ्यांचा पायऱ्यां-प्रमाणें उपयोग करून ती वर गेली आहे. ज्या स्थळीं तिचा जन्म झाला आहे तें स्थळ केवळ साठ वर्षांच्या अवधींत एका लहानशा गांवाचें जगांतील अति मोठ्या शहरांपैकीं एक शहर होऊन बसलें आहे. या शहरांत वसत असलेला जोम, धैर्य आणि महत्वाकांक्षा या तिहींचा थोडा थोडा भाग या मुलीच्या अंगीं जन्मापासून उतरला होता. अग्निमुखीं पडून खाक होऊन गेलेल्या त्या खेड्याचें ज्यांनीं प्रचंड शहर बनविलें अशा मनुष्यांनीं घालून दिलेला धैर्याचा प्रशंसनीय धडा तिच्या नजरे-समोर होता. तें तेज तिच्या रक्तांत संचरलें होतें.

मि. लीटर यांनीं आपल्या धंद्यांत जें यश संपादन केलें आहे तें केवळ आपल्या स्वताच्या कर्तृत्वशक्तीच्या जोरावर केलें आहे. मि. लीटर यांनां जरी उत्तम प्रकारचें शिक्षण मिळालेलें होतें आणि त्याचप्रमाणें त्यांचें घराणें जरी चांगल्या भरभराटींत होतें तरीहि त्यांनीं स्वतः चिकागो येथें व्यापाऱ्याकडे अगदीं हलक्या प्रतीच्या नोकऱ्या देखील प्रथम केल्या आहेत. सन १८६५ सालीं मार्शल फील्डबरोबर यांनीं भागीनें व्यापार सुरू केला आणि याच धंद्यानें त्यांनां पुढें चांगला हात दिला. व्यापारांत जरी त्यांनां अनेक वेळां ठोकर खावी लागली, तरी एकंदरींत त्यांत त्यांनां सारखा नफाच होत गेला. पुढें पुढें व्यापारांतून हळु हळु लक्ष्य काढून घेऊन ते जमीनजुमला घेऊं लागले. शेवटीं सन १८८१ त व्यापारांतून आपलें अंग साफ काढून घेऊन ते देशपर्यटणांत आणि आपल्या मिळकतीची व्यवस्था पहाण्यांत कालक्षेप करूं लागले. ते मोठे निश्चयी, धैर्यवान्, धूर्त आणि

खंबीर डोक्याचे मनुष्य आहेत. त्यांची पत्नी मिसेस लीटर यांचा स्वभाव अगदींच निराळ्या प्रकारचा आहे. अशा आईबापांच्या पोटीं मेरी लीटर हिचा जन्म झाला आहे. जन्मकाळचे तिचे ग्रह सर्वच उच्चस्थानींचे असले पाहिजेत. द्रव्य, सौंदर्य, बुद्धि, सामर्थ्य सर्व कांहीं तिला प्राप्त झालें आहे. तिनें प्रदर्शित न केलेल्या तिच्या इच्छाहि परिपूर्ण झाल्या आहेत; तिचा ग्रहयोगच असा कांहीं अपूर्व आहे कीं, ती जें जें कांहीं मनांत आणील तें तें तिला मिळावें, तिची प्रत्येक इच्छा परिपूर्ण होत जावी.

लहानपणीं आपला अभ्यास मन लावून आणि कधींहि न कंटाळतां करण्याइतकी बुद्धि मेरी लीटरच्या अंगीं होती, आणि त्यामुळें इतर मुलींनां मिळणाऱ्या शिक्षणापेक्षां तिचें शिक्षण अधिक चांगलें झालें आहे. विशेषतः भाषाविषयांत तिनें चांगलेंच प्रावीण्य संपादन केलें आणि पुढील आयुष्यक्रमांत तिला फार उपयुक्त असें हेंच ज्ञान होय. या मुलीच्या महत्वाकांक्षेमुळेंच सन १८८०त हें कुटुंब वाशिंग्टन येथें येऊन राहिलें.

मेरी लीटर हिच्या शरीराची ठेवण मूळचीच मोठी ढबदार असल्या-मुळें तारुण्यावस्थेंत ती विशेष मोहक दिसूं लागली. ती अंगानें सडपातळ असून तिचा प्रत्येक अवयव जणों रेखल्यासारखा दिसे. आणि या सौंदर्याची शोभा तिच्या बोलण्याचालण्याच्या मनमोहक ढबीनें विशेषच खुलून जात असे. तिचे चकचक करणारे काळे केशकलाप नेहमीं तिच्या मानेवर वळलेले असावयाचे. तिचे डोळे पाणीदार असून दृष्टी नेहमीं अर्थपूर्ण असावयाची. मुद्रा किंचित् हट्टी दिसे खरी, परंतु त्यायोगें तिच्या सौंदर्याला विशेष प्रकारची शोभाच आलेली असे. तिचा पोषाख नेहमींच चांगला, नीटनेटका आणि विचारपूर्वक केलेला असावयाचा. आणि या बाबतींतील तिची अभिरुची अशीच कांहीं असे कीं, ती कोणत्याहि स्थितींत असली तरी तिचा पोषाख नेहमीं त्या स्थितीला शोभण्यासारखा असावयाचा; तरीहि तो तिच्या स्वरूपालाहि लपवून टाकण्यासारखा भपकेदार कधींच मिळावयाचा नाहीं. तिच्या एकंदर कृत्यांत 'स्वत्व' हेंच प्राधान्येंकरून

दिसून यावयाचें. ती कोठेंहि गेली असतां तेथें जमलेल्या मंडळीचें लक्ष्य तिच्या पोषाखाकडे न वेधतां स्वतः तिच्याकडे वेधत असे. तिची चालण्याची ढब, तिच्या मानेची ठेवण, तिच्या शरीराची मोहक रचना यामुळेंच प्रत्येकाचें लक्ष्य तिजकडे जात असे. शिवाय ही आकर्षणशक्ति वाढण्याला आणखीहि कारणें होतीं. तिचें बोलणें कधींहि वायफळ नसावयाचें. ज्यांनां या जगाची माहिती असून आपली स्वताची योग्यताहि जे पूर्णपणें जाणून आहेत अशा मनुष्यांशीं बोलण्याचा प्रसंग आला असतांहि त्यावेळीं तिला त्यांच्यावरहि सरशी करतां येत असे. आपण बोलत असलेल्या मनुष्याच्या अंगीं कांहीं योग्यता आहे असें तिच्या ध्यानांत आलें, कीं, त्याला प्रोत्साहन देऊन अधिक बोलण्याला कसें प्रवृत्त करावें हें ती पूर्णपणें जाणत असे. आणि या तिच्या गुणामुळें सौंदर्यात आणि पाणीदारपणांत मोहकपणाची अधिक भर पडत असे; आणि यामुळेंच ती कोठेंहि गेली असतां तिची फार चहा होत असे; यामुळेंच मोठमोठे वयोवृद्ध मुत्सद्दी आणि राजकारस्थानी पुरुष देखील तिचे स्नेही होऊन राहिले होते; यामुळेंच अमेरिकेंतील व इंग्लंडांतील सुप्रसिद्ध स्त्रीपुरुषमंडळी देखील तिची वाहवा करी.

ऐहिक दृष्टीनें अधिक हितप्रद अशा दुसऱ्या अनेक मागण्या नाकारून तिनें शेवटीं एका बुद्धिमान् मनुष्याची मागणी स्वीकारिली. लॉर्ड कर्झन यांच्या अगाध बुद्धिमत्तेविषयीं कोणालाहि संशय येणार नाहीं. 'सॅटरडे रिव्ह्यू' नें लिहिल्याप्रमाणें कर्झन साहेबांनां डामडौलाची कदाचित् आवड असेल, परंतु सन १८९५ च्या एप्रिल महिन्यांत जेव्हां हें लग्न झालें तेव्हां सर्वांनीं कबूल केलें कीं, परस्परांचें प्रेम हेंच हें लग्न जुळवून आणण्यास कारणीभूत झालें. अमेरिकेच्या राजधानीच्या इतिहासांत हें लग्न ह्मणजे मोठ्या महत्वाची गोष्ट होऊन राहिलें आहे. कारण मोठमोठे मुत्सद्दी, राजकारस्थानी पुरुष, कायदेपंडीत, 'सेनेटर्स' आणि इतर मोठमोठ्या कामदारांनीं आपापल्या आगमनानें या प्रसंगास शोभा आणिली

होती. मिसेस क्लीव्हलंड-अमेरिकेच्या प्रेसिडेंट साहेबांच्या पत्नीहि त्या वेळीं आल्या होत्या. एवढ्या मोठ्या वाशिंग्टन शहरांत लेडी कर्झन यांची मैत्री कायती त्यांच्याशींच होती. सटरफटर मंडळींत त्या कधींहि मिसळत नसत. समाजांत मेरी लीटर हिचा स्नेहसंबंध स्त्रियांपेक्षां पुरुषांबरोबर अधिक असावयाचा. याप्रमाणें मेरी लीटर हिला सामाजिकदृष्ट्या जें पाहिजे होतें तें, तिनें मिळविण्याचा प्रयत्न केल्याविना तिला सहज प्राप्त झालें.

लग्न झालें त्याच वर्षीं लॉर्ड कर्झन हे लॉर्ड सॅल्झबरी यांच्या प्रधान-मंडळांत 'अंडर सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर फॉरिन अफेअर्स' झाले. आणि परकीय राष्ट्रासंबंधीं 'हॉउस ऑफ कामन्स'मध्यें हरएक प्रकारच्या प्रश्नाला उत्तरें देण्याची मोठ्या जोखमाची कामगिरी पुढें तीन वर्षेपर्यंत त्यांनांच करावी लागली. लॉर्ड एल्जीन यांच्या मागून हिंदुस्थानच्या गव्हरनर जनरलची जागा लॉर्ड कर्झन यांस मिळाल्याची बातमी ऐकून 'हाउस ऑफ कॉमन्स'मध्यें फार समाधान प्रदर्शित करण्यांत आलें. लॉर्ड कर्झन हे या बहुमानाच्या परंतु अपरिमित जबाबदारीच्या जागेला अगदींच तरुण असूनहि सर्वतोपरी योग्य आहेत, असेंच सर्वांचें मत पडलें. आह्मा हिंदुस्थानवासीयांनां तर या नेमणुकीनें किती आनंद झाला, हें, ते जेव्हां गव्हरनर जनरल या नात्यानें सन १८९९ च्या जान्युआरी महिन्यांत प्रथम हिंदुस्थानांत आले त्यावेळीं मुंबई, कलकत्ता वगैरे शहरीं त्यांचें झालेलें स्वागत ज्यांनीं ज्यांनीं ह्मणून पाहिलें असेल त्यांनां निराळें सांगावयास नको. लेडी कर्झन याहि आपल्या दोन लहान मुलींसह आपल्या पती-बरोबरच हिंदुस्थानांत आल्या.

लेडी कर्झन कलकत्त्यास जाऊन पोंचल्यावर थोड्याच दिवसांनीं तेथें 'बंगवासी' नामक बंगाली भाषेंत निघणाऱ्या एका वर्तमानपत्रांत त्यांच्या संबंधीं पुढील हकीकत प्रसिद्ध झाली होती—

"आमचे नवे व्हॉइसरॉय मोठे चतुर गृहस्थ आहेत आणि त्यांची पत्नीहि त्यांच्या तोडीचीच आहे. लग्न ह्मणजे सर्वांशीं ईश्वरी सूत्रावर

अवलंबून आहे; मानवी प्राण्याच्या हातीं कांहींएक नाहीं. त्या जगन्नियंत्याच्या संकेतानुरूप हे योग जुळून येत असतात. लॉर्ड आणि लेडी कर्झन यांच्या प्रमाणें सर्वथैव अनुरूप वधूवरांचा लग्नसंबंध जुळून आलेला क्वचितच दिसून येतो.

लेडी कर्झन यांच्या अंगीं त्यांच्या वडिलांचे सर्व सद्गुण उतरले आहेत. त्यांचे वडील ह्मणजे मोठे निश्चयी गृहस्थ आहेत. ते पराकाष्ठेचे दीर्घोद्योगी असून एकवार हातीं घेतलेलें काम तडीस नेल्यावांचून कधींहि सोडावयाचे नाहींत. या बाबतींत लेडी कर्झन आणि त्यांचे वडील यांचें अगदीं साम्य आहे. यांचाहि स्वभाव मोठा निश्चयी असून इष्टहेतु सिद्धीस नेण्याला लागणारें धैर्यहि यांच्या अंगीं आहे. स्त्रियांची स्वाभाविक चंचलवृत्ति यांच्या ठिकाणीं मुळींच दृष्टोत्पत्तीस येत नाहीं. यांचे वडील मोठे दीर्घदर्शी असून सद्यःस्थितीवरून भविष्य काळाविषयींचीं बिनचूक अनुमानें त्यांनां बांधितां येतात. लेडी कर्झन यांनींहि वडिलांचा हा सद्गुण तंतोतंत उचलला आहे. कशींहि संकटें येवोत, तरी आपल्या मनाची स्वस्थता कायम ठेवण्याचा गुण लेडी कर्झन या आपल्या वडिलांपासूनच शिकल्या आहेत.

पूर्वसुकृतानें यांचा जन्म धनाढ्य, समंजस आणि चतुर गृहस्थाच्या उदरीं झाला आहे इतकेंच केवळ नव्हे तर या स्वताहि पराकाष्ठेच्या बुद्धिमान आहेत. या अगाध बुद्धिमत्तेला यांच्या शारीरिकसौंदर्यानें तर फारच शोभा आणिली आहे. सद्गुण आणि सौंदर्य यांचा अशा रीतीनें यांच्याठायीं फारच बहारीचा मिलाफ झाला आहे. उत्तम सुवर्णाच्या कोंदणांत जसा हिरा शोभतो किंवा शरदृतूंतील निर्मल नीलवर्ण आकाशांत जसा पूर्ण चंद्र शोभतो, तद्वतच यांचे मानसिक सद्गुण यांच्या शारीरिक सौंदर्यानें फारच खुलून दिसतात. सौंदर्याचे ठिकाणीं सद्गुणांचें अशा रीतीनें सम्मेलन झालेलें क्वचितच आढळण्यांत येतें. साधारणपणें जेथें सौंदर्य असतें तेथें सद्गुणांची उणीव असते व जेथें सद्गुण असतात तेथें सौंदर्याची उणीव असते. तेव्हां सौंदर्य आणि सद्गुण या दोहोंचेंहि एकाच ठिकाणीं

वास्तव्य असणें ह्मणजे खरोखरच मोठ्या भाग्याची गोष्ट आहे. आणि ज्या स्त्रीला सौंदर्यांत प्रत्यक्ष रतीशीं आणि बुद्धिमत्तेंत साक्षात् सरस्वतीशीं स्पर्धा करितां येईल ती स्त्री खरोखरच धन्य ह्मटली पाहिजे. लेडी कर्झन सौंदर्यांत रतीशीं, बुद्धिमत्तेंत सरस्वतीशीं स्पर्धा करित आहेतच; परंतु याशिवाय आपल्या अपार संपत्तीनें त्या जणों प्रत्यक्ष लक्ष्मीशींहि स्पर्धा करित आहेत. त्या सौंदर्यसंपन्न, बुद्धिमान, चतुर आणि विद्वान् असून त्यांचा जन्म अमेरिकेंतील एका कोट्याधिशाच्या पोटीं झाला आहे.

लेडी कर्झन यांची अंगकांती तप्तकांचनाप्रमाणें असून हिंदुस्थानच्या हवेच्या योगानें त्यावर किंचित् तांबूस रंगाची छटा मारित आहे. त्यांच्या दंतपंक्ति मोत्यांच्या सराप्रमाणें आहेत. कंबर सिंहकटीसारखी फार शोभायमान आहे. त्यांच्या काळ्याभोर केशकलापांनीं त्यांची अंगकांती फारच खुललेली दिसते. साक्षात् सरस्वतीची उपमा त्यांनां साजते. त्यांची मान राजहंसाच्या मानेसारखी असून मस्तक अगदीं रेखल्या सारखें आहे. त्यांचे डोळे अगदीं काळेहि नाहींत, किंवा त्यांत तांबूस रंगाचीहि झांक मारित नाहीं; त्यांचा रंग जांभळासारखा अत्यंत हृदयंगम आहे. ते पराकाष्ठेचे चंचल असून फार पाणीदार आहेत. लेडी कर्झन यांच्या अंगीं भाग्यशालीपणाचीं सर्व लक्षणें दृग्गोचर होतात. भालप्रदेश लहान असून आकुंचित आहे; मान राजहंसाच्या मानेसारखी असून त्यांचा स्वर कोकिळेच्या स्वरासारखा मंजूळ आणि मधुर आहे; डोळे पाणीदार असून ते त्यांच्या बुद्धिमत्तेची साक्ष स्पष्टपणें देतात. त्यांची दृष्टी अर्थपूर्ण अशी आहे. प्रथमदर्शनीं त्यांची मुद्रा किंचित् गर्विष्ठासारखी दिसते खरी, परंतु बारकाईनें पाहिलें असतां त्या मुद्रेंत गर्विष्ठपणा मुळींच नसून स्वताबद्दलचा भरंवसा मात्र असल्याचें स्पष्ट दिसून येतें. लेडी कर्झन या दुसऱ्याच्या तंत्रानें वागण्यापेक्षां आपल्याच तंत्रानें इतरांनां वागवित असतात. दुसऱ्याचा अंमल वहाण्यापेक्षां आपलाच अंमल त्या दुसऱ्यावर चालवित असतात. लहानपणीं बरोबरीच्या सर्व मुलींवर यांचें वर्चस्व असे. तरुणपणांत तरुण स्त्रियांनां त्या आपल्या तंत्रानें चालवित आल्या आणि आतां

तर लाखों पुरुष आणि स्त्रियांवर त्यांचा अंमल चालत आहे. आपला अंमल कसा बसवावा हें लेडी कर्झन फार उत्तम रीतीनें जाणतात.

वास्तविक ह्मणावयाचें ह्मणजे असेंच दिसतें कीं, त्यांचा जन्म अंमल बजाविण्यासाठींच झाला आहे, आणि त्यांनां शिक्षणहि तसेंच मिळालें आहे—हिंदुस्थानच्या गव्हरनर जनरलच्या पत्नी होण्यास त्या योग्य झाल्या पाहिजेत ह्मणूनच जणों ईश्वरानें त्यांनां मुद्दाम असें सद्गुणमंडित केलें आहे. लेडी कर्झन यांचें वर्चस्व केवळ स्त्रियांवरच चालतें असें नाहीं तर तें पुरुषवर्गावरहि चालतें. त्यांनां पाहिल्याबरोबर पहाणाराच्या मनांत त्यांच्याविषयीं सन्मान आणि आदरबुद्धि उत्पन्न होते."

'वंगवासी' पत्राच्या संपादकांनीं लेडी कर्झन यांनां प्रत्यक्ष पाहून गग हे त्यांच्याविषयीं उद्गार काढले आहेत. ते बरेच मनोवेधक आणि वाचनीय आहेत असें वाटल्यावरून मुद्दाम येथें घेतले आहेत. असो.

लेडी कर्झन या आपल्या पतीबरोबर हिंदुस्थानांत आल्या दिवसापासून प्रत्येक कृत्यांत त्या लॉर्ड कर्झन साहेबांनां कशी मदत करित आहेत व त्याचप्रमाणें त्यांनीं दुसरीं कोणकोणतीं महत्वाचीं कामें केलीं आहेत वगैरे गोष्टी सर्वांच्या दृष्टीसमोर आहेतच. लेडी डफरीन फंडाच्या त्या प्रमुख असून तत्संबंधीं त्या फार कळकळ वहात असतात. स्त्रीवर्गाची उन्नति व्हावी, त्यांचें अधिकाधिक कल्याण व्हावें अशाविषयीं तर त्या फारच तत्पर असतात.

आमच्या प. लो. वासी महाराणी व्हिक्टोरिया यांच्या स्मारकाप्रीत्यर्थ व्हिक्टोरिया स्कॉलरशिप फंड या नांवाचा एक मोठा फंड यांनीं उभारिला असून त्याचा विनियोग हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या सुखवृद्धीकडे करावयाचें त्यांनीं ठरविलें आहे. हा फंड हल्लीं जवळ जवळ साडेतीन लक्षांवर गेला आहे. ईश्वर यांनां दीर्घायु करून सदैव सुखी ठेवो व सुदैवानें प्राप्त झालेल्या अधिकाराचा हिंदुस्थानांतील महिलावर्गाच्या उन्नत्यर्थ उपयोग करण्याची यांनां तोच जगन्नियंता सदैव सुबुद्धि देवो अशी त्याच्या चरणीं नम्र विनंति करून हा अल्प लेख पुरा करितों.

मुलांनां देवी काढण्याची आवश्यकता.

आपल्या लहान लहान लेकरांनां देवी टोंचून घ्याव्या कीं घेऊं नये अशी अद्यापिहि बऱ्याच जणांच्या मनांत शंका उभी रहाते. विशेषतः आह्मां स्त्रियांचा जीव तर या कामीं फार भीत असतो. मूल दोन अडीच महिन्यांचें होतांच त्याला देवी टोंचून घ्याव्या अशी सरकारची सूचना येऊन ठेपते. कित्येक स्त्रिया तर देवीदाक्तर आला असतां आपलीं मुलें लपवून देखील ठेवितात. अडाणी लोकांत हा प्रकार वारंवार घडून येत असल्याचें दिसून येतें. देवी काढणें हा एक सरकारचा जुलूम आहे असें केवळ अडाणी लोकांसच नव्हे तर बऱ्याच शिकल्या सवरलेल्या लोकांनांहि वाटत असतें. तेव्हां अशा मंडळीचा देवी टोंचण्यासंबंधींचा ग्रह बदलण्यास एका सुप्रसिद्ध इंग्लिश दाक्तराचें मत बरेंच उपयोगी पडेल असें वाटल्यावरून तें येथें दिलें आहे. तो ह्मणतो—

"देवी टोंचण्याच्या शोधानें एकंदर मनुष्यजातीवर अपरिमित उपकार झाले आहेत. हा शोध लागण्याच्या पूर्वी हल्लीं चालू असलेल्या प्लेगप्रमाणेंच देवीची सांथ चोहोंकडे प्रळय उडवून देऊन दरसाल हजारो प्राण्यांचे बळी घेत असे; आणि बाकी राहिलेल्यांची अशी कांहीं दुर्दशा उडवून देत असे कीं, त्यांच्याकडे पहातांच मनाला किळस वाटावा. जगण्यापेक्षां मरणेंच चांगलें, अशी त्यांची स्थिति होत असे. लोकसंख्या हल्लीं जी वाढत आहे, त्याचें, देवी टोंचण्याचा शोध हें एक बऱ्याच महत्वाचें कारण आहे, असें ह्मटल्यावांचून रहावत नाहीं. या रोगानें प्राचीनकाळीं कित्येक देश उध्वस्त करून सोडल्याचे दाखले आहेत.

आतां कित्येकांकडून अशी शंका घेण्यांत येते कीं, टोंचल्यापासून देवी मुळींच येत नाहींत असें थोडेंच आहे! मी कबूल करितों कीं, टोंचलें असतांहि क्वचित देवी येतात खऱ्या, परंतु मग त्या मनुष्याला देवीपासून कांहीं अपाय होण्याची बिलकूल धास्ती नसते; आणि त्याचप्रमाणें पूर्वी टोंचलें असल्यास देवी आल्या तरी त्यांचें स्वरूप फार सौम्य असतें, हें कोणालाहि

नाकबूल करितां येणार नाहीं. एकवार देवी टोंचल्या असतांहि पुनः देवी येऊन त्यानें रोग्याची प्राणहानि झाल्याचेहि क्वचित दाखले सांपडतात परंतु अशीं उदाहरणें फारच थोडीं—केवळ अपवादात्मकच ह्मणावयाचीं. मी तर असें ह्मणतों कीं, या अपवादांपैकीं देखील कित्येकांसंबंधीं असें सिद्ध करून देतां येईल कीं, त्यांनां जरी टोंचलें होतें तरी टोंचल्यापासून जो कांहीं शरीरावर परिणाम झाला पाहिजे, तो त्यांच्या शरीरावर झालेला नव्हता. ह्मणजे त्या टोंचण्यांत कांहीं तरी न्यून होतें. एक वर्षाच्या आंतील न टोंचलेल्या मुलाला देवी येणें ह्मणजे त्याच्या प्राणावरचाच प्रसंग ह्मणण्यास हरकत नाहीं. त्याचप्रमाणें पांच वर्षांच्या आंतील न टोंचलेल्या मुलांपैकीं कोणी या रोगांत सांपडलीं असतां अर्ध्यापेक्षांहि अधिक मृत्युमुखीं पडतात. केवढें हें मृत्यूचें भयंकर प्रमाण!

मुलांनां आणि त्याचप्रमाणें मोठ्या माणसांनां जर प्रत्येक सात वर्षांनीं पुनः पुनः टोंचलें तर अपवादादाखल घडून येणारे मृत्यु देखील खात्रीनें टळतील, इतकेंच नव्हे तर या भयंकर रोगाचें नांव देखील कांहीं काळानें ऐकूं येणार नाहीं.

प्रत्येक आईनें आपल्या प्रत्येक मुलाला सात सात वर्षांनीं टोंचून घ्यावें, हें तिचें कर्तव्य आहे, असें मी समजतों. देवीची सांथ चालू असेल तर या पेक्षांहि लवकर लवकर टोंचून घ्यावें हें उत्तम. पक्कें ध्यानांत धरा कीं, पुनः पुनः कितीहि वेळां जरी टोंचलें तरी त्यापासून यत्किंचितहि अपाय होण्याचा संभव नाहीं, उलट फायदा मात्र होईल. हा रोग फार भयंकर आहे आणि ईश्वरकृपेनें आपल्या हातीं जें हें हत्यार मिळालें आहे त्याचा योग्य उपयोग करून या भयंकर रोगाचा नायनाट करण्यास प्रत्येकानें झटलें पाहिजे.

'प्लेग'पेक्षांहि हा रोग महाभयंकर आहे; आणि याचा प्रतिबंध करण्याची योजना केली नाहीं तर लहान, मोठे, तरुण, वृद्ध, गरीब, श्रीमंत कोणालाहि हा सोडित नाहीं; प्लेगनें देखील कधीं जितका संहार झाला नाहीं

तितका या रोगानें होत असतो. सुशिक्षित, सुधारलेल्या देशांत या रोगाचें प्राबल्य चालावें ही खरोखर मोठी लज्जास्पद गोष्ट आहे. गाईच्या लसीचा योग्य रीतीनें आणि वारंवार उपयोग केला तर या किळसवाण्या रोगाचें नांव देखील रहाणार नाहीं.

मला पक्का भरंवसा आहे कीं, प्रत्येक मनुष्याला प्रत्येक सात वर्षांनीं जर या लसीनें योग्य रीतीनें टोंचलें तर या रोगाचें बीज समूळ नाश पावेल; परंतु आमच्या दुर्दैवानें आमच्या देशांत जोंपर्यंत या रोगासंबंधीं भलभलत्या कल्पना लोकांच्या मनांत भरलेल्या आहेत आणि जोंपर्यंत त्याची अशी हेळसांड चालली आहे, तोंपर्यंत या रोगाचा अम्मल असाच चालेल; कारण हें विष कधींहि सुस्थ रहात नाहीं किंवा त्याला कधीं झोंपहि येत नाहीं. त्याचा क्रम अव्याहत चालू असतो. त्याला प्रतिबंध करण्याला तसाच उद्योग करावा लागतो.

टोंचण्याला चांगली लस कोणती? हा प्रश्न वारंवार विचारण्यांत येतो. माझें मत असें आहे कीं, एखाद्या निरोगी मुलाच्या दंडावरील एखाद्या चांगल्या उठलेल्या फोडींतून घेतलेली लस प्रत्यक्ष गाईच्या लसी-पेक्षांहि टोंचण्यास अधिक चांगली. गाईच्या ओटीवरील फोडींतून लस काढून तिनें टोंचलें असतां मुलाच्या प्रकृतींत जितकी अस्वस्थता उत्पन्न होते तितकी तीच लस बऱ्याच जणांच्या उपयोगांत आल्यावर होत नाहीं. त्याचप्रमाणें हेंहि ध्यानांत धरिलें पाहिजे कीं, प्रत्यक्ष गाईची लस देखील जर योग्य वेळीं काढली नाहीं तर तिच्या अंगचा देवीपासून रक्षण कर-ण्याचा गुण नाहींसा होतो. तरीहि जेथें निरोगी मुलापासून लस मिळण्याचा संशय असेल किंवा अन्य कारणानें तशी खात्रीची लस मिळणार नाहीं तेथें गाईच्या लसीचा उपयोग करावा हें चांगलें.

लहान मुलाला प्रथम देवी केव्हां काढाव्या? मूल दोन किंवा तीन महिन्यांचें होतांच त्याला देवी काढाव्या. कारण या भयंकर रोगापासून त्याचें जितकें लवकर रक्षण होईल तितकें चांगलें. शिवाय मूल जसजसें मोठें होत जातें तसतसें त्याला टोंचण्याचें काम कठीण होत जातें.

त्याचप्रमाणें टोंचल्यावर दंड खाजविल्यानें फोड्या फुटून जाऊन त्यांचा इष्ट परिणाम होत नाहीं. गांवांत जर देवीची सांथ चालू असेल तर एक महि-न्याच्या मुलाला देखील टोंचण्याला मुळींच हरकत नाहीं; आणि अगदींच शेजारीं पाजारीं कोणाला देवी आल्या असल्या तर मग मूल किती दिवसांचें आहे याचा किंवा इतर कोणत्याहि गोष्टीचा विचार करण्याच्या भानगडींत न पडतां त्याला तात्काळ टोंचून घेतलेंच पाहिजे. लॅम्बेथ येथील 'जनरल लाइंग इन' हॉस्पिटलांत एका बाईला ती बाळंत होऊन थोडे दिवस झाले नाहींत तोंच देवी आल्या. त्याबरोबर तिच्या चार दिवसांच्या मुलाला तर देवी टोंच-ल्याच, परंतु तेथें असणाऱ्या एकंदर सर्व मुलांनांहि टोंचण्यांत आलें. हीं मुलें ह्मणजे केवळ एक दिवसापासून तों पंधरा दिवसांच्या आंतील होतीं. पैकीं कोणालाहि देवी आल्या नाहींत. सर्व मुलें बचावलीं. त्या बाईचें मूल तर तिला पीत असे व तिच्याच जवळ निजत असे. परंतु तें देखील बचावलें.

कित्येक आपल्या मुलाच्या दंडावरील फोड्यांतून दुसऱ्या मुलांनां टोंच-ण्यासाठीं लस काढूं देत नाहींत. तसें केलें असतां टोंचण्याचा परिणाम होत नाहीं असें त्यांनां वाटतें. परंतु हें खरें नाहीं. दोन तीन फोड्या जर चांगल्या उठल्या असल्या तर एखादींतून लस काढण्याला कांहींच हरकत नाहीं. या फोड्यांनीं बहुधा दंड फार सुजतो आणि अशा प्रसंगीं त्यांतील लस दुसऱ्या मुलांनां टोंचण्यासाठीं काढली असतां ती सूज उतरते आणि मुलाला बरेंच हलकें वाटूं लागतें. एक फोडी मात्र नेहमीं तशीच ठेवावी हें चांगलें.

ज्या मुलांची प्रकृति बिघडली असेल किंवा ज्यांनां एखादा रोग जडला असेल अशा मुलांनां तीं बरीं झाल्याविना टोंचूं नये. त्याचप्रमाणें दुसराहि एखादा त्वचेसंबंधीं रोग असेल तर तो बरा होईपर्यंत टोंचूं नये. परंतु केवळ एखादें दुसरें गळूं झालें आहे एवढेंच निमित्त करून मुलाला टोंचण्याचें काम चालढकलीवर टाकूं नये. गांवांत देवींची सांथ असेल तर कसलाहि त्वचारोग असला तथापि त्या मुलाला टोंचून घेतलेंच पाहिजे.

टोंचल्यानें मुलाची प्रकृति बिघडते कीं काय ? टोंचल्यापासून सुमारें पांचव्या दिवसापासून पुढें तीन चार दिवस मुलाला थोडा ताप येतो; तोंड गरम होतें आणि सारा दिवस कांहींतरी तोंडांत धरावेंसें त्याला वाटतें. रात्रीची त्याला चांगलीशी झोंप येत नाहीं; तें नीट खेळत नाहीं; त्रासल्यासारखें करतें आणि एखादे वेळीं त्याच्या पोटांतहि दुखूं लागतें. नवव्या किंवा दहाव्या दिवशीं दंड बराच सुजतो आणि तांबडा लाल होतो. या स्थितींत एक दोन दिवस गेल्यावर मग सूज हळूहळू उतरूं लागते. ही अशी स्थिति होणें अत्यंत इष्ट आहे. कारण मुलाच्या प्रकृतीवर टोंचण्याचा योग्य परिणाम झाला असें याच गोष्टीवरून कळून येतें; आणि हा योग्य परिणाम झाला म्हणजेच या भयंकर रोगाचें निवारण करण्याची शक्ति त्याचे अंगीं येते.

या वेळीं मुलाला कांहीं औषध वगैरे देण्याचा कित्येक उद्योग करितात परंतु तें योग्य नाहीं. लस अंगांत घातल्यावर मग तिच्या कामांत कोणत्याहि प्रकारें ढवळाढवळ करणें बरें नाहीं. मुलाच्या प्रकृतीवर त्या लसीचा पूर्ण अम्मल बसूं द्यावा.

औषध कशासाठीं द्यावयाचें ? दंडांत घातलेली लस जर चांगली निर्दोष असेल तर मग आणखी औषध देण्याची आवश्यकता ती काय आहे ? बरें, ती लस जर चांगल्यापैकीं नसेल तर कितीहि औषधें दिलीं तरी मग ती चांगली होणें शक्य नाहीं ! तेव्हां, पाहिजे त्या दृष्टीनें पाहिलें तरी टोंचल्यावर औषध देण्याची मुळींच आवश्यकता नाहीं, असें स्पष्ट दिसून येतें. टोंचण्यापासून थोडासा ताप येतो खरा, पण तो दोन तीन दिवसांत आपोआप कमी होतो. त्याला औषधाची मुळींच आवश्यकता नाहीं.

टोंचल्यावर फक्त एवढीच खबरदारी घ्यावी कीं, तो दंड चोळवटतां वगैरे कामा नये. नाहींपेक्षां त्या फोड्या फुटून जाऊन टोंचण्यापासून व्हावा तसा फायदा होणार नाहीं. दंडाला फार सूज आली तर एखाद्या पिसानें अगर उंटाच्या केसांचा ब्रश घेऊन त्यानें 'बोरॅसिक ऑइन्टमेन्ट'

थोडें थोडें लावावें. या सोप्या औषधाचा चांगला गुण येतो. दंड फारच लाल झाला असेल व सुजला असेल तर 'बोरॅसिक ॲसिड'नें शेकावें ह्मणजे झालें.

फोड्यांवर खपल्या धरल्या ह्मणजे त्या आपोआप गळूं द्याव्या, त्या आपण कधींहि काढून टाकण्याचा उद्योग करूं नये. "

एका नामांकित इंग्लिश डाक्तराचें देवी संबंधींचें हें मत आमच्या स्त्रिया नेहमीं लक्ष्यांत वागवून त्याच्या उपदेशाप्रमाणें वागण्याचा जर निश्चय करतील व कित्येक असमंजस स्त्रियांनां देवी टोचण्यासंबंधीं जो उगाच बाऊ वाटत असतो तो व्यर्थ आहे अशी आपल्या त्या अज्ञान भगिनींची समजूत घालण्याचा प्रयत्न करतील तर आपल्या देशांतहि दरसाल देवीच्या रोगाला बळी पडणाऱ्या हजारो प्राण्यांनां प्राणदान दिल्याचें महान पुण्य त्यांनां लागेल.

मुलें बिघडविण्यास खात्रीचे उपाय.

आपलें लेंकरूं दुर्गुणी निपजावें अशी तुमची इच्छा असेल तर—

१ हट्ट करून व रडून लेंकरूं जें जें कांहीं मागेल तें तें पुरविण्याचा क्रम लहानपणापासून सुरू ठेवा.

२ आपलें लेंकरूं इतर लेंकरांपेक्षां हुशार व चलाख आहे असें त्याच्या समक्ष खुशाल बोलत जा.

३ तूं मोठा हट्टी आहेस व तुझ्यापुढें आमचें कांहींएक चालत नाहीं, असें त्याला स्पष्ट सांगत जा.

४ आईनें एक सांगितलें की बापानें लागलेंच त्याच्या विरुद्ध दुसरें कांहींतरी सांगत जावें.

५ बापाचा अधिकार फार भयंकर आहे, त्याला वाटेल तसें तो करील, तो मोठा जुलमी व क्रूर असून मार देण्यास नेहमीं टपलेला असतो, असें मुलाला भासूं द्या.

६ आई अगदीं तुच्छ आहे, तिची पर्वा करण्याचें मुळींच कारण नाहीं, असें बापाच्या वर्तणुकीवरून मुलाला दिसूं द्या.

७ त्याचे मित्र कोण व कसे आहेत व तो कोणत्या प्रकारच्या मुलांशीं नेहमीं सहवास ठेवितो याकडे पूर्ण दुर्लक्ष्य करा.

८ हवीं तसलीं पुस्तकें त्याला वाचूं द्या.

९ मुलगा असो किंवा मुलगी असो, संध्याकाळीं रस्त्यांतून खुशाल भटकत फिरूं द्या. सर्व प्रकारचे नीतीचे धडे शिकण्यास रस्ता ही मोठी उत्तम शाळा आहे.

१० रात्रंदिवस तुह्मी पैसा मिळविण्याच्या कामांत निमग्न रहा. कारण मुलाच्या अंतःकरणास चांगलें वळण घालून देऊन व त्याला चांगल्या संवई लावून देऊन मरावें, यापेक्षां मागें मोठें भांडवल जमवून ठेवून मरावें हें बरें, हें सदैव ध्यानांत धरा आणि मुलास वाटेल तितका पैसा खर्च करूं देण्यांत कधींहि व्यत्यय आणूं नका.

११ मुलांबरोबर कधींहि सहवास ठेवित जाऊं नका व त्यांच्याशीं लडिवाळपणानें हंसून खेळून आपला आनंद प्रदर्शित करूं नका.

१२ उंटाला गिळून मुरकुटाला गाळित जा. मुलांच्या मोठ्या अन्यायाकडे कानाडोळा करा, परंतु लहानसान चुकी झाल्यास त्याला तात्काळ फोडून काढित जा.

१३ अंगीं सद्गुण आणणाऱ्या नियमांचें जें भाराभर ओझें तुम्ही त्याच्या डोक्यावर लादाल त्यांतील एकहि नियम तुम्ही स्वतः पाळूं नका. स्वतः कोरडे पाषाण रहा, परंतु मुलाच्या डोक्यावर मात्र ज्ञानाच्या घागरी ओतित जा.

[आमच्या बाळू गड्यानें परवां चहाकरितां साखर आणिली. पुडी सोडल्यावर ज्या कागदांत साखर बांधिली होती त्यावर वरील मजकूर आढळला. कागद जुना व फाटलेला असल्यामुळें वर्तमानपत्राचें नांव सांपडलें नाहीं. माहिती उपयुक्त आहे असें वाटल्यावरून पाठविली आहे.]

'तारा.'

खासगी पत्रें.

नांदगांव,

[२]   ता. १५ मार्च १९०१.

अनेक आशीर्वाद---

तुझें ता. ८ चें पत्र पोंचलें. त्यावर उत्तर काय लिहावें तेंच सुचत नाहीं. किती वेळ तरी मी विचार करित आहें, परंतु तुझें तें पत्र वाचून मला जें कांहीं वाटत आहे, तें कांहीं लिहितां येत नाहीं. तूं लिहितेस कीं, माझ्या पराकाष्ठेच्या आग्रहावरून कसें बसें तरी तें पत्र लिहून टाकून तूं एकदांची माझ्या ऋणांतून मुक्त होत आहेस. परंतु, चिंगू, मला नाहीं वाटत कीं तूं जरी मला पत्र लिहिण्याच्याच हेतूनें मुद्दाम बसलीस आणि अगदीं मन लावून लिहिण्याचा प्रयत्न केलास, तरी देखील तुला पुनः अशा प्रकारचें पत्र लिहितां येईलसें! अशीच कांहीं विलक्षण खुबी त्यांत उतरली आहे. तुला नकळत तुझे अगदीं खरे खरे विचार, साध्या आणि सरळ शब्दांनीं बाहेर पडले आहेत. आणि याच कारणामुळें तें पत्र वाचून मला इतकें कांहीं समाधान झालें आहे कीं, तसें तूं मुद्दाम होऊन आणखी दहा जरी पत्रें पाठविलीं असतींस तरी होणें शक्य नाहीं. त्या पत्रासंबंधीं काय लिहावें आणि स्वतां तुझ्या बद्दल किती आश्चर्य मानावें, तेंच सुचत नाहीं! तुझ्या लिहिण्यावरून पत्र लिहितांना तूं रघुनाथरावांनां मुळींच कांहीं विचारलें नसावेंस, किंवा त्यांनां तें नंतरहि दाखविलें नसावेंस असें स्पष्ट दिसत आहे. मला तुझें हें करणें मुळींच आवडलें नाहीं. तरी देखील चिंगू, विशेष आश्चर्याची गोष्ट ती हीच आहे! इतकें चांगलें तुला लिहितां तरी आलें कसें? काय असेल तें असो! कदाचित् तुझ्या मध्यांच्या परिस्थितीचाहि हा गुण असेल! 'लिहिण्यावाचण्या खेरीज या जगांत दुसरें कांहीं असेलसें वाटत नाहीं;' ह्मणून रघुनाथरावांविषयीं तूं जें अगदीं उदासवृत्तीनें लिहितेस त्या त्यांच्या विद्याव्यसनाचा देखील कदाचित् हा परिणाम असेल! पोपटासारखे ज्ञानविहीन पक्षीहि जर मनुष्याच्या सहवासांत

राहिल्यानें मनुष्यवाणीनें बोलूं लागतात तर मग ज्ञानी मनुष्यप्राण्या-संबंधानें अशक्य तें काय असणार ? केवळ तासच्या तास लिहित किंवा वाचित बसण्यानेंहि जें होणें नाहीं, तें, विद्वान् आणि विद्याव्यसनी मनुष्याच्या सहवासानें साहजिकपणें देखील होणें शक्य आहे. तुझ्या पत्रानें तर या बाबतींत माझी पक्कीच खात्री करून सोडली आहे. आतां या वेळीं देखील तें पत्र येथें माझ्या समोर आहे; आजवर कितीदां तरी तें मीं वाचलें असेन पण माझी तृप्ति ह्मणून कांहीं केल्या होत नाहीं. पुनःपुनः तें वाचावेंसें वाटतें. तें वाचित असतांना तूं प्रत्यक्ष मजजवळ उभी आहेस असा मला भास होऊं लागतो. तुझी हुबेहुब प्रतिमाच त्यांत उतरली आहे, असेंच मी ह्मणतें.

चांगलीं वाचनीय पत्रें लिहितां येणें ही एक कला आहे, असें पाश्चिमात्य देशांत समजतात. पुष्कळ मोठमोठ्या लेखकांचीं अशीं पत्रें एकत्र करून तिकडे छापलेलीं आहेत. त्यांत नाना तऱ्हेची मनोरंजक आणि उपदेशपर माहिती भरलेली आहे. आपल्याकडे पत्रें लिहिणें याला फारसें महत्व देत असल्याचें आढळून येत नाहीं; त्यामुळें तुजप्रमाणेंच बहुधा पुष्कळांनां रोज उठून लिहायचें तरी काय, असा विचार पडत असतो. आपलें कांहींतरी लिहून जेमतेम खुशाली कळविली ह्मणजे झालें. पत्राची मजल ह्मणजे यापुढें कधीं जावयाची नाहीं. पुरुषमंडळीची ही गोष्ट, मग चिंगू, स्त्रियांची तुझ्यासारखी गडबड उडाली तर त्यांत नवल तें काय ? तिकडील लोकांचा इतर कामांप्रमाणें पत्रें लिहिण्याचा वेळ देखील ठरलेला असतो; आणि आपल्या इकडे ! कधीं तरी, अगदींच निकड लागेल तेव्हां, कुठें तरी बसून, कांहींतरी चार दोन ओळी एकदांच्या खरडायच्या झालें ! ही स्थिति इष्ट नाहीं. असो.

तूं ह्मणतेस कीं, आपलें काम सोडून पुरुषांसारखें तासच्या तास लिहित बसणें तुला आवडत नाहीं. पण चिंगू, यांत तूं विशेष तें काय सांगित-लेंस ? कोणाहि समंजस स्त्रीला काय आणि पुरुषाला काय, असेंच वाटलें

पाहिजे. आपलें काम सोडून तासच्या तास लिहिणेंच काय परंतु दुसरेंहि कांहीं करणें योग्य होणार नाहीं! परंतु भलतें सलतें कांहींतरी लिहिणें ही गोष्ट निराळी आणि चार आठ दिवशीं आपल्यापासून दूर असलेल्या आप्तांनां किंवा मैत्रिणींनां आपली खुशाली कळविण्यांत कांहीं नियमित वेळ खर्च करणें ही गोष्ट अगदीं निराळी. लिहिणें वाचणें प्रत्येकाला अवश्य पाहिजे आहे, परंतु तें कशाला? कर्तव्याचें विस्मरण पाडण्याला नव्हे; तर कर्तव्याची खरी दिशा दाखविण्याला, समजलीस. विद्येनें मनुष्य कर्तव्य-पराङ्मुख होतो असें ज्या दिवशीं अनुभवास येईल त्या दिवसापासून विद्ये-वर पाणी सोडलेलेंच बरें. परंतु चिंगू, खरी गोष्ट याच्या अगदीं उलट आहे. सद्विद्येनें मनुष्य नेहमीं कर्तव्यदक्षच होत असतो. तेव्हां ज्या स्त्रीला सुशिक्षणाचा लाभ झाला आहे ती स्त्री, आपलें खरें कर्तव्य सोडून भलत्या दिशेला जाईल हें संभवनीय नाहीं. जेथें असा प्रकार दृष्टीस पडेल तेथें त्या शिक्षणाची दिशा कोठें तरी खास चुकली आहे, असें मान-ण्यास मुळींच हरकत नाहीं.

पुढें तूं विचारतेस कीं, नेहमीं नेहमीं लिहायचें तरी काय? खरी गोष्ट आहे. पण चिंगू, मला वाटतें याचें उत्तर तुला तुझ्या पत्रांत सांपडेल. 'आतां मला इतकें कांहीं सुचत आहे कीं, माझें मलाच आश्चर्य वाटत आहे.' असें तूंच नाहीं का पुढें लिहिलें आहेस? या विद्यानंदाचा महिमाच असा आहे. मनुष्याला एकदां का याची गोडी लागली मग तसा आनंद त्याला दुसऱ्या कशानेंहि होणें नाहीं; आणि त्या आनंदांत तल्लीन होऊन गेल्यावर मग त्याला दुसरें कशाचें भानहि राहत नाहीं. तूंच पहाना! ताईची कटकट काढून टाकण्याच्या उद्देशानें, कशा बशा तरी चार ओळी खरडून टाकाव्या म्हणून अंगाला आळेपिळे देत जी बसली होतीस, तीच पुढें तुझ्या मनांत होतें त्याच्या दसपट आणि तेंहि अगदीं एकाग्र मनानें लिहिलेंस, तरी अद्यापि किती तरी लिहायचें राहिलें आहे, असें म्हणण्याची तुलाच नाहीं का पाळी आली? तरी देखील लिहिणें वाचणें तुला आवडत

नाहीं असें रघुनाथरावांनां तूंच स्वतां सांगितल्याचें लिहितेस! तेव्हां हें एक मोठें कोडेंच आहे ह्मणावयाचें नाहींका? अग, चार दोन महिने जाऊं दे ह्मणजे तुझें तूंच याच्या उलट ह्मणूं लागशील, हें मी या तुझ्या एकाच पत्रावरून सांगतें. आज जीं मोठींमोठीं पुस्तकें पाहून तुझ्या कपाळाची शीर उठते, तसें पुढें होणार नाहीं इतकेंच नव्हे, तर संसारांतील इतर कामाच्या दगदगीनें जर तुझें कपाळ दुखूं लागलें तर तेंहि या पुस्तकांच्या वाचनानें राहील. सत्पुरुषांच्या सहवासापासून जो लाभ व्हावयाचा तोच लाभ त्यांचे ग्रंथ वाचून त्याविषयीं मनन केल्यानें होत असतो. कारण त्यांनीं आपले उदात्त विचार त्या ग्रंथांत गोवलेले असतात. परीक्षा झाली तरी देखील रघुनाथरावांचीं पुस्तकें सुटत नाहींत तें कांहीं उगाच नाहीं बरें चिंगू!

तूं लिहिलेली मौज वाचून तर मला फारच मौज वाटली! पण ती कशाची? लग्न केव्हां करणें चांगलें ह्मणून रघुनाथरावांनीं तुला प्रश्न विचारिला त्याची नव्हे बरें? तर तूं त्या प्रश्नावर जें कांहीं विचित्र उत्तर दिलेंस त्या उत्तराची! चिंगू, तूं इतकी का वेडी आहेस? तुला प्रश्न विचारला त्यांत त्यांनीं वावगें तें काय केलें? बरें, त्यांनां कांहीं आवड होस नाहीं; घटका दोन घटका सुखासमाधानाच्या गोष्टीहि बोलायला नको ह्मणूनहि तूंच अगदीं निराश होऊन लिहितेस! तुझ्या वेडगळ आणि हेकड उत्तरानें त्यांनां केवढें समाधान झालें तेंहि तूं पाहिलेंस, इतकेंच नव्हे तर त्याचें तुला मनस्वी वाईटहि वाटलें. तेव्हां आतां तूंच सांग कीं, ज्या मनुष्याच्या बोलण्यापासून सुख किंवा समाधान होण्याऐवजीं दुःख आणि उद्विग्नता प्राप्त होते त्या मनुष्याशीं बोलत बसावें तरी कसें? पुरुषांनीं कांहीं विचारलें आणि त्यावर आपण बायका जर हीं अशीं असंमजसपणाचीं उत्तरें देऊं लागलों, तर आपल्याशीं बोलत बसण्याला त्यांनां उल्हास तरी कसा वाटावा? तूं जर मनांत आणलें असतेंस आणि थोडा विचार केला असतास, तर नसतें का तुला त्यांच्या

प्रश्नावर योग्य उत्तर देतां आलें? परंतु हें व्हावें कसें? अशा मनुष्याबरोबर बोलण्यांत वेळ दवडण्यापेक्षां पुस्तकें वाचित बसणेंच अधिक शहाणपणाचें नव्हे कां?

चिंगू, स्त्रियांनां कोणत्या एखाद्या गोष्टीविषयीं कांहींच वाटत नाहीं, असें खरोखरच का तुझें ह्मणणें आहे? असेल तर मोठा चमत्कारच ह्मणावयाचा! मला देखील मग रघुनाथरावांप्रमाणेंच तुला विचारावें लागेल कीं, तुला मिळालेल्या शिक्षणाचा उपयोग तो काय! माझ्या समजुतीसाठींच जर शिकायचें होतें तर तूं इतके श्रम घेतले नसतेस तरी बरें होतें. कारण अशानें कांहीं माझी समजूत कधींहि व्हावयाची नाहीं. असो. रघुनाथराव स्वतांच याविषयीं तुला सांगणार आहेत, तेव्हां मी येथें कांहीं अधिक लिहित नाहीं. तरी पण, मी एवढें मात्र सांगतें कीं, आपल्या समाजांत विवाह ह्मणजे स्त्रीच्या एकंदर आयुष्यांतील अत्यंत महत्वाची गोष्ट आहे. तिचें सर्व सुखदुःख या विवाहावर अवलंबून आहे. तेव्हां प्रत्येक स्त्रीनें या अति महत्वाच्या विषयाची चांगली ओळख करून घेणें इष्ट आहे. आपल्या नाहीं तरी आपल्या मुलामुलींच्या कल्याणास यानें आपल्या हातून चांगली मदत होणार आहे. या विषयाचा विचार जितका करावा तितका थोडाच आहे.

रघुनाथरावांनां राग येईल अशी गोष्ट तूं कधींहि करणार नाहींस याविषयीं माझी पक्की खात्री आहे. पण चिंगू, त्यांनां आनंद वाटेल आणि तुला फायदा होईल अशी ही लिहिण्यावाचण्याची गोष्ट तुझ्या डोक्यांत कशी शिरत नाहीं? वेळाला कांहीं कमी नाहीं, सर्व साधनें अनुकूल, स्वतां पतिराज शिकविण्याविषयीं उत्सुक, असें असून तुला लिहिण्यावाचण्याचा कंटाळा तेव्हां हें आश्चर्य नव्हे काय? आळस आणि हेकेखोरपणा या पलीकडे 'सगळ्यात्र बायकांनीं करायचं आहे काय लिहायला आणि वाचायला शिकून?' या तुझ्या वेडगळ प्रश्नांत कांहीं हंशील दिसत नाहीं. या असल्या कल्पना तूं आपल्या डोक्यांतून जितक्या लवकर काढून टाकशील तितकें बरें.

मोझा लेख रघुनाथरावांनां आवडला हें वाचून मला फार आनंद होत आहे. तूं त्यांच्या आग्रहाला मान देऊन त्यांनां तो वाचून दाखविलास, नाहीं ह्मणून डोकें फिरवून बसली नाहींस, याचेंहि मला फार समाधान वाटत आहे. 'स्त्रियांनींच प्रकट केलेले विचार स्त्रियांनां जेवढे पटतील तेवढे पुरुषांनीं कितीहि कळकळीनें प्रकट केले तरी ते पटणार नाहींत.' ह्मणून जें रघुनाथराव ह्मणतात, तें अगदीं खरें आहे असें मी स्वानुभवावरून सांगतें. आपली सुधारणा करून घेण्यास खरोखर आपणच झटलें पाहिजे. चिंगू, ही जी आनंदाची बातमी तूं मला कळविलीस त्याबद्दल मी तुला कांहीं बक्षिस देण्याचा विचार केला आहे. तुह्मां उभयतांनांहि त्यापासून आनंद होईल असा माझा समज आहे.

यःकश्चित् गोष्टहि तिकडे कळवायची असा खरोखरच माझा नियम आहे, आणि चिंगू, तूं देखील हा नियम पाळशील अशी मला आशा आहे. यासंबंधीं मी पुढें कधीं तरी लिहीन. पण तुझें पत्र वाचून तिकडेहि मजप्रमाणेंच आनंद झाला, एवढेंच तुला कळवितें.

आतां फार उशीर झाला. मुलें शाळेंतून सुटून येऊन 'भूक भूक' करित आहेत. तेव्हां आतां आटोपतेंच. बाबू, 'मावशी मावशी' ह्मणून रोज तुझी आठवण काढतो; तूं कबूल केलेली आगीची गाडी तो अद्यापि विसरला नाहीं! घराकडून खुशालीचें पत्र नुक्तेंच आले होतें. बाबा कांहीं कामासाठीं बाहेर गांवीं गेले आहेत. यापेक्षां कमी जास्ती तूर्त कांहींएक नाहीं. वारंवार तिकडील सविस्तर हकीकत कळविण्याची हयगय करूं नको. पुढील पत्र दोघांच्या विचारानें येईल असें इच्छिणारी,

तुझी आवडती

ताई.

गृहिणी.

[१]

घरांतील सुव्यवस्थेवरच संसारांतील सुख, शांति, समाधान वगैरे गोष्टी पुष्कळ अंशीं अवलंबून असतात. घरांत जर योग्य व्यवस्था नसली तर तेथें वरील गोष्टी कधींहि आढळावयाच्या नाहींत. आणि ही व्यवस्था ठेवण्याचें काम गृहिणीचें आहे. पुरुष हा गृहांत वास करितो ह्मणून त्यास गृहस्थ अशी संज्ञा आहे. परंतु गृहिणी ही घराची मालकीण आहे. घर हें एका लहानशा राज्यासारखें आहे व त्या राज्याची खरी मालकीण गृहिणी हीच आहे. ज्या राज्याला राजा नाहीं तें राज्य लवकरच नष्टप्राय होतें. तद्वतच गृहिणी नसलेल्या संसाराची स्थिति आहे. ज्या संसारांत गृहिणी नाहीं तो अगोदर संसारच नव्हे व त्यांत शांति, समाधान, सुख हीं अर्थातच नसावयाचीं. ज्या राज्यामधील राजा कर्तव्यपरायण असतो त्या राज्यांतील प्रजेला ज्याप्रमाणें सुखशांतिलाभ होतो, त्या राज्यांतील प्रजेचा ज्याप्रमाणें उत्कर्ष होतो, त्याचप्रमाणें ज्या गृहरूपी राज्याची अधीश्वरी—गृहिणी कुशल, कर्तव्यदक्ष, सद्गुणी आणि परिश्रमरत असते त्या संसाराचा उत्कर्ष झाल्याविना रहात नाहीं. संपूर्ण राज्यामधील प्रजाजनांमध्यें शांति ठेवणें, अन्यायांचा प्रतिकार करणें, सुखसोईची वृद्धि करणें इत्यादि गोष्टींची जबाबदारी जशी राजाच्या शिरावर असते, तशीच गृहरूपी राज्यांतील सर्व मंडळीच्या सुखाची अभिवृद्धि करणें, घरांत शांति ठेवणें, सर्वांचें आरोग्य सांभाळणें, कुटुंबाचा उत्कर्ष करणें इत्यादि गोष्टींची जबाबदारी गृहिणीवर असते. परंतु ही जबाबदारी फारच थोडया स्त्रियांनां ठाऊक असते. पुष्कळांची अशी स्थिति असते कीं, त्यांनां आपली जबाबदारी काय आहे हेंच कळत नसतें. अशी स्थिति असल्यामुळें ह्मणजे गृहिणीला आपलें कर्तव्य योग्य प्रकारें कळत नसल्यामुळें अर्थात् कुटुंबांत योग्य शिस्त नसल्यामुळें अनेक मोठमोठीं घराणीं नामशेष होऊन गेलीं आहेत.

घर हें स्त्रीपुरुषांच्या सुखदुःखाचीच केवळ जागा नसून बालकांची शिक्षणभूमीहि आहे. घरांतील आचार व्यवहारादिकांचा बालकांच्या कोमल अंतःकरणावर बाळपणीं जो ठसा उमटेल तो वृद्धावस्थेंतहि कायम राहील, कधींहि बदलणार नाहीं; ही गोष्ट प्रत्येक गृहिणीनें आपल्या अंतःकरणामध्यें सदैव वागविली पाहिजे. आपल्या बऱ्या वाईट प्रत्येक कृतीचें बालकें पुढें अनुकरण करूं लागतील. यास्तव प्रत्येक गृहिणीनें आपलें वर्तन अत्यंत विचारपूर्वक ठेविलें पाहिजे. प्रत्येक गृहिणीला परमेश्वरानें जो एवढा मोठा अधिकार देऊन ठेविला आहे त्याचा तिनें सदुपयोगच केला पाहिजे. नाहीं तर तिच्यावर परमेश्वराचा महान् कोप झाल्यावांचून रहावयाचा नाहीं.

गृहिणीचे अधिकार अनेक आहेत. गृहिणी ही पतीची सहधर्मिणी आहे; परिवारांतील मंडळीला सुखशांति देणारी आहे, आणि बालकांनां शिक्षयित्री आणि स्नेहमयी जननी आहे. सतत परिश्रम, संतोष, धैर्य, विवेक, यांच्या योगानें तिचा संसार उन्नति पावेल; धर्माचरण, नीति आणि सद्गुण यांनीं तिचें घर नंदनवन बनेल; अंतःकरणांत दया, सर्वांचें हित पहाण्याविषयीं तत्परता, विनयी वर्तन यांनीं ती परिवारांतील मंडळीच्या आणि शेजाऱ्या पाजाऱ्यांच्या आदरास पात्र होईल आणि परमेश्वराची शुभ इच्छा पूर्ण होईल. यास्तव कशा रीतीनें वागलें असतां प्रत्येक स्त्रीला सुगृहिणी होतां येईल व तिच्या संसाराची उन्नति होईल, हें या लेखामध्यें सांगण्याचें योजिलें आहे.

आजकाल आपल्या देशामध्यें जिकडे पहावें तिकडे रोगराईचा प्रसार झालेला आढळून येतो. असें होण्याचीं कारणें अनेक असतील, परंतु त्यांत आपल्या लोकांच्या घरांची चमत्कारिक रचना व आपण आपलीं घरें ज्या स्थितींत ठेवित असतों ती स्थितीच विशेषतः कारण आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत येईलसें वाटत नाहीं. आपलीं घरें योग्य रीतीनें बांधलेलीं असतील, हवा उजेड त्यांत चांगल्या प्रकारें खेळत असेल व त्याचप्रमाणें हीं घरें योग्य रीतीनें स्वच्छ आणि व्यवस्थित ठेवण्याविषयीं योग्य खबरदारी घेण्यांत येईल तर त्यांत रहाणाऱ्या मंडळीचें आरोग्य पुष्कळच सुधारेल, यांत मुळींच संशय नाहीं. परंतु खेदाची गोष्ट ही कीं, इकडे कोणाचेंच लक्ष्य जात नाहीं.

घरांत जिकडे तिकडे टापटीप आणि व्यवस्था असली ह्मणजे कोणतेंहि काम सुरळीतपणें आणि लवकर होत असतें एवढेंच नव्हे, तर जिकडे तिकडे सुरेख व्यवस्था असल्यामुळें तें घरहि मोठें रमणीय दिसतें व आंत रहाणाऱ्या मंडळीला उत्साह वाटतो. अमुक एक वस्तु अमुक एका ठिकाणीं असावयाची हें ठरलेलें असलें ह्मणजे मग कामाचा कांहींएक घोटाळा होत नाहीं. परंतु असा कांहींएक निर्बंध नसला व कोणतीहि वस्तु मनाला वाटेल त्या ठिकाणीं टाकून दिली, ह्मणजे जिकडे तिकडे अडगळ होते व पुनः त्या वस्तूची गरज लागतांच ती अमुकच स्थळीं ठेविलेली नसल्यामुळें ती शोधण्यांत वेळाची हानी होऊन व प्रसंगविशेषीं ती न सांपडल्यामुळें कामाची खोटी होते व दुसऱ्याहि अडचणी सोसाव्या लागतात. सकाळीं एक वस्तु एका ठिकाणीं ठेविली होती, दुपारीं ती दुसरीकडे, संध्याकाळीं तिसरीकडेच व रात्रीं चौथीकडे असा जर प्रत्यहीं क्रम असला, तर काम व्यवस्थितपणें होण्याचा कितपत संभव आहे, हें स्पष्ट कळण्याजोगें आहे. सकाळीं पाहिलें तों हात पुसावयाचा रुमाल दोरीवर वाळत होता; दुपारीं तो माजघरांतील दारावर पडलेला होता; संध्याकाळीं स्वयंपाकघरांतील खुंटीवर त्यानें जागा पटकाविली होती. रात्रीं भोजनोत्तर हात पुसण्यासाठीं रुमालाची गरज लागली परंतु त्याचा पत्ताच नाहीं! अंगावरील वस्त्रानेंच हात पुसावे लागले. निजतांना तो रुमाल बिछान्यावर लोळत असल्याचें दिसून आलें. भिजलेला व मळकट रुमाल बिछान्यावर पडल्यामुळें स्वच्छ चादर बिघडून जाऊन भिजून गेली होती. तसल्याच ओल्या बिछान्यावर निजावें लागलें. अशी ही सर्वच अव्यवस्था आणि त्रास कां बरें सोसावा लागला? याचें कारण एवढेंच कीं, गृहिणी कर्तव्यदक्ष नाहीं. त्या रुमालाला जर नेमलेली जागा असती व काम होतांच तो पुनः जागच्या जागीं ठेविलाच पाहिजे अशी जर घरांतील लहानथोर सर्व मंडळीस गृहिणीची सक्त ताकीद असती, तर असा त्रास सोसावा लागला नसता. निजण्याच्या खोलींत पहावें तर तेथेंहि अशीच गडबड. अनावश्यक असें बरेंचसें सामान खोलींत कोंबून भरून तेथें उगीच अडगळ माजविली आहे व विनाकारण खोलीची शोभा बिघडवून

टाकिली आहे. घरांतील सर्व जागा स्वच्छ राखून एकंदर सामान व्यवस्थित ठेविलें ह्मणजेच केवळ झालें नाहीं, तर जेणेंकरून घर शोभिवंत दिसेल असें करण्याविषयींहि पुष्कळ काळजी घेतली पाहिजे. घरांत पाय टाकतांच तेथील एकंदर टापटीप आणि शोभा पाहून 'वाहवा' असे उद्गार तोंडांतून निघतील व पहाणाराचे डोळे निवतील अशीच एकंदर व्यवस्था असली तरच त्याला घर ही संज्ञा योग्य होईल.

घरांत सर्वांत उत्तम जी जागा असेल, बाहेरची हवा आंत आणि आंतील हवा बाहेर जाण्याची जेथें योग्य व्यवस्था असेल, त्याचप्रमाणें ज्या जागीं दररोज सूर्याचे किरण खेळत असतील, अशी जागा निजण्यासाठीं योजावी. निजण्याच्या जागीं जेवढें थोडकें सामान असेल तेवढें चांगलें. निजण्याची जागा होतां होईल तों माडीवर असणें उत्तम. त्याचप्रमाणें निजण्यासाठीं सामर्थ्याप्रमाणें पलंग किंवा खाट असावी. जमिनीवर होतां होई तों निजूं नये. निजण्याच्या जागीं अधिक तर कपडे, पुस्तकें वगैरे ठेवण्यासाठीं एखादें कपाट, लिहिण्यासाठीं एक टेबल, एक दोन खुर्च्या व एखादी दुसरी पेटी एवढेंच सामान ठेवावें. उगीच भाराभर सामानाची गर्दी करूं नये. सामानाची अडगळ झाल्यानें मोकळी हवा खेळण्यास प्रतिबंध होतो व तसें होणें हें प्रकृतीस अपायकारक आहे. शुद्ध हवेचें महत्व नेहमीं लक्ष्यांत वागवावें. निजण्याचे खोलींत तसबिरी वगैरे लावावयाच्या असतील तर त्या चांगल्या निवडून लावाव्या. भलत्या सलत्या तसबिरी लावणें चांगलें नव्हे. आपल्या देशांतील महान् पुरुषांच्या, साध्वी स्त्रियांच्या, त्याचप्रमाणें परदेशांतीलहि वंदनीय स्त्रीपुरुषांच्या किंवा सुंदर सुंदर देखाव्यांच्या तसबिरी लावाव्या. अशा तसबिरींचें दर्शन झाल्यानें त्या त्या सत्पुरुषांच्या गुणांचें स्मरण होईल व त्यांचें अनुकरण करण्याची अंतःकरणास प्रेरणा होऊन मनांत पवित्र विचार उदय पावतील. सकाळीं निजून उठल्यावरोबर एकंदर खिडक्या दारें उघडून टाकावीं ह्मणजे आंत जर दूषित हवा राहिली असेल तर ती निघून जाईल व बाहेरील शुद्ध हवा घरांत खेळेल. निजण्याची जागाच नव्हे तर एकंदर घर दररोज सकाळ संध्याकाळ झाडून स्वच्छ

करावें. परंतु त्यांतहि निजण्याबसण्याची जागा अत्यंत स्वच्छ ठेवावी. झाडतांना पलंग किंवा खुर्च्या टेबलांच्या सांधीफटींतील केरहि साफ झाडून काढावा. पुष्कळांचें या गोष्टीकडे दुर्लक्ष्य होत असतें. पलंगावर, कपाटावर, टेबल, खुर्ची इत्यादिकांवर इतका मळ सांचलेला असतो कीं, मळाच्या योगानें त्या वस्तु लवकरच खराब होऊन निरुपयोगी होत असतात. यासाठीं सर्व सामान झाडून पुसून अगदीं स्वच्छ ठेवावें. पलंग खुर्च्या इत्यादिकांची दररोज साफसफाई ठेविली नाहीं तर पुढें त्यांत ढेंकुणांचें साम्राज्य चालू होतें व दररोज त्यापासून इतका कांहीं त्रास सोसावा लागतो कीं, त्याचा अनुभव पुष्कळांनां असेलच. त्याचप्रमाणें घरांत मुरकुट, डांस, चिलटें इत्यादिकांचा उपद्रव होण्याचें कारण घरांत घाण सांचूं देणें हेंच विशेषतः आहे. घरांतलि एकंदर जागा झाडून सारवून नेहमीं लख्ख ठेविली, घाण ह्मणून कोठेंच होऊं दिली नाहीं, तर वरील डांस चिलटांचा उपद्रव पुष्कळच कमी होईल, हें निराळें सांगावयास नकोच. घरांतील भिंतींस वर्षांतून एक दोन वेळ चुना लावण्यास मोठासा खर्च येत नसतो; परंतु आळसामुळें पुष्कळांकडून याची हयगय होते. असें करणें चांगलें नव्हे. आरोग्याच्या कामीं अशी हयगय करणें हें शहाणपणाचें नव्हे. त्याचप्रमाणें दर आठ पंधरा दिवसांनीं नियमितपणें जमिनी सारवून स्वच्छ टेवणें हेंहि अगत्याचें आहे. इतर कामें जशीं अवश्य केलींच पाहिजेत, तशींच हींहि समजून यांची हेळसांड होऊं देऊं नये. दररोज संध्याकाळीं ऊद, धूप इत्यादि सुवासिक वस्तूंचा धूर सर्व घराला नसला तरी निजण्याबसण्याचे जागीं अवश्य दिला पाहिजे. या धुरानें घरांतील दूषित हवा नाहींशी होऊन घरांत मच्छरादिकांचा त्रासहि कमी होतो.

थंडीच्या दिवसांत निजण्याच्या खोलीच्या खिडक्या उघड्या ठेवणें अपायकारक आहे. प्रकृतीच्या आरोग्यासाठीं शुद्ध हवा जितकी आवश्यक आहे तितकेंच किंबहुना त्याहूनहि जास्त हिंवाळ्यांतील थंड हवेचा प्रतिकार करणें जरूरीचें आहे. उन्हाळ्यांत ह्या तर खिडक्या मोकळ्या

टाकाव्या परंतु त्यांतहि आपल्या समोरची खिडकी नेहमीं बंद ठेवण्याची काळजी घेतली पाहिजे. समोरची खिडकी उघडी ठेविली तर वाऱ्याचा उपद्रव होण्याची भीति आहे. शिवाय सकाळीं डोळ्यांपुढें प्रकाश येईल व तसा प्रकाश येणें दृष्टीला अपायकारक आहे. यासाठीं समोरासमोरच्या खिडक्या बंद करून बाकीच्या मोकळ्या टाकाव्या. एकाच खोलींत गर्दी करून पुष्कळ माणसांनीं निजूं नये. श्वासोच्छ्वासानें हवा त्वरित दूषित होत असते. यास्तव गर्दी न करतां जागेच्या सोईप्रमाणें प्रशस्त स्थळीं निजण्याची व्यवस्था करावी.

बिछान्यावरील पांघरुणें, गाद्या वगैरे नेहमीं उन्हांत टाकाव्या. उन्हाचे योगानें तीं ऊबदार होतात व त्यांत ढेंकूण वगैरे होत नाहींत. बिछान्यावर आंथरावयाची चादर एकदोन दिवसां आड धुवावी. एकच चादर धुतल्याशिवाय बरेच दिवसपर्यंत ठेवूं नये. बिछाना स्वच्छ आणि निर्मळ असला ह्मणजे झोंप कशी सुरेख येते. चादर मळीण झालेली, पांघरुणें घामट आणि गाद्यांनां वर्ष वर्ष ऊन दिलेलें नाहीं, अशी स्थिति असली ह्मणजे निद्रेचा कसा भंग होत असतो, याचा अनुभव पुष्कळांनां असेलच.

निजण्याच्या खोलींत पानांचें तबक ठेवण्याची पुष्कळांची चाल असते. परंतु ही चाल बरी नाहीं. कारण पुष्कळांनां अशी संवय लागलेली असते कीं, पानांला लावण्याकरितां चुना बोटानें काढावयाचा व पानाला लावल्या-नंतर तो जवळच्या कसल्या तरी वस्तूला पुसावयाचा. असा प्रकार होत असल्यामुळें निजण्याच्या खोलींत पानांचा डबा अगर तबक ठेविल्यानें लवकरच त्या खोलींतील पलंगाचे, टेबलाचे खूर, खुर्च्या व दुसऱ्या बहुतेक वस्तु चुन्याच्या डागांनीं बिघडलेल्या आढळतात. यास्तव पान खाण्याचें सर्व सामान एका स्वतंत्र जागींच ठेवणें बरें. वास्तविक ह्मटलें तर चुन्याचे हात पुसण्यास पानांच्या डब्यांत अगर तबकांत धुतलेल्या वस्त्राचा एखादा स्वच्छ फडका ठेवणें हें चांगलें व मग हें तबक कुठेंहि जरी ठेविलें तरी चिंता नाहीं. परंतु या क्षुल्लकशा गोष्टीकडेहि कोणी लक्ष्यच पुरवित नाहीं ही दुःखाची गोष्ट होय.

शिवणकाम आणि कशिद्याचीं कामें.

शिवणकामाचीं साहित्यें आणि साधनें.

वार, गज व टेप.

कापड मापण्याची आपली देशी रीत ह्मटली ह्मणजे गजानें व तसूनें मापणें ही होय. गज हा लांकडी, लोखंडी किंवा पितळेचा असून त्यावर तसू व गिरे खोदिलेले असतात; परंतु त्यांचे पोटविभाग त्यावर खोदिलेले नसून गिरे व तसू दाखविणारे आंकडेहि नसतात; त्यामुळें मापण्यांत मोठी गैरसोय होते. यापेक्षां फूट, इंचानें, माप घेण्याची रीत फारच सोयस्कर आहे. कारण एका यार्डाचे किंवा वाराचे तीन सम भाग असून त्या प्रत्येक भागाचे ह्मणजे फुटाचे बारा विभाग केलेले असतात, आणखी त्या प्रत्येक भागाचे ह्मणजे इंचाचे आठ आठ पोट भाग केलेले असतात. मापाचे या रीतीनें हवे तेवढे पोट विभाग केलेले असल्यामुळें कोणत्याहि प्रमाणांत माप घेण्यास हरकत पडत नाहीं. गजाप्रमाणें वार किंवा यार्ड हेहि लोखंडाचे, पितळेचे, किंवा लांकडाचे केलेले असतात; परंतु शिवणकामाच्या सोई-करितां व अंग माप घेण्याकरितां फूट इंचाचे पोटभाग करून छापिलेल्या नाड्या हल्लीं विशेष प्रचारांत आहेत; या नाड्या बहुतकरून ६० इंचांच्या असतात व त्या मुद्दाम घट्ट विणलेल्या असून त्यावर रंगानें आंकडे व भाग काढिलेले असतात. ह्या नाड्या 'टेप' ह्या संज्ञेनें ओळखण्यांत येतात. ह्या नाड्या किंवा 'टेपी' खरेदी करितांना एका विशेष गुणासंबंधीं चौकशी करून नंतर त्या विकत घ्याव्या. तो गुण ह्मणजे या नाड्यांत लोखंडी तारेनें वेष्टण देऊन बनविलेल्या धाग्यांचा उपयोग केलेला आहे किंवा नाहीं हा होय. हे धागे कलाबतूच्या धर्तीवर तयार केलेले असून त्या योगानें 'टेप' अतिशय मजबूत होते व वापरण्याचाहि तीवर फारसा परिणाम होत नाहीं.

हिंदुस्थानांतील बंगाली गज १ यार्ड किंवा ३ फुटींबरोबर आहे व १ मूठ ३ इंचांबरोबर आहे.

मद्रासचा गज ३३ इंचांबरोबर आहे व मुंबईचा गज २७ इंचांबरोबर आहे व तसू १ इंचाबरोबर आहे.

ही वरील गजाची माहिती देण्याचा मतलब इतकाच आहे कीं, केव्हां केव्हां दारावर कापड विकण्यास फेरीवाले येत असतात व त्यांकडून सौदा करण्याचा प्रघात आमच्या स्त्रीवर्गात बराच आहे; अशा फेरीवाल्यांकडून वारावर कापड ठरवून गजानें मापून घेण्याची चूक होऊं नये. निरनिराळ्या देशांतील वस्त्रांची वगैरे लांबी मापण्याचीं कोष्टकें खालीं दिल्याप्रमाणें आहेत.

इंग्लंड.

१२ इंच=	१ फूट.
३ फूट=	१ यार्ड.

फ्रान्स.

१ मिटर=	३९$\frac{३७}{१०००}$ इंच.
१० मिटर=	१ डेका मिटर.

दक्षिण अमेरिका.

१ पोलेगाडा=	१$\frac{९३}{१०००}$ इंच.
१ व्हारा=	१[illegible] यार्ड.

चीन, शॉंघाय.

१ चीह=	१४[illegible] इंच.

इजिप्त.

१ किरात=	१[illegible] इंच.

जपान.

१ सन=	१[illegible] इंच.
१० सन=	१ सकु.
१०० सन=	१ जो.

सौ. कृष्णाबाई तालचेरकर.

नवलविशेष.

बडोदें संस्थानचे सरसुभे रा० ब० धामणस्कर यांनीं सहा हजार रुपयांची रकम मुंबई युनिव्हर्सिटीच्या हवालीं करून त्या रकमेच्या व्याजांतून म्याट्रिक्युलेशनच्या परीक्षेंत पास होणाऱ्या मराठे ज्ञातीच्या ज्या मुलीस सर्वांत जास्त मार्क मिळतील तिला आपल्या पत्नीच्या नांवानें एक स्कालर्शिप देण्याची व्यवस्था केली आहे. रा. ब. धामणस्कर यांनीं पत्नीच्या स्मारकार्थ दिलेली ही देणगी अत्यंत प्रशंसनीय होय.

***

मुंबईंत प्रेमाबाई या नांवाची वीस वर्षे वयाची एक गुजराथी बाई आहे. ही आज दोन अडीच वर्षांत अन्नपाण्याला मुळींच शिवली नाहीं असें सांगतात. तरीहि तिची शरीरप्रकृति सुरेख आहे. इला भूकतहान मुळींच लागत नाहीं. कांहीं खाण्याचा प्रयत्न केल्यास ताबडतोब वांति होते. हा काय रोग आहे याचें मुंबईतील डाक्टरांस मोठें कोडें पडलेलें आहे.

***

पार्वती नांवाच्या एका बाईनें लक्ष्मण नांवाच्या आपल्या मुलास कांहीं दिवसांपूर्वीं जळक्या लांकडानें डाग दिला. डागण्याचें कारण मुलगा शाळेंत गेला नव्हता हें होय. या क्रूर आईला माजिस्ट्रेट साहेबांनीं एक महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा दिली. मुलाच्या साधारण अपराधास अशी कडक शिक्षा प्रत्यक्ष मातेनेंच करावी हा स्त्रियांनां सुशिक्षण नसल्याचाच परिणाम होय.

***

८० हजार रुबल खर्च करून एका रशियन गृहस्थानें एक कागदांचें घर बांधिलें आहे. हें अमेरिकेंतील न्युयार्क शहरांतील एका इंजिनियरानें तयार केलेलें असून दगडी इमारतीपेक्षां हें घर मजबुतींत आणि टिकाऊपणांत जास्त आहे असें तो इंजिनीयर सांगत आहे. अमेरिकन लोक करतील तेवढें थोडेंच.

***

रांदेर येथील हाजी युसफ इस्माईल या नांवाच्या एका श्रीमंत मुसलमान गृहस्थानें आपल्या घरांतील लग्नसमारंभाच्या आनंदाचे प्रसंगीं आपल्या ज्ञातींतील अनाथ मुलांसाठीं एक बोर्डिंग हाऊस स्थापन करण्यासाठीं ५० हजार रुपये दिले आहेत. फार स्तुत्य गोष्ट होय.

***

महाराणी साहेबांच्या प्रेतक्रियेला सवापांच लक्ष रुपयांचा खर्च झाला.



डचेस ऑफ यॉर्क.

CHITROTEJUCK PRESS KOLBHAT ST BOMBAY

महाराष्ट्र महिला.

महिलेचे उद्गार.

ता. २७ एप्रिलच्या **'टाइम्स ऑफ इंडिया'** पत्रांत 'हिंदु सामाजिक सुधारणा' या महत्वाच्या विषयावर एक विचार करण्याजोगा लेख आला आहे. बऱ्याच गोष्टींचा विचार करून त्यांत एके ठिकाणीं असें ह्मटलें आहे कीं "हिंदुस्थानांतील सामाजिक सुधारणेच्या कोड्याचा उलगडा हिंदुस्थानांतील स्त्रीवर्गालाच करितां येण्याजोगा आहे. परंतु, तो उलगडा करण्याला त्यांनां सुशिक्षण मात्र मिळालें पाहिजे. सामाजिक चालीरीतींचें भांडार ह्मटलें ह्मणजे प्रत्येक देशांत स्त्रियांजवळच असावयाचें; आणि एका प्राचीन विद्वान हिंदु लेखकानें तर असेंहि ह्मटलें आहे कीं 'या चालीरीतींसंबंधीं कधीं कांहीं संशय उत्पन्न झाला तर त्याचा अखेर निर्णय स्त्रियांकडूनच करून घ्यावा.' हिंदुस्थानांत कोणत्याहि जातींत पाहिलें तरी गृहव्यवस्थेंत स्त्रियांचें वर्चस्व अधिक दिसून येतें. आणि शिक्षणाचा त्यांच्या अंगीं अभाव असूनहि या वर्चस्वाचा उपयोग त्या फार चांगल्या रीतीनेंच करित असतात, हें त्यांनां अत्यंत भूषणावह आहे. त्यांनां उपयुक्त विषयांसंबंधीं ज्ञानप्राप्ति करून देण्याचे मार्ग जर सरकारानें सुलभ केले, तर हिंदुस्थानांत सामाजिक सुधारणेच्या प्रगतीला मदत करण्याकरितां जें कांहीं केलें पाहिजे किंवा करतां येण्याजोगें आहे तेंच सरकार करित आहे, असें होणार आहे."

***

'सामाजिक सुधारणेला सांगितलेलें हें औषध फार जुनें झालें आहे, इतकेंच नव्हे, तर या औषधापासून कांहीं गुणहि येत नाहीं, हें इतक्या वर्षांच्या अनुभवानें सिद्ध झालें आहे' असें येथील 'प्रार्थना समाजा'च्या वतीनें निघणाऱ्या 'सुबोधपत्रिके'चें ह्मणणें आहे. समाजांत असणाऱ्या बऱ्या आणि वाईट दोन्ही गोष्टींशीं स्त्रियांचा बराच निकट संबंध आहे, ही गोष्ट 'पत्रिका'बाईंनां मान्य आहे; परंतु आमच्या सामाजिक स्थितींत ज्या कांहीं वाईट गोष्टी आहेत त्या दूर करण्यास फक्त 'स्त्रीशिक्षण' हेंच कायतें एक औषध बस्स आहे, हें ह्मणणें मात्र त्यांनां मुळींच पसंत नाहीं. 'पत्रिका'बाई ह्मणतात 'मिशनरी लोकांनीं स्त्रियांनां शिक्षण देण्याच्या उद्देशानें पहिली शाळा उघडल्या दिवसापासून तों आजपावेतों हजारों हजार मुलींनां शिक्षणाचा लाभ झाला आहे; तेव्हां या इतक्या शिकून तयार झालेल्या स्त्रियांचा सामाजिक स्थितीवर कितीसा परिणाम झाला आहे व त्याचप्रमाणें सुधारणेप्रीत्यर्थ चालविलेल्या चळवळींत त्यांनीं सुधारकांनां कितीशी खरोखरी मदत केली आहे, हें 'टाइम्स' मधील लेखक सांगण्याची कृपा करितील तर बरें होईल.' हल्लीं झपाट्यानें फैलावत असलेल्या स्त्रीशिक्षणाचा एक मात्र प्रत्यक्ष परिणाम 'पत्रिका'बाईंनां दिसून येत आहे; आणि तो 'रंगित लोंकरीचा विलक्षण खप' हा होय! परंतु 'पत्रिका'बाईंच्या मतानें या परिणामाचा सामाजिक सुधारणेशीं कांहींच प्रत्यक्ष संबंध पोहोंचत नाहीं.

***

महिलेच्या वाचकभगिनींनां 'पत्रिका'बाईचें हें ह्मणणें कितपत रुचेल तें सांगवत नाहीं; परंतु, आमच्या मुलींनां हल्लीं मिळत असलेल्या शिक्षणापासून जर रंगित लोंकर विकणाऱ्या बोहऱ्यांचाच मात्र फायदा होत असेल तर ही मोठी शोचनीय गोष्ट ह्मटली पाहिजे. 'टाइम्स'मधील लेखकाप्रमाणें महिलेलाहि वाटत आहे कीं, सामाजिक सुधारणेची खरी गुरुकिल्ली स्त्रियांच्याच हातीं आहे. त्यांच्या मदतीविना हें काम होणें दुरापास्त आहे. त्यांनां योग्य शिक्षण देऊन सुशिक्षित केल्याविना सामाजिक

धारणेचें पाऊल जोरानें पुढें पडणें शक्यच नाहीं. 'पत्रिका'बाई ज्याला हल्लीं शिक्षण ह्मणत आहेत त्या शिक्षणानें स्त्रिया सुशिक्षित होत नाहींत, असाच महिलेचाहि समज आहे. परंतु 'टाइम्स'पत्रांतील लेखकाच्या वरील ह्मणण्याला बाध कसा येतो. हें मात्र समजत नाहीं. हल्लींच्या स्त्रीशिक्षणाचा मार्ग खास चुकत आहे; त्यांत अवश्य आणि त्वरित सुधारणा झाली पाहिजे; परंतु मोठ्या दुःखाची आणि दुर्दैवाची गोष्ट आहे कीं, आमच्या पुरुषवर्गाचें या महत्वाच्या गोष्टीकडे जावें तितकें लक्ष्य जात नाहीं. आह्मां स्त्रियांची ही अत्यंत शोचनीय स्थिति सुधारण्यास त्यांचेकडून व्हावे तसे प्रयत्न मुळींच होत नाहींत.

***

'पत्रिका'बाईंचें तर ठाम मत झालें आहे कीं, आपल्या समाजाला जे असंख्य रोग जडले आहेत ते हटविण्यास रामबाण मात्रा ह्मटली ह्मणजे 'धर्मसंशोधन,' आपल्या हल्लींच्या धर्मांत सुधारणा करणें, हीच होय. अर्थात् ती रामबाण मात्रा संपादन करण्यांत त्या अगदीं गढून गेल्या आहेत. दुसरीकडे पहाण्याला त्यांनां अवकाशच नाहीं. महिलेच्या इतर विद्वान् बंधूंचीहि स्थिति अशीच आहे. 'सामाजिक सुधारणा' आधीं कीं 'राजकीय सुधारणा' आधीं, हा पराकाष्ठेचा बिकट प्रश्न सोडविण्यांतच त्यांचा सारा वेळ व बुद्धिसामर्थ्य हीं खर्च होत आहेत. त्यापुढें स्त्रीशिक्षणासारख्या अत्यंत महत्वाच्या विषयाकडे लक्ष्य देण्यास त्यांनां मुळींच फावत नाहीं! सामाजिक सुधारणेला धार्मिक सुधारणा ही कदाचित् रामबाण मात्रा असेल; परंतु धार्मिक सुधारणा घडून येण्याला समाजाचें मन सुशिक्षणानें संस्कृत झालें पाहिजे. तेव्हां धर्मसुधारणेचा मार्ग सुलभ करण्याला सुशिक्षण हीच दिव्यौषधि नाहीं काय? धर्माचीं तत्वें लहानपणापासून मनुष्याच्या अंतःकरणांत बिंबलीं पाहिजेत; आणि हें काम मातेकडून जितकें चांगलें होईल तितकें दुसरें कशानेंहि होणार नाहीं. परंतु सुशिक्षणाशिवाय मातेला धर्माचीं उदात्त तत्वें कळावीं कशीं? आणि तिला स्वतः तीं पूर्णपणें कळल्याविना आपल्या मुलांच्या

कोमल अंतःकरणांत तीं तिनें ठसवावीं तरी कशीं? तेव्हां 'पत्रिका' बाईंच्या मताप्रमाणें सामाजिक सुधारणेला धार्मिक सुधारणा ही जरी रामबाण मात्रा असली, तरी तेवढ्यानें 'टाइम्स'मधील लेखकाच्या ह्मणण्याला वास्तविक बाध येतो असें मुळींच नाहीं.

***

वर लिहिल्याप्रमाणें हल्लींच्या स्त्रीशिक्षणाविषयीं आपलें अनुभवजन्य मत ज्या अंकीं दिलें आहे त्याच अंकीं 'पत्रिका'बाईंनीं पुढील आनंदाचें वर्तमान मोठ्या अभिमानानें प्रसिद्ध केलें आहे.

"बंगाल्यांत ब्राह्ममंडळींत यंदा बऱ्याच तरुण मुलींच्या निरनिराळ्या परीक्षा समाधानकारक रीतीनें पसार झाल्या आहेत, हें पाहून स्त्रीशिक्षणेच्छूंस आनंद झाल्यावांचून राहणार नाहीं. कुमारी शांता सरकार ह्या बी. ए. ची परीक्षा पास झाल्या असून, इंदुलेखा बसू, प्रभावती रे व हेमंत कुमारी दास ह्या एफ. ए ची परीक्षा उतरल्या आहेत. स्वानप्रभा सिंघ, इंदुप्रभा विश्वास, निरुपमा गांगोली, कुमुदिनी घोस, पुण्यप्रभा मुकरजी. सुखलता रॉय, भक्ति उशा दास, जामिनी दास, वसंती मित्र व हेम कुसूम मलिक ह्या प्रवेशपरीक्षा पास झाल्या आहेत. यंदां तेथील परीक्षांचे निकाल ह्मणण्यासारखे समाधानकारक नसतांही इतक्या मुली निरनिराळ्या परीक्षा उतरल्या आहेत, ही मोठी अभिमानाची गोष्ट होय."

महिलाहि या तरुण मुलींचें प्रेमानें अभिनंदन करित आहे व या वंगदेशस्थ भगिनींचें या कामीं अनुकरण करण्याविषयीं आपल्या महाराष्ट्र भगिनींस आग्रहानें सांगत आहे.

***

सोलापुर येथें **श्रीसरस्वतीमंदिर** या नांवाची एक उपयुक्त संस्था गेल्या पांच सहा वर्षांपासून तेथील मंडळीनें चालविलेली आहे. या मंदिराची सविस्तर हकीकत श्रीमती सौ. पार्वतीबाई देगांवकर यांनीं दिलेली आजच्या अंकीं प्रसिद्ध झालेली **महिलेच्या** वाचकभगिनींस दिसून येईलच. ही संस्था केवळ स्त्रीवर्गाच्या उन्नतीसाठींच व स्त्रीवर्गाच्या

साधानेच चालविलेली आहे, ही अभिनंदनीय गोष्ट होय. श्रीमती लक्ष्मीबाई साहेब अक्कलकोटच्या राणी साहेब; श्रीमती सौ. लक्ष्मीबाई देशमुख; श्रीमती सौ. बमवाबाई वाग्द, श्रीमती सौ. पार्वतीबाई देगांवकर आणि शेट वीरचंद दीपचंद व शेट लखमीदास खिमजी यांनीं प्रत्येकीं मंदिरास ३०० रुपयांहून जास्त मदत केली असून श्रीमती रमाबाई रानडे, श्रीमती रमाबाई जोशी, श्रीमती सौ. बयाबाई भाजेकर, श्रीमती सौ. काशीबाई कानिटकर, श्रीमती सौ. चिमाबाई नागपुरकर, श्रीमती सौ. लक्ष्मीबाई किर्लोस्कर, श्रीमती सौ. नर्मदाबाई सामंत, श्रीमती सौ. गंगाबाई जावलगीकर, मिसेस मेटना आणि प्रो. जी. आर्. काळे व किर्लोस्कर वकील यांहीं प्रत्येकीं १०० रुपयांहून जास्त मदत केलेली आहे. याशिवाय आणखीहि बऱ्याच मंडळीनें मंदिरास थोडी बहुत मदत केलेली आहे. अशा स्त्रियोपयोगी संस्थांची आजकाल आपल्या देशांत अत्यंत आवश्यकता आहे व अशा संस्थांस यथाशक्ति साह्य करणें हें प्रत्येक सुशिक्षित स्त्रीपुरुषांचें अवश्य कर्तव्य आहे, हें कोणीहि कबूल करील. विशेषतः स्त्रीवर्गानेंच या कामीं पुढाकार घेण्याची आवश्यकता आहे. पुरुषवर्ग राजकीय सुधारणा आधीं कीं सामाजिक सुधारणा आधीं याचा काथ्याकूट करित बसून स्त्रीशिक्षणासारख्या अत्यंत महत्वाच्या व सर्वांत प्रथम हातीं घेण्याजोग्या गोष्टीकडे दुर्लक्ष करित आहे, तेव्हां सुशिक्षित स्त्रियांनींच ह्या अत्यंत महत्वाच्या गोष्टीकडे लक्ष्य पुरवून आपल्या भगिनीवर्गाची उन्नति करण्यास झटलें पाहिजे. श्रीमती सौ. पार्वतीबाई देगांवकर यांच्या विनंतीचें महिलेच्या वाचकभगिनींनीं चीज केल्यास महिलेस फार समाधान वाटेल व कोणी मंदिरास साह्य करण्यासाठीं महिलेमार्फत वर्गणी वगैरे पाठविल्यास मोठ्या आनंदानें महिलेंत त्यांचीं नांवें प्रसिद्ध करून तो पैसा मंदिराच्या व्यवस्थापकांकडे पाठविण्यांत येईल.

सुशीला.

मावशीच्या घरीं कांहीं दिवस राहून आपल्या अंगच्या सद्गुणांनीं तेथील सर्व मंडळीचें प्रेम संपादन करून आणि आपल्या विनयशील व प्रेमळ वर्तनानें सर्वांच्या मनाला चटका लावून सुशीला आपल्या आईबापांकडे निघून आली. पुढें दहाबारा दिवसांनीं तिला नेण्यासाठीं तिच्या सासऱ्याकडून मनुष्य आला. आतां उद्यां सुशीला सासरीं जाणार हें निश्चित होतांच तिच्या आईबापांच्या अंतःकरणाची जी कष्टजनक स्थिति झाली तिचा अनुभव पुष्कळ आई-बापांनीं प्रत्यक्ष अनुभविला असेलच. मोठ्या प्रेमानें आणि अनेक कष्ट सोसून अगदीं बाळपणापासून वाढविलेल्या पोटच्या गोळ्याला परक्या स्थळीं, परक्या घरीं व परक्याच्या हवालीं करतांना प्रेमळ मातापितरांनां किती कठीण वाटत असतें व सुशीलेसारख्या सद्गुणी व विनयशील कन्येचा विरह सहन करणें किती कष्टजनक होतें, याचें. शब्दांनीं वर्णन करण्याचा प्रयत्न करणें शक्तीपलीकडचें आहे. सुशीलेचा विरह तिच्या आईबापांस अतिशयच दुःखजनक भासूं लागला. सुशीला आतां आपल्या घरून कायमची जाणार हा विचार मनांत येऊन त्यांनां अन्नपाणीहि रुचेनासें झालें. घरांतील एकूण एक मंडळी अगदीं खिन्न होऊन गेली. सुशीलेची आई तर एकसारखी अश्रु ढाळूं लागली. परंतु सुशीलेला तिच्या नवऱ्याच्या घरीं पाठविण्याशिवाय गत्यंतरच नाहीं, हें लक्ष्यांत आणून दुःखित मनानें ती तिच्या पाठवणीची तयारी करूं लागली. सुशीलेसहि आपल्याला आतां माहेरचा कायमचा वियोग होणार हें लक्ष्यांत येऊन फार दुःख झालें व तिचेहि डोळे भरून आले. परंतु माहेर हें केवळ दोन दिवसांचें, सासर हेंच स्त्रीचें खरें घर होय, हें लक्ष्यांत आणून मनाशीं पुष्कळ विवेक करून तिनें आपलें दुःख आंवरण्याचा प्रयत्न केला. सकाळपासून ती शेजाऱ्यापाजाऱ्यांचा निरोप घेऊं लागली. सुशीला सासरीं जाते याबद्दल शेजारपाजारची मंडळी ही फार कष्टी झाली व त्यांनींहि मोठ्या नाइलाजानें तिला निरोप देऊन मंगल

आशीर्वाद दिले. रात्रीं सगळ्या मंडळींचीं जेवणेंखाणें आटोपल्यावर विष्णुपंत सुशीलेला जवळ घेऊन तिच्या पाठीवरून हात फिरवित ह्मणाले "सुशीले! जगाच्या रहाटीप्रमाणें तूं उद्यां आह्मांला सोडून आपल्या नवऱ्याच्या घरीं जाणार हें ठीकच आहे; तूं पतिगृहीं जात आहेस याबद्दल आह्मां सर्वांनां आनंद वाटावा. आह्मीं मोठ्या संतोषानें तुझी पाठवणी करावी, हें योग्य असतांना तूं आह्मांला सोडून जात आहेस याबद्दल आह्मांला फार दुःख होत आहे. हें दुःख होणें हें अविचाराचें आहे खरें, परंतु अंतःकरणांतील मनोवृत्ति उचंबळल्यावर योग्यायोग्यतेकडे लक्ष्यच जात नाहीं. माया ही वेडी आहे, तिला सारासार विचार कळत नसतो. असें ह्मणतात त्याचा प्रत्यक्ष अनुभव आज आह्मी घेत आहों. तुझ्या आईची स्थिति किती करुणाजनक झाली आहे, हें तूं सकाळपासून पाहतच आहेस. तुलाहि आह्मांला सोडून जातांना फार दुःख वाटणें साहजिकच आहे; परंतु सुशीले, शहाण्या मनुष्यांनीं आपल्या मनोवृत्तींस आळा घालून जगरहाटीप्रमाणें वागलें पाहिजे. आज पंधरा सोळा वर्षें आमच्या शक्तीप्रमाणें आह्मीं तुझें लालनपालन केलें, आमच्या समजाप्रमाणें तुला योग्य तें शिक्षण दिलें व तुला लहानाची मोठी केली. तुझा आमचा इतकाच संबंध देवानें जुळवून दिला होता. आतां तूं मोठी झालीस, समंजस झालीस, बरें वाईट, न्यायान्याय तुला कळूं लागलें आहे. आतां तूं आमची नव्हेस. आतां तूं परक्याची झालीस. आजवर जे तुला परकी होते ते आतां तुझे झाले व आह्मी जे इतके दिवसपावेतों तुझे होतों ते आतां तुला परकी झालों. असा हा ईश्वराचे घरचा चमत्कारिक न्याय आहे. हा आह्मांला चमत्कारिक दिसतो खरा, परंतु जग सुरळीत रीतीनें चालावयास याची योजना आवश्यक आहे. तेव्हां वेड्या मनाला जरी कष्ट झाले तरी ते सहन करून ईश्वराच्या नियमांस प्रत्येकानें मान्य झालें पाहिजे. मुलगी माहेरीं शोभते व स्त्री पतिगृहीं शोभते असें जे ह्मणतात तें अगदीं यथार्थ आहे. कन्याविरहासारखें दुसरें दुःसह विरहदुःख नाहीं असें ह्मणतात हें

अगदीं खरें आहे. परंतु त्याला उपाय काय? आह्मांला व तुला कितीहि दुःख वाटलें तरी तें आतां व्यर्थ आहे. तुला आतां पतिगृहीं गेलेंच पाहिजे. बाळ, तूं मोठ्या आनंदानें नवऱ्याच्या घरीं जा व सुखानें संसार कर. तूं शहाणी आहेस, समजूतदारहि आहेस, तुझें कर्तव्य तुला पूर्णपणें कळत आहे. मीं आणखी तुला कांहीं सांगितलें पाहिजे आहे, अशी गोष्ट नाहीं. तथापि पितृकर्तव्य स्मरून या प्रसंगीं तुला दोन शब्द सांगणें अवश्य आहे. सुशीले, ईश्वरानें हें जग सुरक्षितपणें चालण्यासाठीं स्त्रीपुरुषांची सांगड घालून दिलेली आहे आणि या सांगडीला संसार अशी संज्ञा दिली आहे. हा संसार करण्याचा मुख्य उद्देश एवढाच आहे कीं, मनुष्याला सुखप्राप्ति व्हावी व इहपर लोकींचे अर्थ साध्य होऊन अखेर परलोकीं मुक्ति मिळावी. ह्या गोष्टी सफळ होण्यास संसार सुखी असला पाहिजे. आणि संसार सुखी करणें किंवा दुःखी करणें हें ज्याच्या त्याच्या वर्तनावर आहे. सुख सुख ह्मणून सर्व जग ज्यासाठीं धडपडत असतें, तें सुख कांहीं लांब नसून प्रत्येकाच्या हातीं असतें. समाधानवृत्ति ही सर्व सुखांची गुरुकिल्ली होय! घरांत अठरा विश्वे दारिद्य, सुग्रास अन्नाचें किंवा अंगभर वस्त्रांप्रावरणांचें कधीं स्वप्नांतहि दर्शन नाहीं, अशा एखाद्या भयंकर दारिद्यानें गांजलेल्या कुटुंबांतहि कधीं कधीं जें सुख दृष्टोत्पत्तीस येतें, त्याची छायाहि, पूर्ण श्रीमंतींत मग्न असलेल्या व सर्व प्रकारें यथेच्छ ऐश्वर्य उपभोगित असणाऱ्या श्रीमान् कुटुंबांतहि आढळून येत नाहीं. माझ्या सांगण्याचा मतलब एवढाच कीं, सुख सुख ह्मणून ज्याच्यासाठीं सारें जग हपापलेलें असतें तें सुख कांहीं दागदागिने, वस्त्रेंभूषणें, धनदौलत, दासदासी, इत्यादिकांच्या प्राप्तींत नसतें, तर तें केवळ स्वतांच्या आचरणांत आणि स्वतांच्या समाधानवृत्तींतच असतें. आपण सुखी आहों असें मानिलें तर आपण खरोखरीच सुखी होऊं, आणि आपण दुःखी आहों असा मनाचा ग्रह करून घेतला ह्मणजे मग आपल्या दुःखास पारावार रहाणार नाहीं. यास्तव प्रत्येक समंजस मनुष्यानें समाधानवृत्तीनेंच राहिलें पाहिजे. आमचे आजोबा

आह्मांला नेहमीं सांगत 'बाबांनों, तुह्मी नेहमीं खालीं पहात जा, वरती कधींहि पाहूं नका.' त्यांच्या सांगण्याचा मतलब एवढाच कीं, प्रत्येकानें नेहमीं आपल्याहून ज्याची स्थिति कमी प्रतीची आहे त्याच्याकडे पाहून त्याच्याहून आपण किती तरी सुखी आहों ही आपल्यावर परमेश्वराची मोठी कृपा होय, असें मानून समाधानवृत्तीनें रहावें; आपल्याहून ज्याची स्थिति उत्तम असेल अशाकडे पाहून आपल्या स्थितीबद्दल कष्टी होऊं नये. ज्यांच्या पायांत फाटका तुटका जोडा असेल त्यांनीं अनवाणी चालणाऱ्या मनुष्याकडे पहावें, गाडींत बसून फिरणाऱ्याची स्थिति लक्ष्यांत आणून दुःख करित बसूं नये. तात्पर्य, देवानें आपल्यास जी स्थिति दिली असेल तींत संतुष्ट राहून ती सुधारण्याचा यथाशक्ति प्रयत्न करित रहावें. आपल्याला असुक नाहीं, तमुक नाहीं ह्मणून कर्माला दोष देत बसूं नये. समाधानवृत्ति ही संसारांत आणि त्यांतहि आमच्यासारख्या गरीबीच्या संसारांत मोठी महत्वाची गोष्ट आहे. ही समाधानवृत्ति अंतःकरणांत सदैव जागृत असली ह्मणजे आपल्याला दागदागिने नाहींत, वस्त्रेंभूषणें नाहींत, गडीमोलकरणीचें सुख नाहीं, इत्यादि वेडे विचार अंतःकरणाला कधींहि स्पर्श करणार नाहींत. शिवाय दुसरीहि एक गोष्ट आहे. दागदागिने आणि वस्त्रेंभूषणें यांसाठीं आमच्या स्त्रिया एवढ्या कां बरें हपापलेल्या असतात? ज्यांची वास्तविक गरिबीची स्थिति आहे त्यांनीं कर्जवाम करून किंवा अन्य रीतीनें दागिने मिळवून देह शृंगारिला व आपण मोठे श्रीमंत आहों असें लोकांस भासविण्याचा प्रयत्न केला ह्मणजे त्यापासून त्यांनां खरें सुख प्राप्त होत असतं काय? कर्जवाम करून किंवा दुसऱ्याचे मागून आणून अथवा पोटापाण्याचे हाल करून घेऊन दागिन्यांनीं देहाची शोभा वाढविण्याचा प्रयत्न करणारीं माणसें अगदीं मूर्ख होत, असें मी समजतों. बाहेरून आनंदवृत्ति दाखवावयाची आणि आंतून नानाविध संकटांनीं आणि काळजींनीं जळून जावयाचें, असली दिखाऊ श्रीमंती आणि बाह्य शोभा व सौंदर्य अगदीं निंद्य होय. बरें आपण असें केलें ह्मणजे लोक

आपल्याला श्रीमंत ह्मणत असतात काय? लोकांची मूळची वृत्तीच अशी आहे कीं, दुसऱ्यांचीं व्यंगें आणि कमीपणा डोळ्यांत तेल घालून शोधून काढावयाचा. त्यांच्या दृष्टीस असा प्रकार पडला व कधींना कधीं तो दिसावयाचाच, ह्मणजे मग सर्व लोकांत आपलें जें कांहीं हसें, निंदा आणि मत्सर होतो, तो विचारूंच नये! तात्पर्य, कर्जवास करून दागिन्यांची हांव करणें परिणामीं अहितकर आहे. बाहेरून क्षणिक शोभा देणारे परंतु आंतून सर्वप्रकारें ताप देणारे अलंकारांची हांव धरण्यापेक्षां अंतर्बाह्य सुखदायक असे जे सद्गुणरूपी अलंकार तेच प्रत्येक स्त्रीनें आपल्या देहावर धारण करणें हेंच श्रेयस्कर आहे. तुला सांगावयाची दुसरी महत्वाची गोष्ट ह्मटली ह्मणजे प्रत्येक स्त्रीनें नेहमीं उद्योगी असलें पाहिजे ही होय. घरची जशी स्थिति असेल त्याप्रमाणें प्रत्येकीनें घरांतील कामकाज करून उरलेला वेळ सत्कर्मी खर्च केला पाहिजे. परंतु दुःखाची गोष्ट ही कीं, आजकाल आमच्या स्त्रिया आपला फुरसतीचा वेळ आळसांत व निरर्थक गप्पागोष्टींत घालवित असतात. आणि स्त्रियांची ही आळसाची प्रवृत्ति त्यांच्या मुलांच्या अंगीं जडून एकंदर देश आळशी होऊन बसला आहे. श्रीमतांच्या त्याचप्रमाणें गरीबवर्गाच्या स्त्रियांस आजकाल कांहींएक कर्तव्य नाहीं, अशी स्थिति झालेली आहे. ही स्थिति पहिल्यानें सुधारली पाहिजे. आणि तुझ्या सारख्या सुशिक्षित तरुण मुली जर मनावर घेऊन आपल्या भगिनीवर्गाच्या अंगचें हें व्यंग दूर करण्याचा प्रयत्न करतील तर मोठेंच देशहित केल्यासारखें होणार आहे. तो प्रयत्न कसा केला पाहिजे, हें ज्याच्या त्याच्या योग्यतेवर आणि स्थलकालाच्या परिस्थितीवर अवलंबून आहे. सुशीले, तुला जास्त सांगण्याची आवश्यकता नाहीं. आमच्या सामर्थ्याप्रमाणें आम्हीं तुला जें कांहीं शिक्षण दिलें आहे, त्याचा तूं योग्य सदुपयोग करून सर्वांकडून बरें ह्मणवून घे व तुझ्या सासुसासऱ्यांस व आह्मांस तुझ्या वर्तनापासून आनंद होईल अशी वागत जा. नेहमीं देव तुला अशीच बुद्धि देवो व तुला तुझ्या नवऱ्यासह सदोदित आनंदांत ठेवो, असा माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे.

नासिक येथील आरोग्यभुवन.

दुखण्यांतून उठल्यावर वैद्याच्या किंवा डॉक्टराच्या सांगण्यावरून हवा पालटण्यास जाण्याचें आपल्यास कधीं कधीं प्रयोजन पडतें. द्रव्याची वगैरे विशेष अडचण नसल्यास एखाद्या हवाशीर स्थळीं जाऊन तेथें भाड्यानें बंगला घेऊन प्रकृति सुधारण्यासाठीं रहातां येतें. ही श्रीमंत लोकांची गोष्ट झाली; परंतु मध्यम स्थितींतील लोकांस इतका खर्च झेपण्याची ऐपत नसल्यामुळें हवा बदलण्यास जाणें दुरापास्त होतें. तेव्हां विशेषेंकरून अशा मध्यम स्थितींतील लोकांस 'सॅनिटेरिअम' अथवा आरोग्यभुवनासारख्या संस्था फार उपयुक्त असतात. पार्शी, मुसलमान वगैरे लोकांनीं अशा प्रकारच्या सर्वतोपरी उपयुक्त संस्था जागोजाग स्थापन करून आपल्या ज्ञातिबांधवांवर अगणित उपकार करून ठेविले आहेत. कांहीं धनाढ्य गुर्जर गृहस्थांनींहि या बाबतींत त्यांचें अनुकरण केलें आहे. मुंबईनजीक मींरा येथें आगगाडीच्या स्टेशनाजवळ अशाच प्रकारचें एक मोठें 'हिंदु आरोग्यभुवन' आहे; परंतु त्याचा उपयोग बहुधा गुजराथी लोकांनाच होत असतो. तेव्हां आपल्या दक्षिणी लोकांस, विशेषतः बायका मनुष्यांस उपयुक्त आणि सोयस्कर असें स्थळ म्हटलें म्हणजे हें नासिक येथील स्त्रिया व मुलें यांच्यासाठीं स्थापिलेलें आरोग्यभुवनच होय. या आरोग्यभुवनाची अगावी तितकी माहिती नसल्यामुळें आमची मंडळी त्याचा घ्यावा तसा उपयोग करून घेत नाहींत. यंदा मला येथें येऊन रहाण्याचा योग आल्यामुळें या उपयुक्त संस्थेची मला मिळाली तितकी माहिती माझ्या भगिनींना करून देण्याचें मीं आज योजिलें आहे.

मुंबईपासून नासिक ११७ मैल लांब असून तें समुद्राच्या सपाटीपासून १९०० फुटींच्या उंचीवर आहे. कासाऱ्याच्या घांटावरून आगगाडी येत असतां आजूबाजूचा सृष्टिप्रदेश मनोल्हादक आणि प्रेक्षणीय आहे. नासिकरोड स्टेशनावरून हें आरोग्यभुवन अवघें पाऊण मैलावर आहे. येथील गांवढेकरी लोक या आरोग्यभुवनास 'बारा बंगले' या नांवानें ओळखितात. सर भालचंद्र कृष्ण, शेट हरकिसनदास नरोत्तमदास, शेट

विजभुकणदास आत्माराम, शेट वीरचंद दीपचंद, मि० फीपसन, मिसेस गॉस्लिंग आदिकरून उदार आणि धनिक मंडळीच्या खटपटीनें या आरोग्यभुवनाची सन १८९४ सालीं स्थापना झालेली आहे. बऱ्याच बड्या बड्या लोकांकडून या स्तुत्य कामासाठीं वर्गणी गोळा करण्यांत आली होती. घोड्याच्या नालाच्या आकारांत येथें एकंदर बारा बंगले बांधण्यांत आले आहेत. पैकीं दोन पाशा लोकांकरितां, तीन हिंदु लोकांकरितां, तीन ख्रिस्ती लोकांकरितां व बाकीचे इतर जातींकरितां आहेत.

हिंदु लोकांकरितां ह्मणून जे टुमदार दगडी बंगले आहेत ते हिज हायनेस महाराजा गायकवाड ऑफ बडोदा, हिज हायनेस जाम ऑफ जामनगर, हिज हायनेस महाराजा ऑफ भावनगर, ऑनरेबल मुरारजी गोकुळदास आणि शेट हरकिसनदास नरोत्तमदास यांच्या खर्चानें बांधिले आहेत. प्रत्येक बंगल्याच्या ओट्यावर एक एक स्फटिक शिला बसवून तीवर ज्या सद्गृहस्थाच्या औदार्यानें तो बंगला बांधण्यांत आला आहे, त्याचें नांव कोरलें आहे. बंगल्यांच्या आजूबाजूस जागा अगदीं ऐस पैस आहे. पुढील वर्तुळाकृति 'कम्पाउन्डां'त दोन विहिरी खोदल्या आहेत. या विहिरींचें पाणी पिण्यास उपयोगीं पडतें. एके बाजूस लहान मुलांना खेळण्याकरितां 'दोले' टांगले असून जवळच 'टेनिस' खेळण्याचीहि जागा आहे. या विस्तीर्ण पटांगणाच्या मध्यभागीं एका उंच खांबावर यूनिअन जॅक ' ब्रिटिश राजसत्तेचा ध्वज उभारलेला असतो.

बंगला रिकामा असला तर कमिटीस अर्ज देऊन दहा रुपये फी भरली ह्मणजे एक महिनाभर बंगला रहाण्यास मिळतो. पाणी वगैरे प्रत्येकाच्या बंगल्यांत पोहोंचविण्यांत येतें. आरोग्यभुवनांत येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या उपयोगासाठीं येथें एक पुस्तकालयहि आहे. या पुस्तकालयांत इंग्रेजी कादंबऱ्यांचाच भरणा विशेष आहे हें सांगावयास नकोच. मराठी पुस्तकांचा असावा तितका संग्रह नाहीं. आरोग्यभुवनाची एकंदर व्यवस्था पहाण्यास एक पगारदार 'नेटिव सुपरिन्टेन्डन्ट' नेमलेला आहे व तो तेथेंच रहातो.

डॉ. मिसेस पिची फिप्सन या बाईचा बंगला शेजारींच आहे. त्याला 'दसक बंगला' असें नांव आहे. हिंदुस्थानांत ज्या पहिल्या प्रथम डॉक्टरणी

आल्या त्यांपैकींच पिर्ची फिप्सन बाई या एक आहेत. बरेच दिवस या 'कामा हॉस्पिटल' च्या मुख्य डॉक्टरीण होत्या. यांचे पति मि. फिप्सन व सर भालचंद्र हे या आरोग्यभुवनाचे ऑनररी सेक्रेटरी आहेत. मिसेस फिप्सनबाई व्यवस्थापक मंडळीच्या सभासद आहेत. येथील बहुतेक सर्व व्यवस्था या बाईच पहात असतात. उन्हापासून संरक्षण व्हावें म्हणून एक भली मोठी टोपी डोक्यास घालून या परोपकारी बाईस आरोग्यभुवनांतील मंडळीचा समाचार घेत इकडून तिकडे फिरतांना पाहिलें म्हणजे मोठें कौतुक वाटतें. वयानें या अगदीं पोक्त असून यांचा स्वभाव फारच मन-मिळाऊ व दयाळु आहे. आपल्या बंगल्यापुढें यांनीं फार सुंदर असा बगीचा केला आहे. त्यांत या स्वतः खपत असतात. या विद्वान् व श्रीमान् बाईची उद्योगप्रियता पाहून जितकी स्तुति करावी तितकी थोडीच वाटते. यांच्या दर्जाच्या व यांच्या योग्यतेच्या हिंदु स्त्रिया आपल्या वेळाचा असा सदुपयोग करताना कधीं नजरेस तरी पडतील काय? आपल्या बंगल्याच्या दारासमोरच या दयाळु आणि परोपकारी बाईनीं एक पाणपोई घातली आहे. दसक पचक खेड्याच्या रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या वाटसरांस व गुरांढोरांस येथें थंडगार पाणी मिळतें.

आरोग्यभुवनाच्या आसपास असणाऱ्या खेड्यापाड्यांचा व जवळूनच वहात जाणाऱ्या गोदावरी नदीचा देखावा अत्यंत प्रेक्षणीय आहे. गेल्या पावसाळ्यांत श्रीमती लेडी नॉर्थकोट या हें आरोग्यभुवन पहाण्यास मुद्दाम आल्या होत्या. त्या वेळीं येथील एकंदर व्यवस्था पाहून त्या फार खुष झाल्या आणि आरोग्यभुवनाच्या फंडाला त्यांनीं बरीच रक्कम देणगी दाखल दिली. आरोग्यभुवनाच्या 'कम्पाउन्डांत' शिरतांक्षणींच जें कलमी आंब्याचें झाड लाविलेलें दिसतें तें आमच्या सध्यांच्या गव्हर्नरीणबाईच्या हातचें आहे.

सुप्रसिद्ध आणि लोकप्रिय प. लो. डॉक्टर सदाशिवराव काणे यांनींहि आपल्या नांवानें येथें हिंदु लोकांसाठीं आणखी एक 'कॉटेज' बांधण्यासाठीं म्हणून बरीच रक्कम ठेविली आहे. या कामास लवकरच सुरुवात व्हावयाची आहे असें समजतें.

या आरोग्यभुवनापासून सरासरी एक मैलावर देवळाली म्हणून एक

लहानसें पण जुनें खेडें आहे. हें वालदि नांवाच्या नदीच्या कांठीं असून येथें इनामदार वगैरे श्रीमंत लोकांचे मोठमोठे वाडे आहेत. येथील रस्ते, वाडे व देवालयें पाहिलीं ह्मणजे पेशवाईची आठवण होते. या खेड्यापासून ४ मैलांच्या अंतरावर गोऱ्या लष्कराची छावणी आहे. याच रस्त्यावर फार प्राचीन आणि मोठालीं प्रचंड अशीं वडाचीं झाडें आहेत. यांच्या विस्तीर्ण आणि गर्द छायेखालीं गोरे लोक हमेश 'पिकनिक' ह्मणजे वनभोजनाला जातात. यालाच 'बेबी वुड' असें ह्मणतात.

येथून पांच मैलांवर प्रेक्षणीय पांडवलेणीं आहेत. तसेंच रामशेज व सप्तश्रृंगीचे डोंगरहि जवळच असून ते पहाण्यास बरेच लोक जात असतात. गंगापुराजवळचे धबधबेहि अनायासें पहाण्यास मिळतात. शिवाय नासिक, त्र्यंबकेश्वर इत्यादि पवित्र क्षेत्रांचें दर्शनहि होतें. नासिकाजवळच नेटिव्ह ख्रिश्चन लोकांनीं वसविलेलें शरणपूर नांवाचें गांव आहे. येथील हवा स्वच्छ असून आरोग्यदायक आहे असें ह्मणतात.

येथील धड देशी नाहीं, धड विलायतीहि नाहीं अशी 'ट्रॅमवे'ची गाडी श्यामकर्ण वारू ओढून नेत असतां पाहिलें ह्मणजे मोठी मौज वाटते. स्टेशनपासून गांव सहा मैलांवर असल्यामुळें या गाडीचा फार उपयोग होतो. सिंहस्थासारखी पर्वणी आली ह्मणजे या 'ट्रॅमवे' कंपनीचें चांगलेंच फावतें. पैसा मिळविण्याकरितां इंग्रज लोक काय उद्योग करितील त्याचा नियम नाहीं. आमच्या लोकांनां असल्या धंद्यांत भांडवल घालून पैसा मिळविण्याची युक्ति अद्यापिहि सुचूं नये हें आमचें दुर्दैव होय.

असो. मला मिळाली तितकी माहिती मीं येथें दिली आहे. यापेक्षांहि या आरोग्यभुवनासंबंधीं कोणास विशेष माहिती पाहिजे असल्यास सेक्रेटरी ती मोठ्या खुषीनें देतात.

हिज हायनेस गायकवाड्स कॉटेज,
सॅनिटेरिअम फार वुइमेन ॲन्ड
चिल्ड्रन, नासिकरोड.

सौ. सुमतीबाई नानुजी.

गृहिणी-धर्म.

[एका वृद्ध सासूचा आपल्या तरुण सुनेस गृहिणीधर्मासंबंधीं उपदेश.]

मम सदुपदेश परिसें, परिसेवावें जया कुलीनांहीं,
इहपरलोकसुखार्जन साधन, यांविण दुजें मुली ! नाहीं. १
आह्मी वृद्ध, न अमुची शाश्वति, संसार हा तुझा होय;
तरि हो धन्य वितरुनी सुख इतरां, घन जसा मधुर तोय. २
संसार-शकट अवजड, पुरुष-स्त्री दोन हीं तया चाकें,
जरि तीं समतोल न गे ! तरि बाई ! शकट हा कसा हांके ? ३
'गृहिणी सुशील गृहची,' हें वच वदती सुख-प्रभव संत,
ती सदन सदा करिते, जेविं करी वन सुख-प्रभ वसंत. ४
जी पत्नी सद्वर्तन, सन्मति, तद्गुण कधींहि न लिकेची,
रमवी नित्य पतीला तल्लीला, जशि अलीस कलिकेची. ५
प्राणज्योती हो ती, तीविण मृत देह-साम्य ये गेहा,
सुकलत्रावीण न जन लाभे सुखमुक्तितें बये ! गे ! हा. ६
अतिपुण्यचरित्र सती स्वयें तरे, तारिते स्वपतितेंही,
लाभोनी तद्दर्शन व्हावें गे ! मुक्त इतर पतितेंही. ७
परि जी कुचरित्रा स्त्री अपणां करिते कुलासकट साधी,
ती पतनासचि कुलटा, उलटा पथ सेवुनी प्रकट साधी. ८
पतिसेवापर होई, तत्सौख्यातें सदैव हो जपती,
स्त्रीचें सुख, सौभाग्य, प्रियमंगल आणि होय ओज पती. ९
पतिस यथाशक्ति सदा करावया सिद्ध हो सहाय्यास,
त्रासें भ्रूभंगानें न दे मुली ! त्यास तूं महायास. १०
एकमतें वागावें, भांडण न करीं परस्परांशीं तें,
कलह सुखातें नाशी, दहन जसा मृदुल पुष्पराशीतें. ११
आणी पतिव्रतेवर हट्ट सदा कठिण संकटाला गे !
सीता हेममृगाग्रह धरितां पाठीस कटकटा लागे. १२

१ नेत्र.

मुख्यालंकार पती, व्यर्थ तयाविण दुजे अलंकार,
निर्धनता बरवी, परि न धनाचा बाइ गे ! अहंकार. १३
आळस गृह बुडवीतो, प्रत्यक्षचि तें करंटपण साचें,
श्रमलभ अमलयशःफल रसमय परि सुफळ जेंवि पणसाचें. १४
वाणीपरी स्वकरणी नसेल, तरि तें विवेकहीनत्व,
तेणें हंसती सगळे, होई जीवित समग्र निःसत्व. १५
निज तोल पाहुनीयां दाखविं तूं हावभाव जगतांत,
अति उंच फलार्थहि जो उद्बाहु बटू, तयास हंसतात. १६
आदा पाहुनि करणें खर्च, तसें धर्मदान सुनबाई,
ऋण होय नरक मोठा, त्यांत न जाणोनि जाणता जाई. १७
चाणाक्षपणा दावीं, व्यवहारीं सर्वदैव दक्ष रतें,
गावीं हिशोब सारा, हानिकरी मानिं गे ! निरक्षरतें. १८
सेवकजनिं लक्ष्य असो, मृदु बोल कधीं, कधीं जरा रागें,
जो नित्य ढिला वागे, राहिल त्याचा कसा दरारा गे ! १९
सन्निश्चय तव न ढळो, ढळतो सतिचा जसा न तो पदर,
स्वमनीं दचकुनि पावें, मानुनि अहितुल्य सत्यलोप दर. २०
'[1]करिती सकुटुंब महादुष्काळीं दीन जन उपासा जे,
तैशांवरि सकृपांहीं जी केली तीच बहु कृपा साजे. २१
दीन व्यसनीं बुडतां, ताराया साधु हात नावरिती,
नाव रिती, सत्स्वीकृत पापिजनाला न यातना वरिती. २२
येतील समर्थाच्या कार्यास समर्थ, काय तें चित्र ?
तो धन्य स्तवनोचित जो दीन-जळास दुग्धसन्मित्र.' २३
बाई ! सुबोध वचनें मनीं धरीं तूं महाकवीचीं हीं,
ज्यांनीं मनास शांती लाभे, तैशी न [2]अमृतवीचींहीं. २४

---

१ अवतरणांतील आर्या मोरोपंतां आहेत. २ अमृताच्या लहरींनीं.

प्रभुवर ठेवीं श्रद्धा, तीविण होणार जाण जन कष्टी,
ती आह्मां मनुजां गे ! जैशी गतिहेतु आंधळ्या यष्टी. २५
पत्नीकर्तव्य, तसें मातेचें कठिण होय कर्तव्य,
परि तीं निश्चित मनसें करुनी साधीं जगीं परम भेव्य. २६
बाळांचें मन असतें, वसन अमल धवल तें जसें धुवट,
तरि डाग लावुनी त्या पापमळाचा न घालवीं फुकट. २७
बाळांचें मन कोमळ वळतें सहजीं जसें नवें रोप,
कोप न करीं उगाची, प्रेमानें त्यांस शिक्षणा ओप. २८
सुनबाइ ! मुलें वंशाधारस्तंभचि सुरेख गे ! पुढिले,
दे नीति बळकटी त्यां, नये तयांनां कधींहि सोडुं ढिलें. २९
सदुदाहरणा दावीं, सद्वृत्त करीं सदैव पुत्रास,
'जेंवि बहु कुपुत्राचें, न फणीचें तेंवि दे वपु त्रास.' ३०
गृह शून्य अपुत्राचें, न कुपुत्राचेंहि शून्य कां लोकीं ?
कुसुत कुलव्याधि असे, आत्मजना बुडवितो त्रपा-शोकीं. ३१
तरि हें ध्यानीं धरुनी लोकीं तूं प्रकट सच्चरित्र करीं,
त्वत्करिं लाभो हें गृह, जसें मुली ! ग्रह सुकांति मित्रकरीं. ३२
येई सतीव्रताला यश, न तसें लाभतें महाक्रतुला,
त्वत्संगें मम पुत्रा, तत्संगें होउं सौख्यलाभ तुला. ३३

---

१ मोक्ष, (पक्षीं) चालणें. २ सुख.

डचेस ऑफ यॉर्क.

डचेस ऑफ कॉर्नवाल आणि यॉर्क, या, सांप्रतचे आपले युवराज ड्यूक ऑफ कॉर्नवाल आणि यॉर्क यांच्या पत्नी, अर्थात् आमच्या भावी बादशाहिणी होत. तेव्हां आह्मां प्रजाजनांस त्यांची माहिती असणें अत्यंत इष्ट आहे; आणि याच हेतूनें त्यांचा संक्षिप्त वृत्तांत येथें देण्याचें योजिलें आहे.

डचेस ऑफ यार्क यांचें संपूर्ण नांव प्रिन्सेस व्हिक्टोरिया मेरी ऑगस्टा लुइसा ओल्गा पॉलिन क्लॉडिन ॲग्नेस, असें आहे. परंतु लहानपणीं त्या प्रिन्सेस मे या लहानशाच पण गोड नांवानें ओळखिल्या जात. यांचा जन्म सन १८६७ च्या मे महिन्याच्या २६ व्या तारखेस मध्यरात्रीच्या बरोबर एक मिनिट पूर्वी केन्सिंग्टन नामक राजवाड्यांत झाला. यांचे वडील ड्यूक ऑफ टेक आणि मातोश्री डचेस ऑफ टेक या दोघांचींहि घराणीं फार प्राचीन असून त्यांची कुलपरंपरा इंग्लंडचे राजे दुसरे जॉर्ज यांचेपर्यंत लागत गेलेली आहे. ड्यूक ऑफ टेक यांनां 'सरेन हायनेस' हा बहुमानाचा किताब आहे.

सन १८७७ पर्यंत राजकन्या मे हिला आणखी तीन भाऊ झाले. या सर्व मुलांचें शिक्षण ड्यूक आणि डचेस ऑफ टेक यांच्या स्वताच्या देखरेखीखालीं आणि मोठ्या दक्षतेनें झालें आहे. आपल्या मुलांनीं सुशील आणि मर्यादशील निपजावें, वडील मनुष्यांचा उपमर्द करण्याची, किंवा तीं कांहीं बोलत असतां त्यांत मध्येंच पडून अत्यय आणण्याची वाईट खोड त्यांनां लागूं नये, सर्वांशीं त्यांनीं फार ममतेनें वागावें, झाडें आणि फुलें यांचा देखील कधीं विनाकारण नाश करण्यास त्यांनीं प्रवृत्त होऊं नये, अशाविषयीं ड्यूक ऑफ टेक आणि त्यांची पत्नी या उभयतांनींहि आपल्या मुलांनां त्यांच्या बाल्यावस्थेंत योग्य शिक्षण देण्यासाठीं फार परिश्रम घेतले आहेत. हें कुटुंब सर्व प्रकारें फार सुखी होतें; आणि ड्यूक ऑफ टेक यांनां आपल्या मुलांबरोबर आपल्या बागेंत बसून चहा पीत असतां

पहाणें ह्मणजे मोठी मौज आणि आनंद वाटत असे, असें त्यांच्या मित्र-मंडळीकडून वारंवार सांगण्यांत येत असे.

बरींच वर्षें हाच क्रम चालला होता. शिक्षणसंपादनांत आणि बाल्यावस्थेस योग्य असे नाना तऱ्हेचे खेळ खेळण्यांत राजकन्या मे ही आपला काळ घालवित होती. ती सोळा वर्षांची होईपर्यंत तिचें शिक्षण घरींच झालें. स्वतः आईबापांचें उदाहरण दृष्टीसमोर ठेवून आपल्या गृहस्थितीला योग्य असें शिक्षण ती संपादन करित होती. सतराव्या वर्षी ती आपल्या आईबापांबरोबर इटाली देशांतील फ्लोरेन्स नामक शहरीं जाऊन तेथें दीड वर्ष राहिली. हें राहणें राजकन्येला फार हितप्रद झालें. आपल्या आईच्या साह्यानें तिनें येथें ललित कलांचें ज्ञान संपादन केलें. यानंतर लग्न होईपर्यंतचा काळ तिनें असाच प्रवासांत घालविला. तरी मधून मधून आपल्या घरीं—व्हाइट लॉज येथें येऊन कांहीं दिवस मौजेनें राहणें तिला फार आवडे. आपल्या बाळपणच्या घराकडे तिचा फार ओढा असे. या घराचा लोभ मोडण्याचा पुढें लवकरच तिला प्रसंग आला.

सन १८९१ च्या डिसेंबर महिन्यांत राजकन्या आपल्या आईबापांबरोबर फ्रान्समध्यें गेली असतां तेथें प्रिन्स आलबर्ट व्हिक्टर यांच्याशीं तिचें लग्न निश्चित झालें. या लग्नासंबंधीं डचेस ऑफ टेक यांनीं व्हाइट लॉज रिचमंड येथून लेडी सॅलिसबरी यांनां पत्र लिहिलें आहे त्यांत पुढिल उद्गार काढिले आहेत. "लवकरच घडून येणाऱ्या या आनंदकारक गोष्टीनें परम प्रिय महाराणी व्हिक्टोरिया यांनां जो कांहीं आल्हाद होत आहे, तो लिहितां येत नाहीं. आमचीं दोन्ही कुटुंबें अत्यानंदानें आणि समाधानानें अगदीं भरून गेलीं आहेत आणि एकंदर ब्रिटिश राष्ट्राला देखील या गोष्टीपासून आनंदी आनंद झाला आहे. जांवईबुवा कसे हर्षनिर्भर झाले आहेत, हें त्यांची प्रफुल्ल मुद्राच सांगते! माझ्या मेच्या आनंदाला तर जणों पारावारच राहिला नाहीं. इतकेंच नव्हे, तर इतकें सौख्य आपल्याला खरोखरच लाभेल

कीं काय याबद्दल तिच्या अंतःकरणांत कधीं कधीं शंका देखील येण्यास चुकत नाहीं!"

याप्रमाणें या गोष्टीनें जिकडे तिकडे आनंद होऊन राहिला होता. या जोडप्याच्या सौख्यरूपी आकाशांत दुःख किंवा दुर्दैवसूचक ढग मुळीं देखील दृश्यमान होत नव्हते. पुढें घडून येणाऱ्या हृदयभेदक गोष्टी-बद्दल दुश्चिन्हें कोणाच्या स्वप्नीं देखील येत नव्हतीं. जिकडे तिकडे या लग्नाबद्दल आनंद आणि समाधान प्रदर्शित करण्यांत येत होतें. तों अकस्मात् दुर्दैवानें झडप घातली. मनुष्य चिंतित असतो एक आणि ईश्वरी योजना असते भलतीच, अशांतला प्रकार झाला. प्रिन्स व्हिक्टर यांनां सॅन्ड्रिंघॅम येथें 'इनफ्लुएंझा' तापानें एकाएकीं पछाडलें. हा ताप पुढें विकोपास गेला आणि शेवटीं त्यांतच या दुर्दैवी राजपुत्राचा शेवट झाला. सर्वांच्या आनंदांत दुर्दैवानें विरजण पडलें. राजकन्या मे हिची स्थिति तर पराकाष्ठेची शोचनीय आणि करुणास्पद झाली. पुढें दोन महिन्यांत ती आणि तिची आई या दोघींनींहि घराच्या बाहेर म्हणून पाय काढिला नाहीं. व्हाइट लॉज येथें अगदीं एकांतवासांत त्यांनीं आपला काळ घालविला. नंतर त्या तेथून निघून फ्रान्समध्यें गेल्या आणि कॅनेस येथें लेडी वुल्हर्टन यांचे घरीं त्यांनीं कित्येक आठवडे घालविले. या स्थलांतरानें आणि दिवसगतीनें राजकन्येचा असह्य दुःखावेगहि किंचित् कमी होत चालला, आणि भयंकर निराशेनें दुःखमय करून सोडलेल्या तिच्या आयुष्यरूपी आकाशांत पुनरपि सुखाशेचीं चिन्हें हळु हळु दृग्गोचर होऊं लागलीं.

दुसऱ्या वर्षी म्हणजे सन १८९३ च्या मे महिन्याच्या ३ ऱ्या तारखेस राजपुत्र ड्यूक ऑफ यॉर्क यांनीं तिच्याबद्दल मागणी घातली. राजकन्या मे हिनेंहि त्या गोष्टीला आपली संमति दिली. तेव्हां ही गोष्ट मग लाग-लीच महाराणी व्हिक्टोरिया यांच्या कानांवर घालण्यांत आली. महाराणी

साहेबांनीं या लग्नास आपला रुकार देऊन दुसऱ्याच दिवशीं जाहिर रीतीनें प्रसिद्ध केलें कीं " आपला आवडता नातू ड्यूक ऑफ यॉर्क याचें प्रिन्सेस मे ऑफ टेक हिच्याशीं लग्न होण्याचें निश्चित झाल्याबद्दलचें वर्तमान काल सायंकाळीं महाराणी साहेबांच्या समजण्यांत आलें आहे, आणि महाराणी साहेब मोठ्या आनंदानें या लग्नाला आपला रुकार देत आहेत."

असें सांगतात कीं, हें लग्न अशा रीतीनें जमावें अशी महाराणी साहेबांची फार इच्छा होती. त्याचप्रमाणें प्रिन्स आणि प्रिन्सेस ऑफ वेल्स ह्मणजे आमचे हल्लींचे एडवर्ड बादशहा आणि अॅलेक्झॅन्ड्रा महाराणी साहेब, यांचें राजकन्या मे हिजवर फार प्रेम जडलें असल्यामुळें तीच आपली सून होणार हें पाहून त्यांनांहि फार आनंद झाला. आपल्या मुलीला असें अतुल वैभव प्राप्त होणार या विचारानें डयूक आणि डचेस ऑफ टेक यांच्या आनंदाला तर पारावारच राहिला नाहीं!

गत गोष्टीच्या दुःखकारक स्मृतीनें या लग्नाबद्दल बरीच चर्चा सुरू झाली, परंतु शेवटीं होत आहे हीच गोष्ट चांगली, असें सर्वांचें मत पडलें, आणि वधूवरांनां दोघांनांहि हा संबंध हितप्रद होईल अशीं सुचिन्हें दिसूं लागलीं. ता० ६ जुलई रोजीं हें लग्न होण्याचें नक्की ठरून तत्संबंधीं तयारी मोठ्या जारीनें सुरू झाली.

ता० ४ जुलई सन १८९३ रोजीं आपल्या बाळपणच्या घराचा निरोप घेऊन राजकन्या मे ही बकिंघम नामक राजवाड्यांत लग्नासाठीं येऊन राहिली. हें लग्न सेंट जेम्स येथील चॅपेल रॉयलमध्यें मोठ्या थाटानें कॅन्टरबरीचे आर्च बिशप डॉ० बेन्सन यांचे हस्तें झालें. स्वतः महाराणी व्हिक्टोरिया या आनंदाच्या प्रसंगीं हजर होत्या, इतकेंच नव्हे तर हा पवित्र विधि पूर्ण होईपर्यंत त्या अगदीं उभ्या राहिल्या होत्या. लग्न लागतांच ड्यूक ऑफ यॉर्क यांनीं आपल्या परम प्रिय आजीचें आणि राज-

कन्या मे हिनें आपल्या आजेसासूचें प्रेमादरपूर्वक चुंबन घेतलें. जिकडे तिकडे आनंदी आनंद होऊन राहिला.

या लग्नाच्या वेळीं राजकन्या मे हिनें जो पोषाख केला होता त्या संबंधीं एक गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. लग्नाचें निश्चित होतांच तिच्या आईनें ह्मणजे डचेस ऑफ टेक यांनीं असें ठरविलें कीं " या पोषाखाला लागणारें सर्व रेशीम इंग्लंडांतील असलें पाहिजे; सर्व फ्लॅनेल वेल्स मधील; विणीचें एकंदर कापड स्कॉटलंडांतील आणि फीत अगदीं तसून तसू आयर्लंडांतीलच असली पाहिजे. " हा ठराव अगदीं अक्षरशः पाळण्यांत आला. या प्रसंगीं राजकन्येला पुष्कळच नजर नजराणे आले. स्वतः महाराणी व्हिक्टोरिया यांनीं आपल्या नातसुनेला एक बहुमोल रत्नखचित हार दिला.

डचेस ऑफ यॉर्क यांनां चार मुलें झालीं आहेत.

एडवर्ड आलबर्ट क्रिश्चन जॉर्ज पॅट्रिक डेव्हिड हा राजपुत्र सन १८९४ च्या जून महिन्याच्या २३ व्या तारखेस व्हाईट लॉज येथें जन्मला.

ऑलबर्ट फ्रेडरिक ऑर्थर जॉर्ज याचा जन्म सन १८९५ च्या डिसेंबरच्या १४ व्या तारखेस यॉर्क कॉटेजमध्यें झाला.

व्हिक्टोरिया अॅलेक्झॅन्ड्रा ॲलिस मेरी हिचा जन्म सन १८९७ च्या एप्रिल महिन्याच्या २५ व्या तारखेस यॉर्क कॉटेजमध्यें झाला. आणि हेनरी वुलियम फ्रेडरिक ऑलबर्ट हा राजपुत्र सॅंड्रिघॅम येथें इ. स. १९०० च्या मार्च महिन्याच्या ३१ व्या तारखेस जन्मला.

छोटा राजपुत्र एडवर्ड केवळ पांच महिन्यांचा असतांना 'तो फार बुद्धिमान होणार' असें त्याची आजी डचेस ऑफ टेक यांनीं ह्मटलें आहे, आणि या इतक्याशा अल्प वयांत देखील त्याच्या बद्दलच्या कितीतरी मौजेच्या गोष्टी प्रसिद्ध झाल्या आहेत. या सर्व गोष्टींवरून त्याच्या आजीचें

म्हणणें खरें होईल असें स्पष्टपणें दिसून येतें. या छोट्या राजेसाहेबांनां पहारेकरी, लष्करांतले शिपाई, पोलिसचे शिपाई कोणीहि भेटोत त्यांनां ऐटीनें सलाम करण्याची मोठी मौज वाटते. परंतु त्या शिपायानें यांनां न ओळखून जर का यांची सलामी घेतली नाहीं तर मात्र यांनां फारच घुस्सा येत असतो. लष्करी बाण्याची त्यांची पराकाष्ठेची आवड या अल्पवयांत देखील हे स्पष्टपणें व्यक्त करित असतात. यांची बोलण्याचालण्याची ऐट नेहमीं शिपाई बाण्याची असते. यांचा स्वभाव फार प्रेमळ असून अत्यंत उदार असा आहे. त्यांच्या बुद्धिमत्तेबद्दल तर संशयच घेण्यास नको. स्वारी सर्वांची आवडती असून प्रत्येकाला त्यांच्यावर प्रेम करावेंसेंच वाटतें. महाराणी व्हिक्टोरिया यांचा तर या पणतवंडावर फारच जीव असे.

बाळपणापासून डचेस ऑफ यॉर्क यांचा स्वभाव कांहींसा एकांतप्रिय आहे. हंसणें खेळणें त्यांनां आवडतें, तथापि त्यांची वृत्ति नेहमीं विचारमग्न, गंभीर आणि शांत अशी दिसते. पुष्कळ वाचनाच्या योगानें ज्यांच्या आंगीं बहुश्रुतपणा आला आहे अशा विद्वानांचा सहवास त्यांनां फार आवडतो. प्रचलित विषयांवर त्यांच्याशीं त्या मोठ्या चतुराईनें वादविवाद करित असतात. वाचनाचा तर त्यांनां जबरा नाद आहे. त्या कोमल स्वभावाच्या असून विचारी, धार्मिक आणि दयाळु आहेत. त्यांच्या भावांची त्यांच्यावर फार श्रद्धा आहे. सुमाता आणि सुगृहिणी या दोन्ही नात्यांनीं त्या आपलें कर्तव्य उत्तम रीतीनें बजावितात, अशी यांची फार ख्याति आहे. मनमिळाऊ स्वभाव, चांगुलपणा आणि चित्ताकर्षकता या अपूर्व गुणांच्या योगानें एकंदर ब्रिटिश राष्ट्रांत यांचेविषयीं आदरबुद्धि वसत आहे. आपल्या पतीच्या तर त्या पूर्ण प्रेमास पात्र झाल्या आहेत.

कलाकौशल्याची यांनां फार आवड आहे; परंतु यांनां मोठी मौज वाटते ती नाना तऱ्हेचे देखावे पहाण्याची. बायसिकलवर वगैरे बसण्यापेक्षां यांनां पायानें चालणें अधिक आवडतें. लहानपणीं या फार भित्र्या

होत्या. जरा कोणी परकें मनुष्य आलें कीं या आपल्या आईच्या मागें शिरल्याच ह्मणून समजावें. हल्लीं देखील त्यांनां प्रसिद्धीचा फार मोठा तिटकारा आहे. "आपल्याला कोणत्या प्रकारचें मनुष्य आवडत नाहीं ?" असें एकदां त्यांनां कोणीं विचारिलें. तेव्हां त्यांनीं दिलेलें उत्तर ध्यानांत धरण्यासारखें आहे. त्या ह्मणाल्या. " रस्त्यांतून जातांना एखाद्याला पाहून तें पहा तें अमुक अमुक चाललें आहे, असें ओरडणारे लोक मला मुळींच आवडत नाहींत. "

डचेस ऑफ यॉर्क यांच्याबद्दल फारशा आख्याइका प्रसिद्ध नाहींत. आहेत त्यांतील एक दोन येथें दिल्या आहेत. त्यांवरून त्यांच्या स्वभावाची चांगलीच ओळख पटते.

त्या सुमारें बावीस वर्षांच्या असतां रिचमंड पार्कमध्यें त्या आपला भाऊ प्रिन्स ॲलेक्झॅन्डर आणि डचेस ऑफ टेक यांच्याबरोबर एके दिवशीं सकाळींच सहल करावयास गेल्या होत्या. तेथें एक अगदीं अशक्त आणि जख्खड झालेली ह्मातारी मोठ्या कष्टानें काटक्या कुटक्या गोळा करतांना त्यांच्या दृष्टीस पडली. त्या बरोबर डचेस ऑफ टेक या तिच्याजवळ जाऊन झाडांच्या वाळलेल्या फांद्या आपल्या छत्रीच्या दांड्यानें मोडूं लागल्या; आणि राजकन्या मे व तिचा भाऊ ॲलेक्झॅन्डर यांनीं त्या गोळा करून त्यांची एक मोठी भारी बांधून दिली आणि त्या ह्मातारीला मोठ्या आनंदानें घरीं लावून दिलें.

दुसऱ्या एका वेळीं क्यू येथें असतां एक दाई मुलांची लहान हातगाडी एका तारेच्या कुंपणाखालून ढकलित असतां या मायलेकींच्या दृष्टीस पडली. कांहीं केल्या ती गाडी त्या दाईच्यानें पुढें ढकलवेना. शेवटीं दमून तिनें तो नाद सोडून दिला. इतक्यांत डचेस ऑफ टेक आणि राजकन्या मे या तिच्या मदतीला गेल्या, आणि त्यांनीं मोठ्या जोरानें ती गाडी पुढें ढकलली. त्या दाईनें त्यांचे फार आभार मानले, परंतु आपणांस कोणीं मदत केली याची स्वप्नांत देखील त्या बिचारीला कल्पना झाली नसेल.

डचेस ऑफ यॉर्क या सध्यां आपल्या पतीबरोबर ऑस्ट्रेलियांत गेल्या आहेत. तेथील रहिवाशांनां मिळालेल्या स्वतंत्र पार्लमेंदाची पहिली सभा या महिन्याच्या नवव्या तारखेस राजपुत्र ड्यूक ऑफ कॉर्नवाल आणि यॉर्क यांचेकडून मोठ्या समारंभानें भरविण्यांत आली. सात महिने या प्रवासांत घालवून ही मंडळी पुनः स्वदेशीं परत जाणार आहे. व नंतर या राजपुत्राला युवराजपदाभिषिक्त करण्यांत येणार आहे. अर्थात् मग प्रिन्सेस ऑफ वेल्स ही बहुमानाची पदवी डचेस ऑफ यॉर्क यांनां प्राप्त होणार आहे. ईश्वर यांनां उदंड आयुष्य देऊन हें आणि यापुढें प्राप्त होणारें अतुल ऐश्वर्य भोगण्यास नेहमीं सुखी ठेवो व प्रजाजनांचें कल्याण करण्याची त्यांच्या बुद्धीला सदैव प्रेरणा करो, हेंच त्याजपाशीं आमचें अनन्य भावानें मागणें आहे.

खासगी पत्रें.

[३]

नांदगांव,

ता० ५ मे १९०१.

अनेक आशीर्वाद—

इतके दिवस तुला लिहिण्यावाचण्याचा दोहोंचाहि कंटाळा येत होता; परंतु आतां तुझ्या लिहिण्यावरून असें दिसतें कीं, वाचनांत काय गोडी आहे आणि त्यापासून केवढे फायदे आहेत हें तुला थोडें बहुत तरी कळूं लागलें असावें. रघुनाथरावांच्या आग्रहावरून ह्मण, त्यांच्या स्वताच्या उदाहरणावरून ह्मण, किंवा तुझें तुलाच कांहीं वाटूं लागलें आहे ह्मणून पाहिजे तर ह्मण, परंतु फुरसतीचा वेळ घालविण्याला वाचन हें एक चांगलें साधन आहे, असें तुला वाटूं लागलें आहे हें पाहून मला फार समाधान होत आहे. पण चिंगू, ही गोष्ट तुझ्या अनुभवास इतकी लवकर कशी आली तें सांगूं का मी?

तूं पाहिजे तर खुशाल ह्मण कीं ' माझ्या ताईच्या पत्रांनीं मला वाचनाची गोडी लाविली; कांहीं उद्योग नसला ह्मणजे मी आपली तीं पत्रें घेऊन पुनः पुन्हा वाचित बसतें. ' त्याचप्रमाणें ' ताईचे हे अगणित उपकार कसे फिटतील? ' हें रघुनाथरावांनांहि पाहिजे तर सारा दिवस ह्मणत राहूं दे; परंतु चिंगू, खरें कारण फार निराळें आहे! सांगूं का मी तें? अग आवडतेंच जर एखाद्याच्या नशिबीं येऊं लागलें मग तेथें काय इलाज बरें? ' घटकाभर बोलणें, कीं बसणें कांहीं—कांहीं नाहीं. ' ह्मणून निराशेचे उद्गार काढणाऱ्या पत्नीला प्रेमानें जवळ बसवून घेऊन जर पतिराज मौजेनें कांहीं सांगूं शिकवूं लागले, तिच्या वेड्यावांकड्या बोलण्याचेंहि कौतुक करून तिला उत्तेजन आणि धीर देऊं लागले, तर त्याचा काय परिणाम होईल बरें? इतर सर्व कारणें जरी बाजूस ठेविलीं तरी निदान आपल्या प्रिय पतीजवळ आपल्याला या निमित्यानें तरी बोलण्या बसण्यास सांपडतें, त्यांचे दोन प्रेमाचे शब्द ऐकण्यास सांपडतात,

एवढ्याचसाठीं तरी तुजसारखी समंजस मुलगी अशी हिताची गोष्ट करण्याकडे मूर्खपणानें दुर्लक्ष्य करील हें संभवतें तरी का?

प्रेम ही कांहीं अजब चीज आहे. गुदस्तां मी तुमच्याकडे असतांना आपण सर्व मंडळी प्रो. छत्र्यांची सरकस पहावयास गेलों होतों, त्या वेळीं त्या भयंकर वाघिणीला मैदानांत आणून तिच्या जबड्यांत आपला हात निर्धास्तपणें घालून, त्या भयंकर आणि क्रूर प्राण्याला कसें कह्यांत आणिलें याबद्दल प्रो. छत्र्यांनीं काय सांगितलें तें आठवतें का तुला? ते ह्मणाले 'शिक्षण देण्याच्या दोन पद्धति आहेत; एक प्रेमाची —गोडी गुलाबीची आणि दुसरी जुलमाची —मारहाण, धाक दपटशाची. यांपैकीं पहिली ह्मणजे प्रेमानें आणि गोडी गुलाबीनें शिक्षण देण्याची पद्धति चांगली, असें आपल्या इतक्या वर्षांच्या अनुभवानें आपलें ठाम मत झालें आहे.' आणि चिंगू, शिक्षणाचा जर योग्य परिणाम व्हावयास पाहिजे असेल तर त्याला जुलमाचा रामराम मुळींच कामाचा नाहीं. जुलूम आणि मारहाण करून ती वाघीण फार झालें तर प्रो. साहेबांच्या कह्यांत वागेल, त्यांचा हुकूम नाखुषीनें पाळण्यास तयार होईल, परंतु आपण ते दिवशीं पाहिलें त्याप्रमाणें लडिवाळपणानें त्यांचा हात चाटण्यास, एखाद्या कुत्र्याप्रमाणें त्यांच्याशीं वागडण्यास कधींहि तयार होणार नाहीं. जुलमानें अगर मारहाणीनें जी गोष्ट कधींहि होणें शक्य नाहीं, ती गोष्ट देखील या प्रेमानें आणि ममतेच्या वागणुकीनें सहज होत असते. या प्रेमाचा असा विलक्षण प्रभाव आहे. फार तर काय, पण चिंगू, हें संपूर्ण जग या प्रेमाच्या किल्लीवर चाललें आहे, असें ह्मणण्यास मुळींच हरकत नाहीं. दुर्दैवानें प्रेम ही वस्तु जर का या जगांतून अस्तंगत झाली तर हें जग अगदीं रुक्ष, भयाण आणि उदासवाणें होईल. तेव्हां अशा या प्रेमानें, तुला न कळत कां होईना, परंतु तुजवर आपला प्रभाव बसविला, तुझ्या मर्जीविरुद्ध तुला एखादी गोष्ट करावयास लाविली, तर त्यांत कांहीं आश्चर्य का आहे?

असो. पण चिंगू, वाचनाची नुस्ती गोडी लागूनच त्यापासून व्हावे तितके फायदे होणें शक्य नाहीं. किंवा जें कांहीं हातांत येईल तें घेऊन सारा दिवस वाचित बसणें, हेंहि इष्ट नाहीं. अग्निमांद्य झालेल्या मनुष्याची वैद्याच्या औषधानें क्षुधा प्रदीप्त व्हावी आणि मग त्यानें आपल्या प्रकृतीला सोसेल कीं सोसणार नाहीं याचा मुळींच विचार न करितां जें सांपडेल त्यावर यथेच्छ हात मारित सुटावें, यापासून त्याला फायदा होणें शक्य आहे का? नुकसान मात्र खात्रीनें होण्याचा संभव आहे. तीच गोष्ट वाचनाची आहे. यासाठीं आपण काय वाचित आहों, याची आपण घेऊं तितकी काळजी थोडीच आहे. परंतु चिंगू, तुला मुळीं या बाबतींत कांहींएक सांगण्याची आवश्यकताच नाहीं. कारण रघुनाथरावांसारखे विद्वान् पति जेथें आपल्या पत्नीस शिक्षण देण्याला स्वतः तयार झाले आहेत तेथें त्या शिक्षणाविषयीं मुळीं काळजीच करावयास नको. आपल्या पत्नीनें काय वाचावें आणि काय वाचूं नये याची आवड निवड जेथें ते स्वतः इतक्या काळजीनें आणि दक्षतेनें करित आहेत, तेथें माझ्यासारख्या उगाच चार दोन पुस्तकें शिकलेल्या बहिणीनें काय वाचावें, हें तुला सांगत सुटणें ह्मणजे यांत कांहीं अर्थच नाहीं. तरी पण या वाचनाची रुचि एकदां लागली ह्मणजे मग ती अनावर होत असते; विशेषतः वाईट पुस्तकें वाचण्याचा एकदां का नाद लागला, ह्मणजे तो सुटणें फार कठीण असतें, हें तूं नेहमीं ध्यानांत ठेव. तूर्त तरी रघुनाथराव सांगतील तेवढींच पुस्तकें वाचित जा. भाराभर पुस्तकें नुस्तीं वाचल्यानें कांहीं उपयोग होणें नाहीं. एकच पुस्तक परंतु तें अगदीं काळजीपूर्वक, त्यांतील प्रत्येक वाक्याचा अर्थ आणि त्याचप्रमाणें तें लिहिणाराचें हृद्गत समजून घेऊन वाचल्यानें जो फायदा होईल, तो शेंकडों पुस्तकें वर वर वाचल्यानें होणार नाहीं. असो. चिंगू, रघुनाथराव तुला जीं जीं पुस्तकें वाचण्यासाठीं आणून देतील त्या सर्वांचीं नांवें वगैरे मला अगदीं आठवणीनें कळविशील

का ? ह्मणजे मी देखील त्यांतील वाचलीं नसतील तीं वाचून पाहीन. येथें वाचावयास कांहीं चांगलीं पुस्तकें मिळणें फार कठीण आहे. कोण कोणतीं चांगलीं पुस्तकें अलीकडे प्रसिद्ध झालीं आहेत तें समजणें देखील दुरापास्त, मग दुसरी गोष्ट कशाला पाहिजे ? याकरितांच मीं हें तुला मुद्दाम लिहिलें आहे.

चिंगू, तुजबद्दल माझ्या आजेसासूंनीं केलेलें भविष्य ह्या वेळपर्यंत तरी अगदीं अक्षरशः खरें होत आहे, हें पाहून या तुझ्या ताईला फार फार आनंद होत आहे. तुला प्रथम पहातांक्षणींच त्यांनीं सांगितलें कीं 'ही मुलगी मोठी भाग्याची आहे. ही जन्मभर सुखांत राहील.' तूंच सांग, खरें आहे कीं नाहीं त्यांचें हें बोलणें तें. मी तर ह्मणतें कीं, हल्लींच्या स्थितीवरून तरी तुझ्यासारखी सुखी तूंच. आहे का कांहीं कमी तुला? आपल्याशींच नीट विचार करून पहा. असलीच एखाद्या गोष्टीची उणीव तर ती देखील देवाच्या कृपेनें योग्य वेळीं दूर होईल बरें!

हो, माझ्या आजेसासूंची अनायासें आठवण आज झाली आहे तेव्हां त्यांच्या संबंधीं एक ध्यानांत धरण्याजोगी गोष्ट तुला सांगतें. त्यांचें बोलणें, चालणें, वागणें इत्यादि प्रत्येक गोष्ट अगदीं अनुकरण करण्याजोगी होती. कधीं तरी सवडीप्रमाणें मी त्यांची सविस्तर हकीगत तुला लिहून पाठवीन, पण आज एका विशेष गोष्टीबद्दल मात्र मी सांगतें. ती गोष्ट ह्मणजे इतकीच कीं, लिहितां वाचतां न येणाऱ्या सर्व स्त्रिया अजागळ, मूर्ख असतात असें जर कोणाचें मत झालें असेल तर त्याविरुद्ध आमच्या आजेसासू ह्मणजे उत्तम उदाहरण होत्या. लिहिण्या वाचण्याचा त्यांनां गंध देखील नव्हता, तरी पण त्यांच्यासारखी दक्षता, कर्तबगारी, समंजसपणा आणि हुशारी, मोठमोठ्या परीक्षा देऊन विद्वान बनलेल्या पुरुषांमध्येंहि सांपडणें कठीण. तूं स्वतः त्यांनां पाहिल्याच होतास, तेव्हां त्या माझ्या आजेसासू होत्या म्हणून आतां त्यांच्या मागें मी त्यांच्याविषयीं कांहींतरी ह्मणत आहें, असें निदान तुला तरी वाटणार नाहीं. एवढें मोठें कुटुंब-

वत्सलाचें घर, गरिबीचा संसार, घरांतील माणसें सर्व निरनिराळ्या स्वभावाचीं, बायका तर विचारूं देखील नकोस, परंतु चिंगू, कसा थाटानें त्यांनीं संसार चालविला होता? केवढा त्यांचा दरारा होता? ब्र काढण्याची तरी घरांत कोणाची छाती होती का? जरा इकडची वस्तु तिकडे होईल कीं एक पैचा तरी वावगा खर्च होईल ह्मणजे काय! इतकेंहि असून त्या कंजूष होत्या असें मुळींच नसून प्रसंगविशेषीं त्यांचा हात बराच सढळ असावा, असें मात्र पहाणारास वाटे. बरें इतका त्यांचा घरांत दरारा होता, परंतु त्यांचा स्वभाव निष्ठुर होता कीं काय? छे छे! त्या फार दयाळु, कोमल स्वभावाच्या आणि धार्मिक होत्या. आंधळा, पांगळा, अतिथि अभ्यागत कोणी येवो तो विन्मुख ह्मणून गेलाच नाहीं! गांवांत लहान थोरांनां आजीबाई सारख्याच प्रिय. कोणावर वेळ प्रसंग आल्यास त्या आपल्याकडून होईल तितकी मदत करण्यास नेहमीं तयार असावयाच्या. केव्हांहि त्यांचें बोलणें ऐकिलें तरी मनाला समाधान व्हावयाचें. आमच्या हातून एवढ्या चुका होत पण त्या ह्मणून कधीं आह्मांला टाकून बोलल्याचें स्मरत नाहीं. आंत एक बाहेर एक, हें त्यांच्या पाशीं मुळींच मिळावयाचें नाहीं. त्यांच्या बोलण्याचा असा कांहीं गुण असे कीं, त्यांनीं एकदां का एखाद्या गोष्टीविषयीं कांहीं सांगितलें ह्मणजे त्याचा विसर ह्मणून पडावयाचा नाहीं. स्वतः मोठ्या करारी स्वभावाच्या होत्या, परंतु दुसऱ्याच्या वर्तनासंबंधीं विचार त्या फार उदार मनानें करित असत. प्रत्येक काम चलाखीनें आणि चांगल्या रीतीनें करण्याची त्यांची हातोटीच कांहीं विलक्षण असे. संसारसंबंधीं कसलें एखादें काम त्यांच्या हातून गेलें आहे, असें झालेंच नाहीं. इतक्या वयोवृद्ध झाल्या होत्या, पण चिंगू, त्यांच्या स्वभावांत इतका इतका देखील फरक झाला नव्हता. नाहींतर दुसरीं ह्मातारीं माणसें ह्मणजे एकएक अशीं कांहीं त्रासिक आणि चिडखोर बनत असतात कीं, कांहीं विचारूं नको! तिकडून आजीला वारंवार थट्टेनें ह्मणायचें कीं 'या जगांत माझ्या माहितीच्या दोन ह्मातार्‍या मोठ्या

कठीण आहेत. पैकीं एक आमची महाराणी व्हिक्टोरिया आणि दुसरी ही आमची आजी. पणतवंडें झालीं, घरीं बसल्या बसल्या काशीयात्रा घडल्या, पण यांचा संसाराचा लोभ कांहीं सुटत नाहीं. बिचाऱ्या त्या सुनांच्या हातीं सत्ता तरी यावी कधीं ! ' म्हातारीला हें ऐकून जें कांहीं हंसूं यायचें तें कांहीं विचारूं नकोस. असो. मी त्यांची सून होऊन त्यांच्या-विषयीं असें लिहित आहें, तेव्हां यांतच त्यांची श्रेष्ठ योग्यता दिसून येत आहे. त्यांच्याविषयीं आज इतकेंच लिहून मी थांबतें. हें फक्त इतक्याचसाठीं लिहिलें आहे कीं, केवळ लिहितां वाचतां आल्यानेंच किंवा हल्लीं मुलींनां मिळत असलेल्या शिक्षणानेंच त्यांनां सुशिक्षित, संसारदक्ष होतां येईल असें मुळींच नाहीं. संसारदक्षतेला आणि खऱ्या गृहिणीच्या श्रेष्ठ पदवीला पोहोंचण्याला दुसऱ्या पुष्कळ गोष्टींची आवश्य-कता आहे. हल्लीं मिळत असलेलें शिक्षण हें फार झालें तर त्यांतलें एक साधन आहे, इतकेंच. तेव्हा हल्लींच्या शिक्षणाची योग्यता काय आहे, त्याचप्रमाणें सारा दिवस लिहिणें आणि वाचणें तरी चांगलें कीं काय? इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें तुझीं तूंच द्यावींस हें बरें. असो.

आतां पत्र फार लांबलें. कदाचित् वाचतां वाचतां तुला कंटाळाहि येईल, तेव्हां आतां आटोपतेंच. परंतु तसें करतांना ईश्वराजवळ एक मागणें मला मागितलें पाहिजे; आणि तें हेंच कीं, तो माझ्या लाडक्या चिंगूला सदैव सुखी ठेवो, दुःखापासून आणि दुर्दैवापासून तोच तिचें सर्वकाळ रक्षण करो ! ही इच्छा तो जगदात्मा पूर्ण करील असें इच्छिणारी,

तुझी आवडती

ताई.

वेणीफणी.

[चाल–फुलें चला ग वेंचूं या.]

चला चला ग सर्वजणी
करूं बसोनी वेणिफणी. । ध्रु. ।

करा मोकळे पेड तिन्ही
झाडा झडझड शिळिवेणी;
उठा उठा, बिकट जटा–
सोडवुं तेला लावोनी. १

मला दिली ही बाबांनीं
हस्तीदंती नवी फणी;
विंचरुंया, या या या,
केश आपुले तिनें झणीं. २

पहा पहा ग दांत हिचे
नाजुक तरि कवण्या परिचे !
वेळ सुना जातो ना,
राहुं नका ग उभ्या कुणी. ३

दादानें मज दिला पहा
काल आरसा नवीन हा;
पाहोनी यांत तुह्मी
भांग सरळ घ्या काढोनी. ४

मोगरिच्या ह्या रम्य कळ्या.
भाऊनें मज काल दिल्या;
  त्यांच्या या माळाया
    माळा करुंया नीट झणीं. ५

वेणिफणी ती आटपली,
तोंडें धुतलीं अणि पुसलीं;
  सर्व जणी मैत्रीणी,
    दिसती मज सख्या बहिणी. ६

जगदंबेनें नव्या नव्या,
नित्य अशा बहिणी द्याव्या;
  आशा ही मज पाहीं,
    रात्रंदिस व्हावें मिलुनी. ७

सौ० लक्ष्मीबाई दामले.

श्री सरस्वतीमंदिर.

सोलापूर येथें श्री **सरस्वतिमंदिर** नांवाची संस्था स्थापन होऊन सुमारें पांच सहा वर्षें झालीं. स्त्रियांच्या शिक्षणासाठीं व त्यांच्या उन्नतीसाठीं ही संस्था श्रीमती सौ. लक्ष्मीबाई देशमुख यांच्या हस्तें स्थापन करण्यांत आली व तेव्हांपासून ती सुरळित रीतीनें चालली आहे.

मंदिराचा पहिला उद्देश बायकांचें शिक्षण हा होय. हल्लीं लहान मुलींचें शिक्षण मुलींच्या शाळांतून बरेंच होतें. परंतु तें पुरेसें होत नाहीं. मुली थोड्या मोठ्या झाल्या कीं, त्यांस अशा शाळेंत जाण्याची सवड होत नाहीं. त्यामुळें त्यांचें शिक्षण अर्धेंच रहातें. शिवाय हल्लींची मुलींच्या शाळांची शिक्षणपद्धति असावी तशी समाधानकारकहि नाहीं. स्त्रियांस मुख्यत्वें लागणारे विषय म्हणजे सूपशास्त्र, शिवणकाम, गृहव्यवस्था, बालसंगोपन, बालशिक्षण वगैरे विषयांची माहिती हल्लीं असलेल्या मुलींच्या शाळांतून मुळींच मिळत नसते. बडोदें संस्थानांत अशी कांहीं व्यवस्था सुरू करण्यांत आली आहे खरी परंतु इंग्रजी मुलुखांत अशी व्यवस्था कोठेंहि नाहीं. मुख्यत्वेंकरून स्त्रियांस अत्युपयोगी जें धर्मशिक्षण त्याचा तर चोहींकडे अभावच दिसून येतो. ही उणीव दूर करण्याची खटपट **सरस्वतीमंदिरानें** सुरू केली आहे. या ठिकाणीं हल्लीं प्रौढ वयाचे बायकांसाठीं एक वर्ग सुरू करण्यांत आला आहे व येथें शिवणकाम वगैरे उपयुक्त विषय सुरू केले आहेत. पुणें येथील स्त्रियांचे पाठशाळांतून तयार होऊन आलेली एक मास्तरीण शिक्षण देण्याचें काम करित असते. मंदिरांत येणाऱ्या स्त्रियांस धर्मशिक्षण देण्याचें काम श्रीमती सौ. पंडिता अनुसूयाबाईकडे देण्यांत आलें आहे.

ह्या धर्मशिक्षणाची किती आवश्यकता आहे, हें येथें नव्यानें सांगावयास पाहिजे असें नाहीं. धर्मावांचून नीतीचा पाया बळकट होणें कठीण, हें तत्व सर्वत्रांस माहित आहेच. आपले पूर्वींचे लोक फारच धर्मशील होते म्हणून त्यांची सर्वत्र ख्याति झाली होती. आपलीं भारत, भागवत,

रामायणादि धर्मपुस्तकें किती उत्तम आहेत, हें आपणा सर्वांस माहितच आहे. आपले भगवद्गीता, ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथ फारच वर्णनीय आहेत, ह्मणून पृथ्वीवरील सर्व लोक त्यांची शिफारस गात आहेत. मिसेस आनी बिझांट व मिस एडगरबाईसारख्या परद्वीपस्थ व परधर्मीय विदुषी स्त्रियांनीं आपल्या धर्मतत्वांचे गुणानुवाद गावे व आपण मात्र त्याबद्दल उदासीन रहावें, ही आह्मांला लाजिरवाणी गोष्ट नव्हे काय?

अलीकडचे इंग्रजी शिकलेले पुरुष धर्माविषयीं फार उदासीन असतात, असें त्यांचे वर्तनावरून दिसून येतें. तशाच प्रकारचें शिक्षण आह्मां स्त्रियांसहि मिळत गेल्यास आह्मीहि धर्माविषयीं उदासीनच होऊं व धर्माविषयीं उदासीन झालों ह्मणजे अर्थातच नीतीचेंहि बंधन बरेंच शिथिल होईल, यांत संशय नाहीं. यासाठीं आपण आतांपासूनच या कामाविषयीं खबरदारी बाळगिली पाहिजे. आपल्या शाळांतून धर्म व नीतिशिक्षण सुरू केल्यास ही उणीव पुष्कळ अंशीं दूर होईल अशी खात्री वाटल्यावरून सरस्वती-मंदिरांत तें शिक्षण देण्याची योजना करण्यांत आली आहे. त्या ठिकाणीं एक देऊळ तयार झालें ह्मणजे दररोज पुराण व उपदेश सुरू करण्याचा पंडिताबाईंचा उद्देश आहे.

आपल्या हिंदु स्त्रियांस हल्लीं करमणुकीचीं चांगलींशीं साधनें नाहींत. घरचे कावाडकष्ट करून थकल्यावर चार घटका मनाची करमणूक करून घेण्यास रमणीय अशीं स्थळें कोठेंहि नाहींत. आपलीं जुनीं देवळें प्रत्येक ठिकाणीं आहेत खरीं, परंतु त्या ठिकाणीं पुरुषांसहि जाण्यास मुभा असल्यामुळें तरुण स्त्रियांस तेथें जाण्यास संकोच वाटतो. गोषांतील व पडद्यांतील बायकांस तर अशा देवळांतून जाण्यास किती गैरसोय असते, हें उघड करून सांगावयास नको आहे. बागबगीच्यांचीहि अशीच गोष्ट आहे. त्यांत देखील पुरुषांस जाण्यायेण्यास सदर परवानगी असल्यामुळें तेथेंहि बायकांस जाण्यास चांगलीशी सोय नाहीं. ही उणीव दूर करावी व फक्त बायकांसाठीं करमणुकीची एक जागा असावी ह्मणून सरस्वतीमंदिराची योजना

करण्यांत आली आहे. या ठिकाणीं एक लहानशी बाग केली आहे व लवकरच मंदिरांत एक सरस्वतीची मूर्ति स्थापन करून पुराणाची व उपदेशाची रोजची व्यवस्था करण्याचा मंडळीचा विचार आहे व या कामासाठींच पंडिता अनुसूयाबाई ह्या गांवोगांव हिंडून मंदिरासाठीं पैसे गोळा करित आहेत.

हें काम फार खर्चाचें आहे हें उघड आहे. शाळेसाठीं व देवालयासाठीं सुमारें दहा हजार रुपये खर्च लागेल, असा अजमास आहे. तसेंच शाळेची वगैरे उत्तम व्यवस्था करण्यास दरमहा शंभर रुपये खर्च लागणार. इतका खर्च सोलापुरकरांकडून भागणें शक्य नाहीं. तेथील लोकांनीं सुमारें दोन अडीच हजार रुपये खर्च करून एक लहानसें शाळागृह व शाळेचा दरमहाचा पंचवीस रुपयांचा खर्च चालविला आहे. बाकीचा खर्च पुरविण्याचें सर्व राजेरजवाड्यांनीं व श्रीमंत गृहस्थांनीं मनांत आणिल्यास ही गोष्ट सहज होऊन जाईल हें सांगणें नकोच.

सोलापुरच्या संस्थेस बाहेर गांवच्या लोकांनीं पैसे कां द्यावेत? असा एक प्रश्न कित्येक लोकांकडून येण्याचा संभव आहे. त्यास इतकेंच उत्तर आहे कीं, अशा संस्था सर्वांचे उत्तेजनावांचून प्रथम निघणें कठीण. अशा पांच चार संस्था निघून त्यापासून फार उपयोग होतो असें सर्वत्रांचे अनुभवास आल्याशिवाय ठिकठिकाणीं अशा संस्था स्थापन होणें असंभवनीय आहे. यासाठीं प्रथमच्या संस्थांस सर्वत्रांनीं मदत करणें फार जरूर आहे. शिवाय या मंदिरांतून कांहीं गरीब विद्यार्थिणींस धर्मशिक्षण देऊन ह्मणजे त्यांस कथेकरी, पुराणिक किंवा उपदेशक बनवून, त्यांचेकडून धर्मशिक्षणाचा चोहोंकडे प्रसार करण्याचें काम सुरू करण्याचें आहे. प्रत्येक शहरांतून अशा बऱ्याच गरीब विद्यार्थिणी सांपडतील.

सरस्वतीमंदिर हीं स्त्रियांची संस्था आहे. मंदिराची सर्व व्यवस्था स्त्रियांनींच करावी अशी चालक मंडळीची इच्छा आहे व मंदिरास पैशाची जी मदत मिळावयाची ती स्त्रियांचेच नांवें मिळावी ह्मणून खटपट चाल-

विली आहे. प्रत्येक सुशिक्षित स्त्रीनें ह्या उपयुक्त संस्थेस यथाशक्ति साह्य करण्याचें मनांत आणिल्यास मंदिरास पैशाचें पुष्कळच साह्य मिळणार आहे. पुरुष मंडळी निरनिराळ्या संस्थांस पुष्कळ मदत करतात; बायकांचे नांवाची ही पहिलीच संस्था असल्यामुळें तीस मदत करण्यास व आपल्या बायकांचे नांवें वर्गणी देण्यास कोणीहि सद्गृहस्थ मागेंपुढें पहाणार नाहीं. परंतु पुरुषांचें मन वळवून त्यांचेकडून पैसे काढून घेणें हें स्त्रियांचे शहाणपणावर अवलंबून आहे. आपण धर्मादायासाठीं थोडे का पैसे खर्च करितों? तो खर्च पुरुषांस मान्य असल्यामुळें आपणास कांहीं आडकाठी येत नाहीं. एखादी सार्वजनिक संस्था उपयुक्त आहे असें कळल्यावर तिला मदत करण्यास कोणीहि आड येणार नाहीं. यासाठीं आपल्या शिक्षणानें, सद्गुणानें, विनयानें, पातिव्रत्यानें व सदाचरणानें पुरुषांचीं मनें संतोषित करून हा कार्यभाग उरकून घेण्याबद्दल महिलेच्या द्वारें माझ्या संपूर्ण भगिनींची मी नम्रपणें प्रार्थना करितें.

सौ० पार्वतीबाई देगांवकर.

युनायटेड स्टेट्स येथील तरुण स्त्रियांचें शिक्षण.

स्वतंत्र राष्ट्रें नीतिखेरीज कधींहि टिकणार नाहींत आणि नीति ह्मटली ह्मणजे स्त्रियांचें काम. ह्मणून स्त्रियांच्या संवयींत, मतांत व इतर परिस्थितींत बदल पाडणाऱ्या ज्या ज्या गोष्टी घडून येतात त्यांचें राजकीय दृष्ट्या महत्व फार असतें. ख्रिस्ती राष्ट्रांत बहुतकरून स्त्रिया सर्वत्र यथेच्छ स्वातंत्र्य भोगित असतात. इंग्लंडसारख्या प्रॉतेस्तंत पंथाच्या देशांत तर हें स्त्रीस्वातंत्र्य अधिकच दृष्टोत्पत्तीस येतें. राजकीय संवयींनीं व धार्मिक मतांनीं स्वातंत्र्याचें पाणी घरोघर खेळत असतें. अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थानांमध्यें प्रॉतेस्तंत पंथाचीं मतें चोहोंकडे आपला अंमल गाजवित असल्याकारणानें राजकीय निर्बंध व समाजाची प्रजासत्ताक स्थिति तेथें आहे. आणि येथें तरुण स्त्रियांच्या हातांत त्यांचा कारभार जितक्या लवकर व पूर्णतेनें येतो तितका दुसऱ्या कोणत्याहि ठिकाणीं नजरेस येणार नाहीं. अमेरिकेंतील मुलगी लग्नाच्या वयाच्या कैक वर्षें आधीं आपल्या आईच्या कक्षांतून मुक्त होते. लहानपण संपून तारुण्य येत आहे त्याच्या आधींच ती आपल्यासंबंधानें विचार करावयास लागते, स्वतंत्रतेनें बोलते व आपल्या मर्जीप्रमाणें वागायास लागते. जगांतील सर्व देखावा नेहमीं तिच्या नजरेसमोर असतो. प्रत्येक दिवशीं तो नाहींसा न होतां उलटा अधिकाधिक पूर्णतेनें तिच्या प्रत्ययास येतो व तो धिमेपणानें व संथ दृष्टीनें पहाण्यास तिला शिकविलें जातें. ह्याप्रमाणें समाजांतील दुर्गुण व व्यंगें तिला आरंभींच कळून चुकतात आणि हीं जसजशीं तिला स्पष्टपणें कळूं लागतात, तसतसा तिचा मोह कमी होत जातो व ती त्यांच्याशीं निर्भीडपणें टक्कर देण्यास समर्थ होत असते. कारण तिच्यांत व तिच्या भोंवतालच्या माणसांत एक प्रकारचा विश्वास उत्पन्न झालेला असतो व तिच्या मनावर पूर्णपणें तिचा दाब असतो. यूरोपांतील मुलींत व अमेरिकेंतील मुलींत बालपण जाऊन तारुण्य येत असतांना महदंतर असतें. वासनांचे अंकुर व कौमार्याची छाट हीं अमेरिकेंतील मुलींत समकालीन क्वचितच सांपडतील.

त्याचप्रमाणें यूरोपांतील मुलींप्रमाणें निष्कपट व निसर्गरमणीय लावण्य त्यांच्यांत क्वचितच आढळेल. भितरेपणा किंवा अज्ञान अमेरिकेंतील मुलींत विरळाच आढळेल. यूरोपांतील तरुण स्त्रियांप्रमाणें अमेरिकेंतील स्त्रीहि दुसऱ्यांनां खुष करण्याचा प्रयत्न करते, परंतु त्या खुष करण्याची बरोबर किंमत काय असते हें ती पूर्णपणें जाणून असते. ती जरी एखाद्या वाईट छंदाच्या अगदीं आधीन होत नाहीं, तरी पण तो वाईट छंद काय आहे, हें ती जाणत असते. मनःशुद्धतेपेक्षां बाहेरच्या चालीरीतींबद्दलच ती जास्त नांवाजलेली असते. कितीहि उद्दीपक भाषण असलें तथापि अमेरिकन स्त्रिया आपल्या भाषणामध्यें व विचारामध्यें जें एक विलक्षण चातुर्य व धैर्य दाखवितात तें पाहून आश्चर्य वाटल्यावांचून कधींच रहावयाचें नाहीं. बरें हें भाषण त्या बिन अडखळतां व सहजरीत्या करूं शकतात, असें कीं, एखाद्या तत्त्वज्ञान्यालासुद्धां तें बरोबर साधावयाचें नाहीं. अशा प्रकारची स्वतंत्रता भोगित असतां अमेरिकन स्त्री आपली स्वताची हरएक गोष्टींत मालकीण होऊन बसते. जेवढीं म्हणून सुखें भोगण्यास योग्य व अनुमत आहेत तेवढीं सर्व, त्यांच्या आधीन न होतां ती भोगते व आत्मसंयमनाचे लगाम जरी एखादे वेळेस तिनें ढिले धरले तरी तिचें शहाणपण तिला ते कधींच सोडूं देत नाहीं. फ्रान्समधील स्त्रियांनां एक प्रकारचें ठराविक. व एककल्ली शिक्षण मिळत असल्याकारणानें प्रजासत्ताक समाजांमध्यें अवश्य आढळून येणाऱ्या दुर्गुणांमध्यें त्या येऊन पडतात. अशा वेळेस त्यांनां आपली सुटका करून घेण्याचें साधनहि त्यांच्यापाशीं नसतें. अमेरिकेंत जरी प्रजासत्ताक समाज आहे तरी अमेरिकन लोक फार विचारी आहेत. त्यांच्या पक्कें लक्षांत येऊन चुकलें आहे कीं, जेथें **प्रजासत्ताक राज्य आहे, तेथें व्यक्तीची स्वतंत्रता अधिक वाढल्यावांचून कधींच रहावयाची नाहीं!** तारुण्य वाजवीपेक्षां लवकरच आलें पाहिजे; मनुष्यांच्या हौशी अनियंत्रित असल्या पाहिजेत; रीतिभाती नेहमीं बदलणाऱ्या; लोकमत कायमचें नाहीं; तें सदा निःसत्व; घरांत मुख्य माणसांचा दाब कमी; आणि वैवाहिक बंधनें कोतीं.

अशा स्थितींत अंतःकरणांतील अतिशय जोराच्या वासना स्त्रियांनां दाबून टाकतां येण्याचा संभव फारच कमी असें वाटून त्यांचें असें मत झालें आहे कीं, ही स्थिति सुधारण्याचा खात्रीचा मार्ग ह्मटला ह्मणजे स्त्रीला आपल्या वासना आपणच कशा हटवाव्या ही कला शिकविणें हा होय. स्त्रियांच्या सद्गुणाचें, पातिव्रत्याचें वारंवार उत्पन्न होणाऱ्या भयापासून निवारण करतां येणें अशक्य आहे, असें पाहून अमेरिकन लोकांनीं असें ठरविलें आहे कीं, त्यांचें त्यांनांच स्वताच्या पातिव्रत्याचें रक्षण कसें करावें हें समजलें पाहिजे; व हें निवारण करण्याच्या उपायांपेक्षां स्त्रीच्या आत्मसंयमन शक्ती-वरच जास्त अवलंबून असलें पाहिजे. कारण ह्या उपायांचा फारसा उपयोग होत नाहीं. ह्मणून वर्तणुकीच्या बाबतींत स्त्रीला स्वताच्या संयमन शक्तीवर कसें अवलंबून रहातां यावें, हें त्यांनीं तिला शिकवून तिच्यामध्यें एक प्रकारचा विश्वास उत्पन्न करून दिलेला असतो. तरुण स्त्रीला सदैव आणि पूर्ण अज्ञानांत ठेवणें हें शक्य नाहीं व श्रेयस्करहि नाहीं, हें नेहमीं लक्ष्यांत वागवून अमेरिकन लोक तिला प्रत्येक विषयाचें थोडथोडें साधारण ज्ञान फार लवकर प्राप्त करून देतात. जगांतील दूषितें तिच्यापासून लपविण्याचा प्रयत्न करण्याच्याऐवजीं तिनें तीं लवकर पहावीं व त्यांपासून दूर रहा-ण्यास शिकावें, हें त्यांनां जास्त पसंत वाटतें; व तिच्या निर्मलतेबद्दल जास्त चौकस असण्यापेक्षां तिच्या वर्तणुकीचें संरक्षण करणें हें अधिक महत्वाचें आहे, असें त्यांचें मत झालेलें असतें. अमेरिकन लोक जरी विशेष धार्मिक आहेत तरी स्त्रियांच्या पातिव्रत्याचें संरक्षण करण्यासाठीं ते धर्मावरच सारा भरवंसा ठेवितात असें नाहीं. त्यांची बुद्धिहि बळकट करण्याचा प्रयत्न कर-तात. ह्या बाबतींत त्यांचा मार्ग इतर गोष्टींप्रमाणेंच असतो. स्त्रियांत संयमन-शक्ति चांगली यावी यासाठीं ते प्रथम व्यक्तिस्वातंत्र्य अमलांत आणण्याचे जारीनें प्रयत्न चालवितात आणि मानुषिकशक्तीची अपरंपार झाल्याखेरीज धर्माची (दैविक) मदत ते घेत नाहींत. आतां हें खास आहे कीं, अशा प्रकारचें शिक्षण ह्मणजे धोक्यांशिवाय नसतें. यायोगें शहाणपण व बुद्धि अधिक वाढते हें खरे परंतु, त्याबरोबरच मनोवृत्तींचा ऱ्हास होत जातो.

स्त्रिया प्रेमयुक्त व प्रियकर सोबतिणी होण्याच्या ऐवजीं नुसत्या सद्गुणीच बनतात. समाजदृष्टीनें पहातां अधिक शांतता व व्यवस्था दिसून येते, खरी परंतु गृहव्यवस्था मनोहर होण्याचीं कारणें नाहींशीं होऊं लागतात. तथापि हे तोटे प्रथम उद्भवणारे असून पुढें होणाऱ्या उच्च प्रतीच्या नफ्यांसाठीं सहज सोसण्याजोगे असतात. अमेरिकेंतील समाज सध्या अशा स्थितीस येऊन पोहोंचला आहे कीं, स्त्रियांनां अशा प्रकारच्या शिक्षणाखेरीज गत्यंतरच नाहीं. प्रजासत्तात्मक राज्यांत व प्रजासत्तात्मक संस्थानांत स्त्रियांचें खरोखरच जर संरक्षण व्हावयाला पाहिजे आहे, तर हें शिक्षण अवश्य पाहिजे.

अमेरिकेंत एकदां स्त्रीचा विवाह झाला ह्मणजे तिचें पूर्वींचें स्वातंत्र्य बहुतकरून अजिबात नष्ट होत असतें व बहुधा असें दिसून येतें कीं, तेथील अविवाहित स्त्रिया इतर ठिकाणच्या स्त्रियांपेक्षांहि एक वेळ कमी नियमित असतात, तरी लग्न झाल्यावर त्या बंधनांनीं अगदीं जखडल्या जातात. अविवाहित स्त्री आपल्या बापाच्या घरीं राहून तें घर स्वातंत्र्याचें व सुखाचें आगर करून टाकित असते; परंतु लग्न झालेल्या स्त्रीला आपल्या नवऱ्याचें घर हें एक प्रकारचें कारागृहच असतें. असें जरी आहे, तरी ह्या दोन भिन्न स्थिति जितक्या परस्परांशीं विरुद्ध कल्पिल्या जातात तितक्या वास्तविक नसतात व अमेरीकेंतील स्त्रियांनां एक स्थिति सोडून दुसऱ्या स्थितींत पडल्यानें विशेष परावलंबी वाटत नसतें. अविवाहित स्थितींत सर्व तऱ्हेनें उपयुक्त शिक्षण मिळालें असल्याकारणानें अमेरिकेंतील स्त्रीला आपण आपल्या सुखास अंतरून लग्नाच्या पाशांत व्यर्थ पडलों असें कधींच वाटत नाहीं. तिला पुढें काय करावयाचें असतें, कोणती जबाबदारी अंगावर घ्यावी लागते वगैरे गोष्टी आधींच शिकविल्या असतात व ह्मणूनच लग्नाची जबाबदारी ती मोकळे मनानें व राजीखुषीनें आपल्या शिरावर घेते. समजून-उमजून ती नव्या स्थितींत शिरते व धैर्यानें तींत आयुष्य घालविते. पुरें शहाणपण व ज्ञान प्राप्त झाल्याखेरीज ती लग्न करण्यास कधींहि तयार होत नसते. इतर देशांतून पाहिलें तर असें नसतें. तेथील स्त्रियांनां बहुशः लग्न झाल्यानंतर शहाणपण व ज्ञान येत असतें व हेंच अमेरीकेंतील मुलींत व अन्य मुलींत महत्वाचें अंतर आहे.

बालविवाहाचे दुष्परिणाम.

आपल्या देशांत पूर्वीं व कोठें कोठें अझूनहि आढळून येतें कीं, मुलगी चार किंवा पांच वर्षांची झाली ह्मणजे तिचें लग्न करून टाकावयाचें. परंतु ही चाल अतिशय वाईट आहे व हिचे परिणामहि वाईट होतात असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं.

बालपणीं लग्नें झाल्यानें मुलीच्या वयास तेरा किंवा चवदा वर्षें होण्यापूर्वींच तिला संतति होऊं लागते. अशा रीतीनें झालेली अल्पवयी स्त्रियांची संतति अगदीं खुरटी व रोगी अशी निपजते. तेंच जर मुलींचीं लग्नें प्रौढ-पणांत ह्मणजे मुलीला सोळा वर्षें झाल्यावर नंतर केलीं तर त्यापासून होणारी संतति शरीरानें मजबूद व कुवतदार, निरोगी व चिरायुषी अशी होण्याचा संभव असतो. जगांत जनावरांत किंवा वनस्पतींत साधारणनियम असा दिसून येतो कीं, अल्पवयांत झालेली पैदास अगदीं खुरटी निपजते. यासाठींच आंब्याला मोहोर येऊं लागला ह्मणजे पहिले सुरुवातीचे तीन वर्षांपर्यंत तो मोहोर खुरटून टाकतात. कारण पहिल्या प्रथम लागलेले आंबे चांगले मोठे नसतात. मोहोर पहिल्या वर्षीं काढून टाकला नाहीं तर झाडाची वाढ खुंटते व दुसऱ्या वर्षीं त्याला जसे आंबे लागावेत तसे लागत नाहींत.

सोळा, सतरा वर्षांचें वय झाल्यावांचून स्त्रियांचा बांधा चांगला मजबूत व पूर्ण झालेला नसतो. शिवाय मुलांचें योग्य रीतीनें संगोपन करणें हें फार जोखमाचें काम आहे व तें पार पाडण्यास अवश्य असा बुद्धीचा विकास ह्या वयाच्या पूर्वीं स्त्रियांच्या ठिकाणीं झालेला नसून एकं-दरींत त्यांच्या ठिकाणीं न्यूनता दिसून येते व त्या न्यूनतेमुळें पुष्कळ मुलें मृत्युमुखीं पडतात.

दुसरी गोष्ट अशी कीं, लहानपणीं लग्न केलें व ईशकोपामुळें एकादे वेळीं जर तिला लवकरच वैधव्यदशा प्राप्त झाली तर बिचारीचा सर्व जन्म व्यर्थ जातो. कारण लहानपणींच सर्व सोहळे होत असल्यामुळें ज्ञानप्राप्ति करून घेण्यास मुलींनां वेळ मिळत नाहीं व तेणेकरून त्यांनां सर्व जन्म अज्ञान-

वासांत घालवावा लागतो; बालवयांत वैधव्यदशा प्राप्त झाल्यामुळें संसार-सुख ह्मणून जें काय असतें त्याला त्या सर्वस्वीं मुकतात. किंवा समजा जर त्यांनां वैधव्यदशा प्राप्त झाली नाहीं तरी त्या अशिक्षित राहिल्यामुळें संसार कसा चालवावा, मुलांची जोपासना कशी करावी, कशा प्रकारें वागल्यानें पतीचें मन राजी राहील, हें साधारणतः त्यांनां बिचाऱ्यांनां समजत नाहीं. दुसरें असें कीं, लहानपणांत लग्न केल्यामुळें त्या पतिपत्नी प्रेमाच्या सुखाला बहुशः अंतरतात. बायकोचें प्रेम नसल्यामुळें नवरा सुमार्ग सोडून कुमार्गास लागतो व मग त्या गरीब बिचाऱ्या बायकोला सर्व जन्म दुःखांत घालवावा लागतो. अशीं अनेक कारणें दिसून येतात. यास्तव बाळपणीं लग्न करणें हें अगदीं अहितकारक आहे.

मुलींचीं लग्नें प्रौढपणांत करण्याची पद्धति असली ह्मणजे लग्न होईपर्यंत मुलींनां चांगलें शिक्षण द्यावयास मिळतें. पुढें त्या सासरीं गेल्या ह्मणजे त्यांनां स्वताच्या संसाराची व्यवस्था कशी ठेवावी, मुलांचें संगोपन कसें करावें, पतीचें मन कसें राखावें, वेळाचा सदुपयोग कसा करावा, वगैरे गोष्टी, चांगलें शिक्षण मिळाल्यामुळें समजूं लागतात. त्याचप्रमाणें त्यांनां जी संतति होते तीहि बहुतेक निरोगी निपजते. त्यामुळें त्यांची जोपासना करण्यास फारसा त्रास पडत नाहीं. त्याचप्रमाणें मुलांनां चांगलें वळण कसें लावावें ह्याविषयीं त्या झटत असतात.

आपल्या लोकांत जास्त रोगी संतति होण्याचें कारण बालपणांत विवाह होणें हेंच आहे, असें ह्मटल्यावांचून राहवत नाहीं; युरोपियनांचीं मुलें बहुतेक सर्व अगदीं निरोगी अशीं असतात. त्याचें कारण त्यांचा विवाह प्रौढपणांत झालेला असतो. शेक्सपियरनें एके ठिकाणीं ह्मटलें आहे "टळलेल्या ऋतूच्या बाहेर झालेलीं फळें चांगलीं नसतात." हा नियम आपल्या लोकांनां अगदीं बरोबर लागू होतो. अल्पवयांत संतति झाल्यामुळें फक्त मुलेंच नव्हे तर पुष्कळ स्त्रियाहि मृत्युमुखीं पडतात किंवा भयंकर रोग त्यांनां जडतात. ह्या काळाच्या जबड्यांतून त्यांनां वांचविण्यास झटावें हें आपल्या देशांतल्या प्रत्येक मनुष्याचें कर्तव्यकर्म नव्हे काय? रोग

झाल्यावर मग डॉक्टराकडून औषध द्यावयाचें त्याच्यापेक्षां रोगच न होऊं देण्यास झटलें तर किती चांगलें होईल बरें?

पूर्वी राजे लोकांत देखील कन्या उपवर झाली आणि तिनें नवरा पसंत केला म्हणजे तिचा विवाह करित होते, असें अनेक वेळां पुराणांत लिहिलेलें आपण वाचतों. त्याप्रमाणें हल्लीं आपण वागत असतों काय? आपण ह्या घातकी चालीच्या नादीं लागून आपल्या खऱ्या सुखास अंतरलों आहोंत. अशी रोगी संतति होत गेली तर आपला देश अगदीं लयास जाण्याचा संभव आहे. वैद्यकीय शास्त्राप्रमाणें वर लिहिलेल्या कारणावरून प्रौढ-पणाच्या विवाहाची किती आवश्यकता आहे, हें सहज दिसून येईल; व आपल्या स्त्रिया भयंकर रोगांनीं ग्रस्त झालेल्या आढळून येतात त्यांतून त्यांनां मुक्त केल्यासारखें होईल. बालपणांत वैधव्यदशा प्राप्त होऊन ज्या दुःखसागरांत बुडतांना आपल्या दृष्टीस पडतात त्यांनां त्या दुःखयातनेंतून सोडविल्यासारखें होईल. दुसरें बालपणांत बुद्धि पूर्णपणें विकास पावलेली नसल्यामुळें सासरचीं टोंचणीचीं बोलणीं ऐकावीं लागलीं म्हणजे त्यांची मति अगदीं खुंटते, ही शोचनीय स्थितिहि दूर होईल.

बाळपणीं मुलींचे विवाह केल्यापासून वर सांगितलेले दुष्परिणाम घडून येतात. बालविवाहाचे असे अनेक दुष्परिणाम मूर्तिमंत दिसून येत असतांहि केवळ रूढीला बळी पडून आपले लोक याचा प्रतिकार करण्यासाठीं जेवढ्या आस्थेनें झटावे तेवढे झटत नाहींत व भावी प्रजे-विषयीं घ्यावी तेवढी काळजी घेत नाहींत ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. असें होण्याचें कारण विशेषतः स्त्रियांचें भोळेपण व अज्ञान हेंच आहे. स्त्रियांस योग्य शिक्षण देऊन त्यांचे भलभलते ग्रह आणि अज्ञान दूर केलें म्हणजे मग कोणतीहि माता आपल्या मुलीचें बाळपणीं लग्न कर-ण्याचा आग्रह धरून तिच्या संसाराचें मातेरें करण्यास इच्छिणार नाहीं. व स्त्रियांचा आग्रह नसला म्हणजे पुरुषहि समजून उमजून असा अविचार करण्यास धजणार नाहींत. यासाठीं स्त्रियांस सुशिक्षण देण्याविषयीं प्रत्येक देशहितचिंतकानें झटणें हें त्याचें कर्तव्य आहे.

सौ. ताराबाई नाबर.

शिवणकाम आणि कशिद्याचीं कामें.

शिवणकामाचीं साहित्यें आणि साधनें.

परडी अथवा 'ट्रे'.

फुलांच्या परडीच्याच धर्तीवर शिवणकामाची परडी असावी. परंतु आकारांत ती बरीच मोठी पाहिजे. बांबूची किंवा वेताची परडी वजनांत हलकी असून नेहमींच्या कामास फारच उत्तम असते. परडीस आंतून जाड कपड्याचें किंवा कापसाच्या गादीचें अस्तर घालावें ह्मणजे आंतील वस्तु पडण्याची कांहींएक धास्ती नाहीं. परडी ओंड असण्यापेक्षां उथळ असलेली उत्तम व तिच्या आंतील कांठांवर सुया ठेवण्यास, कातर ठेवण्यास व इतर बारिकसारिक वस्तु ठेवण्यास खण करून ते अस्तरास शिवून टाकावेत. ह्या रीतीनें परडींतील मधली जागा शिवणकाम ठेवण्यास चांगली उपयोगांत येते. शिवणकामाच्या आयत्या परड्या महाग असल्यामुळें त्या विकत घेण्याच्या भरीस पडूं नये. परंतु वर सांगितल्याप्रमाणें त्या बनविल्यास घरगुती कामास त्या चालण्यासारख्या असतात. परडी-शिवाय व्यवस्थेशीर काम होण्यास फार कठीण पडतें. शिवणकाम करणारी बाई एकीकडे बसलेली आहे; कातर दोन हातांवर पडलेली आहे; सुताचें बंडल जवळ पडलेलें असून त्याचा दोरा एक दोन खोल्यांतून यथेच्छ लोळत पडला आहे व तो येणाऱ्या जाणाऱ्या माणसांच्या पायांत गुंततच आहे; बेतलेल्या कपड्याचे तुकडे सभोंवतीं पसरलेले आहेत; एखादी सुई बुचड्यांत, दुसरी जवळ पडलेल्या उशींत, तर तिसरी बिछान्याच्या एखाद्या कोपऱ्यांत खोंचून ठेवली आहे व ती एखाद्यास नजर-चुकीनें बोंचतच आहे; जवळ एखादें रांगतें मुल खेळत असून कांहींना कांहीं वस्तूस झोंबतच आहे; अशा गोंधळांतून मुक्त होण्यास शिवणकामाची परडी जवळ असल्यास फार सोइस्कर पडतें. विलायती शिवणकामाच्या परड्या किंवा 'ट्रे' यांत स्त्रियांस दुसऱ्या शिवणकामाच्या व कशिद्याच्या कामास लागणाऱ्या पुष्कळ वस्तूंचा समावेश केलेला असतो. तशा तऱ्हेच्या वस्तूंचा समावेश आपणासहि आपल्या परडींत करितां येईल. बुरुडास बोलावून वाटेल त्या प्रकारची चौकोनी, वाटोळी, अष्टकोनी, उथळ,

ओंड, तसेंच लांबी, रुंदी वगैरे गोष्टींचें मान सांगून परडी तयार करवून घ्यावी. उचलण्याची कमान जेवढी मजबूत होईल तेवढी करण्याविषयीं बुरुडास ताकीद द्यावी. परडीस आंतून अस्तर लावण्यासंबंधी सांगितलेंच आहे. तशाच तऱ्हेचें बाहेरूनहि चांगल्या कपड्याचें अस्तर लावून त्यावर सुबक कशिदा वगैरे काढावा, ह्मणजे परडीस चांगलें स्वरूप येईल.

इस्त्री.

इस्त्रीच्या दोन जाती आहेत. एक भरींव व दुसरी पोकळ. बहुतकरून शिवणकामांत भरींव इस्त्री अधिक प्रचारांत आहे. इस्त्रीचा उपयोगांत येणारा भाग गुळगुळीत व सफाईदार असतो. इस्त्रीचा हा तळाचा भाग शेगडींत तापत घालून बराच उष्ण करतात व शिवणीच्या सायांवर पाणी शिंपडून त्या चिरण्याकरितां व त्याचप्रमाणें शिवणकामास मऊपणा, पातळपणा व सफाई आणण्याकरितां ती फिरवितात. इस्त्री अतिशय न तापवितां तिचा उपयोग करण्याच्या आधीं तीवर पाण्याचा छाट मारावा ह्मणजे ती कितीशी तापली आहे हें सहज कळून येतें; नाहीं तर वस्त्र जळून जाण्याची फार धास्ती असते. हातावर किंवा बाहीवर शिवणकामाच्या ठिकाणीं इस्त्री फिरविणें असल्यास स्लिव्ह बोर्ड किंवा बाहीचा तक्ता ह्याचा उपयोग करावा लागतो. ही लांकडी फळी पाऊण किंवा एक इंच जाडीची असून दोन तीन फूट लांब व ६ इंच किंवा १ फूट रुंद असते. एखाद्या सपाट मेजावर फार जाड नाहीं व फार पातळहि नाहीं असें कापडाचें आच्छादन घालून त्यावर शिवणीचा किंवा कोणताहि कपडा टेवून इस्त्री करावी. भरींव इस्त्रीचें तळ _ ‿ ह्या दिलेल्या दोन आकृतीं सारखें असतें व त्याचा उपयोग निरनिराळ्या शिवणकामासाठीं करण्यांत येतो. इस्त्रीच्या वरच्या अंगीं चार पांच इंचांच्या अंतरावर चांगली मूठ असते आणि तेणेंकरून हातास उष्णता पोहोंचत नाहीं. उत्तम अशा इस्त्रीस ही मूठ लांकडाची असते व त्यामुळें हात किंवा बोटें वगैरे भाजण्याची बिलकूल धास्ती नसते. पोकळ किंवा पेटीची इस्त्री ही अलीकडची

होय. हींत तापविलेले गोळे टाकून ढांपण लावून इस्त्रीचा तळ उष्ण करितात. पेटीची इस्त्रीहि ह्याच प्रकारची असते परंतु ती सर्व अंगानें खुली असते, वजनांत फार असते व राख आणि विस्तवाच्या ठिणग्या बाहेर येऊन कपड्यास इजा होण्याची त्यापासून फार भीति असते. कोणत्याहि इस्त्रीचा उपयोग चांगल्या रीतीनें करणें हें सवईवर अवलंबून आहे व त्यापासून शिवणकामास मोठी सफाई येते. शिवणकामाची इस्त्री वजनांत हलकी असते व स्त्रीवर्गास तिचा उपयोग करण्यास त्यामुळें कांहींएक अडचण पडत नाही. सपाट व बांक्या तळाच्या इस्त्रीस अनुक्रमें १४ आणे व १ रु. ६ आ. किंमत पडते. हातपायांस व गळपट्यांस तकतकाई आणण्याच्या बांक्या तळाच्या इस्त्रीसहि १ रु. ६ आ. पडतात. शिंपी लोकांच्या जड इस्त्र्या ज्या १५, १६ रतल वजनाच्या असतात त्यांस ३,३॥ रु. पडतात. पेटीच्या पोकळ इस्त्रीस २ रु. १२ आ. किंवा अधिक तर ३ रु. पडतात. ह्या इस्त्र्या बिडाच्या, पितळेच्या किंवा पोलादाच्या असतात. त्यांत पोलादाच्या सर्वांत उत्तम होत. त्याच्या खालोखाल सफाईत पितळेच्या व बिडाच्या समजाव्या. वर दिलेली सरासरी किंमत बिडाच्या इस्त्र्यांची समजावी. वर लिहिलेल्या ह्या इस्त्रीच्या सामान्य उपयोगाशिवाय कापडास जिरविणें, ताणणें, त्यास झकाकी आणणें वगैरे इतर गोष्टींकरितांहि निरनिराळ्या प्रकारच्या इस्त्र्यांचा उपयोग करण्यांत येतो. त्याची खुलासेवार माहिती माझ्या भगिनींची शिवणकामांत बरीचशी गती झाल्यावर सवडीनुसार थोडी थोडी देत जाईन.

सौ० कृष्णाबाई तालचेरकर.

नवल विशेष.

येथील सुप्रसिद्ध दानशूर पारसी गृहस्थ सर दिनशा माणेकजी पेटीट, हे गेल्या ९ व्या तारखेस परलोकवासी झाले. यांनीं निरनिराळ्या धर्मकृत्यांसाठीं जवळ जवळ तीस लक्ष रुपये दान केले आहेत. अपार संपत्ति असणें ही कांहीं श्रीमंती नव्हे, तर विपुल संपत्ति सत्कार्यीं खर्चणें हेंच खऱ्या श्रीमंतीचें लक्षण होय. सर दिनशा माणेकजीसारखे श्रीमंत पुष्कळ असतील परंतु त्यांचेसारखे उदार श्रीमंत क्वचितच निर्माण होतात, आणि ह्मणूनच त्यांच्या वियोगामुळें पुष्कळ जण हळहळत आहेत.

***

राजकोट येथील ठाकूर यांची कन्या श्रीमंत साहेबा बाई यांचा विवाह पालिठाण्याचे कुमार श्रीमंत सामंतसिंह याचे पुत्र श्रीमंत विजयसिंह यांच्याशीं जून महिन्याच्या १० व्या तारखेला होण्याचें ठरून उभय पक्षांकडे जारीनें तयारी चालली होती. परंतु वधूला आपला हा भावी वर पसंत नसल्यामुळें तिनें आपली नापसंती स्पष्टपणें कळविली आहे व आपल्या इच्छेविरुद्ध लग्न करण्याचा प्रयत्न केल्यास सरकारची मदत मागण्याचाहि तिचा विचार आहे. केवळ आपल्या मर्जीप्रमाणें मुलांमुलींचीं लग्नें करण्यांत आईबापांस काय भूषण वाटतें, कळत नाहीं. जगांत जर कोणताहि अति भयंकर जुलूम असेल, तर तो हाच होय !

***

मद्रास येथील मिसेस सत्यनाधन नांवाच्या नुकत्याच एम्. ए. झालेल्या एक देशी ख्रिस्तीबाई हिंदुस्थानांतील स्त्रियांच्या हितासाठीं एक इंग्रजी मासिक पुस्तक लवकरच चालविणार आहेत. तसेंच कोल्हापुर येथेंहि ' सौभाग्यसंभार अथवा हळदकुंकू ' या नांवाचें एक मराठी मासिक पुस्तक येत्या जून महिन्यापासून करवीरस्थ महिला चालविणार आहेत असें समजतें. स्त्रीवर्गाच्या उन्नतीची कळकळ खुद्द स्त्रीवर्गासच उत्पन्न होऊं लागली आहे, हें सुचिन्ह होय.

***

म्हैसूर येथील राजकन्या चेलुवा जम्मानी इनें ' वरनंदिनी कल्याणम् ' नांवाचें एक उत्तम काव्य नुकतेंच प्रसिद्ध केलें आहे. राजकन्येच्या या विद्याव्यासंगाबद्दल महिला तिचें मनःपूर्वक अभिनंदन करिते.

***



श्रीमती लेडी नॉर्थकोट

महाराष्ट्र महिला.

महिलेचे उद्गार.

महिलेला जन्मून आज सहा महिने झाले. बहुतेक इंग्रजी मासिक पुस्तकें ज्याप्रमाणें आपआपल्या मासिक पुस्तकांचें सहा सहा महिन्यांचेंच पुस्तक पुरें करित असतात, त्याप्रमाणेंच एका वर्षाचे दोन भाग बनविण्याचा महिलेचाहि हेतु असल्यामुळें आज महिलेच्या प्रथम वर्षाचें हें प्रथम खंड (पूर्वार्ध) ईश्वराच्या कृपेनें संपूर्ण झाल्याबद्दल महिलेला आनंद वाटत आहे. या आनंददायक प्रसंगीं आपल्या प्रस्तुतच्या गव्हर्नर साहेबांच्या दयाळु पत्नी श्रीमती लेडी नॉर्थकोट यांचें सुंदर चित्र महिला आपल्या वाचकभगिनींपुढें ठेवित आहे. मुंबई इलाख्यांत तरी आतां या दयाळु आणि उदार बाईची कोणास माहिती करून देण्याची आवश्यकता राहिली आहे, असें महिलेस वाटत नाहीं. आपल्या दयाळु स्वभावानें, उदार वृत्तीनें आणि सरळ व साध्या वर्तनानें अगदीं अल्प काळांत या बाई सर्वांस प्रिय झाल्या आहेत. प्रजेबद्दल आपली सहानुभूति प्रगट करण्याचा प्रसंग त्यांनीं आजवर कधींहि वायां म्हणून जाऊं दिला नाहीं. ही सहानुभूति नुसती कळवळ्याच्या शब्दांनीं प्रगट करूनच त्या थांबल्या नाहींत, ही गोष्ट, त्यांनीं आपल्या पतीबरोबर हिंदुस्थानांत पाय ठेविल्या दिवसापासून निरनिराळ्या परोपकाराच्या कृत्यांसाठीं ज्या अनेक लहान मोठ्या देणग्या दिल्या आहेत त्यांवरून, कोणासहि दिसून येणार आहे. गेल्या दुष्काळाच्या प्रसंगीं उभारलेल्या फंडाला त्यांनीं वेळोवेळीं केलेली मदत अद्यापिहि सर्वांपुढें आहे. कोणत्याहि सत्कृत्याला यथाशक्ति हातभार लावण्यास त्या कधींहि चुकत नाहींत.

प्लेगच्या गेल्या हल्ल्यांत रोगाचा ऐन कहर उसळला असतां रोग्यांसाठीं ठिकठिकाणीं स्थापिलेल्या दवाखान्यांत या कनवाळु बाई स्वतः जाऊन तेथील व्यवस्था पहात असत; आपल्या गोड व कळकळीच्या शब्दांनीं मरणोन्मुख पडलेल्या रोग्यांचा समाचार घेत असत; त्याचप्रमाणें या भयंकर रोगाला चुकविण्याकरितां लोकांनीं ठिकठिकाणीं बांधलेल्या 'हेल्थ-कॅम्पां'त जाऊन तेथें रहाणाऱ्या मंडळीची हालहवाल काय आहे, त्यांची नीट व्यवस्था रहाते कीं नाहीं याबद्दल त्या स्वतः चौकशी करीत. आमच्या या दयाळु गव्हर्नरीणबाईनां 'मान अपमानाचें गोंवें' अवघें गुंडाळून ठेवून गरीबगुरीब लोकांत मिळूनमिसळून वागतांना पाहिलें ह्मणजे मोठें कौतुक वाटतें. एतद्देशीय लोकांविषयीं एवढें प्रेम आणि इतकी कळकळ आजवर कोणत्याच गव्हर्नरीणबाईनीं दाखविली असेल असें वाटत नाहीं. लेडी नॉर्थकोटबाईनां ही गोष्ट अत्यंत भूषणावह आहे. ईश्वर त्यांनां दीर्घायु करून चिरकाल सुखी ठेवो व त्यांची ही परोपकारबुद्धि उत्तरोत्तर अशीच वृद्धिंगत करो, अशी महिलेची त्याचे चरणीं नम्र विनंति आहे.

***

आज साठ वर्षें चालत आलेल्या क्रमाप्रमाणें चालू सालींहि मे महिन्याच्या २४ व्या तारखेचा दिवस, आमच्या प. लो. वासी परम दयाळु महाराणी व्हिक्टोरिया यांचा जन्मदिवस ह्मणून पाळण्यांत आला. हिंदुस्थानांत पुढेंहि हा दिवस व्हिक्टोरिया महाराणी साहेबांच्या स्मरणार्थ सार्वजनिक रजेचा समजला जाईल, असें प्रसिद्ध करण्यांत आलें आहे. आमच्या एडवर्ड बादशहांची मातृभक्ति यावरून चांगलीच व्यक्त होत आहे. महाराणी साहेबांच्या दयाळु छत्राखालीं आह्मां हिंदुस्थानवासीयांस जीं अपार सुखें लाभलीं आहेत त्यांमुळें हा पवित्र दिवस आह्मांस नेहमीं संस्मरणीयच वाटणार आहे.

बडोद्याचे विद्वान् महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांची आपल्या प्रजेच्या कल्याणाविषयींची कळकळ जगजाहीर आहे. श्रीमंत सयाजीराव महाराजांनीं आपल्या राज्यांत जागोजाग मुलांच्या व मुलींच्या शाळा स्थापन करून शिक्षणप्रसाराचें काम झपाट्यानें चालविलें आहे. आणखीहि बराचसा खर्च करून आणखी पुष्कळशा नवीन शाळा स्थापन करण्याचा महाराजांनीं हल्लींच हुकूम केला आहे. महाराज स्वतां सुशिक्षित, विद्याव्यासंगी आहेतच; परंतु त्यांतहि सुदैवानें त्यांची सहधर्मिणीहि त्यांच्याचसारखी विद्याप्रिय असल्यामुळें त्यांच्या सल्ल्याचा महाराजांनां फार मोठा उपयोग होत आहे व दिवसेंदिवस स्त्रियांची अवनतस्थिति दूर करण्याचे महाराज अधिकाधिक प्रयत्न करित आहेत. इतर राजेरजवाड्यांनीं या कामीं महाराजांचें अनुकरण करणें अत्यावश्यक आहे.

***

इंग्रजी राज्यामध्यें पुनर्विवाह करणाऱ्या स्त्रीपुरुषांनां जसे हक्क आहेत तसे बडोदें संस्थानांत नाहींत. म्हणजे पुनर्विवाहित दांपत्यांच्या संततीचा किंवा पुनर्विवाहित स्त्रीचा वडिलोपार्जित संपत्तीवर तिकडे मुळींच हक्क पोंचत नाहीं. आणि असा प्रकार असल्यामुळें तिकडील प्रजेला पुनर्विवाह करण्याला हरकत पडते. यास्तव ती हरकत काढून टाकावी व कोणीं पुनर्विवाह केला तरी इंग्रजी अमलाप्रमाणें वडिलोपार्जित संपत्ति प्राप्त होण्यास बाध येऊं नये, अशा प्रकारचा एक नवीन कायदा करण्याचें महाराजांनीं ठरविलें आहे. असा कायदा केला म्हणजे भराभर पुनर्विवाह होऊं लागतील व अनाचार कमी होईल, असें मुळींच नाहीं व महाराजांचाहि तसा हेतु नसेल. तर फक्त पुनर्विवाहित दांपत्यांला तिकडे कायदा जो अडचणीचा आहे तो नसावा, एवढाच महाराजांचा हेतु दिसतो. परंतु जुन्या विचाराच्या मंडळीस महाराजांची ही कृति पसंत नाहीं. त्यांनीं बरीच ओरड चालविली आहे. पुनर्विवाह होऊं लागल्यानें

समाजाची नीतिमत्ता सुधारेल असें ह्मणणारी कांहीं मंडळी आहे व त्याच प्रमाणें पुनर्विवाहाची मोकळीक दिल्यानें समाजांत भयंकर अनाचार सुरू होऊन फार घोटाळा होऊन जाईल, असें ह्मणणारीहि बरीच मंडळी आहे. यांत खरें ह्मणणें कोणाचें आहे व गैरसमज कोणाचा आहे, या नाजुक आणि बिकट प्रश्नांत शिरण्याची महिलेची इच्छा नाहीं. महाराजां-जवळ महिलेची एवढीच प्रार्थना आहे कीं, स्त्रीवर्गाच्या अवनत स्थितीविषयीं ज्यापक्षीं महाराजांचें अंतःकरण तिळतिळ तुटत आहे व त्यांनां सुस्थिति आणून देण्याविषयींचे ज्यापक्षीं त्यांच्या मनांत रात्रं-दिवस विचार घोळत आहेत त्यापक्षीं पुष्कळ लोकांनां अप्रिय वाटणारा हा पुनर्विवाहाचा कायदा मंजूर करण्यापूर्वीं बालविवाहप्रतिबंधक असा एक कायदा करण्याची महाराज जर कृपा करतील तर त्यापासून बडोदें संस्था-नांतील प्रजेचें अनंत कल्याण होईल व लोकांनांहि मग कुरकुर करण्यास फारशी जागा रहाणार नाहीं. ह्मैसूरच्या महाराजांनीं आपल्या राज्यांत बालविवाह न करण्याविषयीं सक्तीचा कायदा केलेला आहे व तो तिक-डील प्रजेला पसंतहि पडला आहे. तसाच बडोद्यांच्या महाराजांनीं केल्यास फार उत्तम होईल.

***

मुलगी कमींत कमी १२ वर्षांची होईपर्यंत जीं आईबापें तिचा विवाह करतील तीं कडक शिक्षेस पात्र होतील, असा जर महा-राजांनीं कायदा केला तर जुन्या विचाराची मंडळीहि फारशी विरुद्ध जाणार नाहीं. आणि अशा रीतीनें बालविवाहच बंद झाला ह्मणजे मग बालविधवांची संख्याहि अर्थातच कमी होईल व मग विधवांच्या दुःख-विमोचनासाठीं आजच्या सारखा स्वतंत्र कायदा करण्याची मोठीशी आवश्यकताहि रहाणार नाहीं. बालविवाहप्रतिबंधाचा कायदा ह्मैसूर संस्थानांत आहेच; बडोदें संस्थानांतहि तसा झाला व त्यानें लोकांची स्थिति सुधारते असें दिसून आलें ह्मणजे इंग्रज सरकारहि साऱ्या हिंदुस्थानभर पुढें

मागें असा कायदा करील व बालविवाहाची एकदा कायद्यानें बंदी झाली ह्मणजे पुष्कळच अनर्थ कमी होईल. आमच्या विदुषी महाराणी श्रीमंत सौ. चिमणाबाई साहेब ह्या या बाबतींत आपल्या प्रिय पतीस योग्य सल्ला देऊन आपल्या राज्यांत असा कायदा करवितील तर एकंदर महिलावर्गावर त्यांचे अनंत उपकार होतील.

***

कन् या संस्कृत धातूचा अर्थ प्रकाशणें, शोभणें असा आहे. कंन्या हा शब्द कन् धातूपासून झालेला आहे. प्रकाशणारी ती कंन्या, असा कंन्या या शब्दाचा वास्तविक अर्थ आहे. प्राचीनकाळीं राजेलोकांतच नव्हे, सामान्यलोकांतहि पुत्रापेक्षां कंन्येचा जास्त आदर असे. पुत्ररत्नापेक्षां कंन्यारत्नाची लोक जास्त अपेक्षा करीत. परंतु सांप्रतचा मनु अगदींच उलटा झालेला आहे. निदान हिंदुस्थानांत तरी कन्येचा जन्म होणें हें आजकाल मोठें दुर्दैव समजलें जातें. एखादी स्त्री गर्भवती होऊन तिची प्रसूतीची वेळ जवळ आली ह्मणजे लोक मोठ्या उत्सुकतेनें पहात असतात. पुत्ररत्न झालें ह्मणजे त्यांनां आनंद होतो व जर का दुर्दैवानें कंन्येनें जन्म घेतला, ह्मणजे मग सर्वांच्या कपाळास आंठ्या पडतात! फक्त पुरुषवर्गाचीच अशी स्थिति असते असें नाहीं; स्त्रियांनांहि—नव्हे खुद्द जननीलाहि 'ही कार्टी कशाला जन्माला आली!' असें वाटत असतें. हळुहळू या समजाचा इतका भयंकर परिणाम होऊन गेला आहे कीं, राजपुतान्यांत आणि पंजाबांतील कांहीं प्रांतांत, कंन्या जन्मास आल्यास आईबापांनां फार वाईट वाटून ते निर्दयपणानें तिचा वधहि करावयास मागें पुढें पहात नाहींत. तिकडे मुलींचा वध करणें हें अगदीं साधारण होऊन गेलें आहे व याचमुळें कन्यावधाच्या प्रतिबंधार्थ आमच्या सरकारास मुद्दाम कायदाहि करावा लागला आहे. राजपुतान्यांतील कांहीं भागीं असा कायदा सांप्रत आहे. पंजाबांतील जालंदर विभागासाठींहि असाच एक कायदा तेथील सरकारानें नुक्ताच केला आहे.

जालंदर प्रांतांत अंदियाला, समरा, बिलगा, रुरकाकलन आणि बुंदला या जिल्ह्यांत जाट नांवाचे लोक आहेत. या लोकांच्या मुलींनां अनुरूप वर मिळत नाहींत व जे कोणी कसे बसे मिळतात त्यांचेसाठीं शक्तीपलीकडे खर्च करावा लागतो. यामुळें ते लोक फारच त्रासून गेले आहेत आणि या त्रासण्याचा फारच भयंकर परिणाम होऊन गेला आहे. मुलगी जन्मास आल्याबरोबर ती त्यांनां शत्रूप्रमाणें भासूं लागते व निष्ठुरपणें तिला जगांतून लवकर नाहींशी करण्याच्या ते उद्योगास लागतात. कित्येक आईबाप त्यांनां बाळपणींच निर्दयतेनें ठार करतात; कोणी आजारीपणांत त्यांनां औषध पाणी देत नाहींत व कित्येक अन्य उपायांनीं त्यांनां या जगांतून नाहींसें करतात! पोटच्या पोरींचा असा क्रूरतेनें संहार करणाऱ्या आईबापांस राक्षसापेक्षांहि निर्दय ह्मणण्यास आमचा समाज तयार होईल परंतु त्या बिचाऱ्या आई-बापांच्या संकटाची कोणीहि मुळींच कींव करित नाहीं. शेवटीं सरकारास या गोष्टींत मन घालावें लागून त्यानें या लोकांसाठीं नुक्ताच पुढील कायदा केला आहे. "या जाट लोकांच्या सर्व कुटुंबांची सरकारांत नोंद ठेवावी. प्रत्येक गरोदर स्त्रीची नोंद ठेवावी. प्रसूत होतांच मुलगा कीं मुलगी झाली तें घरधन्यानें सरकारांत कळवावें. मुलगी आजारी होतांच सरकारांत कळवावें. मुलीच्या मृत्यूचीहि सरकारांत ताबडतोब खबर द्यावी." इत्यादि कडक कायदा करूनच सरकार स्वस्थ बसलें नाहीं. तर त्यानें आणखी असाहि हुकूम सोडला आहे कीं "मुलीचें लग्न ठरतांच सरकारांत खबर द्यावी ह्मणजे मुलीच्या बापानें जांवयास हुंडा किती द्यावा, लग्नांत खर्च किती करावा वगैरे संबंधीं सरकार हुकूम करील त्याप्रमाणें आई-बापांनीं वागलें पाहिजे व लग्नाचा एकंदर खर्च सरकारांत कळविला पाहिजे." अशा रीतीनें त्यांच्या लग्नाच्या अवाढव्य खर्चास आळा पडावा व मुलीच्या जिवास अपाय होऊं नये एवढाच सरकारचा हेतु आहे. हे कायदे बरेच कडक आहेत खरे, परंतु लोकांच्या चमत्कारिक वर्तनाला आळा पडण्यासाठीं

असे कायदे असणें हेंच हितकर आहे. मोठमोठ्या हुंड्याच्या बागुलबोवामुळें आपल्या महाराष्ट्र समाजांतहि सांप्रत मुलींनां चांगलीं स्थळें मिळणें अशक्य होऊं लागलें आहे व कालांतरानें ही स्थिति विशेष भयप्रद होण्याची भीति दिसत आहे. यास्तव नवऱ्या मुलांच्या आयांनीं या गोष्टीचा दूरवर विचार करून वेळींच सावध व्हावें व भलताच हेका धरून गरीब व्याह्यां-विहिणींस नाडूं नये, एवढेंच महिलेचें सर्व भगिनींस सांगणें आहे.

***

प्रेमाबाई नांवाची भाटे जातीची एक गुजराथी बाई दोन तीन वर्षें अन्नपाण्यावांचून राहिली आहे अशी गप्प उठल्यामुळें सर भालचंद्र यांच्या अध्यक्षतेखालीं मुंबईतील डाक्टरमंडळीची एक कमिटी स्थापन होऊन तिच्या मार्फत युरोपियन नर्सीसच्या देखरेखीखालीं प्रेमाबाईची तपासणी करण्यांत आली. दोन तीन दिवसांतच सर्व बेंड फुटून हें सर्व ढोंग आहे असें उघडकीस आलें. असें ढोंग करण्यांत प्रेमाबाईचा व तिच्या घरच्या मंडळीचा काय हेतु होता कळत नाहीं. परंतु 'हें सारें स्त्रीचरित्र आहे. शहाणे म्हणविणाऱ्या पुरुषांसहि या स्त्रिया कशा चकवित असतात पहा!' अशा प्रकारचे उद्गार कित्येक वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊं लागले आहेत. एकंदर स्त्रीजातीवर असा आरोप करणें, विचारी पुरुषांस शोभत नाहीं. एखाद्या स्त्रीनें लोकांस चकविण्याचें किंवा दुसरें कसलेंहि वाईट कृत्य केलें म्हणजे त्याबद्दल साऱ्या स्त्रीवर्गाला दूषण लावणें हें योग्य नव्हे.

***

सुशीला.

माहेरच्या सर्व मंडळीचा मोठ्या कष्टानें निरोप घेऊन दुसरे दिवशीं सुशीला आपल्या घरीं आली. सून घरीं येतांच तिच्या सासूसासऱ्यांस आज जणूं प्रत्यक्ष लक्ष्मीच आपल्या घरीं रहावयास आली आहे, असें वाटून अतिशयित आनंद झाला. आणि त्यांच्या या आनंदास साजे अशा रीतीनेंच सुशीलाहि आपल्या या नव्या घरीं वागूं लागली. सासरीं पाय ठेविल्या दिवसापासून घरांतील प्रत्येक गोष्टींत ती मन घालूं लागली व सकाळपासून तों रात्रीं अंथरुणावर पाठ टेकीपर्यंत एकसारखी गृहकृत्यांत राबूं लागली. आपल्या वेळाचा एक क्षणहि तिनें कधीं फुकट ह्मणून दवडला नाहीं. आठपंधरा दिवसांच्या अवकाशांतच सुशीलेनें आपलें हें नवें घर अशा कांहीं सुंदर रीतीनें सजवून सोडिलें कीं, पहाणारानें त्याच्याकडे एकसारखें पहातच रहावें. पूर्वीं ज्यांनीं तें घर पाहिलें होतें त्यांनां तें पूर्वींचें घर हेंच कीं काय, असा संशय वाटूं लागला व सुशीलेच्या विलक्षण गृहदक्षतेची जें तें प्रशंसा गाऊं लागलें.

सुनेची ही कर्तृत्वशक्ति आणि तिचा उल्हासी स्वभाव पाहून वामनराव आणि त्यांची पत्नी यांनां आपण मोठीं भाग्याचीं ह्मणूनच अशी ही सद्गुणी सून आपल्याला लाभली आहे, असें वाटून फार फार आनंद झाला. सदाशिवरावांच्या हर्षास तर सीमाच राहिली नाहीं! आणि त्यांनां कां बरें आनंद वाटणार नाहीं? पुरुषाला आपल्या मनाजोगी सुशिक्षित, सद्गुणी, नम्र, संसारदक्ष आणि सुस्वरूप अशी पत्नी मिळणें, आणि त्याचप्रमाणें स्त्रीलाहि तिच्या इच्छेप्रमाणें विद्वान, गुणवान्, धनवान् आणि कीर्तिमान् असा पति प्राप्त होणें, या आनंदापलीकडे स्त्रीपुरुषांस जगांतील इतर सर्व आनंद खरोखर तुच्छ आहेत! सर्वांच्याच नशिबीं असा आनंद नसतो. ज्यांची पूर्वजन्मींची सबळ पुण्याई असेल तेच या बाबतींत सुखी, भाग्यवान् असतात. अशाच प्रकारच्या भाग्यवानांपैकीं आपण एक श्रेष्ठप्रतीचे भाग्यवान् आहों व

ईश्वराची आपल्यावर पूर्णकृपा असल्यामुळेंच त्यानें आपल्यास सुशीलेसारखें हें दिव्य पत्नीरत्न दिलें आहे, असें वाटून सदाशिवराव अहर्निश ईश्वराचे उपकार स्मरूं लागले व आपल्या पत्नीवर प्राणापलीकडेहि प्रेम करूं लागले. प्रत्येक गोष्टीमध्यें दिसून येणारी सुशीलेची वाकबगारी, कुशलता, व्यवस्थितपणा आणि दक्षता पाहून सदाशिवरावांनां फार समाधान वाटूं लागलें व घरांतील रमणीयपणा पाहून त्यांनां आपलें घर हें प्रतिनंदनवनच भासूं लागलें. पत्नीचे अंगचे हे विलक्षण गुण पाहून त्यांनां इतकें कांहीं समाधान आणि इतका कांहीं आनंद झाला कीं, कांहीं केल्या त्यांचा हा आनंद मनांतल्या मनांत मावेना. क्षणोक्षणीं तो बाहेर फुटून येण्याचा प्रयत्न करूं लागला. सदाशिवराव एक दिवस एकांतामध्यें आपल्या प्रिय पत्नीस मोठ्या प्रेमानें ह्मणाले " सुशीले, तूं ल्याहावाचायला शिकलेली, लिहिण्यावाचण्याची फार आवड बाळगणारी अशी स्त्री असल्यामुळें तूं आपला बहुतेक वेळ पुस्तकें वगैरे वाचण्यांतच घालविशील, घरसंसाराच्या कामांकडे तुझें फारसें लक्ष्य असणार नाहीं, आणि आमचा तर गरिबीचा संसार, घरांतील एकूनएक काम हातानेंच करावें लागणार; अशी स्थिति असल्यामुळें माझ्या वृद्ध मातोश्रीवरच घरखटल्याच्या सर्व कामाचा विशेष बोजा पडणार, तुझ्यापासून तिला फारशी मदत होणार नाहीं व असें झालें ह्मणजे मग सास्वासुनांचीं अंतःकरणें एकमेकांविषयीं रहावीं तशीं शुद्ध रहाणार नाहींत. इत्यादि मीं कल्पना केली होती. परंतु तुझें एकंदर वर्तन पाहून तर मी चकीतच होऊन गेलों. तुला पहावी तर तूं इतर बायकांपेक्षांहि संसारांत फारच दक्ष दिसतेस. आमच्या गरिबीच्या संसारांतील कामें स्वतां करतांना कंटाळा किंवा लज्जा न वाटतां उंलट तुला मोठा आनंदच वाटत असल्याचें तुझ्या चर्येवरून दिसून येतें. तुह्मां सास्वासुनांकडे पाहिलें ह्मणजे या सख्ख्या मायलेंकीच असाव्या असें तिऱ्हाईताला वाटतें. ज्या शिक्षणाबद्दल मला पहिल्यानें भीति वाटत होती त्याच शिक्षणानें तुझ्या मनावर असा चांगला संस्कार घडलेला

पाहून मला आज जो आनंद होत आहे त्याची योग्यता खरोखर असामान्य आहे. दरेक सुशिक्षित स्त्री तुझ्यासारखीच वागूं लागेल तर आजकाल स्त्रीशिक्षणाविषयीं कित्येकांनां नाकें मुरडावयाला जी जागा मिळत असते ती न मिळतां सर्वजण स्त्रीशिक्षणाचे कैवारीच होतील."

पतीच्या ह्या प्रेमळ भाषणावर सुशीला नम्रपणें ह्मणाली "गृहकृत्यें कुशलतेनें करतां येणें आणि संसारांत दक्ष असणें, हें प्रत्येक गृहिणीचें अवश्य कर्तव्यच आहे. ज्या स्त्रीला आपलें हें कर्तव्यकर्म बरोबर करतां येणार नाहीं, ती गृहिणी या नांवाला पात्रच होऊं शकत नाहीं. आतां शिक्षण न मिळालेल्या कित्येक स्त्रियाहि जर नीटपणें संसार करित असतात, तर ज्यांच्या मनावर सुशिक्षणाचा संस्कार घडला आहे त्यांनां आपला संसार त्यांच्यापेक्षां उत्तम प्रकारें चालवितां आलाच पाहिजे. जिला तसा तो करतां येणार नाहीं, त्या स्त्रीचें शिक्षण व्यर्थच समजलें पाहिजे. आजकाल आह्मां स्त्रियांनां जें शिक्षण मिळत असतें त्यांत पुष्कळच दोष असल्यामुळें आह्मांला संसारांत उपयोगी पडणारें असें ज्ञान न मिळतां रिकामा डौल व प्रौढी मिरविण्याकडे कित्येक स्त्रियांची प्रवृत्ति होते, ही गोष्ट कांहीं अंशानें खरी आहे, हें खरें; परंतु सर्वच सुशिक्षित स्त्रिया अशा रिकामा डौल मिरविणाऱ्या असतात, असें मात्र नाहीं. स्त्री असो अगर पुरुष असो, ज्याच्या मनावर शिक्षणाचा सुसंस्कार घडला आहे, त्याचा वृथाभिमान निघून गेलाच पाहिजे. मनुष्याला गरिबी किंवा श्रीमंती प्राप्त होणें हें ज्याच्या त्याच्या पूर्वजन्मींच्या सुकृतावर अवलंबून आहे. गरिबी प्राप्त झाली ह्मणून कोणीं कष्टी व्हावयास नको व श्रीमंती आली ह्मणून चढून जावयास नको. तर ईश्वर आपल्यास ज्या स्थितींत ठेवील त्या स्थितींत संतुष्ट राहून आपलें कर्तव्य उत्तम प्रकारें करित रहाणें, हेंच समंजस मनुष्याला उचित आहे. घरचें काम करतांना मला यत्किंचितहि वाईट किंवा कमीपणा न वाटतां उलट आनंदच होत असतो, याचें कारण हेंच आहे. आतां 'सासूबाईला व मला एकीकडे पाहिलें तर तिन्हाइताला या सख्ल्या माय-

लेंकी आहेत असें वाटेल' असें जें आपण ह्मणतां, तें ऐकून मला खरोखर फारच आनंद होत आहे. माझ्या आईनें मला पुनः पुनः बजावून सांगितलें आहे कीं 'सुशीले, तुझी आई आतां मी नाहीं; आतां तुझी खरी आई तुझी सासूच होय. तर सासूला तूं सासू असें न समजतां तिला तुझी आईच समज, ह्मणजेच तुझें कल्याण होईल.' माझ्या आईचे हे शब्द मीं अंतःकरणांत कोरून ठेविले आहेत व त्याप्रमाणें वागण्याचा मी प्रयत्न करित आहें. आणि दुसरेंहि असें आहे कीं, दोन निरनिराळे जीव एक करण्यासाठींच विवाहाचें पवित्र बंधन देवानें घालून दिलें आहे. स्त्रीपुरुषांचें एकदा लग्न झालें ह्मणजे मग एकाचें सुख तें दुसऱ्याचें सुख, एकाचा आनंद तोच दुसऱ्याचा आनंद, दुःख, शोक, विपत्ति वगैरे सर्व गोष्टींत तीं उभयतां वांटेकरी होतात. स्त्रीला पुरुषाचें अर्धांग अशी संज्ञा आहे ती याचमुळें. पति आणि पत्नी यांचे देह जरी निरनिराळे दोन असले तरी उभयतांचा जीव भिन्न नाहीं, एकच आहे. परस्परांस स्वतांपेक्षां दुसरें प्रिय आहे. पत्नीला पतिपरतें प्रिय दुसरें कांहींएक नाहीं. अर्थात् पतीला अप्रिय अशी कोणतीहि गोष्ट पतिव्रता स्त्रीनें कधींहि आचरतां कामा नये. असें असल्यामुळें पतीला अत्यंत प्रिय असलेल्या त्याच्या आईशीं विरोध करणें, ह्मणजे प्रत्यक्ष पतीशींच विरोध करण्यासारखेंच आहे. व जी स्त्री असें वर्तन करील तिच्या सारखी अधम दुसरी कोणीहि नसेल. प्रत्येक स्त्रीनें गृहकृत्यांत दक्ष राहून पति आणि सासूसासरे यांची सेवा करणें व परिवारांतील सर्व मंडळींनां प्रसन्न ठेवणें, हें तिचें कर्तव्यच आहे. माझ्या आईबापांनीं मला अशाच प्रकारचें शिक्षण दिलेलें असल्यामुळें मीं असेंच वागण्याचा निश्चय केलेला आहे. त्याबद्दल आपल्यास आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. माझ्या पुष्कळशा भगिनी संसारांत दक्ष नसतात व त्यांनां कुटुंबांत योग्य रीतीनें वागतां येत नाहीं, अशी कित्येकांची तक्रार आहे व तींत बराचसा सत्यांशहि आहे. हें खरें, परंतु या त्यांच्या दोषाबद्दल

जबाबदार त्या नसून त्यांचे वाडवडिलच या दोषाचे खरे अधिकारी आहेत. संसारांत उपयोगीं पडण्याजोगें शिक्षणच जर आईबापांकडून मुलींनां मिळालें नाहीं, मग त्या संसारदक्ष झाल्या नाहींत तर त्यांच्यावर काय ह्मणून खापर फोडावयाचें आणि काय ह्मणून त्यांच्या शिक्षणास निंदावयाचें? अपराध करावयाचा आईबापांनीं व शिक्षा द्यावयाची त्यांच्या बिचाऱ्या निरपराधी मुलींनां व त्यांच्या शिक्षणाला? हा न्याय ख्वासा ह्मणावयाचा!"

पत्नीचें हें पोक्तपणाचें भाषण ऐकून सदाशिवरावांनां इतकें कांहीं समाधान आणि इतका कांहीं आनंद झाला कीं, त्याचें वर्णन करतां येणें अशक्य आहे. सुशीला ही या पृथ्वीवरील कोणी मनुष्यप्राणी नसून स्वर्गलोकींची एक देवताच आहे, असें त्यांनां वाटूं लागलें व ते दिवसेंदिवस तिच्या एकसारखे भजनीं लागत चालले! पतिपत्नींमध्यें खरें प्रेम जेथें असतें तेथें वृथा मानअपमानाचा भाग मुळींच नसतो. पतीला आपलें दैवत समजून पत्नी जशी त्याची एकनिष्ठपणें सेवा करित असते, तसाच पतीहि पत्नीला योग्य मान देऊन तिच्या अर्ध्या वचनांत वागत असतो. तेव्हां सुशीलेसारख्या सद्गुणी पत्नीच्या पूर्ण अंकित होऊन तिनें उठा ह्मणतां उठावें, व बसा ह्मणतां बसावें अशी सदाशिवरावांची अवस्था झाल्यास त्यांस कोणी दोष देण्यास तयार होईलसें वाटत नाहीं. प्रत्येक गोष्ट ते आपल्या प्रिय पत्नीच्या सल्ल्याप्रमाणेंच करूं लागले. महिन्याच्या पगाराचे सर्व पैसे ते सुशीलेजवळच आणून देत व सुशीलाहि मोठ्या दक्षतेनें आणि काटकसरीनें त्यांचा व्यय करी. सदाशिवरावांची प्राप्ति फार थोडी होती तरीहि सुशीला त्या पैशाचे ६ भाग करून त्यांतील ४ भाग घरसंसारासाठीं घेऊन तेवढ्यांत मोठ्या काटकसरीनें संसाराचा सर्व खर्च सांभाळी. बाकी उरलेल्या २ भागांपैकीं १ भाग गोरगरिबांस दानधर्म करण्याकडे खर्च करी व १ भाग दरमहा शिलकेंत टाकी.

अशा रीतीनें घरांतील त्याचप्रमाणें शेजाऱ्यापाजाऱ्यांनां व इतर परिचयाच्या सर्व मंडळींनां आनंदवित आणि त्या सर्वांचे आशीर्वाद घेत सुशीला मोठ्या दक्षतेनें संसार करूं लागली. कोहिनूर हिरा जगांत सर्वांत तेजस्वी अशी ख्याति आहे. परंतु सुशिक्षित, सद्गुणी, धर्मपरायण आणि संसारदक्ष गृहिणीचें तेज असामान्य आहे. कोहिनुरासारखीं तेजोमान आणि अमूल्य रत्नें देहावर धारण केल्यानें किंचित्काल शरीराची शोभा वाढून ऐहिक सुखाचा क्षणभर लाभ होतो खरा; परंतु "पतिव्रता, धर्मपरायण, विद्यावती, सद्गुणी आणि संसारदक्ष स्त्रीचें तेज अशा दगडांपेक्षां लक्षपट जास्त आहे" असें जें एका थोर पुरुषानें ह्मटलें आहे तें सार्थ आहे. कारण अशा सद्गुणी गृहिणीच्या सहवासानें ऐहिक आणि पारमार्थिक सुखाचा चिरकाल लाभ होऊन मनुष्यजन्माची सार्थकता होते. अशा सद्गुणी पत्नीच्या सहवासानेंच इह-लोकींचे धर्म, अर्थ, काम हे पुरुषार्थ साधून परलोकींचा मोक्षहि लाभतो.

सुशीला आणि सदाशिवराव हीं उभयतां एकजीव होऊन पूर्ण प्रेमानें आनंदानें संसार करूं लागलीं. उभयतां दररोज रात्रीं बराच वेळपावेतों एकत्र बसून नानाप्रकारचीं पुस्तकें वाचीत; संसारसंबंधीं, धर्मसंबंधीं व त्याचप्रमाणें दुसऱ्याहि महत्वाच्या गोष्टींसंबंधीं वादविवाद करीत, विद्याध्ययन करीत व इतर करमणुकीच्या गोष्टी बोलून मोठ्या आनंदानें वेळ घालवीत. ज्या भाग्यवान् पतीला सुशीलेसारख्या सुशिक्षित, प्राणप्रिय, सद्गुणी आणि संसारदक्ष पत्नीचा सहवास घडला असेल त्यालाच या आनंदाची बरोबर कल्पना करतां येणार आहे.

सुशीला आणि सदाशिवराव यांनां त्यांच्या या नूतन आणि सुखकर आयुष्याचा अनुभव घेऊं देऊन व अशींच दांपत्यें आपल्या या हिंदुस्थानांत पुष्कळ निर्माण करण्याविषयीं परमेश्वरापाशीं प्रार्थना करून सुशीलेच्या चरित्राचा हा प्रथम भाग येथें पुरा करितें.

पहिला भाग समाप्त.

वसंतप्रभात.

प्रभातकाळीं उदयाचलिं तो—
येतां भानू मोदचि देतो;
सुस्वर गायन करुनि रमवितो—
'लावा' आनंदें. १

पक्षीगण बहु किलबिल करिती,
'प्रभात झाली' हें सुचवीती;
उदरपूरणासाठीं जाती—
कोटर सोडोनी. २

तमोनाश मग मरिची करितो—
जेविं सुहृद्गण संकट हरितो;
बुधजन जैसा नाश करीतो—
तिमिराज्ञानाचा. ३

कमलिनी बहु प्रफुल्ल होउनी—
—होते जैसी भार्या सद्गुणी—
आला निजपति गृहीं पाहुनी—
हांसे आनंदें. ४

पहा युवति किति सडा घालिती,
फुलें, स्वस्तिकें कोणि काढिती,
नानापरिचे रंग भरीती—
रांगोळ्यामध्यें. ५

फुलें सुवासिक कोणि काढुनी,
नानापरिच्या माळा करुनी,
देवासाठीं ठेविति सदनीं—
आनंदें प्रमदा. ६

गृहसंमार्जन करुनी युवती,
शिशुगण दुड दुड धांवत पुढती,
गंगातीरीं स्नाना जाती—
घेउनि जलकुंभा. ७

दिनकर उदयाचलिं येउनि तो—
चक्रवाकिला तोषा देतो,
परि मजला तो दुःखद होतो—
वांचुनि मम कांता. ८

उठ झडकरिं बाळा ! ऊठ झाली प्रभात,
दिनकर वर आला, ऊठ पाहें नभांत;
खगगण मिळुनी ते गोड शब्दां करीती,
रविशत किरणांच्या स्वागतातें करीती. ९

सौ. यमुनाबाई.

आर्य पत्नीचीं कर्तव्यें.

दोन हजार वर्षांपूर्वीं या भरतखंडांत वात्स्यायन नांवाचे एक महान् विद्वान् ऋषि होऊन गेले. त्यांनीं आपल्या ग्रंथांत एके ठिकाणीं पत्नीचीं कर्तव्यें दिलीं आहेत. त्यांवरून इतक्या पुरातन काळीं आमच्या समाजाची स्थिति कशी होती, त्याचें चांगलें अनुमान करितां येण्याजोगें आहे. भवभूतीनें तर वात्स्यायनाच्या ग्रंथांतून कित्येक गोष्टी घेतल्याच आहेत; परंतु कविकुलगुरु कालिदास यांनींहि कित्येक स्थळीं त्यांचा आश्रय केला आहे आणि यावरूनच वात्स्यायनाचा काळ दोन हजार वर्षांपूर्वींचा असावा ही गोष्ट सिद्ध होत आहे. या प्राचीन ऋषिवर्यानें त्या वेळच्या आर्य पत्नीचें चित्र पुढीलप्रमाणें काढिलें आहेः—

१. जी पतिव्रता पत्नी आहे तिनें आपल्या पतीचा पूर्ण विश्वास संपादन करावा, आणि त्याला आपला देव समजून त्याची मनोभावानें सेवा करावी.*

२. पति परवानगी देईल तर एकंदर गृहकृत्यांचा भार तिनें आपल्या शिरावर घ्यावा.

३. घर चांगलें झाडून सारवून स्वच्छ आणि नीटनेटकें ठेवणें, नाना प्रकारच्या सुवासिक पुष्पांनीं तें सुशोभित करणें, आणि त्याची जमीन चकचकीत ठेवणें, इत्यादि गोष्टींकडे तिनें स्वतः लक्ष्य पुरवावें. पहाण्यांत घर नीटनेटकें दिसेल अशाविषयीं तिनें खबरदारी घ्यावी आणि त्याचप्रमाणें प्रातःकाळीं, माध्यान्हकाळीं आणि सायंकाळीं घरांत होमहवनविधि यथासांग करण्याविषयीं आणि गृहदेवतांची पूजाअर्चा यथासमयीं करण्याविषयीं दक्ष रहावें.

---

*पाश्चिमात्य स्त्रियांनां लग्नाची ही कल्पना मुळींच आवडेनाशी झाली आहे; परंतु त्यांच्याच एका कवीनें ॲडम आणि ईव्ह यांचें वर्णन करितांना "He for God only, she for God in him." पतीच्याच ठायीं पत्नीनें ईश्वराचें अस्तित्व मानावें अशा अर्थाचे उद्गार काढल्याला फारसा काळ लोटला नाहीं. इंग्रेजी शिक्षणामुळें आपल्या पाश्चिमात्य भगिनींचें या कामीं अनुकरण करूं इच्छिणाऱ्या माझ्या भगिनींनीं ही अवश्य लक्ष्यांत घेण्याजोगी गोष्ट आहे.

४. सासूसासरे, जावा, नणंदा व दीर आणि त्याचप्रमाणें आपल्या पतीच्या घरांतील इतर माणसें, यांनां त्यांच्या त्यांच्या योग्यतेप्रमाणें तिनें वागवावें.

५. भिक्षुकी, श्रमणा किंवा क्षपका (संन्यासिनींचे तीन प्रकार) किंवा जातीबाहेर असलेल्या, ज्योतिष सांगणाऱ्या आणि जादूटोणा करणाऱ्या स्त्रिया, यांच्या बरोबर तिनें संभाषण करितां कामा नये.

६. भोजनासंबंधीं कोणकोणते पदार्थ आपल्या पतीला आवडतात आणि कोणकोणते आवडत नाहींत, आणि त्याचप्रमाणें त्याला पथ्यकारक पदार्थ कोणते आणि अपथ्यकारक कोणते, हें तिनें पाहून ठेवावें.

७. पति बाहेरून घरीं येत असतां त्याचा स्वर कानीं पडतांच त्याची आज्ञा काय आहे हें समजून घेण्यास तिनें घरांत तयार होऊन रहावें.

८. दासीला बाजूला करून तिनें स्वतः त्याचे पाय धुवावे.

९. अगदीं एकटेंच असतांना देखील वस्त्राभरणांनीं विभूषित झाल्याविना तिनें पतीच्या दृष्टीस पडूं नये.

१०. पति जर बाजवीपेक्षां फाजील खर्च करित असेल, किंवा योग्य रीतीनें खर्च करित नसेल, तर तिनें तो एकटा असेल तेव्हां ती गोष्ट त्याला समजावून सांगावी.*

११. लग्नसमारंभांत वधूगृहीं किंवा वरगृहीं जाणें, यज्ञाला जाणें किंवा आपल्या मैत्रिणींबरोबर वनभोजनाला अगर देवालयांत जाणें, या गोष्टी तिनें आपल्या पतीच्या संमतीविना करूं नयेत.

१२. आपल्या पतीला संतोष होईल अशा लागेल त्या प्रकारच्या करमणुकींत तिनें वेळ घालवावा.

* घरांतील प्रत्येक वस्तु आणि त्याचप्रमाणें पैशांच्या पेटीची किल्लीहि पूर्वी स्त्रियांच्याच हातीं असे, हें येथें सांगितलें पाहिजे. पुरुषाच्या उधळेपणाला आळा घालण्याला ही पद्धत किती उपयुक्त आहे, तें स्पष्ट दिसत आहे.

१३. पति निजल्यानंतर निजावें व तो उठण्याच्या आधीं उठावें. दिवसा कधीं जर तो निजला असेल तर तिनें त्याला कधींहि उठवूं नये.*

१४. स्वयंपाकघरांत इतर कोणाचाहि शिरकाव होऊं देऊं नये; परंतु सूर्यकिरणांचा शिरकाव मात्र त्यांत अवश्य झाला पाहिजे.

१५. पतीच्या हातून जर कांहीं अपराध घडला असेल तर तिनें थोडासा राग आणावा व त्याची कानउघाडणी अवश्य करावी; परंतु हें मर्यादेबाहेर मात्र जातां कामा नये.

१६. केवळ मित्रमंडळीच जवळ असेल, किंवा तो एकटाच असेल, अशा वेळीं मात्र त्याला लागतील असे शब्द तिनें बोलावे. जादूटोणा करून पतीची मर्जी सुप्रसन्न करून घेण्याचा यत्न तिनें कधींहि करूं नये.

१७. रागाचे शब्द, रागीट मुद्रा, तोंड चुकवून बोलणें, दरवाजांत उभें राहून बाहेर पहाणें, बागेंत बोलत रहाणें, एकांत जागीं बराच वेळ रहाणें, इत्यादि सर्व गोष्टी तिनें टाळाव्या.

१८. तिनें सदोदित नीटनेटकें आणि स्वच्छ रहावें.

१९. प्रसंगाला शोभेल असा साधा किंवा मौल्यवान् पोषाख तिनें करावा.

२०. पति जर कांहीं व्रत किंवा उपोषण करील तर तिनेंहि तसेंच करावें. परंतु तो जर तसें करूं देणार नाहीं तर "या कामीं मी कोणाचाहि अडथळा जुमानणार नाहीं!" असें म्हणून तिनें त्याच्या म्हणण्याकडे दुर्लक्ष्य करावें.

२१. घरांत लागणारीं सर्व भांडीं, मातीच्या, लांकडाच्या, चामड्याच्या व लोखंडाच्या सर्व वस्तु आणि टोपल्या वगैरे तिनें विकत घ्याव्या.

२२. त्याचप्रमाणें तिनें घरांत मीठ, तेल आणि दुर्मिळ औषधी यांचा गुप्त सांठा करून ठेवावा.

---

* हें वाचून कविश्रेष्ठ मोरोपंतांच्या धर्मराजाच्या तोंडीं घातलेल्या

'आधीं जिणें उठावें, पाहुनि निजलों असें मग निजावें;'

या आर्यार्धाचें कोणाला स्मरण होणार नाहीं?

वात्स्यायनानें वर सांगितलें आहे त्याच्या उलट, म्हणजे दिवसा पत्नी निजली असेल तर पतीनें तिला उठवूं नये, असा मात्र प्रकार हल्लीं पाश्चिमात्य समाजांत चालू आहे!

२३. आपली संपत्ति आणि त्याचप्रमाणें आपल्या पतीचा उपदेश तिनें कोणालाहि सांगूं नये.*

२४. वस्त्रेंभूषणें नीटनेटकीं परिधान करण्यांत, पाकनिष्पत्ति करण्यांत, मानमान्यता संपादन करण्यांत आणि पतिसेवापरायणतेंत तिनें आपल्या बरोबरीच्या स्त्रियांत कोणालाहि हार जाऊं नये.

२५. आपलें वार्षिक उत्पन्न काय आहे हें तिनें पहावें आणि त्याप्रमाणें आपला खर्च चालवावा.

२६. भोजनानंतर दूध शिल्लक राहील तर तिनें तें विरजण लावून त्याचें दहीं, ताक, लोणी व तूप करावें. तेल आणि साखर यांचीहि नीट व्यवस्था लावावी. तिनें कापसाचें सूत काढावें आणि त्याचीं वस्त्रें विणावीं. तांदूळ सडून नीटनेटके करावे. त्यांतील कण्या, कोंडा यांचा कांहींना कांहीं तरी उपयोग करावा. चाकर माणसांच्या पगाराचा तिनें हिशेब ठेवावा. शेतांच्या लागवडीकडे आणि गुराढोरांच्या पोषणाकडे लक्ष्य द्यावें. गोठ्यावर आणि तबेल्यावर देखरेख करावी. कोंबडे, लावे, पोपट, कोकीळ, मोर, वांदरें आणि हरणें व गुरेंढोरें इत्यादि पाळलेल्या प्राण्यांच्या दाणा-पाण्याची तरतूद तिनें दररोज करावी. आणि शेवटची गोष्ट म्हटली म्हणजे प्रतिदिवशीं तिनें आपला जमाखर्चाचा हिशेब स्वतः जमवावा.

२७. आपल्या पतीचीं जुनीं वस्त्रें प्रावरणें तिनें जमवून ठेवावीं आणि वेळ येईल त्याप्रमाणें तीं लायक नोकरांचाकरांनां किंवा भिकाऱ्यांनां देऊन टाकावीं.

२८. आपल्या पतीच्या मित्रमंडळीला फुलांचे हार, उटी आणि सुपारी देऊन तिनें त्यांचा आदरसत्कार करावा. सासूसासऱ्यांची सेवाशुश्रूषा करावी. त्यांची आज्ञा सदैव मानावी. कधींहि त्यांच्या तोंडास तोंड देऊं नये. त्यांच्याशीं मित आणि मर्यादशील भाषण करावें. त्यांच्या समक्ष मोठ्यानें हंसूं नये. तिच्या पतीचे मित्र तेच तिचेहि मित्र असावेत व त्याचे

---

* पुरुषानें आपलें द्रव्य आणि आपलें वय याचा कोणालाहि अंत लागूं देऊं नये, अशी देखील एक जुनी म्हण आहे.

जे शत्रु ते तिनेंहि आपले शत्रु लेखावे. करमणुकीच्याच मागें एकसारखें लागूं नये. गडीमाणसांनां चांगल्या रीतीनें वागवावें. आपल्या पतीला कळविल्या-विना कोणालाहि कांहींहि नजर करूं नये. प्रत्येक नोकर आपापलें नेमून दिलेलें काम करितो कीं नाहीं, हें तिनें पहावें. सणावाराच्या दिवशीं तिनें गडीमाणसांनां स्वतः भोजन घालावें. पतिव्रता पत्नीच्या कर्तव्यांची येथें समाप्ति होते.*

---

* यांपैकीं हें शेवटचें २८ वें सूत्र ध्यानांत धरण्याजोगें आहे. या सूत्रांत आणि कालिदासाच्या एका जगप्रसिद्ध श्लोकांत कांहींतरी संबंध आहे, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. सर्व नाटकांत शाकुंतल उत्तम, शाकुंतलाच्या सर्व अंकांत चौथा अंक उत्तम आणि त्या चौथ्या अंकांतहि हा पुढील श्लोक अत्युत्तम ही सर्वमान्य गोष्ट आहे.

शुश्रूषस्व गुरून्कुरु प्रियसखीवृत्तिं सपत्नीजने
भर्तुर्विप्रकृतापि रोषणतया मा स्म प्रतीपं गमः ।
भूयिष्ठं भव दक्षिणा परिजने भाग्येष्वनुत्सेकिनी
यान्त्येवं गृहिणीपदं युवतयो वामाः कुलस्याधयः ॥

याच श्लोकाचें प. लो. वासी परशुरामपंत गोडबोल्यांनीं पुढील सुरस भाषांतर केलें आहे.

शुश्रूषा पतिची करीं, सवतिशीं स्नेहप्रवृत्ती धरीं,
केलें यद्यपि अप्रिय स्वपतीनें कोपूं नको अंतरीं;
राहीं सावध, फार गर्व न धरीं, दासीं करावी दया,
येणें पावति थोर मान युवती, होती दुजा अप्रिया.

आणि प. लो.वासी अण्णासाहेब किर्लोस्करांनीं याच श्लोकाच्या आधारें केलेलें

वाडवडिलां सेवित जावें, सवतीशीं प्रेम धरावें,
पतिकोपीं नम्र असावें, सेवकावरि सदय पहावें,
निजधर्मीं दक्ष रहावें, भाग्य येतां मत्त न व्हावें,
ऐशीलाची गृहिणी ह्मणती,
इतरा कुलव्याधिचि होती.

हें गोड पद्य तर माझ्या पुष्कळ भगिनींनां मुखोद्गतच असेल.

आंग्लपत्नीचीं कर्तव्यें.

दोन हजार वर्षांपूर्वी वात्स्यायन ऋषींनीं काढलेलें आर्यावर्तांतील पत्नीचें मागील लेखांतील चित्र किती मनोवेधक आहे, हें सांगावयाला नकोच. आमच्या सांप्रतच्या स्थितींतील पत्नीचें चित्र काढून तें जर याच्या समोरासमोर धरिलें, तर तेंहि फार मनोवेधक आणि प्रेक्षणीय होणार आहे! परंतु आधुनिक आर्यपत्नीचें असें चित्र काढण्याचें काम दुसऱ्या कोणातरी कुशल कारागिरासाठीं ठेवून हल्लीं सुधारणेच्या शिखरावर जाऊन बसलेल्या आंग्लसमाजाची पत्नीच्या कर्तव्यासंबंधीं काय समजूत आहे, ती आपण पाहूं. कारण आपल्या प्राचीन आणि परमपूज्य ऋषिवर्यांनीं पूर्वी जे निर्बंध घालून ठेविले आहेत त्यांपेक्षां अर्वाचीन पाश्चिमात्य समाजानें घालून दिलेलें उदाहरण आह्मांस आतांसें अधिक प्रिय व अनुकरणीय वाटूं लागलें आहे!

लेडी बर्टन नामक एका सुप्रसिद्ध आंग्ल विदुषीनें याच विषयावर आपले विचार प्रदर्शित केले आहेत. त्यांत पत्नी होऊं इच्छिणाऱ्या आपल्या भगिनींनां त्यांनीं पुढील सुंदर उपदेश केला आहे. त्या ह्मणतातः—

१. अगदीं पहिली गोष्ट ह्मटली ह्मणजे तुह्मी पतीच्या जोडीदार होण्यास, मित्र होण्यास आणि पतीला सल्ला मसलत देण्यास योग्य आणि विश्वासू आहां असें त्याच्या प्रत्ययास आणून देऊन त्याला घरीं कसलीहि उणीव भासूं देऊं नका. पुष्कळ पुरुषांनां वाटत असतें कीं, कित्येक गोष्टी बाहेर मिळतात त्या घरीं मिळणें शक्य नाहीं; हा त्यांचा समज दूर करण्यास झटा. घरांत सर्व कांहीं मिळणें शक्य आहे, असें त्याच्या प्रत्ययास आणून द्या. ह्मणजे तो घराबाहेर अशा गोष्टी मिळविण्याच्या नादास लागणार नाहीं.

२. पति दुखण्यानें पडला असतां त्याची काळजीपूर्वक शुश्रूषा करा, ह्मणजे योग्य कारणावांचून आपल्या प्रकृतिसंबंधी तो निष्कारण विवंचना करणार नाहीं.

३. घर त्याला सुखावह होईल असें करा. घर जरी कितीहि लहान आणि गरिबीचें असलें, तरी तें घर आहे, हें विसरूं नका. दारिद्र्यानें

ग्रासलेल्या घराची पुरुषांनां लाज वाटत असते आणि ह्मणून ते अशा घरीं येऊन बसण्यापेक्षां 'क्लब' मध्यें जाऊन बसणें बरें, असें समजतात. पतीच्या शारीरिक सौख्याकडे विशेष लक्ष्य द्या. घरीं त्याला आनंद वाटून त्याचें मन तिकडे ओढेल असें करण्यास झटा. त्याची इष्टमित्र मंडळी नेहमीं त्याच्याजवळ येईल असें करा, आणि त्याचप्रमाणें त्याला कशा प्रकारची संगत आवडते तिकडे लक्ष्य द्या.

४. प्रत्येक बाबतींत तुह्मी आपली स्वताची सुधारणा करा आणि प्रत्येक गोष्टीची माहिती करून घ्या, ह्मणजे पतीला त्याच्या उद्योगांत तुह्मांला साह्य करितां येईल व तुह्मांला तुमची स्वताची उन्नतिहि करून घेतां येईल.

५. पतीबरोबर बाहेर पडण्यास सदैव तयार रहा, आणि पुरुषांप्रमाणें धैर्यानें प्राप्तस्थितीला तोंड द्या.

६. पतीवर असलेलें तुमचें प्रेम त्याजपासून लपवून ठेवण्याचा यत्न करूं नका; तुमच्या प्रत्येक कृत्यांत तें त्याच्या दृष्टोत्पत्तीस येऊंद्या. कोणत्याहि गोष्टींत त्याला नाहीं ह्मणूं नका. त्याच्या समक्ष मर्यादेनें आणि नम्रपणानें वागत जा. विनय आणि लज्जाशीलता यांचा कधींहि त्याग करूं नका; परंतु बाजवीपेक्षां फाजील लज्जा दाखवून सारा दिवस मुरके मारण्यांतहि अर्थ नाही. कारण ती खरी लज्जाशीलता नव्हे. आपल्या स्वतांच्या शरीराविषयीं किंवा कपड्यालत्त्यांविषयीं निष्काळजी रहाण्याची चूक कधींहि करूं नका. तर तुमच्याकडे पाहून तुमच्या पतीच्या नेत्रांनां आनंद होईल असा पोषाख करा व अशा रीतीनें आपल्या बाह्यसौंदर्याला जपा.

७. या जगांत पतीच्या हिताविषयीं सदैव दक्ष रहा. तो कोठें बाहेर जाईल त्या वेळीं आपल्या मागें घरांतील आपल्या एकंदर कामकाजांकडे पहाण्यास आपण आपल्यासारखेंच काळजीचें मनुष्य ठेवून जात आहों, असें त्याला वाटूं द्या; ह्मणजे कधीं काळीं त्याला कामानिमित्य कोठें दूर

जाण्याचा प्रसंग आला, तरी त्याला मागची काळजी करावी लागणार नाहीं. त्याला आवडणाऱ्या प्रत्येक गोष्टींत तुह्मी मन घाला. आपल्या पतीची खरी मैत्रीण होण्याला त्याला काय आवडतें याची पत्नीनें प्रथम माहिती करून घेतली पाहिजे. मग त्याला बागेंत गाजरें लावणें का आवडेना, तुह्मांलाहि त्या गाजरांची माहिती करून घेतली पाहिजे.

८. तुमचीं गृहछिद्रें तुमच्या मैत्रिणींनां कधींहि सांगूं नका.

९. पतीचे दोष कोणाच्याहि दृष्टोत्पत्तीस येऊं देऊं नका आणि प्रत्येक संकटांत आणि प्रत्येक अडचणींत त्याची पाट राखा.

१०. पतीचा अपमान होण्यासारखें भाषण तुमच्या समक्ष कोणालाहि बोलूं देऊं नका; आणि जर इतकेंहि करून कोणी नच ऐकेल तर तुह्मी तेथून उठून जा. त्याच्या विरुद्ध—विशेषतः इतरांशीं असलेल्या त्याच्या वर्तनाविरुद्ध—कोणाला एक शब्द देखील तुमच्याशीं बोलूं देऊं नका. कठोर भाषणानें किंवा थट्टेनें त्याचें मन दुखवूं नका. तो जेव्हां तुमचे दोष दाखवील तेव्हां त्यावर प्रत्युत्तर देऊं नका; त्याच्या हातून चूक झाली आहे असें समजलें असतां, विशेषतः तो स्वतः तें तुह्मांला सांगत असतां, तुह्मी त्याला दोष देऊं नका; किंवा रागाच्या भरांत त्या गोष्टीचा उल्लेख करून त्याला कधींहि हिणवूं नका. कोणतीहि गोष्ट त्याच्या हातून फसली तर तशा प्रसंगीं त्याला नेहमीं धीर देत जा, त्याचा उत्साहभंग होऊं देऊं नका.

११. उभयतांमध्यें कांहीं वितुष्ट आल्यास तें खोलींतल्या खोलींत ठेवा; बाहेर कोणालाहि त्याचा सुगावा लागूं देऊं नका.

१२. कोणत्याहि गोष्टींत त्याचा निषेध करूं नका. उदाहरणार्थ तुह्मीं तिटकारा घेतला असेल अशा एखाद्या मनुष्याला तुमचा पति भेटावयास जाईल, तर तुह्मीं त्याचा निषेध करूं नका. त्याजवर पूर्ण विश्वास ठेवा आणि दुसऱ्या मनुष्याचें कांहीं गुप्त असेल तेवढें खेरीज करून बाकी प्रत्येक गोष्ट त्याला सांगत जा.

१३. धर्मसंबंधीं गोष्टी बोलून त्याला कंटाळा आणूं नका. तुह्मीं स्वतः धार्मिक वृत्तीनें राहून दुसऱ्याला चांगलें उदाहरण घालून द्या. जीवनक्रम गंभीरवृत्तीनें आणि मनःपूर्वक चालवा. पतीच्या कल्याणासाठीं ईश्वराची सदैव प्रार्थना करा. त्याच्या नजरेस न आणितां तुमच्या हातून होईल तेवढ्या त्याच्या हिताच्या गोष्टी करा आणि आपला चरित्रक्रम असा पवित्र आणि शुद्ध ठेवा कीं, त्यामुळें तुमच्या पतीचेंहि पारमार्थिक कल्याण होईल. ईश्वराकडे त्याचें मन लागेल, अनाथ अपंगांविषयीं त्याच्या मनांत दया उत्पन्न होईल, इतरांशीं त्याचें वर्तन अधिक सौम्य आणि उदारपणाचें होईल, अशाविषयीं त्याचें मन वळविण्यास नम्रतेनें यत्न करा.

१४. आपलें कर्तव्य बजाविण्यास अवश्य असें जें शारीरिक आणि मानसिक स्वाथ्य त्याची सदोदित काळजी घ्या.

१५. त्याचीं पत्रें कधींहि उघडून पाहूं नका आणि त्याचप्रमाणें तो होऊन जें तुह्मांला सांगणार नाहीं तें त्याच्याजवळून काढून घेण्याचा यत्न कधींहि करूं नका.

१६. तो आणि त्याच्या कुटुंबांतील इतर माणसें यांच्यामध्यें तुह्मी कधींहि येऊं नका; तीं त्याच्याजवळ रहातील असें करा. त्यांच्यासाठीं तो जें जें कांहीं करूं इच्छील त्या त्या कामीं तुह्मी त्याला मनोभावानें साह्य व्हा आणि त्यांचा कल पाहून तीं अगदीं तुमचीच आप्त मंडळी आहे अशा रीतीनें त्यांनां वागवित जा.

१७. प्रत्येक गोष्ट चालवून घ्या; केव्हांहि कोणतीहि गोष्ट अडून राहील असें करूं नका.

बर्टनबाईचीं पत्नीकर्तव्यावरील सूत्रें वरीलप्रमाणें आहेत. हीं वाचून प्राचीन काळीं आमच्या परमपूज्य महर्षींनीं घालून दिलेल्या सूत्रांचा ओघ हळू हळू पाश्चिमात्य देशाकडे वळत चालला आहे, असें कोणालाहि स्पष्ट दिसून येणार आहे.

गृहिणीशिक्षणालयें.

एका सुप्रसिद्ध आंग्ल विदुषीचें ह्मणणें असें आहे कीं, पत्नी होऊं इच्छिणाऱ्या स्त्रियांसाठीं स्वतंत्र शाळा स्थापन झाल्या पाहिजेत. या शाळांतून गृहकृत्यें नीटपणें करितां येण्यास अवश्य अशा सर्व गोष्टींचें शिक्षण आणि त्याचप्रमाणें गृहसौख्यास अवश्य असें मानसिक व नैतिक शिक्षण देण्यांत यावें. सुगृहिणी होण्यास या बाईच्या मताप्रमाणें ज्या सद्गुणांची आवश्यकता आहे, ते खालीं दिले आहेतः—

१. पाकनिष्पत्ति करितां येणें.
२. शिवण टिपण करितां येणें.
३. मुलांचें चांगल्या प्रकारें संगोपन करितां येणें.
४. आपली स्वताची शरीरप्रकृति चांगली राखतां येणें.
५. आपलें शारीरिक सौंदर्य कायम राखतां येणें.
६. पतीच्या आणि त्याचप्रमाणें आपल्या नातलगांशीं चांगल्या रीतीनें वागतां येणें.
७. चाकर माणसांनां वागवून घेतां येणें.
८. पूर्वीं एका शब्दानेंहि न कळवितां आयत्या वेळीं पतीनें बरोबर जर कोणी पाहुणा आणला तर त्याचें आनंदानें आगतस्वागत करितां येणें.
९. निस्पृहता दाखवूनहि दयाळू होतां येणें.
१०. कोणतीहि गुप्त गोष्ट पतीपासून लपवून न ठेवणें; परंतु जगांतील इतर सर्व माणसांपासून मात्र ती गुप्त ठेवितां येणें.
११. कंजुषपणा केल्याशिवाय काटकसर करितां येणें.
१२. पति रागावला असतां स्तब्ध रहातां येणें.

पत्नीच्या कर्तव्यांची व्याप्ति किती जबरदस्त आहे, हें या तिहींपैकीं कोणत्याहि यादीवरून सहज ध्यानांत येणार आहे. परंतु या गोष्टीनेंच भिऊन न जातां ‘ गृहिणी ’ या महत्पदाची प्राप्ति करून घेण्यासाठीं माझ्या प्रत्येक भगिनीनें वर दिलेले सद्गुण आपल्या अंगीं आणण्यास यथाशक्ति झटावें, असें त्यांनां माझें आग्रहाचें सांगणें आहे.

अमेरिकेंतील स्त्रिया.

डॉ. मरे मिचेल यांनां "अमेरिकेंत अत्युत्तम असें आपण काय पाहिलें?" असें कोणीं एकानें विचारिलें असतां त्यावर "अमेरिकेंतील स्त्रिया!" असें डॉक्टर साहेबांनीं उत्तर दिल्याचें सांगतात. आणि खरोखरच या 'नव्या जगां'त परक्या देशांतील गृहस्थाला सूक्ष्मदृष्टीनें अवलोकन करण्याजोगे आणि विचारांत पाडण्याजोगे जे कांहीं अद्भुत चमत्कार दृष्टीस पडतात त्या सर्वांत 'अमेरिकेंतील स्त्रियांचा नंबर जरी पहिला लागला नाहीं, तरीही तो बराच वर लागेल, ही गोष्ट अगदीं निर्विवाद आहे. तेथें त्यांची योग्यता मोठी महत्वाची आहे इतकेंच नव्हे, तर ती मोठी आश्चर्य वाटण्याजोगी आहे. अमेरिकन स्त्रियांचें समाजांत असें कांहीं जबरदस्त वजन आहे कीं, कैक वर्षांपासून चालत आलेल्या रुढींची देखील त्या उलथापालथ करूं शकतात किंवा पाहिजे तशा स्वभावाच्या व्यक्तीला पाहिजे त्या रीतीनें वांकवूं शकतात. आणि त्यामुळें या पृथ्वीवरील एकंदर सुधारलेल्या देशांत, कधीं कधीं केवळ उपहास करण्याकरितां—परंतु वारंवार आश्चर्य व्यक्त करण्याकरितां, स्त्रीवर्गाच्या उन्नतीचा कट्टा अभिमान वहाणाऱ्या ह्मणून, किंवा त्या उन्नतीचें आश्चर्यचकित करण्याजोगें उदाहरण ह्मणून, अमेरिकन स्त्रियांचा उल्लेख केला जातो. तेव्हां स्त्रीशिक्षण हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आपणापुढें उभा आहे अशा प्रसंगीं, अमेरिकेंतील स्त्रिया आणि इतर देशांतील त्यांच्या भगिनी यांत अंतर पडण्याजोग्या विशेष गोष्टी कोणत्या दिसून येतात, हें पाहिलें असतां अप्रासंगिक होणार नाहीं.

अमेरिकेंतील स्त्रिया ह्मणजे नेहमीं सार्वजनिक कृत्यांत गढलेल्या असावयाच्या आणि त्यांचा हा वर्तनक्रम सर्व आयुष्यभर चालावयाचा. तिकडे मुलींनांहि मुलांबरोबरच जाहिररीतीनें शिक्षण मिळत असतें व मुलांच्या शिक्षणाप्रमाणें त्यांच्याहि शिक्षणाकडे सर्वांची नजर असते. तिकडे स्त्रीशिक्षणाला 'झनाना' किंवा 'एकांतवास' वगैरे कांहींएक लागत नाहीं. आपल्या बंधूंबरोबरच त्या शिक्षण संपादित असतात, इतकेंच केवळ नव्हे

तर त्यांच्याबरोबरच त्यांच्या करमणुकींत व नाना तऱ्हेच्या खेळांतहि त्या भाग घेत असतात. मोठ्या निश्चयानें त्यांच्याबरोबर परीक्षा देतात, आणि मुलांच्या शिक्षणाप्रमाणेंच मुलींच्याहि शिक्षणाची अतोनात कळकळ वहाणाऱ्या अवाढव्य प्रेक्षकसमूहाच्या टाळ्यांच्या गजरांत त्याहि आपल्या बंधूंबरोबरच विद्वत्तेबद्दल मानसन्मान आणि नाना तऱ्हेच्या पदव्या संपादन करितात. विश्वविद्यालयांतून आपला अभ्यासक्रम पूर्ण करून अमेरिकेंतील मुलगी बाहेर पडते ती संसारचक्रांत सांपडून कोठें तरी दडी मारून रहाण्यासाठीं नव्हे, तर आपल्या बंधुवर्गाच्या बरोबरीनें कोणता तरी उत्साहवर्धक आणि लोकोपयोगी उद्योगक्रम स्वीकारून आपली जीवितयात्रा सफळ करण्यासाठींच होय. वर्तमानपत्रें आणि मासिकपुस्तकें खरडून काढणें, नाना तऱ्हेच्या विषयांवर संभाषणें करणें, राजकीय हेतूंसाठीं भरणाऱ्या सभांना जाणें, 'इलेक्शन'चा ओघ आपल्या वजनानें आपणास पाहिजे तसा बदलविण्यास झटणें, समाजांत कोणकोणत्या सुधारणा होणें इष्ट आहेत तें पाहून त्या अमलांत आणण्याचा प्रयत्न करणें, आणि त्याचप्रमाणें त्यांच्या मताप्रमाणें ज्या कोणत्या गोष्टींत त्यांना पुरुषांनीं अन्यायानें मज्जाव केला असेल त्या गोष्टीविषयीं ऊहापोह करणें, इत्यादि अनेक कामें त्यांना करावयाचीं असतात. आणि या एकंदर गोष्टींचा विचार मनांत आणिला ह्मणजे शारीरिकदृष्ट्या त्यांची अवनति होत चालली आहे असें जें कित्येक ह्मणतात, तिकडे मुळींच लक्ष्य न जातां इतक्या सतत परिश्रमांपुढें इतके दिवस त्या टिकाव कशा काढतात, याचेंच आश्चर्य वाटूं लागतें !

शारीरिकदृष्ट्या अमेरिकेंतील स्त्रियांची अवनति होत चालली आहे, असें इंग्लंडांत वारंवार ह्मणण्यांत येतें. याचें कारण इतकेंच आहे कीं, यूरोपांतील स्त्रियांपेक्षां अमेरिकेंतील स्त्रियांचा वर्ण खरोखरच किंचित् फिका असतो; आणि गौरकाय लोक तर स्त्रियांच्या सौंदर्याची किंमत त्यांच्या अंगकांतीवरून ठरवित असतात. अमेरिकेंतील स्त्रियांचा स्वभावहि किंचित् शीघ्रकोपी आणि चंचल असतो; परंतु हा त्यांचा किंवा त्यांच्या शिक्षणाचा

दोष नसून अमेरिकेंतील हवेचा आणि परिस्थितीचाच हा दोष आहे. आणि याचा परिणाम तेथील स्त्रिया आणि पुरुष या दोघांवरहि सारखाच झालेला दिसून येतो. आंपल्या बंधुवर्गाच्या बरोबरीनें त्याहि आपला जीवनक्रम ज्या पद्धतीनें चालवित असतात त्या पद्धतीचाहि हा थोडाबहुत परिणाम असेल, नाहीं असें ह्मणतां येणार नाहीं. अमेरिकेंतील सर्वच लोक नेहमीं क्षुब्ध वातावरणांत रहात असतात. 'इलेक्शन'च्या धामधुमीपुढें तर त्यांनां दुसरें तिसरें कांहींएक सुचतच नाहीं. इतर गोष्टी राहोत, परंतु तेथें धर्मसंबंधीं स्थिति देखील हीच आहे. अमेरिकन लोकांनीं धर्माला असें कांहीं स्वरूप दिलें आहे कीं, त्याचे योगानें मनुष्यप्राण्याच्या स्वभावांतील चंचल आणि क्षुब्धताप्रिय तत्वांनां चांगलेंच प्रोत्साहन मिळतें. या सतत चाललेल्या धामधुमींत पुरुषांप्रमाणें स्त्रियाहि मग्न झालेल्या असतात. आणि याचा साहजिक परिणामच असा झाला आहे कीं, बलवान् पुरुषवर्गापेक्षां सुकुमार स्त्रीवर्गाची शारीरिक अवनति जास्त जास्त होत चालली आहे. त्यांचा वर्ण फिका होत चालला आहे, स्वभाव शीघ्रकोपी बनत चालला आहे, वृत्ति चंचल होत चालली आहे आणि अकाळीं वृद्धत्व येऊन आयुष्य नाश होत आहे.

त्यांच्या पोषाखाविषयीं दोन शब्द येथें सांगितले असतां वावगें होणार नाहीं. इंग्लंडांतील स्त्रियांपेक्षां अमेरिकेंतील स्त्रियांचा पोषाख विशेष भपकेदार असतो. या कामीं त्यांच्या मनाचा पॅरिस येथें प्रचलित असलेल्या पद्धतीकडे पूर्ण ओढा असतो. विशेषतः उष्ण काळांतील त्यांचा पोषाख इतका कांहीं भपकेबाज असतो कीं, तो पाहून या बायांच्या पोषाखाच्या बाबतींत नीटनेटकेपणा आणि साधेपणा यांची जागा पोकळ डौल आणि ऐषआराम यांनीं पटकाविली आहे, अशी पहाणाराची तात्काळ खात्री होते. सारांश अमेरिकेंतील स्त्री ह्मणजे अशा कांहीं अनावर खर्चाचें कूळ होऊन बसलें आहे कीं, बेताबाताच्या प्राप्तीचे पुरुष लग्नाचें नांव निघतांच घाबरून जातात. ज्यांनां हें कांहीं सुचिन्ह दिसत नाहीं अशा कित्येक देशहितचिंतकांनीं या त्यांच्या अनिवार उधळपट्टीविरुद्ध ओरड चालविली आहे; परंतु या स्त्रियांनीं मांडिलेल्या पैशाचा,

काळाचा आणि बुद्धीचा अपव्यय थांबविण्याच्या कामीं त्यांनां म्हणण्यासारखें यश येईलसें दिसत नाहीं. हा डामडौल केवळ सामाजिक कृत्यांतच दिसून येतो असें नाहीं, तर त्याची मजल ईश्वराराधनेच्या मंदिरापर्यंतहि जाऊन पोहोंचली आहे आणि अमेरिकेंतील एखाद्या प्रार्थनामंदिरांतून निघून स्कॉटलंडांतील तशाच एखाद्या प्रार्थनामंदिरांत शिरलें तर डामडौल आणि ऐषआराम यांचा रंगेल प्रदेश सोडून आपण एखाद्या साध्या, स्वाभाविक आणि गंभीर प्रदेशांत आलों आहों, असें वाटूं लागतें. आपल्या इकडे या संबंधीं काय स्थिति आहे ती सर्वांनां माहित आहेच; तेव्हां ती येथें दिलीच पाहिजे असें नाहीं.

बुद्धिवैभवाच्या आणि इतर कलाकौशल्याच्या कामीं अमेरिकेंतील स्त्रिया इतर कोणत्याहि देशांतील आपल्या भगिनींच्या खात्रीनें मागें नसून थोड्या-बहुत पुढेंच आहेत. तथापि या कामांत देखील त्यांचें लक्ष्य टिकाऊपणापेक्षां दिखाऊपणाकडेच अधिक असतें. गहन विद्वत्ता आणि उदात्त विचार यांच्या खोल प्रवाहांत शिरण्यापेक्षां उथळ पाण्यांत डुंबत रहाण्याकडेच त्यांचा कल अधिक असतो. सांदीकोंदींतून निघून चव्हाट्यावर येण्यास उपयोगीं पडण्याजोगें ज्ञान जगांतील इतर कोणत्याहि स्त्रियांपेक्षां त्यांच्या अंगीं अधिक असतें. एका विशेष प्रकारच्या गायनवादनांत त्या अगदीं प्रवीण असतात. समयोचित उत्तर देण्यांत त्या कोणालाहि हार जाणार नाहींत. संभाषणांत दिसून येणारें त्यांचें चातुर्य अनुपमेय असतें. वर्तमानपत्रांत तऱ्हतरीत लेख लिहिण्यांत त्यांचा हातखंडा असतो. त्यांच्या वक्तृत्वांत पराकाष्ठेची मोहकता असते. सारांश, कोणताहि उद्योग घ्या, त्यांत अमेरिकेंतील स्त्रिया अशी कांहीं शिताफी आणि असा कांहीं उत्साह दाखवितात कीं, पहाणाराला आश्चर्यच वाटलें पाहिजे. आणि या अशा उद्योगांत जय मिळाला असतां त्यांनां जो आनंद होतो, तसा दुसऱ्या कशानेंहि होत नाहीं. त्या विजयानंदानें बेहोष होऊन पाणउतारा झाल्यामुळें खिन्न झालेल्या गर्विष्ठ पुरुषवर्गाला बाजूला सारून मोठ्या उल्हासानें मार्गक्रमण करित असतांना त्या वारंवार नजरेस पडतात.

तथापि येथें ही एक गोष्ट सांगितली पाहिजे कीं, या अशा प्रकारच्या सतत धामधुमींत आणि गडबडींत चाललेल्या आयुष्यक्रमांत देखील अमेरिकेंतील स्त्रिया आपलें गृहव्यवस्थेचें काम मुळींच विसरत नाहींत. आणि याबद्दल त्या खरोखरच स्तुतीस पात्र आहेत. त्यांच्या देशांतील पूर्वापार चालत आलेल्या संप्रदायास अनुसरून गृहव्यवस्थेसंबंधीं कोणतेंहि काम आपल्या हातानें करण्यास त्या मागें पुढें पहात नाहींत. आपली एकंदर गृहव्यवस्था अगदीं प्रेक्षणीय करण्यासाठीं त्या जिवापाड श्रम करितात. आणि या सर्वोतहि अत्यंत आश्चर्याची गोष्ट ह्मणजे घरांतील कामें देखील त्या मोठ्या विचारानें, पद्धतशीर रीतीनें आणि टापटिपीनें करित असतात. आठवड्यांतील एक दिवस कपडेलत्ते धुवून साफसूफ करण्याकडे, एक दिवस सर्व वस्तु घांसून पुसून साफ करण्याकडे, एक दिवस बाजारांतून सामानसुमान आणण्याकडे, अशा रीतीनें सर्व दिवस निरनिराळ्या कामांकडे नेमलेले असतात. घरांतील कोणतेंहि काम आपल्या हातानें करण्यास त्या कधींहि कांकूं करित नाहींत, इतकेंच नव्हे, तर हा आपला संसार असा झकपक ठेवण्यास आपल्याला किती उरस्फोड करावी लागली आहे आणि किती श्रम घ्यावे लागले आहेत, हें त्या मोठ्या अभिमानानें सांगत असतात. दिवसाचा वेळ याप्रमाणें मळके कपडे घालून घरांत खपण्याकडे गेला तरी संध्याकाळच्या जेवणाच्या वेळीं नीटनेटका आणि सुबक पोषाख करून तो प्रसंग मोठ्या थाटानें साजरा करण्यास त्या कधींहि विसरावयाच्या नाहींत. एकाच जागीं फार वेळ काढण्याचा त्यांनां कंटाळा आहे. घराबाहेरील करमणुकीचे खेळांची त्यांनां फार आवड असते आणि घरांतील कामें आटोपतांक्षणीं घरांतील कंटाळवाण्या निवांतपणाचा त्याग करून त्या बाहेर रहदारीच्या मोठमोठ्या रस्त्यांवर किंवा जनसमूहानें गजबजलेल्या मैदानांत फिरावयास जातात. नाहींपेक्षां कांहीं मौज करण्याकरितां अगर कांहीं महत्वाचें काम करण्याकरितां जमलेल्या एखाद्या सम्मेलनांत जाऊन मिळतात.

केवळ आपला निर्वाह चालावा एवढ्याच करितां कोणाशीं तरी लग्न करण्याची आवश्यकता अमेरिकेंतील स्त्रियांनां आजकाल राहिलेली नाहीं. उजळ माथ्यानें आपला चरितार्थ चालवितां येण्याजोगें शिक्षण त्यांनां मिळालेलें असतें, आणि त्यांच्या मनांत येईल किंवा त्यांनां जरूर पडेल तेव्हां त्या शिक्षणाचा उपयोग करण्यास कितीतरी मार्ग त्यांनां मोकळे असतात. या 'नव्या जगां'तील अति उन्नत आणि मनोवेधक देखावा ह्मटला ह्मणजे पुरुषांप्रमाणें कुलीन स्त्रियांनांहि मोठ्या नेटानें आणि उत्साहानें परिश्रम करून आपला चरितार्थ संभावितपणें चालवितांना पहाणें हा होय. हरएक प्रकारच्या उद्योगांत त्यांचें अंग आहेच. कसलीहि ऐहिक महत्वाकांक्षा पूर्ण करण्यांत आणि त्याचप्रमाणें धार्मिक चळवळींत देखील, बलवान् ह्मणवून घेणाऱ्या पुरुष जातीच्या बरोबरीनें त्या भाग घेतात. वरिष्ठ प्रतीच्या आणि त्याचप्रमाणें प्राथमिक शिक्षणाच्या शाळांवरील शिक्षकांच्या शेंकडा पन्नास जागा अमेरिकन स्त्रियांनीं भरून काढिल्या आहेत; प्रोफेसरांच्या जागेवर आणि जाहिरव्याख्यात्यांच्या जागेवर त्या विराजमान झाल्या आहेत; पद्धतशीर रीतीनें ज्ञान संपादन करून आणि आपल्या पात्रतेच्या जोरावर मोठमोठे मानसन्मान आणि मोठमोठ्या पदव्या मिळवून त्यांनीं वैद्यकीच्या धंद्यांत गर्दी करून सोडल्यामुळें त्या धंद्याचा मक्ताहि आतां पुरुष डॉक्टरांच्या हातींच राहिला नाहीं; बाकीच्या धंद्यांतहि प्राविण्य संपादन करून हळु हळू स्त्रिया आपला शिरकाव करून घेत आहेत. पोस्टाचें खातें तर इतकें कांहीं पूर्णपणें स्त्रियांच्या ताब्यांत गेलें आहे कीं, प्रवासी लोकांनां पोस्टमास्तरांपेक्षां पोस्टमास्तरणींकडूनच वारंवार काम करून घ्यावें लागतें. सार्वजनिक पुस्तकालयें, हॉटेलें, विश्रामालयें इत्यादि संस्था तर पुरुषांच्या देखरेखीखालीं असलेल्या क्वचितच आढळतात! मोठमोठ्या कचेऱ्यांतून देखील शेंकडा पन्नास जागा स्त्रियांनीं व्यापिलेल्या आहेत. ज्या कांहीं थोड्याशा ठिकाणीं त्यांनां सांप्रत मज्जाव आहे, त्या ठिकाणावरहि त्यांनीं हल्ले चालविले आहेत आणि अल्पकाळांतच तेथेंहि त्यांचा खात्रीनें शिरकाव झाल्याविना रहाणार नाहीं. बालविवाह करावयास लागून पुढें चरितार्था-

साठीं सर्व प्रकारें दुसऱ्याच्या तोंडाकडे पहाण्याचा प्रसंग आणणारी या हिंदुस्थानांतील स्त्रियांची दुबळी आणि सर्वस्वी पराधीन स्थिति सुदैवानें अमेरिकेंतील किंवा इतर कोणत्याहि सुधारलेल्या देशांतील स्त्रियांनां माहीत नाहीं, आणि तेथें खराखुरा प्रेमविवाह होण्याची शक्यता आहे इतकेंच नव्हे तर शेंकडों उदाहरणांत त्याची सत्यता दिसून येते.

अमेरिकन स्त्रियांची धर्मनिष्ठा जागृत झाली ह्मणजे त्यांचे ठिकाणीं अशी कांहीं थोर आणि उदात्तवृत्ति दिसून येते कीं, तिची कशालाहि बरोबरी करितां येणार नाहीं. आत्मत्यागाचें तत्व त्यांच्या ठायीं पूर्णपणें बाणलेलें आहे. गरीब गुरीब, अनाथ अपंग, त्याचप्रमाणें निराश्रित विधवा आणि पोरकीं मुलें पाहून त्यांचें कोमल हृदय तळमळूं लागतें. दुःखी आणि आजारी मुलांची निगा राखण्यासाठीं आणि त्याचप्रमाणें पतितांच्या उद्धारासाठीं त्या जे कांहीं अनेक तऱ्हेनें आणि अनेक मार्गांनीं परिश्रम करित असतात, ते खरोखर एखाद्या देवदूताला शोभण्यासारखे असतात. अमेरिकेंतील स्त्रियांच्या परोपकारबुद्धीचा उल्हासमय ओघ वळलेला जेथें दृश्यमान होत नाहीं, असें तिकडे एकहि अनाथगृह, रुग्णालय, अंधगृह, बहिऱ्या आणि मुक्या लोकांसाठीं स्थापिलेलें शिक्षणालय, दुःखक्लेशांचें निवासस्थान किंवा दुर्गुणदुराचाराचें वसतिस्थान सांपडावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें या परोपकारी धार्मिक बाया आपल्या उदार आणि दयामय अंतःकरणांत एकाच विशिष्ठ देशाचा किंवा एकाच विशिष्ठ वर्गांतील लोकांचा दुःखभार वहातात असें नाहीं; तर एकंदर मनुष्यजातीचीं शारीरिक आणि मानसिक दुःखें पाहून त्या तळमळत असतात. आणि या देशांत ज्या कित्येक अमेरिकेंतील स्त्रिया दुःखाची आणि अज्ञानाची छाया आमच्या लोकांतून घालविण्याचा उद्योग करित आहेत त्यांनां हा सदुद्योग अबाधित चालवितां येण्याला सर्वस्वी जरी नाहीं तरी बऱ्याच अंशानें अमेरिकेंतील त्यांच्या भगिनींचीच परोपकारबुद्धि कारणीभूत आहे.

या वर ज्या गोष्टी सांगितल्या आहेत त्या, किंवा आणखी दुसऱ्याहि कदाचित् सांगतां येण्याजोग्या आहेत त्या, अमेरिकेंतील प्रत्येक स्त्रीला लागू पडतीलच असें नाहीं. साधारणपणें या त्यांच्याविषयीं गोष्टी आहेत. कित्येक स्त्रिया यापेक्षां श्रेष्ठ प्रतीच्या असतील आणि त्याचप्रमाणें कित्येक यापेक्षांहि कनिष्ठ वर्गांतील असतील; परंतु साधारणपणें अमेरिकेंत स्त्रीशिक्षणानें जो मार्ग स्वीकारिला आहे तो मार्ग या सृष्टिक्रमांत स्त्रियांसाठीं नेमलेल्या श्रेष्ठस्थानीं त्यांनां नेऊन पोहोंचविण्याला श्रेयस्कर आहे कीं काय, असा प्रश्न साहजिकच पुढें उभा रहातो. ख्रिस्ती धर्मशास्त्रांत एके ठिकाणीं असें लिहिलें आहे कीं, स्त्री ही पुरुषाच्या कुशींतून निर्माण झाली; ती त्याच्या मस्तकांतून निर्माण झाली नाहीं, आणि ह्मणून ती त्याच्या पेक्षां श्रेष्ठ व्हावी अशी ईश्वरी योजना नाहीं. ती त्याच्या पायांपासूनहि निर्माण झाली नाहीं, तेव्हां ती त्याच्या पेक्षां कनिष्ठ व्हावी अशीहि ईश्वरी योजना दिसत नाहीं. ती त्याच्या कुशींतून निर्माण झाली आहे, सबब ती त्याला मदतगार व्हावी अशीच योजना आहे. अमेरिकेंतील स्त्रीशिक्षणपद्धतीचा परिणाम ती पुरुषाला मदतगार व्हावी असा होण्याच्या ऐवजीं पराकाष्ठेच्या चढाओढीनें ती शेवटीं त्याला प्रतिस्पर्धी व्हावी असा होत नाहीं काय? हा अत्यंत महत्वाचा प्रश्न आहे आणि हल्लीं आपल्या इकडे स्त्रियांनां मिळत असलेल्या शिक्षणांत कोणत्या व कशा चुका होत आहेत हें या वरील प्रश्नाच्या उत्तरावरूनच समजून येणार आहे.

खासगी पत्रें.

गिरगांव, मुंबई.

ता. १२ जून १९०१.

परमप्रिय ताई,

"ताईनां पत्र पाठविलेंस का?" ह्मणून तिकडून मला आज पांच सहा दिवस सारखें विचारणें होत आहे, पण आजवर कशी ती मला आठवण ह्मणून राहिलीच नाहीं. सासूबाई यात्रेला गेल्यापासून घरांत माझी जी कांहीं तारांबळ उडत असते, ती विचारूं नकोस. तरी बरें कीं, माझ्या हातून इतक्या चुका होतात पण एका अक्षरानें दिखील मला कधीं खजील करणें होत नाहीं. उलट गोड आणि ममतेच्या शब्दांनीं माझें पदोपदीं समाधानच करित असायचें. आजवर एकटी रहाण्याचा मला कधीं प्रसंगच आला नव्हता, त्यामुळें मला बरेंच घाबरल्यासारखें होतें. विशेषतः स्वयंपाक करण्याची वेळ आली ह्मणजे रोज उठून मेलें करायाचें काय, हेंच मला मोठें गूढ पडतें. तिकडे पहिल्या पहिल्यानें एकदोनदां मीं याबद्दल विचारून पाहिलें, पण आपलें स्पष्ट सांगणें झालें कीं "या बाबतींत मात्र आह्मांला कांहींएक समजत नाहीं. ताटांत वाढाल तें आह्मी खाऊं." ताई, अशा वेळीं काय बरें करावें माझ्यासारखीनें? तिकडचा स्वभाव इतका दयाळू आहे ह्मणूनच केवळ माझा निभाव लागतो आहे सासूबाईंच्या मागें. नाहींतर पदोपदीं माझी फजिती झाल्याविना राहिली नसती.

खरोखरच मी पूर्वजन्मीं कांहींतरी सबळ पुण्याई केली होती, त्याविना असें सौभाग्य लाभावयाचें नाहीं. देवानें जन्मोजन्मीं असेंच चालवावें, अशी मी रात्रंदिवस प्रार्थना करित असतें. ते दिवशीं ती आपल्या शेजारची कुशी सहज बसायाला आली होती. बिचारी आल्या घटकेपासून सारखी आंसवें गाळित होती. तिची ती कहाणी ऐकून मला जें कांहीं वाईट वाटलें ह्मणून सांगूं, विचारूं नकोस. तिकडे तर ती हकीकत ऐकून संतापच आला. "मुलगा कसा आहे याचा क्षणभर दिखील विचार न करितां श्रीमंतांच्या घरीं पोरी वैरण्याची जी कित्येकांनां हांव असते,

तिचाच हा परिणाम आहे. त्यांत दुःखाची गोष्ट एवढीच आहे कीं, या मूर्ख आईबापांची ही हांव त्या बिचाऱ्या निरपराध पोरींनां पुढें भोंवते!" असें ह्मणणें झालें.

ताई, अशा स्थितींत बिचाऱ्या त्या कुशीनें करावें तरी काय? श्रीमंतीकडे पाहून दिली ह्मणावी तर त्यांतहि कांहीं फारसें तथ्य दिसत नाहीं. "आतां आतांसे तर कितीतरी मारवाडी कार्खेत मोठमोठाल्या चोपड्या घेऊन येत असतात. सासऱ्याचें तोंड अगदींच सुकून गेलें आहे." असें कुशीच्या सांगण्यांत आलें. घरांत सासू नाहीं. सासरे तर सदा वैतागलेले, कधीं चुकून दिखील सुनेजवळ एखादा ममतेचा शब्द बोलावयाचे नाहींत. दीरमंडळी ह्मणजे अशी कांहीं लहरी आणि तालीवार आहे, कांहीं बोलायची सोय नाहीं. 'वहिनी' ह्मणजे आपलें पडेल तें काम करण्याला, बोलूं तें सोसून घेण्याला आणि करूं तें सहन करण्यालाच घरांत आणिली आहे, असा एकंदर मंडळीचा समज! आणि त्याप्रमाणेंच त्यांचें वर्तन! स्वतः नवऱ्याची गोष्ट तर विचारूंच नको. बिचारा कधीं सरळ बोलला आहे, कधीं आदळआफट केल्याशिवाय जेवला आहे, असा दिवस कांहीं त्या कुशीला आठवत नाहीं! ताई, काय ही स्थिति आणि हें दैव तरी असलें कसलें? बिचारीनें जन्मवर हा ताप सोसावा तरी कसा? या घरांत पडल्यामुळें विचारीच्या एकंदर गुणांची माती झाली आहे. मुलगी थोरामोठ्यांच्या घरीं पडावी ही हांव त्या बिचाऱ्या बापालाहि भोंवली. एक दोन वर्षांच्या आंत घरदार देखील कर्जदारांनीं धुवून नेलें. बरें, पोरीला तरी सुख असावें, तर तिची ही अशी दशा! तेव्हां ही एकंदर मागल्या जन्मींचीच पुण्याई ह्मणायची. ताई, मला तर बिचारीचें समाधान दिखील करतां आलें नाहीं. असो.

ताई, मजकडून जरी पत्र जाण्यास विलंब झाला तरी तूं वारंवार पत्र पाठविण्यास अनमान करणार नाहींस अशी माझी एकटीचीच विनंति आहे असें नव्हे तर तिकडूनहि अगदीं आग्रहपूर्वक सांगण्यांत आलें आहे.

तुझी लाडकी,

चिंगू.

नासिकाजवळचीं पांडवलेणीं.

नासिक येथील आरोग्यभुवनाच्या आजूबाजूंस जीं कित्येक प्रेक्षणीय स्थळें आहेत त्यांत पांडवलेणीं हीं विशेष महत्वाचीं होत. आज माझ्या भगिनींस ह्या लेण्यांसंबंधीं थोडीशी माहिती देण्याचा मानस आहे.

आरोग्यभुवनापासून हीं लेणीं सुमारें पांच कोसांवर आहेत. नासिक शहरावरूनच ह्या लेण्यांस जाण्याचा रस्ता असून तो 'आग्रा रोड' ह्मणून प्रसिद्ध आहे. हा रस्ता फार चांगल्या स्थितींत ठेविलेला असतो. रस्त्याच्या दोहों बाजूंनीं गर्द झाडी असल्यामुळें आजूबाजूचा देखावा फारच सुरेख दिसतो. आह्मी सकाळीं सहा वाजतां घरून निघालों होतों. सुमारें एक तासानें आमचे टांगे नासिकास त्र्यंबकगेटाजवळ येऊन पोहोंचले. हा गेट पाहिला ह्मणजे पेशवाईची आठवण होते. ह्यास त्र्यंबकगेट हें नांव पडण्याचें कारण हें कीं, येथूनच त्र्यंबकेश्वरास जाण्याची सडक आहे. अशा तऱ्हेचा गेट पाहण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग असल्यामुळें तो दृष्टीस पडतांच माझ्या मनांत अनेक तरंग आले. हा ह्मणण्यासारखा मोडकळीस आलेला नाहीं. असो. ह्या ठिकाणीं थोडा वेळ टांग्याच्या घोड्यांनीं विसावा खाल्यावर आमचे टांगे पुनः चालू झाले. याप्रमाणें आणखी एक पाऊण तास आम्रवृक्षांच्या दुतर्फा असलेल्या गर्द छायेंतून आजूबाजूचे मळे, वाड्या, इत्यादि शोभा पहात पहात आह्मीं नासरडी नदीच्या पुलावर येऊन थडकलों. येथें टांगेवाल्यानें टांग्याच्या घोड्यांस पाणी पिण्याकरितां ह्मणून सोडलें. नदीवर जाऊन घोड्यांनीं यथेच्छ पाणी पिऊन तृषा शांत केल्यावर तेथें कांठावर मोठ्या आनंदानें रेतींत लोटांगणें घातलीं—जणूं काय सकाळच्या व्यायामामुळें त्यांस आनंदीआनंद झाला असावा! पुलावरून हा देखावा पाहून आह्मांसहि मोठें कौतुक वाटलें.

आणखी अर्ध्या तासानें आम्ही ज्या टेंकाडांवर हीं लेणीं आहेत तेथें येऊन पोंहोंचलों. हीं टेंकाडें दुरून पुरातन काळीं बांधलेल्या मिसर देशांतील पिरामिडप्रमाणें दिसतात. त्रिंबकअंजनेरी नामक जो डोंगर आहे

त्यावरच ह्या गुहा आहेत. चष्मा हंमेशा घातल्यानें नाकावर ज्याप्रमाणें एक प्रकारची खांच दृष्टीस पडते, तशीच खांच ह्या टेंकाडांकडे दुरून पाहिल्यावर नजरेस येते! आमच्यांपैकीं एका थट्टेखोर मुलानें आजीबाई-कडे पाहून म्हटलें "अहो आजीबाई, तुमच्याप्रमाणें चष्मा घालूनच काहो ह्या डोंगरावर हा असा खळगा पडला?" ह्या खांचेमध्येंच बहुतेक गुहा आहेत. सडकेवरून अर्ध्या मैलाच्या अंतरावर असतांना ह्या गुहा दिसूं लागतात. येथें गाडीवानांपासून दस्तुरी घेण्याकरितां एक चौकी आहे. ह्या स्थळीं गाड्या उभ्या करून आम्ही डोंगर चढूं लागलों. चढण सडकेला लागूनच आहे असें म्हटलें असतां चालेल. सुमारें १०० यार्डांवर चिंचेच्या झाडाखालीं एक मोडकळीस आलेलें थडगें व पाण्याचे हौद आहेत. डोंगर चढण्यास पायवाट आहे. सुमारें २०-२५ मिनिटांनीं आम्ही ज्या भागीं गुहा आहेत त्या भागावर येऊन पोंहोंचलों. ह्या वेळीं ८॥ वाजले होते. येथली चढण कार्लें व कान्हेरीच्या गुहांस जातांना जी चढण लागते तिच्याशीं तुलना केली असतां ह्मणण्यासारखी कांहीं विशेष विशेष नाहीं. लेणीं सडकेपासून ३०० फूट उंचीवर आहेत. ह्या स्थळीं येऊन पोंहोंचल्यावर जो भव्य देखावा दृष्टीस पडतो, तो वर्णन करणें अशक्य होय! लेण्यांकडे पाठमोरें उभें राहिलें म्हणजे उत्तरेकडील रामशेजचे डोंगर दिसतात. ह्याच्या पूर्वेकडे जें शिखर दिसतें त्यांतच जैन लोकांचीं चांभारलेणीं आहेत. गोदावरीच्या भोंवतालीं झाडाझुडपांची गर्द छाया व आम्रवृक्षांची दाटी असल्यामुळें येथून नासिकशहर मुळींच दिसत नाहीं.

येथून गोवर्धन व गंगापुराकडील आमराई आणि पूर्वेकडेस आरोग्य-भुवनांतील १२ बंगले लहानग्या मुंगीप्रमाणें दिसत होते. ह्याच्या बाजूसच रेल्वे लाईन असावीसें समजलें. हिरव्या चार पालवीनें सुशोभित झालेली नागमोडी सडक इ० देखावा इंग्रजीमध्यें ज्याला "बर्ड्स आय व्ह्यू" ह्मणतात तो फार नामी दिसतो. हीं लेणीं डोंगरावर पूर्वेपासून पश्चिमेकडेस आहेत. ह्याच कारणामुळें २००० वर्षेपर्यंत ह्यांच्यावरील लेख व कोरींव काम बहुतेक जसेंच्यातसें राहिलें आहे. इतर लेण्यांप्रमाणें

पाऊस व सूर्यतापामुळें यांचा विध्वंस झालेला नाहीं. एकंदर लेणीं २४ आहेत. अगदीं पश्चिमेकडेस जी गुहा आहे तिजपासून क्रमाक्रमानें नंबर दिलेले आहेत. ह्या गुहा पाहिल्यावर ह्या ज्यांनीं कोरल्या असतील त्यांच्या अचाट कृत्याबद्दल आश्चर्य वाटून मति दंग होऊन जाते ! यांस येथें पांडवलेणीं ह्मणतात व हीं पांडवांनीं कोरलीं ह्मणून समजूत आहे. तथापि या गुहांतून दृष्टीस पडणाऱ्या अनेक कोरींव लेखांच्या आधारें कै. वा. पंडित भगवानलाल इंद्रजी नामक विद्वान् संस्कृतज्ञ गृहस्थांनीं असें सिद्ध करून दाखविलें आहे कीं, सुमारें २००० वर्षांपूर्वी बौद्ध धर्माचा स्थापक सिद्धर्थ याच्या अनुयायांनीं ह्या गुहा त्या पंथाचा धर्मोपदेश करणाऱ्या अनेक साधुसंत, योगियोगिनी यांच्या उपयोगार्थ खोदविल्या असाव्या. ज्या गुहेंत ह्या पंथाचे योगी रहात असत त्यांस त्या वेळीं ‘ लायन् ’ ह्मणत असत. लायन् ह्या शब्दाचा अपभ्रंश होऊन ‘ लेणें ’ हा शब्द निघाला असावा, असें कांहीं भाषाशास्त्रज्ञांचें मत आहे. नंबर १, २ या गुहांमध्यें कंगणीवरील खोदींव काम व पाली लिपींतील कांहीं लेख दृष्टीस पडतात. नंबर १ च्या गुहेंत पावसाळ्यांत पाणी जमत असलें पाहिजे. नंबर २ ची गुहा वशिष्टीचा पुत्र फूलमाईच्या कारकीर्दींत खोदिली, असा लेख आहे. नंबर ३ ची गुहा मोठी पहाण्यासारखी आहे. ही महा-पराक्रमी गौतमी पुत्राच्या मातोश्रीनें खोदविली. जवळच पाण्याचें कुंड आहे. ह्या गुहेचा बाह्यभाग मोठा रमणीय दिसतो. ही गुहा सहा जंगी यक्ष आपल्या खांद्यावर घेऊन कैलासास जात आहेत, असें दाखविलेलें आहे. ह्यांत प्रथमतः ओटी आहे, नंतर एक मोठा दिवाण-खाना व त्या भोंवताली चारी बाजूंस खोल्यांप्रमाणें एकंदर १८ भुयारें आहेत. ह्या गुहेची उंची १०॥ फूट आहे. ह्या गुहेच्या दरवाजा-वर फार सुरेख कोरींव काम आहे. ओटीवर पाली लिपींत कोरलेले लेख आहेत. ही एकंदरीनें पहाण्यासारखी आहे. नंबर ४ च्या गुहेंत भोजनाचें स्थळ असावें. हल्लीं येथें पाणी जमलेलें दिसतें. नंबर ५ व ६ ह्या गुहा लहान आहेत. त्यांच्या बाजूसच थंड पाण्याचीं कुंडें आहेत.

नंबर ६ ही गुहा वीरगृहपती नामक व्यापाऱ्यानें स्वखर्चानें खोदविली, असा लेख आहे. नंबर ७ च्या गुहेंत पूर्वी रहाण्याचें स्थळ होतें. हल्लीं ती जलमय झाली आहे. ही चारी दिशांकडून येणाऱ्या संन्याशांकरितां एका जोगिणीनें करविली. नंबर ८ च्या गुहेस ओटी आहे व दोन भव्य अष्टकोनी खांब आहेत. ही गुहा मृगीदासानें खोदविली, असा इजवर लेख आहे. नंबर ९ ची लहानगी गुहा सोडल्यावर आपण नंबर १० च्या गुहेंत येतों. ही नंबर ३ प्रमाणेंच असून हिजवर प्रेक्षणीय कोरींव नक्षीकाम आहे. हिला ओटी, दिवाणखाना व सभोंवतीं भुयारांप्रमाणें एकंदर १६ खोल्या आहेत. प्रवेश करतांक्षणींच मध्यभागीं जी खोली आहे तींत चैतन्यमूर्ति असून दोहों बाजूंस नृत्य करणाऱ्या स्त्रिया कोरल्या आहेत. हें खोदींव काम पाहिलें ह्मणजे २००० वर्षांपूर्वी स्त्रिया कोणत्या प्रकारचीं भूषणें घालित असत, त्याची कल्पना करितां येते. त्यांचे गळ्यांतील, हातांतील व पायांतील दागिने तर फारच सुरेख दिसतात. ह्या दिवसांत देखील हे अलंकार सोनाराजवळून तयार करवून घेतले तर आपल्या सध्या प्रचारांत असलेल्या दागिन्यांपेक्षांहि हे चांगले दिसतील, असें मला वाटतें! ह्या गुहेंत कोरींव काम पुष्कळच आहे. ह्यांत जी मूर्ति आहे ती भैरवाची मूर्ति आहे, असा कांहींकांचा समज आहे. ह्यावर शेंदूर फांसून त्याची पूजाअर्चा करण्यांत येते. ह्या गुहेंतील लेख चांगल्या स्थितींत असल्यामुळें वाचण्यास अडचण पडत नाहीं. एका ठिकाणीं प्राकृत भाषेंत परंतु पाली लिपींत एक लेख आहे. त्याचा सारांश इतकाच कीं, ही गुहा दिनीकाचा पुत्र जो उशवदत्त त्यानें खोदविली. बाकीच्या सर्व लेखांत उशवदत्ताच्या औदार्याचा उल्लेख केला आहे. नंबर ११ च्या गुहेंत जातांना वर चढावें लागतें. हिच्या आंत जाण्यास नंबर १० तूनहि मार्ग आहे. आह्मी नंबर १० च्या गुहेंतच फराळ करून थोडा वेळ विश्रांति घेतली. बाहेर कडकडीत ऊन पडलें होतें, तरी येथें फारच थंडावा होता. नंबर १२ ची गुहा लहानच आहे. ही रामानक वेलीदत्त नामें एका व्यापाऱ्यानें कोरविली. नंबर १३ व १४ ह्या गुहा नजिकच आहेत. नंबर

१५ मध्यें बुद्धाची मूर्ति आहे. ही अजिंठा व कान्हेरी येथील मूर्तींप्रमाणें कोरलेली आहे. येथें पीठिकेवरील कोरींव काम पहाण्यालायक आहे. नंबर १६ ची गुहा पंधरा फूट उंचीवर कोरलेली आहे. ही पहायास जाणें मुष्किलीचें होतें. परंतु १८८० सालीं मुंबईच्या एका दाणेवाल्या लोहाण्या व्यापाऱ्यानें एक लोखंडी शिडी उभारली आहे. आमच्या मंडळीपैकीं तरुण मंडळीखेरीज करून ही गुहा पहायास जाण्याचें कोणासच धारिष्ट्य झालें नाहीं! येथून बऱ्याच अंतरावर नंबर १७ची गुहा आहे व दोन कुंडें आहेत. ही उत्तरेकडील रहाणार इंद्राग्नीदत्त यानें अर्पण केली ह्मणून लेख आहे. ह्यांतलें कोरींव काम व मूर्ति पाहण्यालायक आहेत. ही पाहिल्यावर आपण नंबर १९ च्या गुहेजवळ येतों. ही मोडकळीस आलेली गुहा आहे. नंबर १८ तून नंबर २० च्या गुहेस रस्ता आहे. ही गुहा १५ फूट उंचीवर असल्यामुळें १९ पायऱ्या चढून तींत प्रवेश करावा लागतो. ही मोठी गुहा असून नंबर ३, १० च्या गुहांप्रमाणेंच पहाण्यासारखी आहे. यांत बुद्धाची १० फूट उचीची एक मूर्ति आहे. ह्या गुहेंतील कोरींव काम सर्वांत उत्तम आहे. दिवाणखान्याच्या भोंवतालीं बसण्याकरितां आसनें आहेत. ही गुहा कोळी जातीच्या गुरवाच्या ताब्यांत असते. बुद्धाच्या मूर्त्तीस शेंदूर व बेगड लावलेली असते. ह्यास धर्मराजाचें देवालय म्हणून समजतात. श्रावण महिन्यांत तिसऱ्या सोमवारीं येथें मोठा उत्सव होत असतो. मूर्तीजवळ नंदादीप जळत असतो. मुलें देण्याबद्दल या धर्मराजाची बरीच ख्याति आहे. नासिकांतील व आजूबाजूच्या खेड्यांतील वांझ स्त्रिया "धर्मराजा देवा, मला मूल होऊं दे, मी तुला नारळ तेल वाहीन." ह्मणून येथेंच नवस करितात. १८८३ सालीं ह्या गुहेंत एका बैराग्यास कोळी लोकांनीं ठार मारलें होतें असें सांगतात. नंबर २१, २२ ह्या गुहांत विशेष पहाण्यासारखें कांहीं नाहीं. नंबर २३ ही गुहा कांहींशी मोठी असून प्रेक्षणीय आहे. ही देखील फुलुमई राजानें दिलेली गुहा होय. ह्यानंतर थोडें चालल्यावर शेवटची ह्मणजे नंबर २४ ची गुहा दृष्टीस पडते. हिच्या शेजारीं दोन कुंडें आहेत.

ह्या २४ गुहांपैकीं मीं वर दर्शविल्याप्रमाणें नंबर ३, १०, २० या गुहाच कायत्या पहाण्यासारख्या असून विस्तीर्ण आहेत. एखादा भरींव डोंगर पाहून तेथें अशा गुहा खोदून त्यावर प्रेक्षकांस थक्क करून सोडण्याजोगें प्रेक्षणीय कोरींव काम केलेलें पाहिलें, म्हणजे आमच्या भरतखंडांत प्राचीन काळीं शिल्पशास्त्र कोणच्या थरास जाऊन पोंचलें होतें, याची बरोबर कल्पना करितां येणेंच अशक्य आहे! पिण्याच्या पाण्याचें कुंड प्रत्येक गुहेपाशीं आहेच आहे, ह्यावरून त्या काळीं जागा पाहून पाणी मिळेल कीं नाहीं, हें शिल्पशास्त्र्यांस अवगत असलें पाहिजे, असें सिद्ध होतें. असल्या २००० वर्षांपूर्वीच्या गुहा पाहिल्या म्हणजे ताजमहाल, रेल्वेचे बोगदे व नद्यांवरील पूल इत्यादिकांचें महत्व विशेष वाटत नाहीं! इतर तमासगिरांप्रमाणें ह्या गुहा आह्मीं पाहिल्या नाहींत. आमच्या मंडळीपैकीं आमच्या वडिलांनीं ह्या गुहेसंबंधानें माहिती अगोदरच मिळविली होती व ती आह्मां सर्वत्रांनां क्रमाक्रमानें ते सांगत गेले. ह्यामुळें कर्मणूकची कर्मणूक होऊन ज्ञान प्राप्त झालें. आर्यभूमींतील आपल्या पूर्वजांनीं उभारलेलीं असलीं अपूर्व कृत्यें व प्रेक्षणीय स्थळें पहाण्याची माझ्या भगिनींस स्फूर्ति झाली तर माझ्या भगिनींकरितां हा जो लेख लिहिला त्याचें साफल्य झालें, असें मी समजेन!

नंबर १० गुहेंत चहा व थोडासा फराळ केल्यावर आह्मी डोंगर उतरलों व ३ वाजण्याच्या सुमारास टांगे हांकारले. नासिकांत पुलावरून गोदावरीचा रमणीय देखावा व तीरावरील असंख्य सुंदर मंदिरें, धर्मशाळा, सतींचीं थडगीं, पंचवटींतील मार्किट इत्यादि पाहून, आदितवारांतील सुंदर नारायणाचें दर्शन घेतल्यावर आह्मीं घरचा रस्ता धरला. आरोग्यभुवनांत पुनः येऊन पोहोंचेपर्यंत आह्मांला ६ वाजले.

सौ० सुमतीबाई नानूजी.

शिवणकाम आणि कशिद्याचीं कामें.

शिवणकामाचीं साहित्यें आणि साधनें.

स्केल अथवा मापण्याचें प्रमाण.

कोणत्याहि मोठ्या वस्तूचें मोजमाप, आकृति काढून दाखविणें असल्यास स्केलनें किंवा मापण्याच्या कोणत्याहि प्रमाणानें दाखविल्यास त्या वस्तूच्या अगदीं खऱ्या आकृतीचा बोध होतो. उदाहरणार्थ वस्तु एक फूट लांब आहे व तिची आकृति ह्या महिलेच्या अंकांत दाखवायाची आहे; तर ती स्केलशिवाय दाखविणें दुरापास्त आहे. कारण महिलेचा अंक ५॥ इंच लांब व ३॥ इंच रुंद आहे. तींत एक फूट लांब खऱ्या आकृतीचें माप कोठून येणार! आकृति काढून ती कोणत्या स्केलनें अथवा प्रमाणानें काढिलेली आहे, येवढें कळल्यास बिनचुक आकृतीचें खरें माप काढितां येतें. महिलेंत यापुढें शिवणकामाच्या येणाऱ्या सर्व आकृति कोणत्याना कोणत्या तरी लहान मोठ्या प्रमाणानें दाखविण्यांत येणार आहेत, ह्मणून ही स्केलची अथवा मापण्याच्या प्रमाणाची थोडीशी माहिती देत आहें.

तीन इंच=एक फूट ह्मणून स्केलची जी आकृति काढिलेली आहे, ती लक्ष्य देऊन पहावी, ह्मणजे कळून येईल कीं, तीन इंचांचे बरोबर १२ भाग केलेले आहेत. त्या बारा भागांपैकीं प्रत्येक भाग एक इंच समजावा. ह्मणजे १२ भाग १२ इंच किंवा एक फूट समजावा. उदाहरणार्थ तीन इंच=एक फूट ह्याच प्रमाणानें, १॥ फूट लांबीची आकृति ४॥ इंचांत दाखवावी; कारण एक फूट ह्मणजे ३ इंच व अर्धा फूट ह्मणजे १॥ इंच मिळून ४॥ इंच ह्मणजे १॥ फूट समजावा.

स्केलची दुसरी आकृति दोन इंच=एक फूट आहे. अर्थात् दोन फूट लांबीची आकृति दाखविणें असल्यास ४ इंचांत दाखवावी. कारण १ फूट ह्मणजे दोन इंच, तेव्हां अर्थात् २ फूट ह्मणजे ४ इंच झाले. तसेंच २॥ फूट ह्मणजे ५ इंच झाले. येथें अर्धा फूट ह्मणजे १ इंच समजावा.

ह्यावरील स्केलच्या रीतीनें वाटेल तेवढ्या मोठ्या आकृतीचें माप लहान आकृतींत दाखवितां येतें व तें अगदीं बिनचुक असतें. तीन इंच व दोन इंच ह्यांचेंहि खरें माप निरनिराळ्या दोन आकृतींत दाखविलेलें आहे. ज्या स्केलनें किंवा प्रमाणानें माप घेणें असेल तें स्केल देऊन, शिवण-कामासाठीं ह्मणून घेतलेल्या निरनिराळ्या तुकड्यांची लांबी रुंदी त्या प्रमाणानें देत जाईन, ह्मणजे त्यावरून मोठ्या प्रमाणांत ते तुकडे सहज कापतां येतील. संवईनें स्केलवरून मापें घेण्यास कसलीच अडचण पडणार नाहीं. कारण त्यांत बाऊ वाटण्यासारखें किंवा न समजण्यासारखें कांहीं नसून त्याशिवाय तर गत्यंतरच नाहीं.

सौ० कृष्णाबाई तालचेरकर.

नवलविशेष.

भोपाळच्या नवाब शहाजहां बेगमसाहेब व त्याचप्रमाणें त्रावणकोरच्या माजी महाराणीसाहेब या राजपत्न्यांचे शोककारक मृत्यु या महिन्यांत घडले, याबद्दल महिलेला अत्यंत दुःख होतें. या उभय राजस्त्रिया मोठ्या मुत्सद्दी व प्रजापालनाविषयीं दक्ष असल्याबद्दल त्यांची ख्याति होती. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांति देवो.

***

मुंबईतील प्रसिद्ध श्रीमान् भाटे गृहस्थ लक्ष्मीदास खिमजी यांनींहि गेल्या महिन्यांत परलोकीं प्रयाण केलें. हे उदार गृहस्थ स्त्रीशिक्षणाचे मोठे कैवारी होते. आपल्या ज्ञातीची उन्नति करण्याविषयीं यांनीं बरेंच परिश्रम केले आहेत. यांच्या स्मारकार्थ भाटेज्ञातींतील स्त्रियांसाठीं एक फुकट सुतिकागृह स्थापन करण्याचें ठरलें आहे व त्यासाठीं यांचे चिरंजीवांनीं ७० हजार रुपये खर्चिण्याचें योजिलें आहे. या थोर पुरुषाचें अशा रीतीनें कायमचें नांव राहील ही मोठी संतोषाची गोष्ट होय.

***


गेल्या फाल्गुन वद्य ४ थीला अहमदनगर येथें जो विवाह होऊन दुसऱ्याच दिवशीं नवरा निवर्तल्यामुळें वधूवर दुर्धर प्रसंग आला होता त्या वधूचें गेल्या ज्येष्ठ वद्य ८ मीला पुणें येथें रा. रा. देवधर या नांवाच्या एका होतकरू तरुणानें पाणिग्रहण केलें, हें ऐकून महिलेच्या सर्व भगिनींस मोठें समाधान वाटणार आहे. मुलीच्या पालकांपेक्षां देवधर यांनींच या बाबतींत विशेष मानसिक धैर्य प्रकट केलें व एका निरपराध गरीब गाईचा उद्धार केला, याबद्दल ते खरोखर प्रशंसेस पात्र आहेत.

***


नासिक येथें स्त्रिया व लहान मुलांकरितां स्थापन झालेल्या आरोग्यभुवनास नामदार लेडी नार्थकोट—आमच्या दयाळु गव्हर्नरीणबाई यांनीं नुक्तीच एक बरीच मोठी देणगी दिली. गव्हर्नरीणबाईच्या या औदार्याबद्दल त्यांची प्रशंसा करावी तितकी थोडीच आहे.

***

आमचे गव्हर्नर नामदार लॉर्ड नॉर्थकोट यांच्या अध्यक्षतेखालीं प. लो. वासी नामदार न्यायमूर्ति रानडे यांच्या स्मारकासाठीं जुलई महिन्याच्या ९ व्या तारखेस येथें टाउन हॉलांत एक जाहिर सभा भरावयाची आहे. त्याचप्रमाणें येथील लेडीज सोशल क्लबाचे मार्फतीनें याच गोष्टीसाठीं स्त्रियांचीहि एक जंगी जाहिर सभा लवकरच भरावयाची आहे हें कळविण्यास महिलेस पराकाष्ठेचा आनंद होत आहे.




चीर नाकी सुई.




गोल नाकी सुई.

(पृष्ट ९२पहा)




तीन पदरी रिलीचें सूत.




चार पदरी रिलीचें सूत.


(पृष्ट १२९ पहा.)



कशीद्याची कातर.



सर्वसाधारण कामाची कातर.




कापड बेतण्याची कातर.


(पृष्ठ १४० पहा)



पोकळ पेटीची
इस्त्री.




भरींव सपाट
इस्त्री.



भरींव बांकी
इस्त्री.


(पृष्ट २३८ पहा)

३ इंच = १ फूट




३ इंच


२ इंच = १ फूट



३ इंच.



२ इंच.



पृष्ठ २८२ पहा

चित्रोचेजक प्रेस मुंबई.